# लोकलेखा समिती

# (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या महसुली जमा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३) यावरील**

# सोळावा अहवाल

सत्यमेव जयते

( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक        मार्च, २०१७ रोजी सादर करण्यात आला. )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
मार्च, २०१७

# लोकलेखा समिती

# (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या महसुली जमा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३) यावरील**

# सोळावा अहवाल

एचबी ३१४९–१

**लोकलेखा समिती**
**२०१५-२०१६**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.
(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.
(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.
(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.
(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.
*(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.
*(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे, २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.
(३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(५) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव.
(६) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.
(७) श्री. सो.न.सानप, अवर सचिव.
(८) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.
(९) श्री. रवींद्र म.मेस्त्री, कक्ष अधिकारी.

---

* श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१७ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

** श्री. माणिकराव ठाकरे , वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट २०१७ रोजी उप सभापती , विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

## लोकलेखा समिती

## २०१२-२०१३

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.

क- (७) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै २०१३ रोजीपासून)

(८) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

ख- (९) श्री. संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून २०१३ रोजीपर्यंत)

ग- (१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून २०१३ रोजीपर्यंत)

घ- (११) श्री. ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी २०१३ रोजीपर्यंत)

११अ) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजीपासून ते दिनांक २२ मार्च २०१४ पर्यंत)

(१२) श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.

च- (१६) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. (दिनांक २३ मे २०१४ रोजीपर्यंत)

(१७) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.

(१८) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.

छ (२१) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. (दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजीपर्यंत)

(२१अ) श्री. संजय दत्त, वि.प.स. (दिनांक १४ जुलै २०१४ रोजीपासून)

ज- (२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स. (दिनांक १२ मार्च २०१४ रोजीपर्यंत)

(२२अ) प्रा.जनार्दन चांदूरकर, वि.प.स. (दिनांक १४ जुलै २०१४ रोजीपासून)

(२३) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

झ-(२४) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. (दिनांक ६ फेब्रुवारी २०१४ रोजीपर्यंत)

(२४अ) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. (दिनांक ७ फेब्रुवारी २०१४ रोजीपासून)

ट-(२) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. (दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजीपर्यंत)

**निमंत्रित**

ठ-(२६) श्री. दिवाकर रावते, वि.प.स. (दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ रोजीपर्यंत)

(२६अ) श्री. विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर २०१२ रोजीपासून ते २७ मे २०१४ रोजीपर्यंत)

ड-(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स. (दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजीपर्यंत)

(२७अ) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (दिनांक १४ जुलै २०१४ रोजीपासून)

सदरहू समिती दिनांक ३१ मे २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.

(३) श्री. सु.सा.गायकवाड,वित्तीय सल्लागार.

(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(५) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(६) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

(७) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

(८) श्री. कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

(क) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.

(ख) श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ग) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

(घ) श्री. ए. टी. पवार, वि.स.स. यांचे जागी मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजी नामनियुक्ती केली व दिनांक २२ मार्च २०१४ रोजी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

(च) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. हे लोकसभा सदस्य म्हणून निवडून आल्याने त्यांनी दिनांक २३ मे २०१४ रोजी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

(छ) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजीपासून सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ज) श्री. सुरेश नवले, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजीपासून सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(झ) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांचे जागी मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ६ फेब्रुवारी २०१४ रोजी नामनियुक्ती केली.

(ट) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ठ) श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर २०१२ नामनियुक्ती केली व श्री. विनायक राऊत, वि.प.स. हे लोकसभा सदस्य म्हणून निवडून आल्याने त्यांनी दिनांक २७ मे २०१४ रोजी आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

(ड) श्री. मनिष जैन, वि.प.स. यांनी दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या महसुली जमा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी सबंधित (परिच्छेद क्र. ४.३) यावर विचार करून लोकलेखा समितीचा सोळावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १५ व २२ जुलै २०१४ दिनांक २० व २७ ऑक्टोबर २०१५ तसेच दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ रोजी अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल), प्रधान सचिव, नगरविकास, ग्रामविकास, जलसंपदा, पर्यावरण तसेच सचिव, जलसंपदा (लाक्षेवि), मदत व पुनर्वसन विभाग, तसेच दिनांक ११ व १२ सप्टेंबर २०१५ रोजी परिच्छेद क्र. ४.३ संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांचे समवेत लवासा लेक सिटी, पुणे येथे समितीने बैठक घेतली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक, महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररीत्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली माहिती परिशिष्ट “अ” प्रमाणे असून सदर माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “ब” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०१६ तसेच ६ डिसेंबर २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून दिनांक १ मार्च २०१७ प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर,
दिनांक १ मार्च २०१७.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

**अनुक्रमणिका**


| अ. क्र. (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | सात |
| (१) | महसूल व वन (महसूल) विभाग (परिच्छेद क्र. ४.३) | १ |

## महसूल व वन (महसूल) विभाग

### लवासा, पुणे येथे थंड हवेच्या ठिकाणाचा विकास

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २०१०-२०११ च्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ४.३ **"लवासा, पुणे येथे थंड हवेच्या ठिकाणाचा विकास"** यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

**"थंड हवेच्या ठिकाणासदृष्य क्षेत्र शोधण्यात आणि प्रकल्प विकासकाच्या निवडीत पारदर्शकतेचा अभाव"**

विनियमात, प्रकल्प प्रस्ताविकाने प्रकल्प स्थळी पायाभूत सुविधा पुरवाव्या, कुठल्याही मर्यादेशिवाय शेतजमीन खरेदी करण्यास परवानगी द्यावी, उद्योगाचा दर्जा मिळावा, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींच्या अंतर्गत आवश्यक असणाऱ्या बिगर शेती परवान्याची आवश्यकता ठेऊ नये अशा तरतुदी होत्या. खाजगी सहभागातून थंड हवेच्या ठिकाणासदृष्य क्षेत्रांचा विकास करण्याचे व्यापक उद्दीष्ट्य आणि सदर उद्दीष्ट्य गाठण्यासाठी खाजगी भागीदाराला दिलेल्या अगणित सवलती आणि सुविधा लक्षात घेता, राज्यभरात क्षेत्रांचा विकास करण्यासाठी राज्य शासनाने सुसाध्यता अहवालाचा अभ्यास घेणे आणि खाजगी संस्थांच्या सहभागाचे प्रमाण वाढविण्यासाठी धोरण/विनियम यांना व्यापक प्रसिद्धी देण्याची खात्री करणे अत्यंतिक गरजेचे होते.

अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की,

- थंड हवेची ठिकाणे विकसित करता येऊ शकतील अशी क्षेत्रे निवडण्यासाठी कुठल्याही तज्ञाकडून अभ्यास किंवा सर्वेक्षण केल्याशिवाय शासनाने विशेष विनियम तयार केल्याचे दिसून आले. जैव संवेदनक्षमता, पर्यावरणीय अनुरूपता, स्थानिक लोक आणि त्यांच्या राहणीमानाला हानिकारक ठरणारी बांधकामे इत्यादी मुद्द्यांचा अंतर्भाव असलेल्या सुसाध्यता अहवालाची विनियमात तरतुद केली गेलेली नाही. त्याचप्रमाणे, हा प्रकल्प करण्यात रस असल्याचे दर्शवणारी आवेदने मागवून पारदर्शीपणे विकासकाची निवड करण्यासाठी कुठलीही पद्धती विनियमात विहित केलेली नाही.

- नगरविकास विभागाने राज्यात लवासा प्रकल्पासमवेत ज्या सहा थंड हवेच्या स्थळांच्या विकास प्रकल्पांना मंजुरी दिली होती ते सर्व प्रकल्प पुणे जिल्ह्यातील होते. अशाप्रकारे, राज्याच्या इतर जिल्ह्यात थंड हवेच्या स्थळांचा समदर्शी विकास होण्यासाठी नियोजन केले नव्हते आणि हा निर्णय घेताना फक्त प्रकल्प विकासकांचे हित लक्षात घेतले होते. अशाप्रकारे राज्यात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ किंवा मराठवाडा या क्षेत्रात विकासाची क्षमता असतानाही अशा ठिकाणी थंड हवेची इतर क्षेत्रे विकसित करण्याचे उत्तरदायित्व शासन पूर्ण करू शकले नाही.

- नोव्हेंबर १९९७ मध्ये पुणे जिल्ह्यासाठी प्रादेशिक आराखड्याला नगरविकास विभागाने मान्यता दिल्यानंतर मे. ॲक्वालँड (इंडिया) लि. आणि मे. पर्ली ब्लू लेक रिसॉर्टस प्रा.लि. या दोन खाजगी कंपन्यांनी अनुक्रमे जानेवारी आणि मार्च २००० मध्ये पुणे जिल्ह्यातील मुळशी आणि वेल्हे तालुक्यांतील १८ गावांमध्ये थंड हवेच्या ठिकाणाचा विकास करण्यासाठी परवानगी घेण्यासाठी शासनाशी संपर्क साधला. ही ठिकाणे या आधी वनीकरणासाठी राखीव ठेवलेली असतानाही, मार्च २००० आणि जून २००० मध्ये त्या विशिष्ट १८ गावांसाठी मे. पर्ली ब्लू लेक रिसॉर्टस प्रा.लि. यांनी केलेल्या विनंतीच्या आधारे, विभागाने, जून २००१ मध्ये ही १८ गावे थंड हवेची ठिकाणे विकसित करण्यासाठी योग्य असल्याचे घोषित केले. नगरविकास विभागाच्या टिप्पणीवरून असे निदर्शनास आले की, १००० मीटर्सपेक्षा कमी उंचीवरील ठिकाणासाठी भारत सरकारची अनुमती आवश्यक नसल्याने मे. पर्ली ब्लू लेक रिसॉर्टस प्रा.लि. यांनी त्यांचे प्रकल्प क्षेत्रे त्या मर्यादेतच ठेवले होते. जून २००१ मध्ये मे पर्ली ब्लू लेक रिसॉर्टस प्रा.लि. च्या या प्रकल्पास नगरविकास विभागाने मान्यता दिली. मे. ॲक्वालँड (इंडिया) लि. ऐवजी मे. पर्ली ब्लू लेक रिसॉर्टस प्रा.लि. चा प्रकल्प निवडण्यामागची कारणे अभिलेख्यात उपलब्ध नव्हती. नगरविकास विभागाने दिलेल्या मंजुरीनुसार १००० मीटर्सपेक्षा जास्त उंचीवर बांधकामे करण्यासाठी पर्यावरण आणि वन मंत्रालयाची (MOEF) परवानगी आवश्यक असल्यामुळे १००० मीटर्सपेक्षा जास्त उंचीवरील क्षेत्रात बांधकामे केली जाऊ नये अशाप्रकारच्या काही अटींवर संबंधित गावांमध्ये बांधकामे करायची होती आणि MOEF च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पर्यावरण प्रभाव निर्धारण अहवाल (EIA) तयार करायचा होता आणि GOM च्या ED कडून मान्यता प्राप्त करायची होती.

प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी एजन्सीची निवड करताना प्रकल्पात रस असल्याचे दर्शविणारे आवेदन न मागवल्यामुळे आणि LCL ने दिलेल्या जमीन/प्रकल्प प्राधान्याला एकतर्फी मान्यता देण्यामुळे निवडप्रक्रियेत पारदर्शकता राहिली नाही. त्याचप्रमाणे ही जमीन वनीकरणासाठी राखीव असतानाही या जमीनीवर प्रकल्प विकासकाच्या विनंतीवरून थंड हवेचे ठिकाण विकसित करण्यास परवानगी देणेही अनियमित होते.

निर्गमन परिषदेत नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी नमूद केले (ऑक्टोबर २०११) की, थंड हवेचे ठिकाण विकसित करण्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रकल्पास मान्यता दिली होती आणि त्यासाठी निविदा जारी करण्याची अथवा प्रकल्पात रस असल्याबद्दलचे आवेदन मागवण्याची आवश्यकता नव्हती.

हे उत्तर मान्य करता येत नाही कारण हा राज्यातील यासारखा पहिलाच प्रकल्प आहे. म्हणूनच जागेची त्याचप्रमाणे विकासकाची निवड ही व्यापक प्रसिद्धी देऊन आणि पारदर्शकतेनेच करावयास हवी होती.

**ज्ञापन :—**

**१.२** उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यामध्ये पूर्वीपासून अस्तित्वात असलेली गिरीस्थाने वगळता अलिकडील काळात नव्याने गिरीस्थाने विकसित झालेली नाहीत. त्यामुळे खाजगी सहभागातून अशा प्रकारची गिरीस्थाने विकसित करणे शक्य व्हावे याकरिता शासनाने सन १९९६ मध्ये गिरीस्थान विकसनासाठीची विशेष नियंत्रण नियमावली तयार करून ती, त्यावेळी मंजूर असलेल्या राज्यातील विविध प्रादेशिक योजनांमध्ये अंतर्भूत करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) अन्वये जनतेच्या हरकती व सूचनांसाठी प्रसिद्ध केली होती. सदरची सूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आली होती व त्यास वर्तमानपत्रांच्या माध्यमातूनदेखील व्यापक प्रसिद्धी देण्यात आली होती. त्यास अनुसरून प्राप्त झालेल्या हरकतींचा व सूचनांचा विचार करून दिनांक २६ नोव्हेंबर १९९६ च्या अधिसूचने अन्वये कलम २० (४) अन्वये सदर नियमावली अंतिमतः अशा मंजूर प्रादेशिक योजनांच्या नियमावलींमध्ये समाविष्ट करण्यात आली.

तद्नंतर दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ रोजी पुणे प्रदेशाची प्रादेशिक योजना मंजूर करताना सदर नियमावली प्रादेशिक योजनेवर निर्देशित केलेल्या गिरीस्थानासाठी आणि अशा प्रकारे भविष्यात घोषित करण्यात येणाऱ्या गिरीस्थानांसाठी लागू करण्यात आलेली आहे.

अन्य गिरीस्थान घोषित केलेल्या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.३०४१/१९९७ मध्ये दिनांक ४ डिसेंबर १९९८ रोजी निर्णय देताना मा.न्यायालयाने परिच्छेद क्र.३० मध्ये शेवटी खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

" Considering all these aspects, in our opinion, it cannot be said that the notifications were issued *mala fide* or with a view to confer benefit upon Sahara. Any developer has to carry out the development within the parameters identified and approved."

गिरीस्थानाविषयी शासनाचे धोरण सदर नियमावलीच्या अनुषंगाने अंमलात आल्यानंतर यामध्ये सन २००१ मध्ये कायदेशीर तरतुदींचे पालन करून खालील दोन बदल करण्यात आले :—

(अ) दोन गिरीस्थानांमधील १५ कि.मी. एवढे किमान अंतर सोडण्याचे बंधन काढण्यात आले.

(ब) प्रकल्पाच्या कमाल क्षेत्रावर असलेले २००० हेक्टरचे बंधन काढण्यात आले.

सदर नियमावली ही प्रादेशिक योजनेमध्ये गिरीस्थान म्हणून निर्देशित केलेल्या क्षेत्रास लागू होते. गिरीस्थान विकसनासाठी उपयुक्त असणारे क्षेत्र शासन स्वतःहून अथवा शासनाच्या निदर्शनास आणल्यानंतर, त्यावर संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आवश्यक ती पडताळणी करून घेऊन, कलम २० अन्वये फेरबदल करून नकाशावर गिरीस्थान म्हणून उपयुक्त क्षेत्र म्हणून निर्देशित करू शकते. असे निर्देशन केल्यानंतर या क्षेत्रामधील किमान ४०० हेक्टर जमीन धारण करणारे एक किंवा अनेक प्रकल्प विकासक, गिरीस्थान नियमावलीतील नियम क्र.१ अन्वये शासनाकडे अर्ज करू शकतात. अशा प्राप्त अर्जांची तपासणी करून सुयोग्य क्षेत्र संबंधित अर्जदाराकरिता नियमातील अटीस अधीन राहून गिरीस्थान म्हणून घोषित करण्यात येते. गिरीस्थान म्हणून उपयुक्त क्षेत्रात किमान ४०० हे. क्षेत्र धारण करणारा विकासकच वरीलप्रमाणे गिरीस्थान विकसित करण्यासाठी अर्ज करू शकत असल्याने त्यासाठी अन्यजणांकडून स्वारस्य पत्रांची मागणी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सद्यःस्थितीत आतापर्यंत शासनाने मे. लवासा कॉर्पोरेशन लि., मे. सहारा इंडिया कमर्शियल कॉर्पोरेशन लि. व मे. ॲक्वालॅंड प्रा. लि. अशी एकूण तीन गिरीस्थाने नियम १ अन्वये घोषित केलेली आहेत. गिरीस्थान विकसनासाठी पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी व वेल्हे तालुक्यांमधील क्षेत्राची भौगोलिक संरचना व समुद्रसपाटी पासूनची उंची ही गिरीस्थान विकसनासाठी अनुकूल असल्याने तसेच या क्षेत्रांची पुणे शहर व मुंबई यांचेशी असलेले सानिध्य यामुळे असे प्रकल्प प्राधान्याने पूर्णे जिल्ह्यामध्ये येत आहेत. अशा प्रकल्पांकरिता शासनातर्फे जागावाटप करण्यात येत नसल्याने गिरीस्थान प्रकल्पांच्या कार्यान्वयनासाठी जागा मालकांच्या व्यतिरिक्त अन्य एजन्सीजकडून आवेदने मागविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**पर्यावरणीय / मंत्रालयाच्या मान्यतेशिवाय प्रकल्पाला दिलेली परवानगी आणि प्रकल्पक्षेत्रात केलेली वाढ**

एप्रिल १९९९ मध्ये GOM ने पर्यटन हा उद्योग असल्याचे घोषित केले आणि जुलै १९९९ मध्ये पर्यटन कार्यक्रमात थंड हवेच्या ठिकाणांच्या विकासाचा समावेश केला. मुंबई कुळ वहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ (BTAL) या अधिनियमाच्या कलम ६३-I अ (II) मधील दुरुस्तीनुसार प्रकल्प प्रस्ताविकांनी प्रस्तावित केल्यानुसार प्रत्यक्ष औद्योगिक कारणासाठी जमीन खरेदी करण्याची परवानगी प्रदान करण्याचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग) यांना देण्यात आले होते. त्यानुसार, (BTAL) मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९४८ या अधिनियमाच्या,

अंतर्गत ६६७१.०६ हेक्टर्स (डिसेंबर २००२ मध्ये ४००० हेक्टर्स आणि नोव्हेंबर २०१० मध्ये २६७१.०६३३ हेक्टर्स) शेतजमीन खरेदी करण्यास उद्योग संचालनालयाने परवानगी दिली. जल अधिनियम, वायू अधिनियम यातील तरतुदी आणि हानिकारक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम यातील तरतुदींच्या प्राधिकारात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) या प्रकल्पाला " ना-हरकत प्रमाणपत्र " प्रदान केले (मे २००२). १८ मार्च २००४ ला ED ने मान्यता दिली. MRTP अधिनियमाच्या विभाग ४०(१) (ब) अंतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या जमीनीसाठी UDD ने महामंडळाला SPAघोषित केले (जून २००८).

अभिलेख्यांच्या छाननीत असे दिसून आले की, नोव्हेंबर १९९६ मध्ये निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या नियम क्र. २ ला अनुसरून UDD ने प्रारंभी ४०० हेक्टर आणि २००० हेक्टर या दरम्यान क्षेत्र विकासासाठी निश्चित केले होते. मे २००१ मध्ये नियमातील दुरुस्तीद्वारे UDD ने सदर कमाल मर्यादेचे बंधन काढून टाकले आणि अशाप्रकारे कुठल्याही प्रकल्पांतर्गत विकास केला जाऊ शकेल अशा एकूण क्षेत्रावर कुठलाही निर्बंध राहिला नाही.

डोंगराळ प्रदेश भौगेलिकदृष्ट्या आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनक्षम असल्याने आणि त्यांच्या विकासात सामाजिक-आर्थिक परिणाम दडलेले असल्याने या मुद्दयांच्या अभ्यासपूर्ण अहवालांच्या आधारावर थंड हवेच्या ठिकाणाच्या विकासासाठीची मंजुरी UDD ने ED आणि IE & LD यांच्याबरोबर विचारविनिमय केल्यानंतर द्यावयास हवी होती. या प्रकल्पामुळे होणारे दूरगामी परिणाम लक्षात घेता त्याकरिता मंत्रिमंडळाची मान्यता देखील आवश्यक होती. परंतु अशा अहवाल बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले होते.

**ज्ञापन :—**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

गिरीस्थानासाठीच्या विशेष विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.२१ नुसार अशा प्रकल्पामुळे पर्यावरणाला कोणत्याही प्रकारचा धोका उत्पन्न होणार नाही, याची दक्षता घेणे बंधनकारक आहे. लवासा प्रकल्पास नियम क्र. २१ अन्वये दिनांक २७ जून २००१ रोजीच्या पत्राद्वारे गिरीस्थान म्हणून प्रारंभिक तत्त्वतः मंजुरी देताना अट क्र.(ब) अन्वये सदर प्रकल्पाचा पर्यावरणावर आघात मूल्यांकन अहवाल केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने निश्चित केलेल्या निकषानुसार तयार करून त्यास पर्यावरण विभागाची मान्यता घेणे, अशा आशयाची अट विहित करण्यात आली होती.

**LCL ला विशेष नियोजन प्राधिकाऱ्याचा दर्जा देणे शासनाच्या भूमिकेचे सौम्यिकरण आणि अनावश्यक अनुग्रह**

सन २००२ मध्ये राज्य शासनाने MRTP अधिनियम, १९६६ च्या विभाग ४० मध्ये उपवाक्य १(ब) जोडले. ज्यानुसार कुठल्याही अधिसूचित क्षेत्रासाठी अधिकृत राजपत्रात अधिसूचना देऊन राज्य शासन कुठल्याही एजन्सीला किंवा शासन आदेशाद्वारे स्थापन केलेल्या प्राधिकरणाला किंवा राज्य किंवा केंद्रीय कायद्यांच्या अंतर्गत किंवा त्याद्वारे प्रस्थापित झालेल्या कंपनी अथवा महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकारी (SPA) म्हणून नेमणूक करू शकत होते.

जानेवारी २००७ मध्ये लवासा येथे बैठक घेतली गेली, ज्यामध्ये LCL चे पदाधिकारी, मुख्यमंत्री, केंद्रीय कृषीमंत्री, राज्याचे पाटबंधारे मंत्री, मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव आणि इतर अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. सरकारकडून आराखड्यांना मंजुरी मिळण्याची प्रक्रिया लांबलचक असून त्यामुळे प्रकल्पास विलंब होईल या सबबीवर LCL ने त्यांना SPAम्हणून नियुक्त करण्याची विनंती बैठकीमध्ये केली. प्रतिसादादाखल, शासनाकडून कमीतकमी नियंत्रण ठेवण्याचे त्यांचे मत असल्याचे आणि म्हणूनच या प्रकल्पांसाठी, SPAम्हणून नियुक्त करण्याची विनंती बैठकीमध्ये केली. प्रतिसादादाखल, शासनाकडून कमीतकमी नियंत्रण ठेवण्याचे त्यांचे मत असल्याचे आणि म्हणूनच या प्रकल्पांसाठी, SPAम्हणून, मोठ्या प्रकल्पांच्या प्रवर्तकांची नेमणूक करण्याची शक्यता असल्याचे त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी सूचित केले. त्यानंतर, LCL ने मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेली शक्यता UDD च्या निदर्शनास आणून दिली आणि त्यांना SPAम्हणून नियुक्त करण्याच्या विनंतीचा पुनरुच्चार केला (फेब्रुवारी २००८). या विनंतीच्या आणि MRTP अधिनियम, १९६६ च्या विभाग ४० च्या उप विभाग १(ब) अनुसार, LCL ची SPAम्हणून नियुक्ती करण्यासाठी UDD ने जून, २००८ मध्ये अधिसूचना काढली. अधिसूचनेतील एका अटीनुसार SPAची कर्तव्ये आणि कार्य पार पाडण्यासाठी एक समिती गठित करावयाची होती.

UDD आणि नगररचनेचे सहायक संचालक (ADTP), पुणे, यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांच्या छाननीत असे आढळून आले की, SPAचे गठन, अधिकारांचे प्रत्यायोजन आणि कामकाज यामध्ये अनियमितता होत्या ज्याबद्दल खाली चर्चा करण्यात आली आहे.

- LCL ही, कंपनी अधिनियम, १९५६ साली नोंदणीकृत झालेली प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असून अशा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला SPAम्हणून नियुक्त करण्यासाठी न्यायालयात याबाबतीत एक रिट याचिका प्रलंबित आहे.

■ MRTP अधिनियम, १९६६, नुसार विकास प्राधिकाऱ्यांच्या (DA) संदर्भातील प्रकरण VI च्या तरतुदी SPAला देखील लागू करायच्या होत्या, सदर अधिनियमाच्या प्रकरण VI अंतर्गत एक नवीन नगर विकास प्राधिकरण गठीत करायचे होते आणि राज्य शासनाने त्याच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर सर्व सदस्यांची नियुक्ती करायची होती. या अधिनियमांतर्गत नियोजन प्राधिकाऱ्यांना असलेले सर्व अधिकार DA ला असणार होते आणि त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या त्यांना पार पाडायच्या होत्या. DA चे अधिकार मर्यादित ठेवण्यासाठी अशा एखाद्या DA ला राज्य शासन निर्देश देऊ शकत होते.

■ सप्टेंबर २००८ मध्ये LCL ने एका निर्णयाद्वारे, नगररचना संचालक, पुणे (DTP, पुणे) यांच्यासह १० सदस्यांची एक समिती गठीत केली ज्या समितीला SPAसमिती म्हणून संबोधण्यात येणार होते. समितीमधील जास्तीत जास्त सदस्य हे हिंदुस्थान कंन्स्ट्रक्शन कंपनी (HCC) मधील होते. जीची LCL ही अंगीकृत (Subsidiary) कंपनी असून त्यामध्ये या मूळ कंपनीचे जास्तीत जास्त भागभांडवल होते असे आढळून आले. HCC च्या नियोजन विभागाच्या प्रमुखांना SPAचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात आले होते. SPAचे प्रमुख या नात्याने LCL च्या सर्व विकास प्रकल्पांसाठी ते बांधकाम विनियमन एजन्सी म्हणून काम बघतात. MRTP अधिनियम, १९६६ च्या प्रकरण VI चे उल्लंघन SPAसमितीमधील शासनाचे प्रतिनिधीत्व एका सदस्यापुरते (नगररचना संचालक) मर्यादित ठेवण्याची UDD ने जून २००८ मध्ये जारी केलेल्या अधिसूचनेतील ही अट या परिस्थितीस कारणीभूत ठरली.

अशाप्रकारे, लवासा प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने केलेल्या व्यवस्थेमुळे राज्याच्या आणि त्यातील जनतेच्या हिताची जपणूक झाली नव्हती. अशाप्रकारे, कुठल्याही सरकारी नियंत्रणाशिवाय LCL ला SPAचा दर्जा देण्यात आल्याने अनियमितता, हितसंबंधातील मतभेद यांना वाव मिळाला आणि शासनाच्या थंड हवेच्या ठिकाणांच्या विकासाच्या धोरणाच्या उद्दीष्टानुसार थंड हवेच्या ठिकाणांच्या विकासासाठीही ते सहाय्यभूत ठरले नाही.

फक्त एक शासकीय सदस्य असलेल्या या समितीतील निर्णय प्रक्रिया ही मताधिक्क्याद्वारे पूर्ण होत असल्याने प्रकल्पाच्या नियोजन आणि मंजुरीमध्ये शासनाचा सहभाग अत्यल्प राहिला. SPAकडून तयार करण्यात येत असलेल्या आराखड्यांचा समाजकल्याण, पर्यावरण इ. अनेक संबंधित मुद्यांवर परिणाम होणार असल्याने त्यास शासनाचा संपूर्ण सहभाग आवश्यक होता. तथापि, प्रकल्प आणि त्यांच्या अंमलबजावणीवरील स्वतःचे नियंत्रण सोडून देणे शासनाने पसंत केले.

LCL या प्रकल्प विकासकाला SPAचा दर्जा देण्यामुळे आणि प्रकल्पावरील शासकीय संनियंत्रणाच्या अपहारामुळे विकासकाला निष्कारण लाभ देण्यात आला आणि आजपर्यंत राज्यामध्ये कधीही यासारखी घटना घडलेली नव्हती.

LCL ची SPAम्हणून केलेली नियुक्ती आणि MRTP अधिनियम, १९६६ मधील SPAचा दर्जा देण्याबाबतच्या तरतुदींचा आढावा घेण्यात येत आहे आणि त्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल असे निर्गमन परिषदेत UDD च्या प्रधान सचिवांनी नमूद केले (ऑक्टोबर २०११).

**ज्ञापन :—**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० मध्ये सन २००२ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

"(1B) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), the State Government may, by notification in the *official Gazette*, appoint any agency or authority created by or in accordance with Government order or instrument, or any company or corporation established by or under any State or Central law, to be the Special Planning Authority for any notified area."

उपरोक्त तरतुदीनुसार राज्याच्या अथवा केंद्राच्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापित झालेल्या कोणत्याही कंपनीस विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून नियुक्त करता येते. याच तरतुदीनुसार सन २००८ मध्ये काही अटींसापेक्ष, मे. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड या नोंदणीकृत कंपनीस SPAम्हणून नियुक्त करण्यात आले आहे. अशा SPA चे नियोजन प्रस्ताव अंतिमतः शासनाकडेच कलम ११५ अन्वये मान्यतेस प्राप्त होतात. अशा मंजूर नियोजन प्रस्तावांमधील इमारत बांधकाम परवानगी व अन्य तत्सम परवानगी देण्यामध्ये कालापव्यय होऊ नये तसेच प्रकल्प प्रवर्तकास गिरीस्थानाच्या कार्यान्वयनाबाबतचे स्वातंत्र्य असावे यादृष्टीकोनातून सदर कंपनीची SPA म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या SPA च्या समितीमध्ये संचालक, नगररचना हे एकमेव शासननियुक्त सदस्य असले तरीदेखील त्यांचा सल्ला SPA च्या समितीने विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे SPA ने दिलेली प्रत्येक बांधकाम परवानगी दर तीन महिन्यांनी सहायक संचालक, नगररचना, पुणे शाखा यांच्या निदर्शनास आणणे बंधनकारक आहे आणि यामध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास अशा बार्बीवर जिल्हाधिकारी हे कारवाई करू शकतील, अशा आशयाची अट विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे याद्वारे शासनाने SPA वर आवश्यक ते नियंत्रण ठेवलेले आहे.

लेखापरिच्छेदात " SPA साठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे प्रकरण क्र.६ च्या तरतुदी लागू होत असल्याने त्यासाठी स्वतंत्र विकास प्राधिकरण (DA) गठीत करणे अपेक्षित होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही ", अशा आशयाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. वस्तुतः कलम ४० (३) अन्वये प्रकरण VI मधील विकास प्राधिकरणांविषयी तरतुदी विशेष नियोजन प्राधिकरणांना लागू करताना प्रकरण ६ च्या कलम ११३ (२) ची तरतुद कलम ४०(१ब) तसेच कलम ४०(१) च्या पोट-कलम (अ), (अअ), (ब), (क), कलम ४०(१ख) खालील SPA यांना लागू करणे अपेक्षित नाही. त्यामुळे लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीच्या क्षेत्रासाठी वेगळे DA स्थापन करण्याचे प्रयोजन राहत नाही. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीस SPA म्हणून नियुक्ती करताना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींच्या चौकटीतच काम करण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे. त्यामुळे लवासा या प्रकल्प विकासकाला SPA चा दर्जा देण्यामुळे निष्कारण लाभ देण्यात आला, हा लेखापरीक्षणातील आक्षेप तद्नुषंगाने स्वीकारार्ह नाही.

मात्र, एखाद्या खाजगी कंपनीस SPA म्हणून नियुक्त केल्यास अशा SPA ने त्यांच्याकडे Chief Planner चे पद निर्माण करावे व अशा पदावर शासनाकडील उप संचालक, नगर रचना या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी प्रतिनियुक्तीवर नेमावा तसेच अशा अधिकाऱ्यास कलम १५२ अन्वये अशा विशेष नियोजन प्राधिकरणाचे बांधकाम परवानगी देण्याबाबतचे अधिकार प्रत्यार्पित करावे, अशा आशयाचा विचार विभागाकडे सुरू आहे. याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे सादर केलेला नाही.

### ४.३.१० SPA कडून आराखडे आणि रेखांकने यांना अनियमित मान्यता

MRTP अधिनियम, १९६६, च्या विभाग १५ नुसार अंतिम आराखडा तयार करण्यापूर्वी त्या परिसरात राहणाऱ्या लोकांकडून आक्षेप आणि सूचना मागवून त्या विचारात घ्याव्यात त्यानंतर आराखड्याला शासनाने मंजुरी द्यावी.

विशेष गृहसंकुलांच्या निर्माणासाठी पुणे क्षेत्रीय आराखड्याच्या अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रासाठी नोव्हेंबर २००५ मध्ये UDD ने अधिसूचित केलेल्या विनियमांनुसार, प्रमुख तलावाच्या कमाल पूर पातळी पासून (HCL) ५०० मीटर्स पर्यंतच्या पट्ट्यात येणारी जमीन आणि पाटबंधारे प्रकल्पाचे कमांड क्षेत्र यांचा कुठल्याही गृहसंकुल प्रकल्पामध्ये समावेश केला जाऊ नये. त्याचप्रमाणे, जून २००८ च्या अधिसूचनेतील अटींनुसार, अधिसूचित क्षेत्राला लागू असणाऱ्या चालू विकास नियंत्रण विनियमांमध्ये (DCR) कुठलीही सवलत देण्याचा अधिकार SPA ला नाही, विकासासाठी दिल्या गेलेल्या सर्व परवानग्या त्या दिल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत ADTP, पुणे यांच्या निदर्शनास आणून द्याव्या आणि DCR व क्षेत्रीय आराखड्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास, कलेक्टर, पुणे, यांच्याकडून त्यावर कायदेशीर कारवाई केली जावी.

ADTP पुणे, यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

- LCL ने पारित केलेल्या निर्णयानुसार, लवासा या थंड हवेच्या ठिकाणासाठी प्रारूप आराखड्याचा प्रस्ताव तयार करणे आणि नियोजन प्रस्तावांचा एक भाग म्हणून नियोजित प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या DCR मध्ये सुधारणा किंवा नवीन तरतुदी सूचविणे ही SPA समितीची कर्तव्ये होती. तत्कालीन DCR च्या तरतुदींचे प्रसंगी उल्लंघन करण्याचा LCL चा उद्देश असल्याचे यावरून दिसून येते. म्हणूनच, DTP आणि जिल्हाधिकारी यांनी प्रारूप आराखडा प्रस्तावांमधील बदलांवर संनियंत्रण ठेवावयास हवे होते.

- SPA ने मंजूर केलेला प्रमुख आराखडा हा प्रामुख्याने रेखांकन आराखडा आहे. अंतिम आराखडा तयार करण्यापूर्वी जरी रहिवाश्यांकडून आक्षेप आणि सूचना मागवून त्याला राज्य शासनाकडून मान्यता प्राप्त करायची असते तरी ही निर्धारित प्रक्रिया LCL च्या SPA कडून अवलंबली गेली नव्हती.

- प्रकल्प विकासासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी ६१३.९४ हेक्टर क्षेत्र मंजूर केले होते (जून २००८). LCL ला SPA दर्जा दिला गेल्यावर त्यांनी आधी मंजूर केलेल्या क्षेत्रात ६७.३३ हेक्टर्स ची वाढ केली (ऑक्टोबर २००८, जून २००९ आणि नोव्हेंबर २०१०) ज्यामुळे रेखांकनांमध्ये बांधकामासाठीच्या क्षेत्रामध्ये वाढ होऊन ते ६८१.२७ हेक्टर्स इतके झाले. यामध्ये MKVDC कडून भाडेपट्ट्यावर घेतलेल्या १२.३६८ हेक्टर्स क्षेत्रफळाच्या, पाण्याखाली नसलेल्या जमीनीचा देखील समावेश होता. वरसगाव तलावाच्या कमाल पूर पातळीपासून आणि मोस नदीवर पाटबंधारे प्रकल्पासाठी बांधलेल्या धरणापासून ५०० मीटर्स च्या पट्ट्यात ही पाण्याखाली नसलेली जमीन येत होती. म्हणूनच SPA ने अशा वाढीचे जमीनीसाठी आणि बदलासाठी दिलेली मंजुरी अनियमित होती.

- वर तपशील दिल्याप्रमाणे, SPA कडून रेखांकनाच्या आराखड्यात तीन बदल करण्यात आले. तथापि, DTP, पुणे यांनी फेब्रुवारी २०११ मध्ये UDD यांना प्रस्तुत केलेल्या अहवालात असे आढळून आले की, बदल केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, ADTP पुणे यांना त्याबद्दल अवगत करणे आवश्यक असूनही दोन बदल दोन वर्षानंतर निदर्शनास आणून दिले गेले होते आणि एका बदलाबाबत सूचित करण्यात आले नव्हते.

■ रेखांकनाचे पुनर्परिक्षण करताना LCL ने अंतर्गत रस्ते, इमारतींचे ठिकाण आणि नियोजन यामध्ये बदल केले.

■ " बाह्यरेषा नकाशात " (contour map) मध्ये १:३ आणि त्यापेक्षा जास्त आणि १:३ ते १:५ या दरम्यान प्रवणता असलेल्या क्षेत्राला कंपनीने स्वतंत्रपणे विभाजित केले नव्हते. यामुळे अशी प्रवणता असलेल्या क्षेत्रातील बांधकामाची पडताळणी होऊ शकली नाही. विकासाकरिता सदर क्षेत्रे पात्र नसतात. त्याचप्रमाणे " बाह्यरेषा नकाशा " मध्ये असे विभाजन दाखविले गेले नसल्याने कंपनीने किती प्रमाणात टेकड्या तोडल्या आणि भराव घातले हे समजणे अवघड होते. कंपनीने १:३ ते १:५ दरम्यान प्रवणता असलेल्या उतारावरील क्षेत्रात खोदकाम करून बांधकाम केल्याचेही दिसून आले.

■ SDCR ने २० मीटर्सची मर्यादा विहित करूनही एका हॉटेल्सची उंची २० मीटर्सपेक्षा जास्त होती.

व्यावसायिक मागणीशी सुसंगत ठरण्यासाठी नियोजन लवचिक ठेवण्यात आल्याचे LCL नेच नमूद केल्याचे, पर्यावरणाच्या मुद्यांवरील तज्ञ समिती (ECL) ने त्यांच्या अहवालात निदर्शनास आणले होते. त्याचा इथे उल्लेख करणे समर्पक ठरते. अशा परिस्थितीत LCL च्या कामकाजावर राज्य सरकारने पर्यवेक्षण करणे आवश्यक होते जे केले गेले नव्हते. समितीचा एक सदस्य असून, DTP पुणे, यांनी यावर नियंत्रण ठेवले नव्हते. ज्यामुळे भौगोलिक परिस्थितीचे संवर्धन करण्यासाठी विहित केलेल्या नियम आणि पद्धतीच्या उल्लंघनास कारणीभूत ठरणारे महत्त्वपूर्ण बदल झाले. जानेवारी २०११ मध्ये ECL ने शिफारस केल्यानंतरच ज्या तरतुदींद्वारे SPAचे गठन केले होते त्याचा पुनर्आढावा घेण्याची गरज असल्याची DTP पुणे, यांनी राज्य शासनास शिफारस केली (फेब्रुवारी २०११). SPA वर जिल्हाधिकारी, पुणे हे कायदेशीर कारवाई करू शकत होते जे केले गेले नव्हते.

याबाबतीत सुनावणी सुरू आहे आणि त्यानंतर निर्णय घेतला जाईल असे निर्गमन परिषदेत UDD च्या प्रधान सचिवांनी नमूद केले (ऑक्टोबर २०११).

**ज्ञापन :-**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीची SPA म्हणून नियुक्ती केल्यानंतर त्यांच्या क्षेत्रातील नियोजन प्रस्तावास वेळोवेळी शासनाची मान्यता घेणे बंधनकारक आहे. असे नियोजन प्रस्ताव तयार करताना विद्यमान जमीन वापर नकाशे तयार करणे, प्रारूप प्रस्ताव तयार करून जनतेच्या हरकती व सूचनांसाठी शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रे यांमध्ये प्रसिद्ध करणे, प्रारूप प्रस्तावाने बाधित व्यक्तींना वैयक्तिक नोटीसा देणे, सुनावणी देणे इ. सर्व कार्यवाही पूर्ण करून असे प्रस्ताव शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार लवासा कंपनीने त्यांच्या क्षेत्रातील नियोजन प्रस्ताव संचालकांकडे मंजुरीसाठी सादर केले आहेत. संचालकांकडून अद्याप असे प्रस्ताव शासनास सादर झालेले नाहीत.

SPAने त्यांच्या स्तरावर मंजूर केलेली प्रत्येक बांधकाम परवानगी विहित कालावधीत सहायक संचालक, नगररचना, पुणे शाखा यांच्या निदर्शनास आणावी व यासंबंधाने मंजूर नियमावलीतील नियमांचा भंग झाल्यास जिल्हाधिकारी यांनी त्यावर कारवाई करावी. अशा आशयाची तरतुद SPA स्थापन करताना विहित करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणीवेळी SPAकडून काही अनियमितता झाली असल्यास त्याबाबत उचित कार्यवाही होऊ शकते.

**पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे अनुपालन न होणे**

पुणे जिल्ह्यातील मुळशी आणि वेल्हे तालुक्यात ७००० हेक्टर क्षेत्रात थंड हवेचे ठिकाण विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने डिसेंबर २००२ मध्ये LCL ला तात्पुरते "ना हरकत प्रमाणपत्र" (NOC) दिले आणि अटी आणि शर्ती विनिर्दिष्ट करून मार्च २००४ मध्ये २००० हेक्टर्ससाठी त्याला अंतिम पर्यावरणीय मान्यता देण्यात येऊन ते रूपांतरित करण्यात आले. खाली दिल्याप्रमाणे LCL ने विनिर्दिष्ट अटींचे अनुपालन केले नव्हते असे निदर्शनास आले.

■ मार्च २००४ मध्ये प्रकल्पांतर्गत जरी २००० हेक्टर क्षेत्रात बांधकाम करण्यास परवानगी मिळाली होती तरी MPCB ने ६,१८१.३७ हेक्टर जमीनीत बांधकाम करण्यास मान्यता दिली (जानेवारी २००५) जे अनियमित होते. सप्टेंबर २००९ पर्यंत LCL ने ३,८८२ हेक्टर जमीन खरेदी केली होती. त्याचप्रमाणे, LCL ने आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळवण्याच्या अटींवर उद्योग संचालनालयाने देखील मान्यता दिली होती.

■ १००० मीटर्सच्या मर्यादेपलिकडे बांधकाम केले जाणार नाही या वरकरणी दिलेल्या कारणावर या प्रकल्पासाठी MOEF ची परवानगी टाळून राज्य सरकारने (मार्च २००४) दिलेली पर्यावरणीय मान्यताच अनियमित होती असे आमचे मत आहे. हा प्रकल्प भौगोलिकदृष्ट्या संवेदनाक्षम असलेल्या पश्चिम घाटात क्षेत्रात आणि त्याचा काही भाग वन/आदिवासी जमीनीमध्ये खाजगी संस्थांकडून केला जाणार असल्याने हा प्रकल्प गुंतागुंतीचा होता आणि राज्यात अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प असल्याने राज्य शासनाने केंद्र शासनाकडून ab-initio परवानगी प्राप्त करणे आवश्यक

होते. प्रकल्पाचे झालेले बांधकाम लक्षात घेतल्यास LCL ने MOEF च्या परवानगीशिवाय (तज्ञ समिती अहवाल) १००० मीटर्सपेक्षा जास्त उंचीवर बांधकाम केल्याचे दिसून येते. अशाप्रकारे, स्वतःच दिलेल्या वेगवेगळ्या मान्यतांमध्ये करारनिविष्ट केलेल्या अटींवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाला अपयश आले. बांधकामे सुरू ठेऊन, LCL ने अशा बांधकामांच्या परिणामापासून सभोवतालच्या परिसरातील जीवसृष्टीवर होणाऱ्या परिणामांपासून तिचे संरक्षण करण्यासाठी योग्य ते अंतर राखण्याच्या अटीचे उल्लंघन केले.

- अटीमध्ये करारनिविष्ट केल्याप्रमाणे, जवळपासच्या पाणीसाठ्यात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणेही सांडपाणी मिसळले जाणार नाही अशा रितीने सांडपाणी निचरा प्रणाली तयार केली जावी. तथापि, तज्ञ समितीच्या अहवालानुसार पुराच्या पाण्याच्या सांडपाणी वाहिन्यांद्वारे आणि पावसाळ्यात प्रत्यक्षपणे, प्रक्रिया केलेले सांडपाणी पाणीसाठ्यांमध्ये सोडले जाते.

- या थंड हवेच्या ठिकाणाच्या विकासासाठी MOEF कडून परवानगी मिळण्यासाठी, केंद्र शासनाच्या MOEF ने १९९४ मध्ये जारी केलेल्या, ज्यामध्ये २००४ आणि २००६ मध्ये दुरुस्ती करण्यात आली होती, EIA अधिसूचनेतील अटींचे अनुपालन करण्याबद्दल राज्य शासनाने आग्रह धरला नव्हता. EIA अधिसूचनेतील तरतुदी लवासा प्रकल्पाला लागू होत असल्याचे MOEF ने (जुलै २००५) निदर्शनास आणून दिल्यावर, ऑगस्ट २००५ मध्ये राज्य शासनाने LCL ला प्रकल्पासाठी पर्यावरणीय मान्यता प्राप्त करून घेण्याचे निर्देश दिले. पर्यावरणीय बाबींमध्ये झालेली उल्लंघने लक्षात घेऊन नोव्हेंबर २०१० मध्ये, MOEF ने काम थांबवण्याचे आदेश दिले आणि त्यानंतर, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६, अंतर्गत LCL विरुद्ध आवश्यक कारवाई करण्यासाठी राज्य शासनाला निर्देश दिले (जून २०११) या दरम्यान LCL ने मुंबई उच्च न्यायालयात एक रिट याचिका (क्र.९४४८/२०१०) दाखल केली. याबाबतीत करायच्या कार्यवाहीबाबत केंद्र शासनाकडून स्पष्टीकरण मागवण्याबद्दल मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला निर्देश दिले (जुलै २०११). LCL च्या आवेदनावर अंतिम निर्णय देण्याच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यात थंड हवेच्या ठिकाणी २००० हेक्टर क्षेत्राच्या भूखंडावर गृहसंकुले विकसित करण्यासाठी MOEF ने ९ नोव्हेंबर २०११ रोजी सशर्त मंजुरी दिली आणि श्रेष्ठ तज्ञ MOEF प्रतिनिधी, राज्य शासन, जिल्हा प्रशासन आणि इतर हितसंबंधी यांचा समावेश असलेली एक उच्चस्तरीय सत्यापन आणि संनियंत्रण समिती स्थापन करण्याचे राज्य शासनाला निर्देश दिले.

- अटींच्या अनुपालनाविषयी खात्री करण्यासाठी विभागाकडे कुठलेही कार्यतंत्र नसल्याचे ED च्या प्रधान सचिवांनी उत्तरात नमूद केले (नोव्हेंबर २०११). उत्तराशी आम्ही सहमत नाही कारण करारनिविष्ट अटींनुसार प्रकल्पाच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्यात आणि वेगवेगळ्या पर्यावरण कायद्यांचे अनुपालन करण्यात राज्याच्या ED सह सर्व एजन्सीजना अपयश आले होते ज्यामुळे LCL कडून झालेल्या उल्लंघनास मदतच झाली.

**ज्ञापन :-**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **नगरविकास** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीस गिरीस्थान विकसनासाठी तत्वतः मान्यता देताना, समुद्रसपाटीपासून १००० मी. किंवा त्यापेक्षा जास्त उंचीच्या क्षेत्रामध्ये गिरीस्थानासाठीच्या नियमावलीनुसार विकास अनुज्ञेय राहणार नाही अशा आशयाची अट विहित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे पर्यावरणासंबंधी पुरेशा अटी वर सविस्तर विशद केल्यानुसार विहित करण्यात आलेल्या आहेत. याबाबत लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीकडून काही अनियमितता झाली असल्यास त्याबाबत कारवाई करणे शक्य आहे.

**ज्ञापन :-**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **पर्यावरण** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लवासा येथील लवासा हिल स्टेशनला नगरविकास विभागाने त्यांच्या दिनांक १ जून २००१ च्या अधिसूचनेनुसार हिल स्टेशन म्हणून अधिसूचित केले. ही अधिसूचना प्रकाशित करताना नगरविकास विभागाने सदरहू हिल स्टेशन हे समुद्रसपाटीपासून १००० मीटरच्या खाली असावे व प्रस्तावित प्रकल्पास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे अशा अटी घालण्यात आल्या होत्या.

या अनुषंगाने लवासा कॉर्पोरेशनने सादर केलेल्या अर्जानुसार पर्यावरण विभागाने दिनांक १८ मार्च २००४ रोजी सदर प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील अंदाजे २००० हेक्टर क्षेत्रासाठी पर्यावरण विषयक ना हरकत प्रमाणपत्र दिनांक १८ ऑगस्ट १९९७ च्या शासन निर्णयानुसार प्रदान केले होते व पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत अधिसूचना, १९९४ अन्वये जे प्रकल्प समुद्रसपाटीपासून १००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर असतील किंवा जे प्रकल्प उच्चतम भरती रेषेपासून ५०० मीटर अंतराच्या आत असतील किंवा ज्या प्रकल्पांमध्ये मूळ गुंतवणूक रुपये ५ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती बंधनकारक होती. सदरहू प्रकल्पातील अर्जदाराने पहिला टप्प्याबाबत सादर केलेल्या माहितीनुसार समुद्रसपाटीपासून १००० मीटरपेक्षा कमी उंचीवर असल्याने सन १९९४ च्या EIA अधिसूचनेची तरतुद या प्रकल्पास लागू झाली नाही. केंद्रिय

पर्यावरण मंत्रालयाने दिनांक ७ जुलै २००४ रोजी EIA अधिसूचना, १९९४ मध्ये सुधारणा केली व या सुधारणेनुसार ज्या प्रकल्पांमध्ये १००० रहिवासी किंवा ५० हजार लिटर सांडपाण्याची निर्मिती किंवा प्रकल्पातील गुंतवणूक रुपये ५० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा प्रकल्पांना पर्यावरण अनुमती लागू केली होती. तथापि, या अधिसूचनेमध्ये ज्या प्रकल्पांनी ही अधिसूचना येण्यापूर्वीच २५ टक्केपेक्षा जास्त खर्च प्रकल्पावर केला असेल किंवा जो त्यापर्यंत बांधकाम पूर्ण केले असेल अशा प्रकल्पांना यामध्ये सूट देण्यात आली होती.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने दिनांक १४ सप्टेंबर २००६ मध्ये नवीन EIA अधिसूचना प्रकाशित करून यापूर्वीच्या म्हणजेच सन १९९४ व २००४ च्या EIA अधिसूचना रद्द केल्या. या नवीन अधिसूचनेनुसार २०००० चौ.मीटर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या बांधकाम प्रकल्पांना पूर्व पर्यावरण अनुमती घेणे अनिवार्य केलेले आहे.

लवासा कॉर्पोरेशनने दुसऱ्या टप्प्याअंतर्गत अंदाजे ५ हजार हेक्टर जमीनीवर प्रकल्प प्रस्तावित केला आहे व त्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीकडे पर्यावरण पूर्व अनुमतीसाठी अर्ज सन २००८ मध्ये केला होता.

दरम्यानच्या काळात काही अशासकीय संस्थांनी सन २००९-२०१० मध्ये केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला संदर्भाधीन प्रकल्पाअंतर्गत पर्यावरण अधिसूचना, २००४ व २००६ च्या तरतुदींचे उल्लंघन झाले असल्याची तक्रार केली होती. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने नोव्हेंबर, २०१० मध्ये सदरहू प्रकल्पास पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत कारणे दाखवा नोटीस दिली होती. ह्या नोटीशीविरुद्ध लवासा कॉर्पोरेशनने नोव्हेंबर, २०१० मध्ये मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून काम थांबविण्याच्या केंद्र शासनाच्या आदेशास स्थगिती देण्याची विनंती केली होती.

त्याचप्रमाणे केंद्र शासनाने तज्ञ समिती गठीत करून लवासा हिल स्टेशनची स्थळ पाहणी करून पर्यावरण संरक्षण कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन झाले किंवा कसे, याची शहनिशा केली. शहनिशा केल्यानंतर केंद्र शासनाने सदरहू प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीकडे दिनांक ३१ मे २०११ च्या दिल्ली येथील बैठकीत विचारार्थ घेतला होता. पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीने सदर प्रकल्प प्रवर्तकांवर पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याच्या अधीन राहून पर्यावरण अनुमतीसाठी केंद्र शासनास शिफारस केली होती. त्यानुसार लवासा कॉर्पोरेशनवर जून, २०११ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाने वरील वस्तुस्थिती मा. उच्च न्यायालयास निदर्शनास वेळोवेळी आणून दिली होती व त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने केंद्र शासनाने पर्यावरण विषयक अनुमतीमध्ये घालून दिलेल्या अटींच्या अंमलबजावणीच्या अधीन राहून केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ९ नोव्हेंबर २०११ च्या पत्रानुसार लवासा कॉर्पोरेशनच्या टप्पा-१ च्या प्रकल्पास पर्यावरणविषयक अनुमती दिलेली आहे.

लवासा कॉर्पोरेशनच्या टप्पा-२ च्या विस्तारीकरणासाठी लवासा कॉर्पोरेशनने राज्य शासनाच्या राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीकडे दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ व दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी अर्ज केलेला असून सध्या तो विचारार्थ आहे.

**पाण्याच्या अतिरिक्त प्रमाणातील आवश्यकतेसाठी आणि बंधारे बांधण्यासाठी परवानगीचे अनियमित प्रदान**

खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर येथे खडकवासला पाटबंधारे प्रकल्पाची चार संचय धरणे आहेत. या प्रकल्पातून पुणे शहराला पिण्यासाठी आणि औद्योगिक कारणासाठी पाणीपुरवठा केला जातो. LCL ला त्यांच्या प्रकल्पासाठी पाणीपुरवठ्याची सोय म्हणून, वरसगाव धरणाच्या जलग्रहण आणि जलमग्न क्षेत्रांमध्ये बंधारे बांधण्यासाठी मान्यता देण्यात आल्या होत्या.

खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, ऑक्टोबर, २००१ मध्ये, मोस नदीच्या खोऱ्यांमध्ये आठ (८७१) आणि काला नदीच्या खोऱ्यांमध्ये (१६० mcft संचय क्षमता) दोन असे दहा बंधारे बांधण्यासाठी परवानगी घेण्यासाठी LCL ने MKVDC शी संपर्क साधला. MKVDC चे अध्यक्ष असलेल्या जलसंपदा विभागाच्या मंत्र्यांनी मे २००२ मध्ये मोस आणि काल नद्यांवर हदा बंधारे बांधण्यास परवानगी दिली असल्याने, MKVDC ने जून, २००२ मध्ये त्यास कार्योत्तर मंजुरी दिली. वरसगाव धरणासाठी मोस नदीचे खोरे हा पाण्याचा प्रमुख स्त्रोत आहे. पाण्याचा साठा आणि वापर करण्यासाठी, बंधारे बांधण्यासाठी एका खाजगी संस्थेला MKVDC ने दिलेली मान्यता ही राज्यात अशाप्रकारे प्रथमच दिली गेली होती. १० बंधारे बांधल्यानंतर LCL ने १,०३१ दशलक्ष घन फुट (mcft) एवढे पाणी (घरगुती वापरासाठी ९३ mcft, लागवडीसाठी १७० mcft आणि औद्योगिक वापरासाठी ७६८ mcft) वापरण्याचे प्रस्तावित केले. मोस नदीवर आठ बंधारे बांधल्यामुळे वरसगाव धरणाची पाण्याची पातळी ८७१ mcft ने घटणार होती. टेकड्यांची यादृच्छीक तोड केल्यामुळे दरड कोसळणे, जास्त धूप आणि गाळ साचणे या परिणामांमुळे धरणाच्या संचय क्षमतेमध्ये घट होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

त्याचप्रमाणे, वरसगाव धरणाच्या जलमग्न क्षेत्रात बांधलेल्या आठपैकी दोन बंधाऱ्यांमुळे धरणाची संचय क्षमता २८४ mcft ने कमी होणार होती. पुणे महानगरपालिकेने निश्चित केल्याप्रमाणे पिण्यासाठी १५९२० mcft आणि MKVDC ने निश्चित केल्याप्रमाणे पाटबंधारे आणि औद्योगिक

कारणासाठी २६४२० mcft पाण्याची गरज होती, अशाप्रकारे, पाण्याची एकूण गरज ४२३४० mcft होती. त्याचवेळी खडकवासला धरणाची (ज्यासाठी वरसगाव एक संचय धरण होते.) संचय क्षमता २९,१६० mcft होती. अशाप्रकारे, मोस नदीच्या खोऱ्यातून ८७१ mcft पाणी वापरण्यास LCL ला परवानगी देण्यामुळे पाटबंधारे प्रकल्पाच्या पाण्याच्या गरजेवर आणि पुणे शहराला होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावरच नाही तर कायम पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या दौड, इंदापूर आणि बारामती या तालुक्यांवरही याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता होती.

पुणे जलसंपदा विभागाच्या सहाय्यक मुख्य अभियंत्यांनी २९ एप्रिल रोजी mkvdc ला सादर केलेल्या अहवालानुसार लवासा प्रकल्पाची पाण्याची गरज फक्त ५४७ MCFT (घरगुती वापरासाठी ९३ mcft आणि पर्यटन व नौकाविहारासाठी २८४ mcft) होती याची नोंद घेणे इथे समर्पक ठरते. अशाप्रकारे, LCL सारख्या खाजगी प्रकल्पाला ४८४ MCFT पाण्याचा अतिरिक्त वापर करण्यासाठी MKVDC ने दिलेली परवानगी ही पुणे शहर आणि त्याच्या जवळील तालुक्यांना उपलब्ध होत असलेल्या पाणीपुरवठ्याशी तडजोड करून केली गेली होती हे स्पष्ट होते.

शासनाने (WRD) असे नमूद केले (फेब्रुवारी २०१२) की, वरसगाव धरणासाठी पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेल्या मोस नदीच्या खोऱ्यातील पाणीसाठ्यापैकी, १,०३१ ग्क्क्ष्ट एवढ्या पाण्याचा साठा करण्यास LCL ला दिलेली परवानगी ही LCL ला गरजेपेक्षा जास्त प्रमाणासाठी दिलेली नव्हती आणि त्यामुळे पाटबंधारे प्रकल्प आणि पूर्णे शहराला होणाऱ्या पेयजलाच्या पुरवठ्यावर कुठलाही परिणाम होणार नव्हता.

ज्या पाटबंधारे प्रकल्पाचा सार्वजनिक कार्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो त्यामधून थेट पाणी उचलण्यासाठी खाजगी प्रकल्पाला दिलेली परवानगी यासारखी घटना यापूर्वी कधीही घडलेली नव्हती. त्याचप्रमाणे, new या खाजगी एजन्सीला दोन बंधाऱ्यांमधील पाण्याची मालकी आणि वापर यासाठी जरी परवानगी दिली होती तरी शासनाच्या आणि पर्यायाने समाजाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, MKVDC आणि LCL यांच्या दरम्यान झालेल्या करारामध्ये, अटींचे उल्लंघन झाल्यास त्याविषयीचे कुठलेही परावर्तक कलम समाविष्ट करण्यात आलेले नव्हते. LCL ला कुठल्याही प्रकारे पाण्याची अतिरिक्त मंजुरी देण्यात आल्याचा इन्कार करण्यासाठी बाष्पीभवन/गाळ इ. मुळे पाण्याची हानी होत असल्याचा आता उपस्थित केलेला मुद्दा हा बंधारे बांधण्यासाठी मंजुरी देताना विचारात घेतला जाऊ शकत होता.

**ज्ञापन :-**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **जलसंपदा** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

पर्यटन व गिरीस्थान विकास प्रकल्पासाठी दि लेक सिटी कॉर्पोरेशन प्रा.लि. चे व्यवस्थापनाने दिनांक २९ ऑक्टोबर २००१ अन्वये मोस खोऱ्यामध्ये जलसंधारणासाठी जलसिंचन बंधारे इत्यादीची निर्मिती संबंधीचा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सादर केला होता. सदरच्या प्रस्तावाविषयी पाणी उपलब्धतेचा सखोल अभ्यास करून महामंडळाने मोस नदी व कोकण प्रदेशाने काळ नदीवर मिळून १० बंधारे बांधण्यास परवानगी दिली आहे. पश्चिम वाहीनी काळ नदीचे खोरे स्वतंत्र आहे. मोसे नदीवरील ८ बंधाऱ्याची साठवण क्षमता ८७१ दलघफू आहे. काळ नदीवरील ८ बंधाऱ्याची साठवण क्षमता १६० दलघफू आहे. काळ नदी ही कोकणाकडे वहात असून वरसगांव धरणाशी त्याचा संबंध नाही. अशाप्रकारे सर्व १०३१ दलघफू चा वरसगांव धरणाच्या पाणलोट क्षेत्राचा संबंध येत नाही.

मोसे नदीवरील बंधाऱ्यांच्या साठवण क्षमतेचा तपशील खालीलप्रमाणे :—

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वरसगांव धरणाच्या बुडीत क्षेत्रातील दोन बंधारे** | **२८४ दलघफू** |
| **(२)** | **बुडित क्षेत्राच्या बाहेरील ६ बंधारे** | **५८७ दलघफू** |
| | **एकूण ...** | **८७१ दलघफू** |

बुडित क्षेत्रातील बंधाऱ्यात पूर्वीपासूनच वरसगांव धरणामुळे पाणी साठा होत असून तो अतिरिक्त पाणी साठा नाही. या बंधाऱ्यात पाणी जास्त कालावधीसाठी अडवून ठेवण्यासाठी बंधारे बांधणेत आले आहेत. त्यामुळे नविन ५८७ दलघफू पाणी साठयास परवानगी दिली आहे.

सहाय्यक मुख्य अभियंता (मु.अ.,जसं) यांच्या अहवालानुसार पाण्याची गरज खालीलप्रमाणे आहे :—

| | |
|---|---|
| **घरगुती वापर** | **९३ दलघफू** |
| **वृक्षारोपण** | **१७० दलघफू** |
| **पर्यटन व बोटींग** | **२८४ दलघफू** |
| **एकूण ...** | **५४७ दलघफू** |

सदर पाण्याची गरज ही निव्वळ गरज असून बाष्पीभवन व्यय त्यामध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे फेर पाणी वापराचा तपशील दिलेला आहे :—

| | | |
|---|---|---|
| (१) | निव्वळ गरज | ५४७ दलघफू |
| (२) | बुडीत क्षेत्रातील बंधारे | २८४ दलघफू |
| (३) | बाष्पीभवन व्यय १५ टक्के | १५५ दलघफू |
| (४) | गाळामुळे होणारा मृत साठा | ४५ दलघफू |
| | (१०३१ दलघफू) एकूण ... | १०३१ दलघफू |

अशा प्रकारे बंधाऱ्यात नियोजित पाणी वापरापेक्षा जास्त साठयाकरीता मंजुरी देण्यात आलेली नाही.

(ब) महामंडळाच्या कायद्यातील कलम नं.१९(१) प्रमाणे महामंडळास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणेचे अधिकार आहेत. तसेच १९(२) (b) प्रमाणे धरणे/बंधारे/जलाशय बांधणेचे अधिकार आहेत.

(क) खडकवासला प्रकल्पाचे पाण्याचे नियोजन (टीएमसी) :

| तपशील | सन २०१० चे नियोजन |
|---|---|
| पिण्यासाठी | ११.६५ |
| सिंचनासाठी | २२.२८५ |
| औद्योगिक वापरासाठी | ०.१५ |
| बाष्पीभवन | २.८८ |
| एकूण ... | ३६.९६५ |

खडकवासला प्रकल्पाचा उपयुक्त पाणीसाठा व उपलब्ध येवा (टीएमसी)

| धरण | उपयुक्त साठा | येवा |
|---|---|---|
| पानशेत | १०.६५ | ११.६३ |
| वरसगांव | १२.८२ | १४.९३ |
| खडकवासला | १.९८ | ६.५० |
| टेमघर | ३.७१ | ३.७१ |
| एकूण ... | २९.१६ | ३६.७७ |

खडकवासला प्रकल्पात एकूण येवा ३६.७७ अब्ज घनफूट आहे. लवासाच्या ८ बंधाऱ्याची साठवण क्षमता ८७१ दलघफू आहे. मात्र लवासा कंपनीचा वापर घरगुती वापरासाठी ९३ दलघफू व वृक्षारोपणासाठी १७० अशी एकूण २६३ दलघफू असून उर्वरित पाणी नॉन-कंन्झ्यूमेबल आहे. त्यामुळे लवासा कंपनीस आवश्यक असलेल्या पाण्याची उपलब्ध खडकवासलाच्या येव्याची तुलना केल्यास ती १ टक्के पेक्षा कमी असून त्यामुळे सिंचन प्रकल्पासाठी अथवा पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी पाणी कमी पडणार नाही. तसेच पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या दौंड, इंदापूर आणि बारामती या तालुक्यांवरही याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता नाही.

वरसगांव धरणाचा दूरसंवेदन तंत्राने गाळ सर्वेक्षण सन २००९ मध्ये मेरी, नाशिक या संस्थेमार्फत करण्यात आले असून या गाळ सर्वेक्षण अभ्यास अहवालानुसार खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

**गाळ सर्वेक्षणानंतरचे अद्ययावत पाणीसाठे (द.ल.घ.मी.)**

| धरणाचे नांव | प्रकल्पीय एकूण साठा | प्रकल्पीय मृत साठा | प्रत्यक्षात मृत साठा | एकूण साठ्यातील घट/वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| वरसगांव | ३७५.३६१० | १२.१७२० | १२.००७० | -२.१२२० |

वरसगांव धरणाचे बांधकामास २१ वर्षे एवढा कालावधी झाला असून धरणाच्या साठयावर परिणाम होईल इतपत गाळ आलेला नाही. धरणाचे आयुष्यमान १०० वर्षाचे गृहीत धरुन या काळात येणाऱ्या गाळासाठी धरणात एकूण १२.२३ द.ल.घ.मी. इतका गाळ साठण्याची तरतुद केली असून त्यापैकी सध्या २.१२ द.ल.घ.मी. गाळ आलेला आहे. त्यामुळे भविष्यात ८० वर्षात गाळामुळे धरणाच्या उपयुक्त साठयावर परिणाम होण्याची शक्यता नाही असे दिसते.

महामंडळ व LCL यामध्ये बंधारे बांधण्याबाबत दि. २ सप्टेंबर २००२ रोजी करारनाम्यातील अट क्र. १० नुसार बुडीत क्षेत्रात प्रस्तावित केलेले बंधारे वरसगांव धरणाचा साठा कमी करणारे असल्यामुळे सदरच्या २ बंधाऱ्यातील २८४ द.ल.घ.फू. पाणीसाठा वरसगांव धरणामध्ये सोडणे बंधनकारक आहे. सन २००६-०७ पासून सदरच्या २ बंधाऱ्यांमधील पाणीसाठा महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार वरसगांव धरणामध्ये सोडलेले आहे.

**“MKVDC कडून LCL ला जमीनीचे प्रदान होण्यातील अनियमितता”**

श्री.भास्कर पिल्लई वि. केरळ राज्य (अपिल क्र. २६२८/१९९७) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जर एखादी जमीन सार्वजनिक उद्देशाने घेतली असेल तर असा सार्वजनिक उद्देश सफल झाल्यावर उरलेली जमीन फक्त इतर सार्वजनिक कार्यासाठीच वापरली जाऊ शकेल. जर इतर कुठल्याही सार्वजनिक कार्यासाठी जमीनीची आवश्यकता नसेल तर तत्कालीन मालकाला ती विकून टाकण्याऐवजी तिचा जाहीर लिलाव करावा आणि जाहीर लिलावातून मिळालेली रक्कम ही घटनेमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार सार्वजनिक कार्यासाठी उपयोगात आणली जावी. वरील निर्णयाला अनुसरून जुलै २००२ मध्ये WHO ने एक परिपत्रक निर्गमीत केले ज्यानुसार पाटबंधारे विकास महामंडळाला आवश्यकता नसलेल्या अतिरिक्त जमीनीबाबतचा निर्णय त्यांच्या कार्यकारी संचालकांनी ध्यायचा होता.

खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, MKVDC ने मुळशी तालुक्यातील त्यांच्या मालकीची १४१.१५ (१२८.७८ हे. एवढे जलमग्न क्षेत्र आणि १२.३६८ हे. एवढे जलमग्न नसलेले क्षेत्र) क्षेत्रफळाएवढी जमीन ऑगस्ट २००२ मध्ये प्रतिवर्ष रु. २.७५ लाख एवढ्या भाडेपट्टीने ३० वर्षासाठी LCL ला दिली होती. जलमग्न असलेली जमीन LCL ने बंधाऱ्यासाठी किंवा जलक्रीडा प्रकारांसाठी वापरायची होती. वरसगाव धरणासाठी ताब्यात घेतलेली अ-जलमग्न जमीन MKVDC ने अतिरिक्त असल्याचे जाहीर केले, ज्यावर LCL ने व्यापारी इमारती (उपहारगृहे, कन्वेन्शन सेंटर इत्यादी) बांधल्या आणि या बाबतीत राज्य शासनाने दिलेल्या निर्णयाशी सुसंगत नसून अनियमित होते. ही अतिरिक्त जमीन इतर सार्वजनिक कार्यासाठी वापरावयास हवी होती किंवा त्याचा जाहीर लिलाव करावयास हवा होता किंवा ती जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रत्यर्पित करावयास हवी होती पण खाजगी कंपनीला व्यावसायिक कारणासाठी ती नक्कीच द्यायची नव्हती.

ही बाब निदर्शनास आणून दिल्यावर (सप्टेंबर, २०११) शासनाने असे नमूद केले की (फेब्रुवारी, २०१२) LCL ला भाडेपट्टीवर दिलेली जमीन ही कायमस्वरुपी दिली गेली नव्हती आणि ती अशाप्रकारे देण्याचे त्यांना अधिकार देण्यात आले होते.

हे उत्तर मान्य करता येत नाही कारण, ज्या जमीनीचा व्यावसायिक कारणाकरीता या आधीच विकास करण्यात आला होता आणि जी त्रयस्थांना देण्यात आली होती अशी जमीन ३० वर्षांइतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी भाडेपट्टीने देणे म्हणजे तिचा वारसाहक्क LCL ला दिल्याप्रमाणे होते. ही जमीन परत ताब्यात घेणे MKVDC शासनाला आता सोपे राहिले नव्हते आणि त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि त्याच्या आधारावर त्यांनी काढलेली परिपत्रके यांचे त्यांच्याकडून उल्लंघन झाले होते.

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **जलसंपदा** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महामंडळाने लवासा कंपनीस महाराष्ट्र शासनाच्या गिरीस्थान विकासाबाबत धोरणाचा विचार करून वरसगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये ८ बंधारे बांधणेसाठी मंजुरी दिलेली आहे. (म.कृ.खो.वि.महामंडळाचे पत्र क्र. पर्यटन **१४५०२/(२००/०२) MI-३/४१४८, दि. २९ मे २००२).**

**महामंडळाचे परवानगी देणेचे अधिकार :**

महामंडळाच्या कायद्याच्या (१९९६) प्रकरण चार मधील कलम १८

१८(आय)- मध्ये महामंडळाची कामे व अधिकारामध्ये पाटबंधारे आणि जलविद्युत प्रकल्पाच्या ठिकाणी व परिसरात पर्यटनास किंवा अन्य संबंधित कामांना चालना देणे.

१८(जे)- प्रमाणे तलावासभोवतालची जागा पायाभुत सुविधासह विकसित करणे आणि स्वारस्य असलेल्या व्यक्तींना अशा विकसित मालमत्ता अंशतः किंवा पूर्णतः भाडेपट्टयांने देणे असे अधिकार आहेत.

१९(आय)- प्रमाणे महामंडळाला सर्व निविदांच्या संबधात प्रशासकीय मान्यता सुधारीत प्रशासकीय मान्यता तांत्रिक मंजुरी व निविदा स्विकृतीचे अधिकार, निधीला मंजुरी देणे, आर्थिक तरतुद करणे, कंत्राटामध्ये उदभवणाऱ्या वादाचे निवारण करणे तसेच इतर बाबी ज्यामुळे महामंडळास त्यांची प्रयोजने पूर्ण करण्याचा उद्देश सफल होईल असे खालील कलमानुसार

१९($ii$)- महामंडळाची कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक चल व अचल संपत्ती ही लीजवर देण्याचा, विकण्याचा व हस्तांतरीत करण्याचा अधिकार महामंडळास असेल.

a- महामंडळास त्यांच्या कामापैकी कोणतीही कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटेल अशी जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्ता संपादन करणे धारण करणे आणि त्याने धारण केलेली कोणतीही मालमत्ता महामंडळास योग्य वाटेल अशा अटीवर भाडेपट्टयाने देणे विकणे तिची देवाणघेवाण करणे किंवा अन्य प्रकारे हस्तांतर करणे.

८ बंधाऱ्यापैकी ६ बंधारे लवासा कंपनीच्या जागेवर व २ बंधारे शासनाच्या जागेवर म्हणजे वरसगाव धरणाच्या बुडीत क्षेत्रावर बांधायचे आहेत. लवासा कंपनीला भाडेपटयावर दिलेले एकूण क्षेत्र १४१.१५ हे. असून त्यापैकी १२८.७९ हे. इतके क्षेत्र हे पूर्वीपासूनच वरसगाव धरणाच्या बुडीत क्षेत्रात आहे व उर्वरीत फक्त १२.३२ हे. क्षेत्र बुडीत क्षेत्राच्या बाहेर परंतु फ्रिंज लाइनच्या (FRINGE LINE) जवळ आहे.

**जागेचा मालकी हक्क :**

महामंडळाच्या १९९६ च्या कायद्यातील कलम

१५(१)- नुसार राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून -(नेमून दिलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी)

(a) पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखाली राज्य शासनाकडे निश्चित होत्या अशा महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थावर व जंगम मालमत्तांचा समावेश असलेल्या सर्व पाटबंधारे प्रकल्प जलविद्युत प्रकल्प पूर्ण झालेल्या योजनांचे व्यवस्थापन महामंडळाकडे निश्चित होईल आणि त्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेले असेल आणि त्याबाबतीत मिळालेले उत्पन्न आणि केलेला खर्च हा महामंडळाच्या लेख्यावर आणणेत येईल.

(b) जरी एखादया कंत्राटातून अथवा इतर बाबीतून उद्भवणारे राज्य शासनाचे हक्क, दायित्वे ही महामंडळाची जबाबदारी समजण्यात येईल.

ही अधिनियमांच्या कलमांमधील तरतुद असे दर्शविते की जमीन महाराष्ट्र शासनाकडे पूर्वी होती ती आता महामंडळाची संपत्ती आहे.

**भाडे पट्टयावर जमीन देण्याचे महामंडळाचे अधिकार :**

कायद्यातील तरतुदीनुसार :

**१८(i)** पाटबंधारे प्रकल्पांच्या ठिकाणी व सभोवताली पर्यटनास चालना देणे, जलक्रीडा व अन्य संबंधित उपक्रम राबविण्याचे अधिकार महामंडळास असतील.

२८- कायद्यातील कलम २८ नुसार राज्य शासनाने तयार केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधिन राहून महामंडळ या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा रीतीने या महामंडळाकडे निहीत असलेली कोणतीही जमीन, कोणतीही इमारत, किंवा इतर मालमत्ता भाडे तत्वावर देईल, विकील अदलाबदल करील किंवा ती अन्य प्रकारे निकालात काढेल.

लवासाला दिलेली जमीन ही भाडेपट्टयावर दिलेली आहे आणि ती जमीन कायमस्वरुपी देण्यात आलेली नाही त्यामुळे परिच्छेदात नमूद केल्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अपिल क्र. ६२८/१९९७ निर्णयाप्रमाणे सदरचा संबंध येत नाही. बुडीत क्षेत्रातील १२८.७९ हेक्टर जमीन महामंडळास कायमस्वरुपी लागणार आहे जी पूर्वीपासुनच वरसगाव धरणाच्या बुडीत क्षेत्रात आहे. सदर जमीन ही अतिरिक्त नसल्यामुळे, अतिरिक्त जमीनीची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर १२८.७९ हे. जमीन ही वरसगाव धरणाच्या बुडीत क्षेत्रात आहे व ही जमीन बुडीत क्षेत्रात असल्यामुळे यापासून कोणतेही उत्पन्न मिळत नव्हते. सदर जमीन लवासा कंपनीला भाडेपट्टयावर दिल्यापासून महामंडळास रुपये २,७५,२५० इतके उत्पन्न दरवर्षी मिळत आहे. सदर उत्पन्न हे बाजार भावानुसार वाढत राहणार आहे.

सबब १२८.७९ हे. जमीन लवासा कंपनीला भाडेपट्टयावर देणे हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास फायदेशीर होणार आहे.

**बुडीत क्षेत्राच्या लगतची १२.३६ हेक्टर जमीन भाडेकराराने देणे आणि त्यावरील इमारतींचे बांधकाम :**

सन १९९६ मधील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ कायद्यातील कलम १८ मधील १८ (आय) व १८ (जे) नुसार महामंडळाची मालमत्ता भाडेकराराने देण्याचे अधिकार महामंडळास आहेत.

यामधील तरतुदीनुसार पाटबंधारे प्रकल्पांच्या ठिकाणी व सभोवताली पर्यटन, जलक्रीडा व जलाशयाच्या सभोवतलाची जमीन विकसित करणे, इत्यादीकरिता सदर जमीन लवासा कंपनीला भाडेपट्टयाने देण्यात आली. गिरीस्थान विकासाबाबतचे धोरण या आधीच महाराष्ट्र शासनाकडून निश्चित झालेले आहे. म्हणून पर्यटनाचा उपक्रम सुरू करण्याकरिता धोरण म.कृ.खो.वि. महामंडळाने परवानगी दिलेली नाही.

(१) दिनांक २९ ऑक्टोबर २००४ च्या नगरविकास खात्याच्या पत्रान्वये खाजगी जलाशयापासून १५ मी.अंतराबाहेरील इमारतीच्या बांधकामासंदर्भातील तरतूद शिथील करण्यात आली आहे. (सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.) महाराष्ट्र राज्यांच्या ॲडव्होकेट जनरल यांच्या लेखी अभिप्रायानुसार महामंडळास स्वतःच्या मालकीची मालमत्ता डील किंवा डिस्पोझ करण्याचे अधिकार आहेत. (ॲडव्होकेट जनरल यांच्या अभिप्रायाचे पत्र सोबत जोडले आहे.)

**"दीर्घमुदतीसाठी भाडेपट्टीने आणि राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर भागीदारीच्या रुपात जमीनीचे प्रदान"**

मालमत्तांच्या संगणकीकृत अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत (सूची क्र- II) असे आढळून आले की, LCL ने खरेदी केलेल्या बऱ्याचशा जमीनी या त्यांना ९९९ वर्षांच्या दीर्घमुदतीवर भाडेपट्टीने दिलेल्या होत्या. अशा जमीनींचे एकूण क्षेत्रफळ विभागीय अभिलेख्यांमध्ये उपलब्ध नव्हते.

त्याचप्रमाणे, LCL च्या लघुपुस्तिकेनुसार, LCL ने अपोलो रुग्णालये, राष्ट्रीय अंतरीक्ष आणि अंतराळ प्रशासन (NASA), ऑक्सफर्ड विश्वविद्यालय इ. सारख्या वेगवेगळया राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांबरोबर महत्वपूर्ण भागीदारी केली होती. LCL ने या संस्थांबरोबर संमती प्राप्त केल्याविषयीचे तपशील तपासणीसाठी उपलब्ध नव्हते. भागीदारी कराराच्या प्रतींची मागणी करूनही त्या सादर केल्या गेल्या नव्हत्या.

निर्गमन परिषदेत, R & FD च्या प्रधान सचिवांनी असे नमूद केले की, (ऑक्टोबर, २०११) कुठलीही जमीन ९९९ वर्षांसाठी भाडेपट्टीने दिली गेल्याच्या प्रकरणांची खात्री केली जाईल. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, NASA बरोबर केलेल्या भागीदारीची बाबही तपासली जाईल. याआधी नमूद केल्याप्रमाणे, LCL च्या कामकाजावर कुठलेही शासकीय नियंत्रण नसल्याचेच या उत्तरातून ठळकपणे दिसून येते.

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदर प्रकरणी लवासा कार्पोरेशन लि. ने ९९९ वर्षांच्या कराराने अपोलो हॉस्पिटल-ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर केलेल्या कराराबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. त्यासंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसते की, सदरच्या जमीनी या शासनाने प्रदान केलेल्या नसून त्या खाजगी वाटाघाटीने कार्पोरेशनने विकत घेतलेल्या आहेत. इतःपर नासाबरोबर कोणताही करारनामा केलेला नसून स्पेस थीम पार्क इंडिया लि. या भारतीय कंपनीबरोबर करारनामा केला असून फॉरेन इनव्हेस्टमेंट प्रमोशन बोर्ड, वाणीज्य मंत्रालय, भारत सरकार व रिझर्व बँक ऑफ इंडिया यांची पूर्वपरवानगी घेऊन करारानामा करण्यात आला आहे.

**"आदीवासींच्या जमीनी खरेदी करणे"**

नोव्हेंबर आणि डिसेंबर, २०१० मध्ये जमीनींच्या खरेदीसाठी विकास आयुक्त (उद्योग) यांनी ज्या अटींवर परवानगी दिली त्यानुसार, अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या मालकीच्या जमीनीची खरेदी, ही MLR संहीता, १९६६ च्या विभाग ३६ आणि ३६ अ तसेच, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीनीचे पुनःस्थापना अधिनियम, १९७४, च्या तरतुदींच्या अधीन राहून करावयाची असते. म.ज.म. संहीतेच्या विभाग ३६अ नुसार MLR संहीता आणि कुळवहीवाट कायदे (सुधारणा) अधिनियम, १९७४ लागू झाल्यावर जमातींच्या ताब्यातील जमीन विक्रीद्वारे (दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीद्वारे किंवा न्यायाधिकरणाच्या अथवा प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार झालेल्या विक्रीसह), भेट म्हणून, अदलाबदलीतून, गहाण ठेऊन, भाडेपट्टीने किंवा इतर मार्गाने जमातीबाहेरील व्यक्तीला हस्तांतरीत केली जाऊ नये, परंतु जर अशा जमाती बाहेरील व्यक्तीने आवेदन दिले किंवा पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी एखाद्या प्रकरणात जमीन भाडेपट्टीने गहाण ठेवली असल्यास जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व संमतीने आणि इतर प्रकरणात राज्य शासनाच्या पूर्व अनुमतीने जिल्हाधिकाऱ्यांची संमती घेतली असल्यास अशा अपवादात्मक परिस्थितीत हे घडू शकते.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, मूगाव गावातील (मूळशी तालुका) जनजाती समूहातील (कातकरी) चार व्यक्तींकडून २३, ४७, ७२ हे. इतकी जमीन LCL ने संपादीत केली होती. अशा जनजाती समूहातील व्यक्तींकडून जमीन खरेदी करण्यासाठी LCL ने पूर्व अनुमती घेतली अथवा नाही हे अभिलेख्यांवरुन पडताळता आले नाही. याबाबतीत दाखल केलेली एक रिट याचीका मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

निर्गमन परिषदेत, जिल्हाधिकारी, पुणे यांनी असे नमूद केले की (ऑक्टोबर, २०११) याबाबतीत चौकशी सुरू आहे आणि आदीवासींच्या जमीनीच्या खरेदीसाठी पूर्व अनुमती घेतली गेलेली नाही अशा प्रकरणांमध्ये जमीनीचा ताबा परत देण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल.

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

तहसीलदार, मुळशी यांचे अहवालानुसार लवासा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या आदिवासी जमीनींच्या बाबतीत, आतापर्यंत एकूण १७ प्रकरणात पूर्व परवानगीशिवाय जमीन हस्तांतरण झाल्याची प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत.

या जमीनी परत मिळण्याबाबत त्यापैकी १० शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले. यातील २ प्रकरणात संबंधित शेतकऱ्यांनी त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तर एकूण ८ प्रकरणात जात प्रमाणपत्र प्राप्त झालेली नाहीत. जातीचे दाखले उपलब्ध न केलेल्या अन्य ८ प्रकरणी चौकशी पूर्ण करून बंद करण्यात आले असून ही प्रकरणे पुन्हा पुर्नविलोकन घेण्यात येत आहेत.

जात प्रमाणपत्र दिलेल्या २ प्रकरणातील एकूण क्षेत्र ११.३३.१२ हे.आर इतकी जमीन उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग यांचे दिनांक ६ जुलै २०१२ चे आदेशान्वये शासनाकडे निहीत केलेली असून, कायदयातील तरतुदीनुसार सदरचे क्षेत्र संबंधित आदिवासी खातेदाराचे नांवे प्रत्यार्पित करून संबंधित आदिवासी खातेदाराचे नांवे अधिकार अभिलेखात नोंदविणेत आलेले आहे.

**"जमीनीची खरेदी आणि विक्री"**

जिल्हा सहनिबंधक, मुद्रांक समाहारक, पूर्णे (ग्रामीण) आणि जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयांतील जमीनीच्या खरेदी आणि विक्री यांच्याशी संबंधित अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, ऑक्टोबर आणि डिसेंबर, २००२ या दरम्यानच्या कालावधीत पुणे जिल्ह्यातील दसावे गावात LCL ने जमीन खरेदी केली होती. जमीन खरेदीचा दर रु. १३ ते ३५ प्रति चौ. मीटर या दरम्यान होता. या सर्व जमीनी विकसित केल्या गेल्या आणि कालांतराने नोव्हेंबर, २००९ आणि मार्च, २०१० दरम्यान रु. ३११४ ते रु. ६०३४ प्रति चौ.मीटर इतक्या रग्गड किंमतीला विकल्या गेल्या. जमीनीच्या विकासासाठी आलेला खर्च विचारात घेऊनही, खरेदी आणि विक्री किंमतीमधील मोठा फरक हा निश्चितच LCL ने थंड हवेच्या ठिकाणाच्या केलेल्या विकासामुळेच त्यांना मिळाला होता, ज्यासाठी वित्तीय लाभाकरिता समुपयोजन (Exploited) केले गेले होते.

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

विकसनानंतर वाढणाऱ्या जमीनीच्या दरावर नियंत्रण ठेवण्याबाबतची तरतुद महसूल कायदयामध्ये अंतर्भूत नाही. त्यामुळे यावर कोणतेही भाष्य करता येणार नाही.

**"शुल्क/फी इ. मध्ये दिली गेलेली सुट/सवलती"**

७ एप्रिल १९९९ च्या शासन निर्णयाद्वारे पर्यटनाला "उद्योगाचा" दर्जा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, R&FD विभागाद्वारे जून, २००६, जुलै, २००६ आणि जून, २००७ मध्ये निर्गमीत केलेल्या अधिसूचनांनुसार, BTAL अधिनियम, १९४८ च्या विभाग ६३-१अ मधील दुरुस्तीद्वारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी च्या प्रदानात सूट दिली गेली होती. इतर वेळी देय असलेल्या नजराणा फी आणि तत्सम शुल्कांच्या प्रदानातही सवलत दिली गेली होती.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, LCL ने रु. ४.३१ कोटी मुद्रांक शुल्क, रु. ५.३९ लाख नोंदणी फी यांच्या प्रदानात सूट आणि रु. ३.७१ कोटी नजराणा फी च्या प्रदानात सवलत उपभोगली होती. ज्या ठिकाणी पर्यटनाच्या उद्देशाने विकास करायचा होता फक्त असेच क्षेत्र निश्चित करायचे होते आणि सूट आणि सवलती फक्त त्याच क्षेत्रासाठी मर्यादित ठेवायच्या असल्याने ही गोष्ट समर्थनीय ठरु शकत नाही. जमीन, घरे इ.ची विक्री यासारख्या व्यावसायिक कारणांकरिता ज्या क्षेत्रांचा विकास करण्यात आला होता. ज्यामधून कुठलेही सार्वजनिक हित साधले जात नव्हते, त्यामध्ये दिलेली सूट समर्थनीय नव्हती.

लवासा येथील वैद्यकीय आणि शैक्षणिक सुविधा स्थानिक गरीब जनतेला सवलतीच्या दरात पुरवण्याचे शासनाने अनिवार्य केल्याची खात्री देणारा कुठलाही पुरावा अस्तित्वात नव्हता.

उच्चभ्रू समाजाच्या ऐषोरामी जीवनशैलीसाठी हा प्रकल्प पोषक असल्याने लवासा हा संपूर्णपणे व्यावसायिक उपक्रम आहे. ज्यामुळे महामंडळाला भविष्यात अमाप लाभ होण्याचे अनुमान असल्याने, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी आणि नजराणा फी यांच्या प्रदानात दिलेली सूट आणि सवलती अनावश्यक असल्याचे वाटते.

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:—

**महालेखापालांचे अभिप्राय :** ज्या प्रकल्पाद्वारे सार्वजनिक हित जपले जाणार आहे. केवळ अशा प्रकरणांसाठीच महसूली प्रभावाच्या सूट आणि सवलतींचे प्रदान मर्यादित ठेवावे.

**स्पष्टीकरण :** महसूली जमा अहवाल सन २०१०-२०११ चे अवलोकन करता सर्वसाधारणपणे यातील प्रकरण क्रमांक ३.१ मध्ये नोंदणी व मुद्रांक विभागाशी संबंधित प्रकरणाचा समावेश असतो. त्याप्रमाणे परिच्छेद निहाय स्पष्टीकरण व अभिप्राय महालेखापाल यांना महसूल व वन विभाग अनौ.सं.क्र.प्रालेप-२०१२/११८/प्र.क्र.५७/म-१, दिनांक ३१ जुलै २०१३ अन्वये सादर करण्यात आलेले आहेत. मात्र याच अहवालातील प्रकरण क्र.४.१ मध्ये महसूल विभागाशी संबंधित Performance Audit मधील परिच्छेद क्र.४.३.१६ मध्ये समावेश असल्याने त्याबाबतचे अभिप्राय सादर झालेले नाहीत.

सदरचा परिच्छेद दुय्यम निबंधक मुळशी व वेल्हा, जि. पुणे या कार्यालयांमध्ये नोंदविलेल्या खरेदीखताच्या दस्तांसंबंधित आहे. परिच्छेदातील दस्तऐवज खरेदीखताचे असून हे सर्व दस्तऐवज लवासा कार्पोरेशन (तत्कालीन नाव द लेक सिटी कार्पोरेशन प्रा.लि.) (लिहून घेणार) व जमीनीचे मूळ मालक (लिहून देणार) यांच्या मध्ये सन २००२ पासून निष्पादित झालेले आहे. याबाबत महालेखापाल तपासणी पथकाने अहवालात असे नमूद केले आहे की, दिलेली माफी अनावश्यक आहे.

याबाबत असे सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासन, गृह विभाग (पर्यटन) शासन निर्णय क्र.एमटिडीसी-०३९९/सिआर/२०१/पर्यटन/दि. ७ एप्रिल १९९९ अन्वये पर्यटनास उद्योग (Tourism to be treated as an “Industry”) घोषित केला असून या निर्णयातील अ.क्र.१२ नुसार गिरीस्थान विकास (Development of Hill stations) या पर्यटन प्रकल्पास सर्व वैधानिक प्रयोजनाकरिता उद्योग म्हणून घोषित केलेले आहे. याचाच अर्थ असा की, पर्यटनास उद्योग क्षेत्राचा दर्जा देण्यात आलेला आहे. याशिवाय महाराष्ट्र शासन, गृह विभाग (पर्यटन) शासन निर्णय क्र. एमटिडीसी-०३९९/सिआर/१४२, दिनांक ८ जुलै १९९९ अन्वये पर्यटनास उद्योगाचा दर्जा देऊन वित्तीय बिगर वित्तीय फायदे, सवलती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यात पर्यटन धोरण १९९९ अंमलात आणले आहे. ज्यामुळे पर्यटन उद्योगास चालना व उत्तेजन मिळेल आणि आर्थिक गुंतवणुकीत वाढ होवून रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होईल अशा दृष्टीने नवीन सामूहिक प्रोत्साहन योजना धोरण अंमलात आणले गेले आहे. या धोरणाअंतर्गत शासन निर्णयात पर्यटन प्रकल्प अंमलबजावणीसाठी राज्यातील जिल्हानिहाय क्षेत्राचे ग्रुप ए, बी, सी व डी असे वर्गीकरण केलेले आहे. सदर वर्गीकरणानुसार अनुसूची ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुणे जिल्ह्यातील मुळशी व वेल्हा हे तालुके ग्रुप सी मध्ये समाविष्ट आहेत.

शासन अधिसूचना नोंदणी फी-२०००/१२२९/सिआर-१०६/म-१, दि. ४ मे २००१ अन्वये ग्रुप सी, डी, डी + या क्षेत्रात नवीन उद्योग व उद्योगाचा विस्तार सुरू करणाऱ्या उद्योग घटकास नोंदणी फी ची माफी दिलेली आहे. तसेच शासन अधिसूचना मुद्रांक क्र.२०००/४२२९/सीआर-१०६४/म-१, दि. ५ मे २००१ अन्वये ग्रुप सी, डी, डी + या क्षेत्रात नवीन उद्योग व उद्योगाचा विस्तार सुरू करणाऱ्या उद्योग घटकास मुद्रांक शुल्काची माफी दिलेली आहे. यामधील स्पष्टीकरणात असे नमूद आहे की, आयुक्त उद्योग मुंबई किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांने सदरचा घटक हा नवीन उद्योग/नवीन उद्योगाचा विस्तार म्हणून घटक प्रमाणित केला असावा.

याबाबत महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ यांचे कार्यकारी संचालक यांनी त्यांचेकडील पत्र क्र. एमटीडीसी/इन्सेटिव्ह/दिनांक १९ सप्टेंबर २००२ अन्वये नोंदणी कार्यालयास असे कळविले की, शासन परिपत्रक दिनांक ७ एप्रिल १९९९ चे शासन निर्णयानुसार पर्यटनास उद्योग मानण्याचा निर्णय झालेला आहे. तसेच दिनांक १६ सप्टेंबर २००२ च्या शासन निर्णयानुसार नवीन सामूहिक प्रोत्साहन योजना जाहीर करून पर्यटन प्रकल्पाकरिता मुद्रांक शुल्काची माफी देय केली आहे. यामध्ये असेही नमूद केले आहे की, अर्जदार कंपनीस मुद्रांक शुल्काची माफी मिळणेकरिता अर्जदार कंपनीच्या अर्जाबाबत विचार व्हावा.

महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक विभाग शासन, निर्णय क्र.एमटीसी-२००५/२/ प्र.क्र.१७२/पर्यटन दिनांक १६ डिसेंबर २००६ च्या निर्णयातील मुद्दा क्र.१० (३) अन्वये ग्रुप (झोन) बी व सी मध्ये देण्यात आलेल्या पर्यटन प्रकल्पास पूर्णतः मुद्रांक शुल्काची माफी देण्यात आली

आहे. त्या अनुषंगाने महसूल व वन विभागाकडील आदेश क्र.मुद्रांक-२००७/सी.आर.२१७/म-१, दिनांक १ ऑक्टोबर २००७ नुसार पर्यटन विभागाच्या दिनांक १६ डिसेंबर २००६ शासन निर्णयान्वये व्याख्या केलेले व मान्यता दिलेले नवीन पर्यटन युनिट सुरू करण्याच्या संबंधात किंवा त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीत अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या परिमंडळ-ब व क (झोन बी व सी) क्षेत्रातील पर्यटन युनिटाचा विस्तार करण्याच्या संदर्भात निष्पादित केलेल्या पहिल्या जमीन अभिहस्तांतरण संलेखाकार मुद्रांक शुल्क माफी देण्यात आली आहे. व्यवस्थापकीय संचालक, एमटीडीसी लि. यांच्या क्र.एमटीडीसी/इन्सेन्टिव्ह/सर्टिफिकेट-१९/२००९, दि. २९ सप्टेंबर २००९ च्या पत्रान्वये मे.लवासा कॉर्पोरेशन यांना नवीन पर्यटन युनिट असल्याने मुद्रांक शुल्क माफीस पात्र असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता प्रकरणातील खरेदी घेणार मे.लवासा कार्पोरेशन (तत्कालीन नाव द लेक सिटी कार्पोरेशन प्रा.लि.) मुद्रांक शुल्कास माफीस पात्र आहेत, या नोंदणी महानिरीक्षक यांच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**वतनाच्या जमीनीच्या खरेदीमध्ये देय असलेल्या नजराणा फी ची वसुली न होणे :-** R&FD च्या ८ सप्टेंबर १९८३ च्या निर्णयानुसार जेव्हा वर्ग-II मधील शेतजमीन बिगरशेती वापरासाठी विकण्यासाठी तिच्या मालकाला परवानगी द्यायची असते तेव्हा मालकाने (alienor) निव्वळ अप्राप्त उत्पन्नाच्या ७५ टक्के रक्कम म्हणजेच सध्याच्या बाजारभाव किंवा विक्रीची किंमत यापैकी जास्त रक्कम आणि आवेदकाला प्रथम ज्या भोगवटा किंमतीला जमीन प्रदान करण्यात आली होती त्या रकमेतील तफावतीच्या ७५ टक्के रक्कम शासनाला प्रदान करावी. परंतु, BTAL अधिनियम, १९४८ च्या विभाग ६३-एक-अ (II) अनुसार, अधिकृत औद्योगिक वापरासाठी वतन (वर्ग-II) जमीनीची खरेदी करण्यासाठी नजराणा फी ऐवजी विक्री करार लागू झाल्याच्या एक महिन्याच्या आत खरेदी किमतीच्या फक्त २ टक्के रक्कम देय असते. त्याचप्रमाणे BTAL अधिनियम, १९४८ च्या अंतर्गत उद्योग संचालनालयाने ज्या अटींवर शेतजमीन खरेदी करण्यास परवानगी दिली होती (डिसेंबर, २००२ आणि नोव्हेंबर, २०१०) त्यानुसार LCL ने जमीन खरेदी आणि त्याचा वापर याच्या तपशीलाचा अहवाल दर सहा महिन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करायचा असतो.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की LCL ने ऑक्टोबर, २००६ आणि जुलै, २०१० दरम्यान एकूण रु.४४.३६ कोटी बाजारमूल्यांच्या ११९.३२ हेक्टर्स वतन (वर्ग-II) जमीनीची औद्योगिक कारणासाठी खरेदी करण्यासाठी ७२ वेळा व्यवहार केले होते. या प्रकरणांत २ टक्क्यांनी देय असलेल्या नजराणा फी ची ऑगष्ट, २०११ पर्यंत वसुली केली गेली नव्हती. त्याचप्रमाणे ३० दिवसांच्या विहित मुदतीत नजराणा फी चे प्रदान न झाल्याने अटींचा भंग झाला होता. ज्यामुळे ७५ टक्क्यांनी रु.३३.२६ कोटी नजराणा फी लागू झाली. या रकमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून कुठल्याही मागणी सूचना निर्गमित झालेल्या नाहीत.

हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यावर जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांना दिलेल्या निर्देशानुसार मावळ आणि भोर येथील उपविभागीय अधिका-यांनी संबंधित व्यक्तींना कारणे दाखवा नोटीस निर्गमित केल्या आहेत आणि या बाबतीत तपास प्रगतीपथावर आहे असे नमूद केले (जुलै, २०११).

शेतजमीनीच्या खरेदी आणि वापराविषयी LCL ने सादर केलेल्या सहामाही विवरणपत्रांचा नजराणा फीच्या आकारणी आणि समयोचित वसुलीसाठी जिल्हाधिका-यांनी वापर करावयास हवा होता हे इथे नमूद करणे आवश्यक आहे. संचालनालयाने या सहामाही विवरणपत्रांची तपासणी न केल्यामुळे रु.३३.२६ कोटी रकमेची वसुली झालेली नाही.

या प्रकरणाची चौकशी सुरू असून LCL चे याबाबतचे मत आणि त्यानंतर सिद्ध झालेल्या प्रकरणांचे विनियमन लक्षात घेतल्यावर ७५ टक्के दराने नजराणा फीची वसुली करण्यासाठी कार्यवाही केली जाईल असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी निर्गमन परिषदेत नमूद केले (ऑक्टोबर, २०११).

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

शासन निर्णय दि. ८ सप्टेंबर १९८३ नुसार भोगवटादार वर्ग-२ शेत जमीन बिगरशेती प्रयोजनार्थ हस्तांतरीत करण्यासाठी मिळकतीच्या अनर्जित उत्पन्नाच्या ७५ टक्के रक्कम शासनास प्रदान करण्याची तरतुद आहे. तसेच शासन परिपत्रक दि. ९ जुलै २००२ मधील तरतुदीनुसार इनाम/वतन जमीनीचे पूर्वपरवानगीने बिनशेती प्रयोजनार्थ हस्तांतरण झाले असल्यास ५० टक्के नजराणा रक्कम व विनापरवानगीने हस्तांतरण झाले असल्यास ७५ टक्के नजराणा रक्कम शासनास जमा करण्याची तरतुद आहे. तथापि मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनिमय, १९४८ च्या कलम ६३ १-अ पोटकलम १ मधील तरतुदीनुसार ख-याखु-या औद्योगिक प्रयोजनार्थ खरेदी करावयाची जमीन भोगवटादार वर्ग-२ सत्ता प्रकाराची असल्यास, खरेदीदारांनी अशा जमीनी कोणत्याही शर्तीवर धारण केली असली तरी, खरेदीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत खरेदीच्या किंमतीच्या २ टक्के एवढी रक्कम जिल्हाधिकारी, यांचेकडे जमा करावी अशी तरतुद करण्यात आली आहे. ३० दिवसात २ टक्के नजराणा रक्कम जमा केली नसल्यास जमीनीच्या धारणाप्रकारानुसार अनुषंगिक धोरणाप्रमाणे नजराणा रक्कम शासनास जमा करणे अपेक्षित आहे.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अहवालानुसार लवासा प्रकल्पाअंतर्गत येणा-या वतन जमीनींचे ७२ प्रकरणी व्यवहार झाले आहेत. यापैकी ४ प्रकरणात मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम १९४८ च्या कलम ६३ १-अ पोट-कलम १ नुसार २ टक्के नजराणा रक्कम रु. ४,३५२ सरकार जमा केली आहे. वतन जमीनींच्या २ प्रकरणी जमीन जुन्या शर्तीवर धारण केली असल्याने संबंधितांनी बिगरशेती कारणासाठी वापर करण्यापूर्वी जमीन मूल्याच्या ५० टक्के नजराणा रक्कम रु.१,३१,५९६ सरकार जमा करून घेण्यात आली आहे.

६२ प्रकरणात पूर्वीच्या धारकाने जमीनीच्या ५० टक्के नजराणा रक्कम रु. ४१,२०,५७३ भरुन जमीन भोगवटादार वर्ग-१ झालेली असल्याने या प्रकरणांत पुन्हा नजराणा रक्कम भरुन घेतलेली नाही.

**तसेच उर्वरित ४ प्रकरणांत संबंधितास नजराणा रक्कम भरण्या संबंधी नोटीस बजावली असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.**

महसूल व वन विभागाच्या ८ सप्टेंबर १९८३ च्या शासन निर्णयानुसार जेव्हा वर्ग-II मधील शेतजमीन बिगर शेती वापरासाठी विकण्यासाठी तिच्या मालकाला परवानगी द्यायची असते तेव्हा मालकाने (alienor) निव्वळ अप्राप्त उत्पन्नाच्या ७५% रक्कम म्हणजेच सध्याचा बाजारभाव किंवा विक्रीची किंमत यापैकी जास्त रक्कम आवेदकाला प्रथम ज्या भोगवटा किंमतीला जमीन प्रदान करण्यात आली होती त्या रक्कमेतील तफावतीच्या ७५ टक्के रक्कम शासनाला प्रदान करावी. महाराष्ट्र शेतजमीन (मालकीवरील मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या विभाग २१ नुसार, अतिरिक्त जमीनीविषयी जिल्हाधिका-यांनी घोषणा करावी आणि अशी अतिरिक्त जमीन ही अधिनियमाच्या विभाग २७ मध्ये करारनिविष्ट केल्याप्रमाणे भूमिहीन व्यक्तींना वाटण्यात यावी. त्याचप्रमाणे, अधिनियमाच्या विभाग २९ मध्ये करारनिविष्ट केल्याप्रमाणे विभाग २७ अंतर्गत प्रदान केलेली जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वानुमतीशिवाय विक्रि,भेट,गहाण, अदलाबदल इ.च्या रुपात हस्तांतरित केली जाऊ नये.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्याच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, LCL (लवासा सिटी कॉर्पोरेशन) ने औद्योगिक वापरासाठी एकूण रु. ४.२३ कोटी बाजार मूल्याच्या २१४.५८ हेक्टर्स क्षेत्राएवढी कमाल मर्यादेची जमीन खरेदी करण्यासाठी ऑक्टोबर, २००२ आणि फेब्रुवारी, २००९ दरम्यान ४८ व्यवहार केले होते. यातील एकाही प्रकरणात जिल्हाधिकारी, पुणे यांची पूर्वानुमती प्राप्त केली गेली नव्हती. जिल्हाधिका-यांकडून आवश्यक मान्यता घेतल्याशिवाय ही विक्री प्रकरणे LCL या खरेदीदाराच्या पक्षात नोंदणीकृत केली गेली होती अथवा नाही याविषयी आम्हांस कल्पना नाही. अधिनियमातील अटींचा भंग झाल्यामुळे या प्रकरणात बाजारमूल्याच्या ७५ टक्के नजराणा फी लागू होती. या रु. ३.१७ कोटी रकमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी कुठल्याही मागणी सूचना निर्गमित केल्या नव्हत्या.

हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यावर, जिल्हाधिकारी, पुणे यांनी (जुलै, २०११)असे नमूद केले की, त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार उप विभागिय अधिकारी, मावळ यांनी संबंधित व्यक्तींना सूचना दिल्या आहेत आणि याबाबतीतील चौकशी प्रगतीपथावर आहे.

LCL ने शेतजमीनीच्या खरेदी आणि वापर याविषयी सादर केलेल्या सहामाही विवरणपत्रांचा जिल्हाधिका-यांनी नजराणा फीची आकारणी आणि वसुली करण्यासाठी वापर करावयास हवा होता.हे येथे नमूद करणे आवश्यक आहे. सहामाही विवरणपत्रे तपासण्यात संचालनालयाला आलेल्या अपयशामुळे रु. ३.१७ कोटी रकमेची वसुली झाली नाही. तसेच कुठल्याही मान्यतेशिवाय LCL च्या नांवे जमीनीची खरेदी नोंदणी करण्यात आली आहे.

या प्रकरणाची चौकशी सुरू असून LCL चे याबाबतचे मत आणि त्यानंतर सिद्ध झालेल्या प्रकरणांचे विनियमन लक्षात घेतल्यावर ७५ टक्के दराने नजराणा फीची वसुली करण्यासाठी कार्यवाही केली जाईल असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी निर्गमन परिषदेत नमूद केले (ऑक्टोबर, २०११).

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मा. महालेखापालांच्या अहवालात, एकूण ४८ प्रकरणांबाबत नजराणा रक्कम वसुल करण्याविषयी मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. परंतु, जिल्हाधिकारी, पुणे यांच्या तपासणीत प्रत्यक्षात ९० प्रकरणे आढळून आली आहेत. ९० प्रकरणांपैकी ८ प्रकरणे, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ (एक) (अ) मधील तरतुदीनुसार व्यवहारांबाबत ३० दिवसांच्या आत अर्ज दाखल झाल्याने सदर जमीनींच्या चालू बाजार भावाच्या किंमतीच्या २ % प्रमाणे नजराणा रक्कम वसुलीस पात्र असून त्यापैकी ५ प्रकरणांमध्ये एकूण रु. ३,७८,१६४ इतकी नजराणा रक्कम भरुन घेण्यात आली आहे.या ठिकाणी हे स्पष्ट करण्यात येते की मा. महालेखापालांनी त्यांचे अहवालात जरी दि. ८ सप्टेंबर १९८३ च्या

शासन निर्णयाचा उल्लेख केला असला तरी तद्नंतर सन १९९४ व २००५ मध्ये मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये कलम ६३ (एक) (अ) समाविष्ट केल्यामुळे त्या तरतुदींनुसार उपरोक्त कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

उर्वरित प्रकरणांपैकी ५६ प्रकरणांत ३० दिवसांच्या आत अर्ज दाखल न झाल्याने, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची मर्यादा कमी करणे) (अधिक जमीनीचे वाटप) आणि (सुधारणा) नियम, २००१ मधील नियमानुसार प्रस्तावित जमीनी या अकृषिक कारणांसाठी खरेदी केलेल्या असल्याने ७५ टक्के प्रमाणे एकूण रु. ११,८७,१३,५७६ एवढी अनर्जित रक्कम भरुन घेण्यात आली आहे. म्हणजेच ९० पैकी एकूण ६४ प्रकरणांत एकूण रु. ११,९०,९१,७४० एवढा नजराणा भरुन घेण्यात आला आहे. उर्वरित २६ प्रकरणांबाबत नजराणा रक्कम वसुल करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

**स्वामित्वधनाच्या थकबाकीची वसुली न होणे**

मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ च्या नियम २९ च्या अनुसूचि-१ अनुसार, १५ डिसेंबर २००६ आणि १० फेब्रुवारी २०१० दरम्यान परवानाधारकांकडून गौण खनिजांच्या उत्खननासाठी प्रति ब्रास रुपये १०० आणि ११ फेब्रुवारी २०१० पासून प्रति ब्रास रुपये २०० इतके स्वामित्वधन वसुली योग्य होते.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, पाच खाणींमधून खनिजांचे उत्खनन करण्यासाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी परवानगी दिली होती. तहसीलदार मूळशी, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पुणे आणि उप अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या आधारावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे यांनी तयार केलेल्या अहवालावरुन असे दिसून येते की, LCL ने इमारती, बंगले, दुकाने, कार्यालये, रस्ते आणि धरणे बांधण्यासाठी ८,०८,२४६ बास एवढ्या मुरुमाचे उत्खनन केले होते. जिल्हा परिषद आणि MKVDC यांच्या बरोबर केलेल्या करारानुरुप इतर ठिकाणी उत्खनन करण्यात आले होते. तथापि, मुरुम उत्खननाबद्दल LCL ने रुपये १५.०५ कोटी स्वामित्वधन आकारांचे प्रदान केले नव्हते. शासनाच्या पर्यटन धोरणानुसार स्वामित्वधन आकाराच्या प्रदानातील प्रोत्साहने मिळण्यासाठी LCL च्या पात्रतेविषयी मतभेद असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी निर्गमन परिषदेत नमूद केले (ऑक्टोबर, २०११) त्याचप्रमाणे, या प्रकरणात तपास केला जाईल आणि LCL ने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेचा विचार करून निर्णय घेण्यात येईल असे महसूल व वन विभागाच्या प्रधान सचिवांनी नमूद केले.

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि. २ एप्रिल २०११ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडून मागविलेल्या मार्गदर्शनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी महालेखाकार(लेखापरिक्षा), मुंबई यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांप्रमाणे लवासा कंपनीकडून स्वामित्वधनाची रक्कम वसुल करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी, पुणे यांना शासन स्तरावरून देण्यात आल्या आहेत

स्वामित्वधनाची रक्कम वसुलीविरोधात लवासा कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ६४६३/२०१० दाखल केली होती. सदर याचिकेत दिनांक १६ ऑगस्ट २०१० रोजी आदेश देताना स्वामित्वधन वसुलीस स्थगिती देऊन सदरची याचिका रिट याचिका क्र. ५२५५/२०१० बरोबर सुनावणीसाठी ठेवण्यात यावी, असे आदेश पारित केले न्यायालयाच्या अंतिम आदेशाप्रमाणे वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

**जल क्रीडा आणि इतर मनोरंजनात्मक क्रीडा प्रकारांवर करमणूक शुल्काची आकारणी न होणे**

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, च्या विभाग ५(अ), अनुसार कुठल्याही जलक्रीडा प्रकारासाठी मालकाने कर आकारुन शासनाला प्रदान करावा. त्याचप्रमाणे, विभाग ५ (अ) (i) मधील तरतुदींनुसार जलक्रीडाप्रकार सुरू झाल्याच्या तारखेपासून पहिल्या तीन वर्षांसाठी कुठलेही शुल्क आकारले जाऊ नये, त्यानंतरच्या दोन वर्षांसाठी विभाग ५(अ) (iii) अनुसार पूर्ण करमणूक शुल्क देय होते.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, डिसेंबर, २००८ पासून LCL ने प्रकल्पात जलक्रीडा आणि इतर मनोरंजनात्मक क्रीडाप्रकार सुरू केले. पहिल्या तीन वर्षांसाठी जर सूट दिली नसती तर डिसेंबर, २००८ ते मार्च, २०११ या कालावधीत

जलक्रीडा प्रकार इ. वर आकारलेल्या रु. १.७४ कोटी रकमेवर करमणूक शुल्क वसुल करता आले असते. जल क्रीडा प्रकार सुरू करण्यासाठी, LCL ने जिल्हाधिकारी, पुणे यांची परवानगी घेणे आवश्यक होते. तथापि, आजतागायत (जुलै, २०११) अशी परवानगी दिली गेली नाही आणि LCL कडूनही करमणूक शुल्क प्रदान केले गेले नाही. सूट देण्याचे सदर प्रकरण शासनाकडे प्रलंबित असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांच्य अभिलेख्यांवरुन स्पष्ट झाले. (सप्टेंबर, २०११) लवकरच याबाबतीत निर्णय घेतला जाईल असे महसूल व वन विभागाच्या प्रधान सचिवांनी निर्गमन परिषदेत नमूद केले (ऑक्टोबर, २०११).

**ज्ञापन :**

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात **महसूल व वन** विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

पुणे येथील ता. मुळशी येथे लवासा कार्पोरेशन लि. यांचे वरसगाव धरणातील जलक्रीडा उपक्रम दिनांक १ डिसेंबर २००८ पासून सुरू असून या जलक्रीडा उपक्रमास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील कलम ३ (५) (अ) अनुसार प्रकल्प सुरू झाल्यापासून प्रथम ३ वर्षांकरिता संपूर्ण करमणूक शुल्क माफी व पुढील २ वर्षांकरिता करमणूक शुल्क माफी अनुज्ञेय आहे.

तथापि, या प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने जलक्रीडा उपक्रमाकरिता करमणूक शुल्क सवलत अनुज्ञेय होणेपूर्वी शासन परिपत्रक दि. १२ मे १९९८ नुसार जलक्रीडा उपक्रमाकरिता देयक तिकीटांना मंजुरी घेतली नसल्याने तसेच नियमावलीतील तरतुदीनुसार तिकीटांचे तसेच तिकीट नाशनाच्या नियमांचे पालन केले नसल्याचे निदर्शनास आल्याने अधिनियमातील कलम ५ तसेच ९(अ) नुसार प्रकल्प सुरू झाल्यापासून प्रत्येक महिन्याकरिता रु. २००० याप्रमाणे मान्यता प्राप्त होईपर्यंत महत्तम दंड आकारावा. अशा सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दि. ८ ऑगस्ट २०११ तसेच दि. १५ मार्च २०१२ च्या पत्राद्वारे विचारणा केल्यानुसार देण्यात आल्या. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी डिसेंबर, २००८ ते मे, २०१२ या कालावधीकरिता ४२ महिन्यांसाठी रु. २००० प्रमाणे रु. ८४,००० व्यवस्थापनाकडून वसुल करण्यात आले आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार संपूर्ण करमणूक शुल्क माफी व ५०% करमणूक शुल्क माफीचा कालावधी नोव्हेंबर, २०१३ मध्ये संपला असून व्यवस्थापन या कालावधी दरम्यान अनुज्ञेय ५०% तसेच कालावधी संपल्यानंतर अनुज्ञेय संपूर्ण दराने करमणूक शुल्क शासन जमा करीत आहे. विलंब शुल्कासह या व्यवस्थापनाने मे, २०१४ पर्यंत रु. ४३ लाख, ६० हजार, ४५७ इतका करमणूक शुल्क भरणा केला आहे.

**शिफारशी**

शासनाने खालील गोष्टींचा विचार करावा :—

- महाराष्ट्रात सर्व ठिकाणी थंड हवेच्या ठिकाणांचा विकास एकसमान आणि समतोल व्हावा यासाठी अशा ठिकाणांचा शोध घेण्यासाठी सुसाध्यता अभ्यास घेण्यात यावा.
- प्रकल्प विकासकाची निवड करण्यात पारदर्शकता राहण्याची खात्री करण्यासाठी स्वारस्य पत्रे, इ. मागवावी.
- खाजगी संस्थांना SPA चा दर्जा देण्याच्या धोरणाचा आढावा घ्यावा.
- योग्य कार्यतंत्र विकसित करून वेगवेगळ्या पर्यावरण कायद्यांच्या अनुपालनावर प्रभावी संनियंत्रण ठेवावे.
- ज्या प्रकल्पाद्वारे सार्वजनिक हित जपले जाणार आहे, केवळ अशा प्रकरणांसाठीच महसूली प्रभावाच्या सूट आणि सवलतींचे प्रदान मर्यादीत ठेवावे.
- लवासा प्रकल्पाचा खर्च आणि त्यामुळे समाजाला होणाऱ्या लाभाचे विश्लेषण करावे.

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांनी केलेल्या शिफारशींच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

गिरीस्थान विकसनासाठीची नियमावली राज्यातील मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांसाठी लागू असल्याने अशा प्रदेशांमध्ये सुयोग्य क्षेत्र गिरीस्थान म्हणून निर्देशित करता येऊ शकेल. त्या दृष्टीने शासन विचार करेल.

अशा प्रकल्पांसाठी शासन जागा वाटप करीत नाही, किंबहुना गिरीस्थानाकरिता निर्देशित केलेल्या क्षेत्रापैकी किमान ४०० हे. किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्राची मालकी असलेला विकासक सदरचे क्षेत्र गिरीस्थान म्हणून अधिसूचित करण्याची विनंती करू शकतो. त्यामुळे खाजगी मालकी असलेल्या क्षेत्रावरील विकसनासाठी अन्य विकसकांकडून स्वारस्य पत्रे मागविण्याचा प्रश्न उदभवत नाही.

खाजगी संस्थांना SPA म्हणून नियुक्त करताना, अशा SPA ने त्यांच्याकडे Chief Planner चे पद निर्माण करावे व अशा पदावर शासनाकडील उप संचालक, नगर रचना या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी प्रतिनियुक्तीवर नेमावा तसेच अशा अधिकाऱ्यास कलम १५२, अन्वये अशा विशेष नियोजन प्राधिकरणाचे बांधकाम परवानगी देण्याबाबतचे अधिकार प्रत्यार्पित करावे, अशा आशयाचा विचार विभागाकडे सुरू आहे. याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे सादर केलेला नाही.

सदर बाब पर्यावरण विभागाशी संबंधीत आहे.

विद्यमान परंपरागत गिरीस्थानांवरील पर्यटकांची गर्दी व तेथील पायाभूत सेवासुविधांवरील ताण कमी करणे तसेच खाजगीकरणाच्या माध्यमातून नवीन पर्यटन स्थळे शोधून पर्यटनासाठी मुलभूत व पायाभूत सेवासुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून गिरीस्थान विकसनासाठीची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अशा नवीन गिरीस्थानामुळे होणाऱ्या पर्यटनातून मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. त्यामुळे अशा विकसनामुळे प्रत्यक्षपणे सार्वजनिक हित जपले जाणार आहे.

लवासा प्रकल्पाचा खर्च आणि त्यामुळे समाजाला होणाऱ्या लाभाचे विश्लेषण याबाबत लवासा कंपनीकडून माहिती घेऊन विश्लेषण करता येऊ शकेल.

**साक्ष :**

**१.३** उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात दिनांक १५ जुलै २०१४, २२ जुलै २०१४, ११ सप्टेंबर २०१५, १२ सप्टेंबर २०१५, २० ऑक्टोबर २०१५, २७ ऑक्टोबर २०१५ व ५ नोव्हेंबर २०१५ रोजी समितीने परिच्छेद क्रमांक **४.३.७ "थंड हवेच्या ठिकाणासदृष्य क्षेत्र शोधण्यात आणि प्रकल्प विकासकाच्या निवडीत पारदर्शकतेचा अभाव", ४.३.८'पर्यावरणीय/मंत्रालयाच्या मान्यतेशिवाय प्रकल्पाला दिलेली परवानगी आणि प्रकल्प क्षेत्रात केलेली वाढ", ४.३.९'LCL ला विशेष नियोजन प्राधिकाऱ्याचा दर्जा देणे-शासनाच्या भूमिकेचे सौम्यीकरण आणि अनावश्यक अनुग्रह" व ४.३.१० "SPAकडून आराखडे आणि रेखांकने यांना अनियमित मान्यता"** यासंदर्भात नगरविकास सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, नगरविकास विभाग ही मॉनिटरिंग ॲथॉरिटी आहे. परंतु या प्रकरणी टाऊन प्लानिंग ने कोणती जबाबदारी घेतली होती, त्यांचा काय कंट्रोल होता? या संदर्भात स्थापन केल्या गेलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणामध्ये विभागीय अधिकारी व नगर रचना विभागाचे काही अधिकारी यांचा समावेश असणे अत्यावश्यक असतांना या नियोजन प्राधिकरणामध्ये केवळ संबंधित खाजगी कंपनीचे अधिकारी यांचाच समावेश असणे धक्कादायक आहे. याचा अर्थ असा होतो की, प्रकल्पावर काम करणारे लोकच प्रकल्पाचा दर्जा ठरवून त्याचे मुल्यमापन करणार. प्रकल्पावर काम करणारे लोकच त्यावर देखरेख करणार. यावर विशेष नियोजन प्राधिकरणाच्या निमित्ताने शासनाचा अंकुश असणे अत्यावश्यक होते. या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या निमित्ताने नगर विकास विभाग,नगर रचना विभाग, प्रकल्पावर प्रत्यक्ष काम करणारे खाजगी कंपनीचे अधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधला जाऊन करारनाम्यातील अटी व शर्तींचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. यासंदर्भात विशेष नियोजन प्राधिकरणाच्या बैठका, मिनिट्स, अजेंडा ही सर्व कामे कोण पाहत आहे ? या प्राधिकरणामध्ये जिल्हाधिकारी यांचा समावेश आहे, असे समजते. या प्राधिकरणावर विभागीय अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम करणे अत्यावश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले.

**१.४** याअनुषंगाने पुढे महालेखाकार यांनी असे विदित केले की, महालेखाकार कार्यालय का कहना यह है कि प्राइवेट सेक्टर के पार्टीसिपेशन के जरिये हिल स्टेशन के डेवलपमेंट के लिए नवम्बर, १९९६ में यह निर्णय लिया गया था. यह निर्णय वाईड पब्लिसिटी के जरिये नहीं लिया गया. राज्य सरकार ने एम.आर.टी.पी. ॲक्ट के सेक्शन ४० में क्लॉज १(बी) ॲड किया जिसके जरिए कोई भी एजेन्सी और अथॉरिटी को एस.पी.ए. बनाया जा सकता था. एल.सी.एल. प्राइवेट कंपनी है. इसको इस क्लॉज के तहत एस.पी.ए. बनाया गया जो कि क्वश्चनेबल था. एल.सी.एल. ने सितम्बर, २००८ में एक रिजोल्युशन पास किया जिसके जरिये १० मेंबर्स की एस.पी.ए. कमिटी बनायी गई जिसमें डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग एक मेंबर थे. इस कमिटी के बहुत सारे सदस्य एल.सी.एल. की पेरंट कंपनी हिंदुस्थान कंपनी के थे जिसकी वजह से एस.पी.ए. की ॲक्टीविटी पर सरकार का कंट्रोल कम हुआ और सरकार के कंट्रोल कम होते हुए वहाँ इररॅग्युलिटी हो गई. गव्हर्नमेंट का इंटरेस्ट और प्रकल्प से संबंधित व्यवहार में ट्रान्सपरन्सी रखनी जरूरी है. इस प्रकल्प में कहीं भी गव्हर्नमेंट का इंटरेस्ट प्रोटेक्ट नहीं हुआ ऐसा दिखायी देता है. इस काम का विज्ञापन अंतर्राष्ट्रीय स्तर पर दिया जाना चाहिए था. लवासा प्रोजेक्ट के बारे में जमीन, पानी और अन्य सुविधाओं को लेकर बहुत कॉन्ट्रव्हर्सी हुई थी. इन सभी बातों को देखते हुए ऐसा लगता है कि एल.सी.एल. को फायदा ही होने वाला था. इन सभी बातों पर सरकार ने सोचना चाहिए.

**१.५** या प्रकरणाबाबत महालेखाकारांनी काढलेल्या मुद्यांच्या संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास यांनी शासनाच्या धोरणाची माहिती सांगताना समितीस असे विदित केले की, शासनाने खाजगी सहभागातून अशा प्रकारची हिलस्टेशन्स विकसित करण्यासंदर्भातील भूमिका सन १९९६ मध्ये घेतली. ही भूमिका घेण्यामागचे मुख्य कारण हे होते की, शासनाच्या हे लक्षात आले होते की, ब्रिटिशांच्या काळापासून महाबळेश्वर, माथेरान या

सारख्या ठिकाणी असणारी हिलस्टेशन्स ही टुरिझमची मुख्य सेंटर्स आहेत हिलस्टेशन्सला लोक अनेक कारणांसाठी जातात. त्यातील प्रमुख कारण म्हणजे तेथील हवामान आहे तेथील हवामान चांगले असल्याने, तेथे गेल्यावर बरे वाटेल या उद्देशाने लोक तेथे जातात. तसेच, हिलस्टेशन्सच्या ठिकाणी चांगल्या शाळा आहेत, त्यामुळे शिक्षणाच्या उद्देशानेही लोक तेथे जातात. खाजगी सहभागातून अशी हिलस्टेशन्स विकसित केली तर, पर्यटनाला चालना मिळेल, शासनाला उत्पन्न मिळेल व रोजगार निर्मितीही होईल या दृष्टीकोनातून शासनाने हा निर्णय घेतला होता.

**१.६** खाजगी सहभागातून अशा प्रकारची हिलस्टेशन्स विकसित करणे शक्य व्हावे, या करिता शासनाने सन १९९६ मध्ये हिलस्टेशन्स विकसनासाठीची विशेष नियंत्रण नियमावली तयार करून ती त्यावेळी मंजूर असलेल्या राज्यातील विविध प्रादेशिक योजनांमध्ये अंतर्भूत करण्याकरिता एम.आर.टी.पी. ॲक्टच्या कलम २० (३) अंतर्गत लोकांच्या हरकती व सूचनांसाठी दिनांक ३ सप्टेंबर, १९९६ रोजी प्रसिद्ध केली होती. अशा प्रकारची हिलस्टेशन्स शहराच्या बाहेर विकसित होणार असल्याने या बाबतची सुस्पष्ट नियमावली अंतर्भूत करण्याच्यादृष्टीने ही अधिसूचना जारी करण्यात आली होती. त्यास अनुसरून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करून दिनांक २६.११.१९९६ रोजीच्या अधिसूचनेन्वये एम. आर.टी.पी. ॲक्टच्या कलम २० (४) अन्वये सदर नियमावली अंतिमतः अशा मंजूर प्रादेशिक योजनांच्या नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यात आली. अशा प्रकारे अत्यंत पारदर्शक पद्धतीने शासनाने या बाबतची पॉलिसी तयार केली.

**१.७** विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशास अनुसरून महालेखाकार यांनी असे सांगितले की, विभागके सचिव रिजनल डेवलपमेंट के बारे में कह रहे है. महालेखाकार यह बात ध्यान में लाकर देना चाहती है कि गव्हर्नमेंट से जितने भी प्लान ॲप्रू हुए है वह पूना के ही है. महालेखाकारांच्या या मतास अनुसरून विभागीय सचिवांनी असे विदित केले की, The policy framework was created in a transparent manner. Any suitable area or property having suitable topography can be declared by the Government for the purpose of development as a hill station. This was the policy of the Government. हिलस्टेशन विकसनासाठी शासनाला उपयुक्त वाटेल अशा प्रकारचे क्षेत्र असलेला भूभाग शासन हिलस्टेशन करिता उपयुक्त असल्याचे जाहीर करू शकेल अशा प्रकारची पॉलिसी शासनाने या संदर्भात स्वीकारली. त्या अनुषंगाने या प्रकरणामध्ये शासनाने प्रथम २० गावांकरिता दिनांक १५ जुलै, २००० रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली. त्या नोटिफिकेशनमध्ये असे नमूद केले की, या २० गावांमध्ये हिलस्टेशन विकसित करावयाचे आहे, त्या बाबत कोणाच्या हरकती वा सूचना असल्यास त्या मांडाव्यात. यास अनुसरून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करून दिनांक ३१ मे, २००१ रोजीच्या अधिसूचनेन्वये एम.आर.टी.पी. ॲक्टच्या कलम २० (४) अन्वये ही २० गावे हिलस्टेशन्स करिता पात्र व उपयुक्त असल्याचे नोटिफाय केले गेले. अशा प्रकारे ही प्रक्रिया देखील अत्यंत पारदर्शक पद्धतीने करण्यात आली होती.

**१.८** या बाबतच्या शासनाच्या पॉलिसीचे फ्रेमवर्क अशा प्रकारचे आहे की, त्याचा लाभ घेण्यासाठी भूधारकाला पुढे यावे लागते. सर्वसाधारणपणे कोणत्याही शहराचे जे डीसीआर तयार केले जातात. त्या डीसीआर मधील कोणत्या तरतुदीचा लाभ घ्यावयाचा आहे ते भूधारकाने नमूद करून प्लानिंग ऑथॉरिटीकडे प्रस्ताव सादर करावयाचा असतो व तेथून तो पुढे जातो, अशी प्रक्रिया असते. त्यानुसार हिलस्टेशन विकसनासाठीची विशेष नियंत्रण नियमावली देखील शासनाने आपल्या प्रादेशिक योजनांच्या नियमांवलीमध्ये अंतर्भूत केली आहे. या बाबतच्या पॉलिसीनुसार ज्या लोकांकडे या निकषांमध्ये बसणारी जमीन आहे, त्या जमीन मालकांनी पुढे आले पाहिजे. The Government has framed the policy. The landowner has to come forward with proposal. The Government does not acquire the land. The Government has just made the policy. Therefore, the objection of A.G. that the Government should have invited Expression of Interest is not applicable in this case.

**१.९** त्यानंतर शासनाने दिनांक १.०६.२००१ रोजी आपल्या पॉलिसीच्या रेग्युलेशन १ अंतर्गत काढलेल्या नोटिफिकेशनमध्ये १८ गावे हिलस्टेशन करिता उपयुक्त आहेत असे सांगितले. त्यानंतर शासनाने लेकसिटीला विशेष परवानगी देताना काही अटी व शर्तींच्या अधीन राहून तत्वतः मान्यता देत आहोत असे नमूद केले. In short the Government had a policy to allow private owners to develop Hill Station. If any private owner has a piece of land then he can come forward with an intention to develop the hill station. अशा प्रकारे पूर्ण पारदर्शक पद्धतीने हे काम केले गेले आहे त्यामुळे यामध्ये lack of transparency आहे हे महालेखाकारांचे म्हणणे विभागाच्या मते योग्य नाही.

**१.१०** समितीने पुढे अशी पृच्छा केली की, या संदर्भात राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर जाहिरात का दिली गेली नाही ? उपरोक्त समितीच्या प्रश्नाला या प्रकरणाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर, शासन जागा संपादित करून देणार नव्हते, तर ज्याची जागा असेल, त्याने पुढे आले पाहिजे होते पारदर्शक पद्धतीने या योजनेचे काम केले गेल्याने महालेखाकारांनी जो मुद्दा मांडला तो मुद्दा याच्याशी सुसंगत नाही असे सचिवांनी सांगितले.

**१.११** या मुद्याच्या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, जो पॉलिसी बनी उसके तहत गव्हर्नमेंट ने आईडेन्टीफाय करना चाहिए कि जो पार्टी आएगी उसकी क्या क्या रिक्वायरमेंट है ? वह किस किस एरिया में डेवलपमेंट करने वाली है ? महालेखाकार कार्यालय को लगता है कि इसमें लॅक ऑफ कंट्रोल हुआ है. एल.सी.एल. पर गव्हर्नमेंट का कंट्रोल नहीं था.

जो ६ प्रकल्प पूना में अ‍ॅप्रूव्ह हुए है वह फिजिबल है क्या यह देखना चाहिए. महालेखाकार का कहना यह है कि इसमें रिजनल डेवलपमेंट कहाँ हुआ है ?

**१.१२** महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, शासनाच्या धोरणानुसार ज्याच्याकडे जागा असेल त्याने अर्ज सादर करावयाचे होते.

**१.१३** स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटी ही संकल्पना कंपनीची आहे की, शासनाची आहे ? ही संकल्पना जर कंपनीची असेल तर, जगात असे कोठे घडले आहे का, की, स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीवर शासनाचा ताबा राहिलेला नाही ? महालेखाकारांच्या म्हणण्याप्रमाणे यावर शासनाचा वचक राहिलेला नाही. सर्वसाधारणपणे शासनाकडून कोणत्याही प्रकल्पाला परवानगी देताना त्यामध्ये ५१:४९ टक्क्यांचे प्रमाण दिसते या प्रकरणामध्ये समितीला ते देखील दिसत नाही. स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीचा जन्म लवासा संबंधीच्या मिटिंगमध्ये झाला, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याला मान्यता दिली, हा इतिहास आहे. समितीला असे वाटते की, याची माहिती सर्वांनाच असेल ही लपून राहणारी गोष्ट नाही, हे जगजाहिर आहे. In this case the control has been given to the private party.

**१.१४** स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीमध्ये जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असतील अशी एकच अट होती नंतर त्यामध्ये कोण होते या बाबतची माहिती नाही. एखाद्या शहरामध्ये बांधकाम कसे करावे, एफएसआय किती असावा, तेथे गार्डन किती असावीत, इमारती किती असाव्यात यावर शासनाच्या या विभागाचा व माननीय मंत्र्यांचा कंट्रोल असतो. परंतु, या केस मध्ये तो कंट्रोल विकासकांकडे गेला अशी माहिती समितीकडे आहे. अतः विभागाच्या सचिव महोदयांनी त्या बाबतची वस्तुस्थिती समितीस सांगावी असे समितीने विभागीय सचिवांना सांगितले.

**१.१५** समितीने विचारलेल्या माहिती संदर्भात विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला की, सदर प्रकल्पाला शासनाने सन २००१ मध्ये मंजुरी दिली होती. पूर्ण रिजनल प्लानमधील हा एक भाग होता. एमआरटीपी अ‍ॅक्टमधील कलम १८ नुसार, प्लानकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता असते. सन १९९६ मधील धोरणात देखील या बाबीचा अंतर्भाव केलेला आहे. “D.C.R. as incorporated in Development Plan of ‘C’ class Municipal Council (as amended from time to time) shall be applicable *mutatis mutandis* except those expressly provided. The power of Planning Authority shall be vested in the Collector. If at any time in future, it is noticed that the number of trees mentioned in these regulations are not properly maintained, the construction on the plot shall be treated as unauthorised and the action under the provisions of Maharashtra Regional & Town Planning Act 1966 be taken.” शासनाने तयार केलेल्या नियमानुसार, नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आली होती. एमआरटीपी अ‍ॅक्ट मधील कलम १८ नुसार, विकासावर नियंत्रण ठेवण्याच्या अधिकाराशी ही बाब सुसंगत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेल्या प्लाननुसार पुढील मंजुरी मिळवणे व इतर कार्यवाही करणे अपेक्षित होते.

**१.१६** मोठया शैक्षणिक संस्थेला किंवा एखाद्या व्यापारी संस्थेला प्लानमध्ये बदल करावयाचा असल्यास त्याबाबत मंजुरी घेण्याकरिता पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे जावे लागते. प्रत्येक प्रकरणामध्ये काहीही रिव्हीजन करावयाचे असल्यास त्या करिता जिल्हाधिकाऱ्यांकडून पुन्हा मंजुरी आणावी लागत होती. यामुळे बराच कालापव्यय होत असल्याचे दिसून आल्यामुळे सदर कंपनीने स्वतःला एसपीए जाहीर केले तर ते सोयीस्कर ठरेल, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० मध्ये सन २००२ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार, पुढील प्रमाणे तरतुद करण्यात आली. “(1B) notwithstanding anything contained in sub-section (1), the State Government may, by notification in the *official Gazette*, appoint any agency or authority created by or in accordance with Government order or instrument, or any company or corporation established by or under any State or Central Law, to be the Special Planning Authority for any notified area.” या ठिकाणी कंपनी या शब्दाचा उल्लेख आलेला आहे. सदर कायद्यामध्ये विधिमंडळाच्या मान्यतेने तरतुद करण्यात आली असून या तरतुदीचा वापर सदर प्रकरणात करण्यात आलेला आहे. दि. १२ जून २००८ मध्ये या संदर्भात आदेश निर्गमित केले असून एलसीएल कंपनीला काही अटी व शर्तींच्या अधीन राहून अधिकार प्रदान करण्यात आले. त्यांना काही गोष्टींकरिता अनुमती देण्यात आली तर काही गोष्टींचे नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांकडे राहील, असे स्पष्ट करण्यात आले.

**१.१७** जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण कोणत्या गोष्टीवर राहील, याबद्दल माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, “...shall be liable for legal action by the Collector.” नगर विकास किंवा डीसीआर मधील नियमावलींचा भंग केल्यास त्या संदर्भातील अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. सध्या पर्यावरण विभागाकडे मॉनिटरींग करण्याची पुरेशी व्यवस्था उपलब्ध नाही. या बाबत विचारविनिमय सुरू आहे. एसपीएने दिलेली प्रत्येक बांधकाम परवानगी दर तीन महिन्यांनी सहायक संचालक, नगर रचना,पूर्णे शाखा यांच्या निदर्शनास आणणे बंधनकारक आहे आणि त्यामध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास अशा बाबीवर जिल्हाधिकारी कारवाई करू शकतील, अशा आशयाची अट विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे याद्वारे शासनाने एसपीए वर आवश्यक ते नियंत्रण ठेवलेले आहे.

कोणत्या आधारे कंपनीची निवड केली जाते सुरूवातीला ॲक्वीलँड कंपनीने इंटरेस्ट दाखवला होता. जी कंपनी सन १९७५ पासून सन २००० पर्यंतच्या आवश्यक नोंदी करू शकत नाही, अशाच कंपनीला पुन्हा अंमलबजावणी व नियंत्रण ठेवण्याचे काम सोपवण्यात आले ? विधिमंडळाने कायदा तयार केला असे सचिवांनी सांगितले याबाबत विभागाचे नेमके काय म्हणणे आहे ? अशी पृच्छा समितीने केली यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कलम ४०(१)(बी) अंतर्गत एलसीएल यांना विशेष प्राधिकरण म्हणून नियुक्त केले होते. त्यांना कोणतेही डेलिगेटेड पॉवर्स असले तरी मास्टर प्लान तयार करण्यासाठी संचालक, नगर रचना यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे मास्टर प्लान तयार करता येणार नाही व त्यामध्ये कसलाही बदल देखील करता येणार नाही. ही स्टॅटयूटरी प्रोसेस कलम ४०(३) अंतर्गत असून प्लानमध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास संचालक,नगर रचना यांची मंजुरी घेणे आवश्यक असते.

**१.१८** समितीने पुढे अशी पृच्छा केली की, लवासा मधील प्लानमध्ये नंतर बदल करण्यात आला, त्याकरिता पर्यावरण विभागाची मान्यता घेतली गेली नाही. या प्रकल्पात काँक्रीटीकरण किती असावे या बाबत लवासाच्या संचालकांमध्ये वाद झाला व त्यातील एका संचालकाने या प्रकल्पातून राजीनामा दिला. प्लानमध्ये होणारे बदल ही बाब लवासाच्या एका संचालकाला देखील पटली नाही तर ती बाब शासनाला कशी काय मान्य झाली ?

समितीच्या उपरोक्त प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सांविधिक बृहत योजनेला मंजुरी मिळालेली आहे. मात्र या योजनेला संचालकांनी परवानगी दिलेली नाही ही बृहत योजना (Master plan) सादर केलेली असून त्यानंतर लोकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या. एप्रिल २०११ मध्ये हा प्लान वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करून तो संचालकांकडे पाठवण्यात आला. LCL has prepared the Master Plan and published it in the local newspapers.

**१.१९** जून, २००८ में पूना के जिल्हाधिकारी ने बृहत योजना अॅप्रूव्ह किया था. इसमें तीन मेजर चेंजेस है. ५०० मीटर्स के बेल्ट में कन्सट्रक्शन नहीं होना चाहिए इसमें वायोलेशन हुआ.

**१.२०** यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, दि. ७ जून २००८ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी लेआऊट मंजूर केले होते. The powers to approve the layout were vested with the Collector and not with the SPA. दि. १२ जून २००८ रोजी एलसीएल यांना एसपीए चे अधिकार देण्यात आले. सदर प्रकरणात मास्टर प्लान तयार करून त्याचे प्रारूप प्रसिद्ध केले होते. या नंतर काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या ही बृहत योजना अद्याप मंजूर होऊ शकली नाही.

**१.२१** बृहत योजना मंजूर न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या प्लाननुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. परस्पर मास्टर प्लान बदलणे अपेक्षित नाही. अशा वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी तयार केलेल्या प्लानची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. मास्टर प्लानवर शासनाचे नियंत्रण आहे. संचालक, नगर रचना यांच्या मान्यतेशिवाय हा प्लान अंतिम होऊ शकत नाही. प्लानच्या संदर्भात कार्यवाही व नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने दोन महत्वाच्या बाबी केलेल्या आहेत. (१) दर ३ महिन्यांनी दिलेल्या मंजुरीची प्रत एडीटीपीकडे पाठवावी (२) यामध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास अशा बाबीवर जिल्हाधिकारी कारवाई करू शकतील, अशी अट विहित करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे एसपीए वर आवश्यक ते नियंत्रण ठेवण्यात आलेले आहे.

**१.२२** मात्र उक्त प्रकरणात या बाबी करण्यात आलेल्या नाहीत. दि. १८ मार्च २०११ च्या पत्रान्वये उल्लंघन झाल्याची बाब सहायक संचालक, नगररचना, पुणे (एडीटीपी) यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

**१.२३** समितीने या संदर्भातील सर्व कागदपत्रे एक नस्ती तयार करून समितीला माहिती पाठविण्यात यावी. शासनाने वेळोवेळी काढलेल्या अधिसूचना, प्रारूप नागरिकांनी केलेल्या सूचना, शासनाचे धोरण, नगर विकास विभागाने केलेला पत्रव्यवहार, मास्टर पॉलीसी बाबत केलेला पत्रव्यवहार, दि. १८ मार्च २०११ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेले पत्र, त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही, सुधारित ज्ञापने, नगर विकास विभागाकडील नकाशे इ. सर्व कागदपत्रे समितीला सादर करावीत असे निदेश दिले असता जिल्हाधिकारी पुणे यांनी समितीला दिलेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-अ)**

महालेखाकार यांनी विभागाकडे अशी विचारणा केली की, दो रिपोर्ट दो साल के बाद आए और एक रिपोर्ट दिया ही नहीं. यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, विशेष परवानगी घेण्याकरिता दर ३ महिन्यांनी सहायक संचालक, नगररचना, पुणे शाखा यांच्या निदर्शनास आणून देणे बंधनकारक होते. त्या नुसार, त्यांनी २०११ मध्ये अहवाल तयार केला.

**१.२४** समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००८ मध्ये एसपीएला मान्यता देण्यात आली होती. नियमानुसार दर ३ महिन्यांनी अहवाल देणे आवश्यक असताना सन २०११ मध्ये म्हणजेच ३ वर्षानंतर अहवाल देण्यात आला.

**१.२५** एसपीए डिक्लेअर झाल्यावर त्यांनी विभागाकडे अहवाल पाठविला नाही त्यांची अशी धारणा आहे की, कलम ४४ (अ) अंतर्गत तहसीलदार यांना कळविले आहे. त्यांनी उशीरा नजरेस आणलेले आहे. त्याबाबत चौकशी केलेली आहे त्या अनुषंगाने पर्यावरण संबंधीत ७२ मुद्दे त्यांना कळविण्यात आले होते. सदरहू मुद्याचे निरसन केल्याचे त्यांनी सांगितले आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

सदरहू ७२ मुद्यांची यादी समितीला लवकरात लवकर द्यावी. तसेच त्याबाबतीत काय स्पष्टीकरण देण्यात आले आहे त्याची माहिती देखील समितीला उपलब्ध करून द्यावी. असे निदेश समितीने यावेळी विभागाला दिले.

**१.२६** या कंपनीने प्रकल्पामध्ये खूप बदल केलेले आहेत. ते बदल नियमात बसणारे नसतील तर नगरविकास विभागाचे याबाबत मत काय आहे. त्याबाबत कोणती कारवाई केली जाणार आहे ? या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, या प्रकरणामध्ये अजून त्यांच्या मास्टर प्लॅनला संचालकांनी मान्यता दिलेली नाही. या प्रकरणी त्यांच्या तांत्रिक अडचणी आहेत. यासंदर्भात त्यांनी शासनाकडून मार्गदर्शन मागितले आहे. ले-आऊट मध्ये त्यांच्या स्तरावर बदल केलेला आहे. सध्या मास्टर प्लॅनला मंजुरी देताना जो विकास जागेवर आहे तो मास्टर प्लॅनशी सुसंगत नाही. सदरची डेव्हलपमेंट ही नॉन-कन्फॉर्मिंग डेव्हलपमेंट राहणार आहे. जो पर्यंत प्लॅन मंजूर होईल तो पर्यंत होणारा कुठलाही विकास नॉन-कन्फॉर्मिंग ठरेल.

**१.२७** विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, महालेखाकारांनी काढलेल्या काही मुद्यांशी विभाग देखील सहमत आहे. There should have been better control of SPA in this project. शासनाने केलेल्या कायद्यातील तरतुदीचा आधार घेऊन एसपीए चे कामकाज चालते. मात्र महालेखाकारांनी असे ऑब्झर्वेशन केले आहे की, एसपीए ने नियमाच्या पलिकडे जाऊन काम केल्याचे दिसले. शासन स्तरावरुन कार्यकक्षा ठरवून एसपीएला अधिकार दिले आहेत. परंतु त्यामध्ये कंट्रोल ठेवण्याची आवश्यकता होती. हा मुद्दा बरोबर असून कुठल्याही कंपनीवर कंट्रोल करण्यासाठी एक मॅकॅनिझम ठरविला पाहिजे.

**१.२८** एडीटीपीने त्यांना सन २०११ साली पत्र दिले होते. आता २०१४ साल सुरू आहे. पत्र देऊन तीन वर्षे झाली असून आतापर्यंत त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. व्हायलेशन संदर्भात कारवाई करण्यास किती कालावधी लागेल. तसेच एडीटीपी मास्टर प्लॅनचे प्लॅनिंग कधी करणार आहे अशी समितीने विचारणा केली असता या प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये काही ठिकाणी खाजगी जमीन देखील आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे क्षेत्र हे डिसकन्टीन्यु आहे. त्यामुळे मास्टर प्लॅन करण्यास अडचणी येत आहेत. ज्या जागेवर एसपीएचे नियंत्रण नाही अशा खाजगी जमीनीवर रस्ते दाखविले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**१.२९** या भागातील १०० शेतकऱ्यांनी लवासा सिटी करिता त्यांच्या जमीनी दिल्या आहेत. या लोकांना पाणी, वीज, रस्ते पुरविणे हे शासनाचे काम आहे. त्यांना ग्रामपंचायत आहे. लवासा सिटीच्या बाजूच्या खेड्यातील शेतकऱ्याला लवासा सिटीमधील हॉस्पिटलमध्ये जायचे असल्यास त्याला तेथे येण्यास परवानगी नाही. मग या खेड्यांमधील शेतकऱ्यांनी कुठल्या हॉस्पिटलमध्ये जायचे ? What the Government have decided about these problems ? या समितीच्या प्रश्नाला शासनाने याकरिता एक समिती स्थापन केली असून समितीचा अहवाल अंतिम टप्प्यावर असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला. शासनाने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल लवकरात लवकर समितीस उपलब्ध करून द्यावा असे निदेश समितीने विभागास यावेळी दिले.

**१.३०** पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे अनुपालन न होणे यासंदर्भात महालेखाकार यांनी दिसंबर, २००२ में ७००० हेक्टर क्षेत्र को विकसित करने के लिए लवासा को प्रोवीजनल एनओसी दी गई है. बाद में मार्च, २००४ में कुछ शर्तों के अधीन रहते हुए २००० हेक्टर क्षेत्र को विकसित करने के लिए अंतिम पर्यावरणीय मान्यता दी गई है. प्रश्न यह है कि जब २००० हेक्टर क्षेत्र के बांधकाम की परमीशन मिली है तो एमपीसीबी ने ६१८१.३७ हेक्टर क्षेत्र के बांधकाम की परमीशन क्यों दी ? अशी विचारणा केली असता प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी अशी माहिती दिली की, लवासा कॉर्पोरेशनला त्यांच्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी २००० हेक्टर क्षेत्रासाठी पर्यावरण विभागाने प्रथम सन २००२ मध्ये प्रोव्हिजनल एन.ओ.सी.दिली होती, ती दिनांक १८ मार्च २००४ रोजी कन्फर्म केलेली आहे. लवासा कॉर्पोरेशनने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केला होता. हवा, पाणी यावर होणारे परिणाम यासंबंधी या मंडळाने ठरविलेले काही निकष आहेत त्याच्या अधिन राहून पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ नुसार व केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने दिनांक ७ जुलै २००४ रोजी इ.आय.ए. अधिसूचना अंतर्गत परवानगी दिलेली आहे. या प्रकल्पाला दोन वेगवेगळ्या परवानग्या दिलेल्या आहेत आणि या दोन्ही परवानग्यांची आवश्यकता असते त्यामुळे यामध्ये विसंगती आढळून आलेली नाही.

**१.३१** या प्रकल्पाला इ.पी.ए., इ.आय.ए. व प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे परवानगी दिलेली आहे. लवासा या प्रकल्पाचे बांधकाम समुद्रसपाटीपासून १००० मीटरच्या खाली असल्यामुळे या प्रकल्पाला सन २००२ व सन २००४ या वर्षात पर्यावरण विषयक एनओसी देण्यात आली. परंतु केंद्र सरकारने सन २००८, सन २००९ व सन २०१० मध्ये या प्रकल्पाने पर्यावरण संरक्षण अधिनियमाचे पालन न केल्यामुळे काम थांबविले होते. त्यानंतर सन २०११ मध्ये काही अटी व शर्तींच्या अधिन राहून त्यांना परवानगी दिली आहे. त्या अटी व शर्तींचे त्यांनी पालन केले आहे काय ? अशी समितीने विचारणा केली.

**१.३२** ई.पी.ए. हा केंद्र सरकारचा कायदा आहे. केंद्र सरकारने एन्व्हायरमेंट ॲसेसमेंट चे सूचनापत्र १९८६ साली काढलेले आहे. हवा व जलकायदा या दोन्हींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी एम.पी.सी.बी.वर आहे. ईआयए चे सन १९९४ साली सूचनापत्र काढले आहे. त्यानंतर

सन २००४ मध्ये ईआयएचे नोटिफिकेशन काढले. त्यानंतर सन २००६ मध्ये एक नोटिफिकेशन काढले. ही तिन्ही नोटिफिकेशन्स हिल स्टेशन्स डेव्हलपमेंटसंदर्भातील होती. ईआयए या १९९४ च्या नोटिफिकेशनमध्ये केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय तसेच वन व पर्यावरण विभागाच्या मान्यतेशिवाय प्रकल्प करता येत नाही असे म्हटले आहे. अशी त्या नोटिफिकेशनमध्ये अट होती. जे प्रकल्प समुद्र सपाटीपासून एक हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर असतील आणि जे प्रकल्प उच्चतम धरतीपासून ५०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर असतील आणि ज्या प्रकल्पाची मूळ अंदाजपत्रकीय रक्कम पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल, अशा प्रकल्पांना केंद्र शासनाची मंजुरी आवश्यक होती. नगरविकास विभागाने लवासा सिटीच्या बाबतीत सन २००१ मध्ये नोटिफिकेशन काढून लवासा प्रकल्पाला सांगितले की, एक हजार मीटरपेक्षा कमी उंचीच्या जागेवर हील स्टेशन्साठी परवानगी देता येते म्हणून १९९४ चा ईआयए नोटिफिकेशन लागू झाले नाही. राज्य शासनाच्या दिनांक १८ ऑगस्ट १९८७ मधील नोटिफिकेशनला पर्यावरण विभागाने मंजुरी दिली आहे. एक हजार मीटरपेक्षा जास्त बांधकाम केलेले आहे असे लक्षात आले म्हणून ए.जी. कार्यालयाने आक्षेप घेतला यावर कोणाचे कंट्रोलींग होते, असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे. एन्व्हॉयरमेंट डेव्हलपमेंटसंदर्भात १९९४ चे ईआयए च्या नोटिफिकेशनात म्हटले आहे की, एक हजार उंचीपेक्षा जास्त बांधकाम करावयाचे नाही यासाठी केंद्र सरकारचे क्लिअरन्स आवश्यक होते. एक हजार मीटर उंचीपेक्षा जास्त बांधकाम केले असेल तर त्यावर कोणाचे नियंत्रण होते, याचे उत्तर नगर विकास विभागाने लवासा सिटीबाबत जे नोटिफिकेशन काढले आहे त्यातून मिळेल असा खुलासा प्रधान सचिव, पर्यावरण यांनी समिती समोर केला.

**१.३३** उपरोक्त विभागीय सचिव यांच्या खुलाशानुषंगाने महालेखाकार यांनी अशी पृच्छा केली की, इस प्रोजेक्ट में १००० मीटर से कम ऊंचाई तक बांधकाम की बात राज्य सरकार की ओर से कही गई थी. बाद में इस पोईन्ट का वॉयलेशन हो गया एवं इसमें केन्द्र सरकार की क्लीयरेंस नहीं ली गई. महालेखाकार यह जानना चाहते हैं कि यह सब देखने की जवाबदारी किसकी है ?

**१.३४** यावर खुलासा करताना प्रधान सचिव, पर्यावरण यांनी असे विदित केले की, नगर विकास विभाग के नोटिफिकेशन में इस संबंध में जवाबदारी निश्चित की गई है. स्पेशल प्लानिंग ऑथोरिटी यह सब काम देखती है.

**१.३५** लवासा सिटीमधील बांधकाम एक हजार मीटर उंचीपेक्षा कमी आहे हे कशाच्या आधारावर नगरविकास विभागाने ठरविले आहे? या समितीच्या प्रश्नाला लवासा सिटीसंदर्भात स्पेशल प्लॅनिंग ॲथारिटी जिल्हाधिकारी होते. सन २०११ में केन्द्र सरकार के पर्यावरण विभाग ने टप्पा-१ के प्रकल्प को अनुमति दी है. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**१.३६** इस मामले में केन्द्र सरकार के पर्यावरण विभाग की ओर से काम रोकने के संबंध में नोटिस दी गई थी और उसके खिलाफ लवासा कॉर्पोरेशन ने मुंबई उच्च न्यायालय में याचिका दाखिल की थी, या संदर्भात माहिती देण्याबाबत समितीने विभागास सांगितले.

**१.३७** इस मामले में वॉयलेशन डिटेक्ट हुआ था. १००० मीटर या उससे ज्यादा ऊंचाई पर बांधकाम करना है या नहीं करना है, यह सब केन्द्र सरकार के अधिकार क्षेत्र में है. लवासा के संबंध में जो स्पेशल प्लानिंग ऑथोरिटी है, उसमें जिल्हाधिकारी है. इसमें देखरेख की सारी जिम्मेदारी जिल्हाधिकारी के ऊपर रखी हुई है. इसमें सारी टर्म्स एंड कंडीशन्स को देखने की जिम्मेदारी उनकी है. असा खुलासा प्रधान सचिव, पर्यावरण यांनी समितीसमोर केला.

**१.३८** Who have made complaints about these issues? Whether any NGO's or Distict Collector raised this issue? उपरोक्त समितीच्या प्रश्नावर In November, 2010, some NGOs made complaints with the authorities. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**१.३९** समितीने पुढे अशी विचारणा केली की, जब वहां पर कमिटी ने विजिट की तब यह बात ध्यान में आयी है. यह बात नगर विकास विभाग की ओर से नहीं उठायी गई है.

**१.४०** दिल्ली में दिनांक ३१ मे २०११ को केन्द्रीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिति की बैठक में इस मामले पर विचार हुआ था. नवम्बर, २०११ में केन्द्र सरकार ने टर्म्स एंड कंडीशन्स के साथ पर्यावरण विषयक अनुमति दी थी. It is mentioned on Page No. 9 of the General Conditions - Part 3 (10). वन व पर्यावरण कानून से संबंधित प्रकल्पों की मॉनिटरिंग भोपाल में होती है. अभी तक वन व पर्यावरण से संबंधित क्लीयरेंस का सिस्टम राज्यों में स्थापित नहीं हो पाया है. इसका फील्ड ऑफिस किसी भी राज्य में नहीं है असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. पर्यावरण विभागाकडून यासंदर्भात प्राप्त झालेली माहिती लोकलेका समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-'अ')**

**१.४१** एक्सपर्ट कमिटी ने यह पाया था कि जो वेस्ट वॉटर है वह वॉटर बॉडी में डिस्चार्ज हो रहा है. यह जो वेस्ट वॉटर है वह वॉटर बॉडी में नहीं जाना चाहिए था. यह सब देखने की जिम्मेदारी एमपीसीबी की है या किसी और ऑथोरिटी की है ? अशी पृच्छा महालेखाकार यांनी विभागाकडे केली असता The issues of Water Pollution and Air pollution comes under the Central Act. Therefore, it is the responsibility of M.P.C.B.. असा खुलासा प्रधान सचिव, पर्यावरण यांनी केला.

सन २०११ साली पर्यावरण विभागाने काय निकाल दिला ? यासंदर्भात माहिती देताना प्रधान सचिव, पर्यावरण यांनी असा खुलासा केला की, सन २०११ साली पर्यावरण विभागाने लवासा प्रकल्पाला "कारणे दाखवा नोटीस" दिली. या नोटीसीला अनुसरून त्यांचा खुलासा प्राप्त झाला. त्यानंतर केंद्रीय मंत्रालयाने त्यांच्याविरुद्ध केस दाखल करण्याचे आदेश दिले. एम.पी.सी.बी. मार्फत केस दाखल करण्यात आली. केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाने फेज-१ ला क्लिअरन्स दिला व त्यासंदर्भात रिजनल ऑफिस, भोपाल यांना कमिटी स्थापन करण्यासंदर्भात आदेश देण्यात आला. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, "Highlevel Verification Monitoring Committee shall be constituted by Government of Maharashtra in consultation with Ministry of Enviornment and Forest." परंतु अद्यापपर्यंत कमिटी स्थापन झालेली नाही. तसेच दुसऱ्या फेजच्या परवानगी संदर्भातील दिनांक ९ नोव्हेंबर, २०११ रोजीची कागदपत्रे आहेत यामध्ये असे नमूद केले आहे की, "…. to develop residential interalia construction of first phase of Hill Station on plot area of 2000 Hectare. It is proposed to develop residential area of 68 Hectare, Commercial area of 33.74 Hectare, Educational Institution area of 277 Hectare, Open Space on 908 Hectare and Play activities on 209 Hectare." असे सांगितले आणि फेज-२ ला प्रधान सचिव, पर्यावरण विभागाकडून क्लिअरन्स मिळालेला नसुन फेज-२ आणि फेज-३ परवानगीसाठी प्रलंबित आहेत. अजून त्यांना परवानगी दिलेली नसल्याचे नमूद केले.

**१.४२** लवासा ने अपना एरिया इंक्रीज किया है. लवासा ने ३ हजार हेक्टर जमीन एक्वायर की है. इसमें परमीशन की जरुरत है कि नहीं, इस बारे में विभाग को क्या कहना है ? महालेखाकार ने पुछे गये प्रश्न को विभाग यह नही कह रहा है की, इसमें परमीशन नहीं चाहिए.

**१.४३** २००० हेक्टरपर्यंत पर्यावरण विभागाने परवानगी दिली आहे. २००० हेक्टर्सच्या पुढे लवासा कंपनीने परवानगी न घेता डेव्हलपमेंट केलेले आहे काय ? लवासा कंपीनीचे काम ३००० हेक्टर्सपर्यंत गेले आहे. महालेखाकार कार्यालयातील अधिकारी प्रत्यक्षात तेथे भेट देत असतात. त्यानंतर ते ऑडिट करतात. टाऊन प्लॅनिंगच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात तेथे जाऊन पाहणी केली आहे का? अशी समितीने पृच्छा केली असता सन २०११ ला जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे अहवाल दिलेला असून सध्यातरी २००० हेक्टर्सच्या आत बांधकाम झालेले आहे. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. तसेच महालेखाकार कार्यालयाच्या अहवालानुसार ३ हजार ८८२ हेक्टर्स जमीन संपादित केलेली असून २००० हेक्टर्सच्या पुढे बांधकाम झालेले नसल्याचे समितीस अवगत केले.

**१.४४** २० हजार चौ.मी पेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विभागाची मान्यता घ्यावी, असा नियम आहे. ३-३ वर्षे होऊन देखील पर्यावरण विभागाची मान्यता मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अर्ज केल्यानंतर ३ महिन्यात मान्यता मिळाली नाही तर त्यांना मान्यता मिळाली आहे असे गृहीत धरावे, अशी तरतुद केलेली आहे. सध्या किती प्रकरणे परवानगी करिता प्रलंबित आहेत ? तसेच प्रकल्पांना मान्यता देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या समितीचे सदस्य कोण आहेत, या समितीच्या बैठकी महिन्यातून किती वेळा होतात, साधारणपणे एका बैठकीत किती प्रकरणांना मंजुरी देणे अपेक्षित असते अशी विचारणा समितीने केली.

**१.४५** विभागाला येणाऱ्या अडचणीबाबत केंद्र शासनाला कळवले आहे. इतर राज्यांमध्ये मंजुरीकरिता येणारे प्रकल्प व महाराष्ट्र राज्यातील प्रकल्प यांची तुलना केली असता महाराष्ट्र राज्यातील प्रकल्पांची संख्या जास्त असल्याचे दिसून येते. इतर राज्यांमध्ये महिन्याला २० ते २५ प्रकल्प मान्यतेसाठी दाखल केले जातात. या उलट महाराष्ट्र राज्यात ४५ ते ५० प्रकल्प प्रत्येक महिन्याला येतात. २० हजार चौ.मी पेक्षा मोठे प्रकल्प मुंबई व पुणे या भागात अधिक आहेत. अमरावती, नागपूर, औरंगाबाद व इतर जिल्ह्यातून मोठे प्रकल्प मान्यतेकरिता क्वचित येतात. राज्यातील प्रकल्पांना मंजुरी देण्याकरिता एक राज्याची मुल्यमापन समिती तयार करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून प्रस्तावांचे मुल्यमापन करून शिफारस केली जाते त्यानंतर प्रस्तावांना मंजुरी दिली जाते. साधारणपणे प्रत्येक प्रस्तावाची दोन स्तरावर छाननी केली जाते. सन २०१३ मध्ये एक एस.इ.ए.सी. कार्यरत होती. या समितीच्या काही सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे ६-७ महिन्यांचा गॅप तयार झाला होता. यानंतर २ एस.इ.ए.सी. स्थापन करण्यात आल्या. आता सध्या ३ एस.इ.ए.सी. कार्यरत आहेत. पहिल्या कमिटीकडे उद्योग, दुसऱ्या समितीकडे मुंबई महानगर प्रदेश व तिसऱ्या समितीकडे मुंबई महानगर प्रदेशच्या बाहेरील प्रकरणांचा समावेश केला जातो. प्रत्येक समितीच्या महिन्यातून दोन बैठका होतात. साधारणपणे २ ते ३ दिवसांची एक बैठक असते. प्रत्येक दिवशी ३० ते ४० प्रकरणे क्लिअर केली जातात. प्रत्येक समितीमध्ये १० ते १२ सदस्य असतात. सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव श्री.टी.सी.बेंजामिन, श्री. बुद्धीराजा आणि श्री. जगदीश जोशी असे या तीन समित्यांचे अध्यक्ष आहेत. या समितीमध्ये काही निवृत्त आयएएस अधिकारी आहेत.

**१.४६** सध्या तिसऱ्या समितीकडे १७० प्रकरणे प्रलंबित असून इतर दोन समित्यांचे मिळून ३०० ते ३२० प्रकरणे प्रलंबित आहेत. मागील वर्षी ५०० पेक्षा अधिक प्रकरणे प्रलंबित होती. आता प्रलंबित प्रकरणांची संख्या बरीच कमी झालेली आहे. बांधकामाच्या संदर्भातील दीड ते दोन हजार प्रकरणे मंजूर केली असून गौण खनिजासंदर्भात २२९० प्रकरणे मंजूर केली आहेत. प्रकरणांना लवकरात लवकर मंजुरी देण्याकरिता प्रयत्न केला जात आहे. सध्या ५०० ते ५५० प्रकरणे प्रलंबित असून येत्या २-३ महिन्यात ती पूर्ण केली जातील. असा खुलासा प्रधान सचिव, पर्यावरण यांनी समितीसमोर केला. तसेच सर्व प्रकरणांची माहिती संकेतस्थळावर देण्यात आलेली असून ही सर्व प्रकरणे क्रमानुसार लावली जात असून त्यानुसार ती मंजूर केली जातात. ही प्रोसीजर पूर्णपणे अंमलात आणली जात असल्याने याबाबत कोणालाही हरकत घेता येणार नाही. सर्व प्रकरणांची

माहिती संकेतस्थळावर दिली जाते. ग्रीन बिल्डींग व शासकीय प्रस्तावांनाच केवळ प्राधान्याने परवानगी दिली जाते. इतर कोणत्याही प्रस्तावांना प्राधान्य दिले जात नाही.

पर्यावरण मंजुरीकरिता येणाऱ्या प्रस्तावांची पडताळणी केली जाते काय ? या समितीच्या प्रश्नावर पर्यावरणाची मंजुरी मिळवण्याकरिता मॉनीटरिंग मॅकॅनिझमबाबत केंद्रीय पर्यावरण विभागाने डी.ओ.लेटर पाठवले आहे. त्यानुसार अटी व शर्तीचे पालन केले जाते की नाही, याचा विचार केला जात आहे. असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी दिले. तसेच लोकल प्लानिंग ॲथोरीटीने नियंत्रण ठेवणे अपेक्षित असते या करिता आता नवीन यंत्रणा तयार केली जात असल्याचेही नमूद केले.

**१.४७** लवासाच्या संदर्भात केंद्रीय व राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने सुरूवातीला कोणते आक्षेप घेतले होते, नंतर त्यावर कोणते उत्तर देण्यात आले, शासनाने पाठवलेल्या नोटीसला काय उत्तर पाठविले गेले इ. सर्व कागदपत्रे समितीला उपलब्ध करून द्यावीत. तसेच प्रकल्पाला परवानगी देण्याची बाब नगर विकास विभागाशी संबंधित होती की पर्यावरण विभागाशी होती, याचा देखील खुलासा करावा असे समितीने विभागास निदेश दिले असता **विभागाने समितीला दिलेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. (परिशिष्ट-'अ')**

**१.४८** समितीने यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरीता दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी पर्यावरण विभागाच्या विभागीय सचिवांची पुनः साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, एक हजार मीटर्स आणि त्यापेक्षा जास्त उंचीवर बांधकाम करताना नियमांचे उल्लंघन झाले म्हणून काम थांबविण्यात आले होते त्या संदर्भात कारवाई झाली काय ? केंद्र सरकारने काय कारवाई केली आहे.

**१.४९** एक हजार मीटर्स पेक्षा जास्त उंचीवरील क्षेत्रासंदर्भातील प्लान विभागाकडे सादर केलेला आहे, परंतु विभागाने तो वगळलेला आहे. त्यांनी बांधकाम पाडतो असे म्हटले होते परंतु अजून त्यांनी त्याचे पालन केलेले नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच ज्या काही त्रुटी आढलेल्या आहेत त्या संदर्भात सन २०११मध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल पाठविलेला होता. त्या संदर्भात अद्यायावत माहितीची विचारणा केलेली आहे एडीटीपीने अद्यावत माहिती मागविलेली आहे. स्थळ निरीक्षण करून तत्संबधीचा अहवाल त्यांना सादर केला जाईल असेही समितीसमोर नमूद केले.

**१.५०** दर ३ महिन्यांनी अहवाल सादर करावयास पाहिजे. लवासा प्रकल्प सुरू झाल्यापासून अहवाल सादर झालेला नाही अशी खंत यावेळी समितीने व्यक्त केली असता लवासाकडून प्रकरणे आलेली होती पर्यावरण विभागाची तपासणी झाली त्यासाठी दोन वर्षे प्रकल्प बंद होता. पर्यावरण विभागाने एनओसी दिल्यानंतर नगरविकास विभागाकडे २७ प्रकरणे दिली होती एसपी झालेला आहे. पर्यावरण विषयक मुद्यांची पूर्तता करून एसपी शासनाकडून मंजूर करून घेण्यात आला. २३ एसपी मान्य झालेले आहेत परंतु नकाशे मान्य झालेले नाहीत असा खुलासा प्रधान सचिव, नगरविकास यांनी केला.

**१.५१** जे एसपी मान्य झालेले आहेत ते नकाशावर प्रतिबिंबीत (Reflect) होतील. नकाशे मान्य झाले नसतील तर २३ एसपी मंजूर होतील काय? या समितीच्या प्रश्नाला एसपीएची दोन प्रकारची कामे असतात. एसपीएच्या कार्यक्षेत्राची बृहत योजना (Master Plan) तयार करून त्यास संचालकामार्फत शासनाची मान्यता घ्यावयास पाहिजे तसेच हा प्लान ही सादर झालेला आहे. परंतु त्यामध्ये खूप त्रुटी असून त्या त्रुटी विभागाने कळविलेल्या आहेत त्या त्रुटींची पूर्तता झालेली नसल्याचे विभागीय प्रतिनिधी यांनी समितीस अवगत केले.

**१.५२** बृहत योजना तयार झालेली नाही, नकाशा तयार झालेला नाही. दर तीन महिन्यांनी प्रगती समजली पाहिजे. नकाशा मंजूर झालेला नसताना बांधकाम झालेले आहे. एसपीए व्यतिरिक्त नवीन गोष्टींचा समावेश झालेला आहे. या बाबतीत विभागातर्फे काय देखरेख (Monitering) करणार आहात ? अशी समितीने पृच्छा केली.

**१.५३** आपल्या भागाचा विकास आराखडा तयार करणे हे एसपीएचे मुख्य कर्तव्य आहे संचालकानी स्पष्ट केलेले आहे की, प्रापर्टी आराखडा प्राप्त झाला असून काही प्रस्ताव अशा भागाचा आहे की तो भाग एसपीएच्या कार्यक्षेत्रामध्ये येत नाही. त्यामुळे तो आराखडा मंजूर करण्यामध्ये अडचणी येत आहेत. एमआरटीपीप्रमाणे आपल्या भागातील विवक्षित विकास कामांना मंजुरी देणे हे एसपीएचे दुसरे काम आहे. हे दुसरे काम त्यांनी करायचे आहे. जोपर्यंत बृहत योजना अंतिम होत नाही तोपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांनी पूर्वी जो आराखडा मंजूर केलेला आहे त्या आधारावर विकास कामांना मंजुरी द्यावयास पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक ७ जून, २००८ रोजी अभिन्यास मंजूर केला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केलेला अभिन्यास शासनाकडे आहे. हा आराखडा किती सुसंगत व किती विसंगत आहे हे तपासण्याकरिता तो पुनश्च जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**१.५४** विशेष योजना प्राधिकरणाने २ हजार एकराकरिता आराखडा तयार केला. त्या क्षेत्रावर कामे झालेली आहेत. परंतु जो आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्या व्यतिरिक्त अन्य क्षेत्रावर कामे झालेली आहेत. याबाबत विचारणा केली असता त्या भागाचा नकाशा तयार केलेला आहे त्यास एसपीए दर्जा दिलेला आहे. त्या भागाकरिता ते एसपीए आहेत त्यांनी काही ठिकाणी रस्ते दाखविलेले आहेत. रस्त्याचा काही भाग हा एसपीए क्षेत्रात आहे तर काही भाग एसपीए नसलेल्या क्षेत्रात आहे. जे क्षेत्र एसपीएचे नाही त्या क्षेत्राचे प्लॅनिंग कसे काय करण्यात आले

असा मुद्दा निर्माण झालेला आहे. आरपी एरियामध्ये विकास होत नाही. पण जो भाग एसपीसाठी वेगळा केलेला आहे, जे हिल स्टेशन आहे, त्यासाठी एसपीए नेमलेला आहे. या क्षेत्राची सविस्तर योजना करायला पाहिजे. सविस्तर योजना केल्यानंतर जी बृहत योजना (Master Plan) तयार करण्यात येते त्यामध्ये रस्ते, आरक्षित जागा दाखविण्यात येतात. या प्रकरणी एसपीअे क्षेत्राच्या बाहेरच्या भागाचे नियोजन दाखविण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात जे बांधकाम चालू आहे ते त्यांच्या मालकीच्या क्षेत्राच्या बाहेर आहे असे वाटत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

**१.५५** दळणवळणाकरिता रस्ते आवश्यक असले तरी ते नियोजनाच्या बाहेरील क्षेत्रात केलेले आहेत. यासंदर्भात माहिती देताना त्यांनी नकाशा दाखविलेला असला तरी रस्त्याचा काही भाग हा एसपीए क्षेत्रात आहे तर काही भाग एसपीए नसलेल्या क्षत्रात आहे. रस्त्याची अलाईनमेण्ट उपयुक्त असली आणि संचालकांची खात्री असली तरी तो रस्ता मंजूर करीत असताना आरपीमध्ये शासनातर्फे फेरबदल करावे लागतील रस्त्याचा काही भाग आरपीमधून तर काही भाग डीपी मधून करता येईल अशा प्रकारची दुरुस्ती कायद्यामध्ये शासनास करावी लागेल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**१.५६** दळणवळणाकरिता रस्ते ही मूलभूत गरज आहे. ज्या भागातून रस्ते गेलेले आहेत तो भाग एसपीए क्षेत्राच्या बाहेर आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन झालेले आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे असून हा प्रकल्प सुरू होऊन १२-१५ वर्षे झाली. प्रकल्पाच्या सुरूवातीला ६ हजार रुपये एकर असा जमीनीचा भाव होता तो आता ३३ लाख रुपये एकर असा झालेला आहे. १ एकर जमीनीचा मोबदला ३३ लाख रुपये मिळाला पाहिजे अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे ? अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिव यांनी असा खुलासा केला की, ज्या व्यक्तीच्या जागेतून रस्ता गेला आहे त्या व्यक्तीची कोणतीही संमती घेतली नसेल तर किंवा त्याला मोबदला दिला नसेल तर त्या व्यक्तीला निश्चित दाद मागता येईल. तसेच जो स्थायी प्रकल्प आहे, जो भाग अधिकृत केलेला आहे त्या भागाची जबाबदारी त्या भागाच्या मालकाची असून शासनाची जबाबदारी नाही. योजना करताना रस्ता त्यांच्या मालकीच्या नसलेल्या भागातून जात असेल आणि ती अलाईनमेण्ट उपयुक्त असेल तर अशा प्रकरणामध्ये आरपीमध्ये तत्सम बदल करता येतो.

**१.५७** शेतकऱ्यांच्या जमीनीचा प्रश्न निर्माण झालेला आहे, तो सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी काय प्रयत्न केलेले आहेत ? उपरोक्त समितीच्या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, १५ गावातील बाधित लोकांच्या संघर्ष समित्या गठीत झालेल्या आहेत. जमीनीचे बळजबरीने संपादन करणे, लवासामध्ये नोकरी देणे, पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे असे विविध मुद्दे त्यांनी उपस्थित केलेले आहेत. त्यांच्या संघर्ष समित्यांसमवेत चार महिन्यामध्ये दोन बैठका झालेल्या आहेत. गावामध्ये येऊन बैठक घ्यावी आणि त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करावा अशी गावातील बाधित लोकांची मागणी आहे.

**१.५८** त्या ठिकाणी जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत स्तरावर शिक्षणाचे तसेच आरोग्याचे प्रश्न निर्माण होणार आहेत. शिक्षण आणि आरोग्याचे प्रश्न चांगल्या पद्धतीने सुटतीलही. परंतु त्याचा लाभ तेथील ग्रामस्थांना पुढील ५० वर्षे तरी कायमस्वरुपी मिळत राहिला पाहिजे. त्या ठिकाणी खाजगी शाळेतून सुरूवातीला अल्प फी घेऊन शिक्षण दिले जाईल. परंतु नंतर त्यांनी भरमसाठ फी आकारली तर त्या भागातील मुले शिक्षणासाठी कुठे जातील ? आरोग्याच्या बाबतीत देखील तशीच परिस्थिती निर्माण होईल. खाजगी रुग्णालयात ५० हजार रुपये भरून दाखल होण्यास सांगितले तर त्या भागातील गरीब लोकांना वैद्यकीय सेवा कशी मिळेल ? यासाठी शासनाने कायमस्वरुपी उपाययोजना केली पाहिजे असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले व या बाबतीत शासन आणि कंपनीमध्ये करार झालेला आहे काय ? अशी विचारणा केली.

**१.५९** यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार देशाच्या आणि राज्याच्या प्रत्येक भागामध्ये स्थानिक प्राधिकरण असणे आवश्यक आहे. या घटना दुरुस्तीनुसार ग्रामीण भागामध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती अशा संस्था आहेत. मोठया शहरामध्ये महानगरपालिका, छोटया शहरामध्ये नगरपालिका किंवा नगरपरिषदा आहेत. एखाद्या भागाचा औद्योगिक विकास होत असेल आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगळी संस्था स्थापन करण्याची आवश्यकता आहे असे शासनास वाटत असेल तर शासन त्या भागापुरती औद्योगिक नगरी स्थापन करू शकते. घटनेनुसार या चार प्रकारापैकी कोणती तरी एक स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करणे आवश्यक असते.

**१.६०** विभागाचा ॲप्रोच असा आहे की, तेथील भागाचा होणारा विकास हा नागरी स्वरुपाचा आहे. त्यामुळे त्या भागाला ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत ठेवणे व्यवहार्य होणार नाही. त्या ठिकाणी नागरीकरण होत असल्यामुळे नागरी भागामध्ये जी संरचनात्मक व्यवस्था असते तशी व्यवस्था त्याठिकाणी देणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती ही लोकसंख्येच्या आधारावर केली जाते. नगरपरिषद करावयाची असेल तर त्यासाठी २५ हजार लोकसंख्या आवश्यक असते. महापालिका करावयाची असेल तर ३ लाख लोकसंख्या आवश्यक असते धोरण काहीही असो, जरी त्याठिकाणी १० हजार लोकसंख्या असली तरी तो भाग एरिया इन ट्रांझिशन समजून त्या ठिकाणी नगरपंचायत घोषित केली पाहिजे आणि त्या संस्थेने शासनाने नेमून दिलेली जन्म-मृत्यू नोंदणीसारखी कायदेशीर कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. तसेच मुलांना शाळेत कोठेही प्रवेश मिळत नसेल तर शिक्षणाचा अधिकार कायदयानुसार त्यांच्यासाठी शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. त्याचप्रमाणे ज्यांना वैद्यकीय

उपचार मिळू शकत नाहीत, शाळेत ॲडमिशन मिळू शकत नाही त्यांना ते मिळवून देण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची असते. या प्रकारच्या गोष्टी संबंधीत संस्थेने करावयास पाहिजेत. तसेच, रस्ते, पाणीपुरवठा, पथ दिवे यांची व्यवस्था देखील प्रकल्प विकासकाने केली पाहिजे. जे स्टेट फंक्शन्स असतात ते डिसचार्ज करण्याची जबाबदारी या संस्थांची असते. वेल्फेयर स्टेटची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असेल.

**१.६१** पाण्याच्या अतिरिक्त प्रमाणातील आवश्यकतेसाठी आणि बंधारे बांधण्यासाठी परवानगीचे अनियमित प्रदान तसेच MKVDC कडून LCL ला जमीनीचे प्रदान होण्यातील अनियमितता यासंदर्भात महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, खडकवासला पाटबंधारे प्रकल्प के चार संचय धरण हैं. इनके माध्यम से पूणे शहर के लोगों को पीने के लिए पानी सप्लाई किया जाता है एवं औद्योगिक कामों के लिए भी पानी की सप्लाई की जाती है. LCL के प्रकल्प को पानी सप्लाई करने के लिए वरसगांव धरण का जलग्रहण और जलमग्न क्षेत्रों में बंधारे बनाने की मान्यता दी गई थी. महालेखाकार कार्यालय का इसमें यह कहना है कि जो वॉटर एग्रीमेंट साइन हुआ है उसमें कोई पीनल प्रोवीजन नहीं है. पानी रिलीज करने या न करने के संबंध में इस एग्रीमेंट में कोई पीनल प्रोवीजन नहीं है. महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने समितीने अशी पृच्छा केली की, विभागाने मगरपटट्यात कॅनॉलमधील पाणी देण्यासाठी ॲग्रीमेंट केलेले आहे. त्याबदल्यात विभागाला काय मिळाले याची माहिती समितीला देण्यात यावी. या अनुषंगाने विभागाने दिलेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-'अ')**

**१.६२** उपरोक्त समितीच्या प्रश्नाला प्रधान सचिव, जलसंपदा यांनी अशी माहिती दिली की, महामंडळाने एकूण १० बंधारे बांधण्यास परवानगी दिली आहे. त्या बंधाऱ्यांची एकूण साठवण क्षमता १०३१ एमसीएफटी आहे. त्यातील २ कोकणाकडे जाणारे सबबेसीन आहेत. वरसगांव धरणाच्या बुडीत क्षेत्रातील २ बंधारे असून त्यांची साठवण क्षमता २८४ दलघफू आहे. तसेच प्रत्येक वेळी कार्यकारी अभियंता यांनी सांगितल्यावर पाणी सोडले जाते. पाणी सोडण्यासाठी गेट केलेले असून याची देखभाल जलसंपदा विभागाकडे आहे. लवासा कॉर्पोरेशन सोबत पाण्याच्या बाबतीत लेखी करार केलेला आहे. त्यानुसार विनंती केल्यावर त्यांच्यामार्फत पाणी सोडण्यात येते.

**१.६३** लवासा कार्पोरेशन लिमिटेड को उसकी टोटल पानी की रिक्वायरमेंट से ज्यादा पानी की मान्यता दी गई है. इससे पूर्णे की ड्रिंकिंग वॉटर सप्लाई में प्रोब्लम होगी. या महालेखाकारांच्या वक्तव्यावर वरसगांव धरणाच्या बुडीत क्षेत्रातील २ बंधाऱ्यांमध्ये २८४ एमसीएफटी पाणी साठवण क्षमता आहे. बुडीत क्षेत्राच्या बाहेरील ६ बंधाऱ्यांमध्ये ५८७ एमसीएफटी पाणी साठवण क्षमता आहे. प्रत्येक वापराला म्हणजेच घरगुती वापरासाठी ९३ एमसीएफटी, वृक्षारोपणकरिता १७० एमसीएफटी आणि पर्यटन व बोटींगकरिता २७० एमसीएफटी वापर होणार आहे. या ठिकाणी स्टोरेज जास्त आहे. परंतु पर्यटनाच्या दृष्टीने वॉटर गेम्स व बोटींगकरिता तशा प्रकारची सोय केलेली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

**१.६४** लवासा कार्पोरेशन लिमिटेड को ५४७ एमसीएफटी (घरगुती वापरासाठी ९३ एमसीएफटी, लागवडीसाठी १७० एमसीएफटी आणि पर्यटन व नौकाविहारासाठी २८४ एमसीएफटी) पानी की जरुरत थी परन्तु लवासा कार्पोरेशन लिमिटेड को १०३१ एमसीएफटी पानी स्टोरेज करने की परमिशन दी गई. इसके साथ ही जो २८४ एमसीएफटी पानी पर्यटन व नौका विहार के लिए आरक्षित रखा गया है उस पर लवासा कार्पोरेशन लिमिटेड का कंट्रोल रहेगा. इस पर सरकार का कंट्रोल नहीं रहेगा. इस पानी को रिलीज करने का कंट्रोल लवासा कार्पोरेशन लिमिटेड के पास ही रहेगा यह अनियमितता है. असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता The concerned authority can take action under Clause No. 28 of the Agreement. याबाबत करार करण्यात आलेला आहे. त्यामुळे कायद्याचा आणि त्यातील कलमांचा कंपनीकडून उल्लंघन झाल्यास होणाऱ्या परिणामास कंपनी जबाबदार राहील. तसेच कंपनी कार्यवाहीस पात्र राहील असा करार आहे. आता खडकवासला प्रकल्पात पुणे शहराला १५ दिवस पुरेल एवढाच पाणी साठा असल्यामुळे लवासातून जलसंपदा विभागाने पाणी सोडले आहे तसेच दासवे धरणातून ५० टक्के पाणी सोडले आहे. आणि १० बंधाऱ्यांपैकी २ बंधारे पूर्ण झालेले आहे. उर्वरित बंधाऱ्याचे काम सुरू नसल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**१.६५** लवासाला किती जमीन देण्यात आली आहे ? अशी समितीने पृच्छा केली. याअनुषंगाने खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियमानुसार वरसगांव बुडीत क्षेत्रातील १२८ हेक्टर जमीन व बुडीत क्षेत्रालगतची १२.३६ हेक्टर जमीन तसेच जलाशया बाहेरील काही जमीन लवासा कंपनीला भाडेपट्ट्याने दिलेली आहे. भाडे पट्ट्याचे दर ठरविताना त्यावेळच्या रेडीरेकनर प्रमाणे कॉस्ट ऑफ लॅन्डच्या १५ टक्के अधिकचा दर विचारात घेऊन भाडेपट्टा ठरविला होता. त्यावेळी रेडी रेकनरचा दर १३ हजार रुपये प्रति हेक्टर असा होता. सध्या सन २०११ चे दर उपलब्ध आहेत त्याप्रमाणे वेगवेगळ्या गावांमध्ये वेगवेगळे दर असून ३३ लाख ६० हजार, ११ लाख २० हजार, ९ लाख ८० हजार प्रति हेक्टर असे दर आहेत. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली माहिती लोकलोखा समिती कक्षात उपलब्ध आहे **(परिशिष्ट-'अ')**

**१.६६** समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यावेळी केवळ १३ हजार प्रति हेक्टर असा दर होता. आता ॲव्हरेज काढला तर आजच्या दरामध्ये मोठी वाढ झालेली आहे. सदरहू करार होऊन १२ वर्षे झाली आहेत. या १२ वर्षात लवासा कंपनीकडून २३० ते ३०० हेक्टर जमीनीपोटी किती रक्कम मिळाली. समितीच्या या प्रश्नाला माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, सदर जमीन लवासा कंपनीला भाडेपट्ट्यावर दिल्यापासून दरवर्षी महामंडळास रुपये २,७५,२५०/- इतके उत्पन्न मिळत आहे.

साधारणतः त्यांना २ हजार रुपये एकर हा वर्षभराकरिता भाड्यापोटी भाव ठरविला आहे. शेती महामंडळाकडून त्यांच्या जमीनी भाडेपट्ट्याने देतांना भाड्यात दर वर्षी वाढ होते. त्याप्रमाणे येथे देखील तशा प्रकारची भाडेवाढ व्हावयास पाहिजे. परंतु या ठिकाणी तसे झाल्याचे दिसत नाही. या कंपनीला दिलेली जमीन रेडीरेकनरच्या दरानुसार देण्यात आली आहे. तसेच पहिल्या वर्षी ठरविलेला दर पुढील ३० वर्षापर्यंत तोच दर ठेवलेला आहे काय? याबाबत समितीने विचारणा केली असता ॲग्रीमेंट मध्ये तसा दर ठरविलेला नसल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

**१.६७** एखाद्या कामाकरिता जागा देताना करार करताना त्यामध्ये ५ टक्के, १० टक्के प्रति वर्षी वाढ करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख करतो. परंतु विभागाने हा करार करताना पहिल्या वर्षी जो दर ठरविलेला आहे तोच दर तीस वर्षापर्यंत कायम राहणार आहे. हा करार कोणी केला आहे, अशी समितीने पृच्छा केली.

**१.६८** समितीच्या उपरोक्त प्रश्नावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, कार्यकारी अभियंता (खडकवासला, पुणे) यांनी हा करार केलेला असून करार २००३ मध्ये करण्यात आलेला आहे. भाव ठरविताना रेडी रेकनर प्रमाणे cost of land वर १५ टक्के / acre असा फार्मुला तेव्हा ठरविण्यात आला होता. त्याप्रमाणे प्रत्येक वर्षासाठी दर निश्चित केले आहेत.

**१.६९** ज्या प्रमाणात रेडीरेकनर प्रमाणे cost of land वाढते त्यावर १५ टक्के गृहीत धरण्यात आले. त्या फॉमुल्यानुसार २००३ मध्ये ६८ हजार, २००४ मध्ये ८२ हजार, २००५ मध्ये ९ लाख ४९ हजार, २००६ मध्ये १० लाख ९२ हजार आणि २०१० मध्ये सुमारे ३ कोटी एवढी भाडेपट्ट्यापोटी रक्कम ठरविण्यात आली होती त्याप्रमाणे लवासा कंपनीला कळविण्यात देखील आले आहे.

**१.७०** सन २०१४ मध्ये किती रक्कम आकारण्यात आली आहे ? त्यांनी हा सर्व पैसा भरला आहे काय अशी विचारणा समितीने केली. समितीच्या उपरोक्त प्रश्नावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सन २०११ पर्यंतची माहिती विभागाकडे असून लवासा कंपनीने हे अमान्य केलेले आहे. दरवर्षी त्यांनी रुपये २,७५,२५० एवढीच रक्कम भरली आहे. सन २००७ पासून अधिकची भाडेपट्ट्यांची रक्कम भरण्यासंदर्भात विभागाकडून लवासा कंपनीकडे मागणी करीत आहोत. आजतागायत रुपये २,७५,२५०/- एवढीच रक्कम कंपनीकडून भरण्यात येत आहे. तसेच जमीनीच्या भाडेपट्ट्यासंदर्भात लवासा कंपनीने विभागाला सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या अखत्यारीत समिती स्थापन करून या संदर्भात मार्ग काढण्याचे सूचविले आहे.

**१.७१** ज्यांनी हे करारपत्र केले आहे त्यांनी सरकारला तोट्यामध्ये आणले आहे. लवासा कॉर्पोरेशन सदरहू जमीन विकसिता करून मोठ्या प्रमाणात पैसे कमवित आहे. लवासा सीटीला समितीचा विरोध नाही. समितीचे तर मत आहे की, यासारखी आणखी नवीन थंड हवेची ठिकाणे तयार व्हायला पाहिजे. परंतु शासनाला तोट्यात आणून किंवा तेथील आदिवासींना अडचणीत आणून केले जात असेल तर हे योग्य नाही. तेथील पर्यावरणाचे नियम पाळले गेले पाहिजे. त्या जमीनीची किंमत दिवसेंदिवस वाढत आहे. भविष्यात लवासा कॉर्पोरेशनचे उत्पन्न वाढणार आहे. हे खाजगी शहर होणार आहे. त्यामुळे कोणालाही या शहरात प्रवेश मिळणार नाही. शासनामार्फत विविध परवानग्या व सवलती घेऊन लवासाचे निर्माण होत आहे. परंतु ही खाजगी कंपनी असल्यामुळे या ठिकाणी अडविले जाऊ शकते या ठिकाणी कोणालाही प्रवेश मिळणार नाही. तुम्ही महाबळेश्वर सारख्या शहरामध्ये फिरायला गेल्यावर तेथे कोणीही अडवू शकत नाही. In this case the rent of the land is also not seem to be increasing. It is clearly a loss of Government revenue. असे मत समितीने व्यक्त केले.

**१.७२** लवासाच्या मालमत्तेसंदर्भात जलसंपदा व पाणीपुरवठा खात्याची टिपणी काय होती ? त्यामध्ये जलसंपदा विभागाने कोणत्या मुद्द्यासंदर्भात ओव्हर रुल केले होते का ? लवासा हा एका खाजगी कंपनीचा गिरिस्थान विकास नियमावली अंतर्गत पुढे आलेला प्रकल्प असून या माध्यमातून संदर्भित खाजगी कंपनी करोडो रुपये कमाविणार आहे. या प्रकल्पाकरिता जागा, पाणी, सवलती शासनाच्या वापरल्या जाणार आहेत. या संदर्भात केवळ दोन लाख रुपयांची आकारणी ॲग्रीमेंटच्या माध्यमातून सक्तीची न करता त्यामध्ये प्रती वर्षी वाढ करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ जर ही कंपनी २०० करोड रुपये या प्रकल्पाच्या माध्यमातून कमाविणार असेल तर शासनाने उक्त बाबींच्या अगेन्स्ट २० लाख रुपये दर वर्षी वाढीव दराने आकारले तरीही हरकत नसावी. सदरहू कंपनी चॅरिटी म्हणून हा प्रकल्प करीत नसून व्यावसायिक तत्वावर करीत आहे. धर्मादाय प्रकल्प असता तर त्यांना शासनाने शुल्क आकारणीमध्ये सवलत दिली असती असेही समितीने पुढे नमूद केले.

**१.७३** यासंदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा यांनी लवासा प्रकल्पासंदर्भात करारपत्रातील अटी व शर्तीबाबतचे जास्तीत जास्त निर्णय महामंडळाच्या स्तरावर घेण्यात आलेले आहेत असे समितीस सांगितले. तसेच विभागीय प्रतिनिधींनी समितीस अशी माहिती दिली की, लवासाला जी जमीन दिली गेलेली आहे, त्या संदर्भात एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. दिनांक २६ नोव्हेंबर,१९९६ रोजी गिरिस्थान विकास विशेष नियमावली तयार करण्यात आली होती. त्या नियमावली अंतर्गत काही शर्ती मान्य करण्यात आल्या होत्या. जसे की, गिरिस्थान विकासाअंतर्गत कल्चरल सेंटर्स, रिक्रियेशनल सेंटर्स, जल उद्यान, वॉटर किंग्डम्स वगैरे बाबींची निर्मिती करण्याची परवानगी आहे. याकरिता दिनांक २९.१०.२००१ रोजी अनेक खाजगी कंपन्यांनी अर्ज केले. मध्यंतरीच्या काळामध्ये म्हणजे दिनांक १ जून, २००१ रोजी नगर विकास विभागातील कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या स्थापनेची

घोषणा झाली. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या स्थापनेअंतर्गत संपादित केली गेलेली जमीन लवासाला दिली गेलेली आहे याबाबत मध्यंतरीच्या काळामध्ये अधिसूचना काढण्यात आली होती.

**१.७४** १९९६ मध्ये गिरिस्थान विकास नियमावली अंतर्गत केलेल्या तरतुदीमध्ये वॉटर गेम्सची तरतुद होती. यामध्ये वॉटर गेम्स, कल्चरल गेम्स, कल्चरल ॲक्टिव्हिटिज, क्लब हाऊस आदि तरतुदी केलेल्या आहेत यामध्ये असाही निर्णय होता की, the developer shall be required to develop source for drinking water, water reservoir for the daily water requirement of 140 per capita per day....

**१.७५** या प्रकल्पामध्ये वॉटर गेम्स बनविले आहेत प्रती वर्षी विभाग या कंपनीकडून बोटींग चार्जेस आकारतो. तीन प्रकारची पाणीपट्टी आकारतो. तसेच, पाण्याच्या बाष्पीभवनाची रॉयल्टी देखील आकारण्यात येते. सन २०१३-२०१४ मध्ये विभागाने या कंपनीकडून एकूण १५ लाख रुपये आकारलेले आहेत. या खाजगी कंपनीचे असेही म्हणणे नाही की, कराराप्रमाणे विभागाने त्यांच्याकडून तीस वर्ष तेवढीच रक्कम वसुल करावी. ही रक्कम प्रती वर्षी पाच ते दहा टक्क्यांनी वाढविली तरी हरकत नाही, अशी त्यांची भूमिका आहे.

**१.७६** लवासाच्या प्रकल्पाला मान्यता देत असतांना जमीन, पाणी व इतर सवलतींची खैरात वाटत असतांना शुल्क आकारणीच्या अटी व शर्ती ज्या अधिकाऱ्यांनी ठरविलेल्या आहेत, त्या अधिका-यांविरुद्ध काही कारवाई करण्यात आली नाही का ? तत्कालीन करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार या प्रकल्पामध्ये शासनाचा कोणताही फायदा होत नाही. याचा विचार तत्कालीन अधिका-यांनी का केलेला दिसून येत नाही ? लवासा प्रकल्पासंदर्भातील पत्रव्यवहार व वाढीव दराने शुल्क आकारणी याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी. असे समितीने यावेळी निदेश दिले.

**१.७७** लवासा करारनाम्यातील क्लॉजेसचा विभागाने आता सविस्तरपणे विचार केला असता, ज्या बाबींमध्ये बदल घडवून आणणे शक्य आहे, ते बदल शासनाच्या फायद्याच्या दृष्टीने घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

**१.७८** लवासा प्रकल्पासंबंधीचा करारनामा विभागाला रद्द करता येतो का किंवा यामध्ये मुलभूत बदल करण्याचे अधिकार शासनाला आहेत का अशी विचारणा समितीने केली.

**१.७९** शासन लवासा प्रकल्पांतर्गत संबंधित खाजगी कंपनीकडून रेडी रेकनरच्या दराप्रमाणे १५ टक्के शुल्क आकारीत आहे. करारनाम्याप्रमाणे हे शुल्क प्रतीवर्षी पाच ते दहा टक्के वाढविण्यास कंपनीची काही हरकत नाही. या करारनाम्यातील शुल्क आकारणी टक्केवारीमध्ये मर्यादित वाढ करण्याचा अधिकार शासनाला आहे करारनामा रद्द करण्याचा अधिकार कंपनीला नाही. शासनाच्या हिताच्या दृष्टीने या करारनाम्यामध्ये आणखी काही बदल करता येतील का याकरिता लिगल ओपिनियन घेण्याचे प्रस्तावित असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले तसेच लवासा प्रकल्प करारनामा पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार शासनाच्या विभागाला नाहीत. करारनाम्यातील अटींमध्ये सहसंमतीने बदल करण्याचे अधिकार शासनाकडे आहेत. १९९६ मध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळाकरिता संपादित करण्यात आलेली जमीन लवासा प्रकल्पाकरिता गिरिस्थान विकास नियमावली अंतर्गत हस्तांतरित करण्यात आलेली आहे असेही नमूद केले.

**१.८०** लवासा या खाजगी प्रकल्पाला शासनाने जमीन, पाणी, वीज व इतर सवलती दिलेल्या आहेत. असे असतांनाही या संबंधिच्या करारनाम्यामध्ये शासनाच्या हिताचे क्लॉजेस नसतील तर हे पूर्णपणे अयोग्य आहे. शासनाने एखाद्या खाजगी कंपनीला जमीन,वीज पाणी व इतर सवलती देण्याकरिता करारनामा केला असता त्यामध्ये गिरिस्थान विकासाबरोबरच संदर्भित खाजगी कंपनीलाही यामधून प्रचंड नफा मिळणार आहे, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. या प्रकल्पांतर्गत वॉटर गेम्सकरिता कंपनीला भरपूर प्रमाणात पाणीही देणार आहे. एखाद्या दुष्काळी भागामध्ये आवश्यकतेप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नियमाबाहेर पाणी देतांना सरकार आढेवेढे घेते. ग्रामीण भागामध्ये शेतीकरिता कॅनॉलमधून पाणी देण्याची परवानगी शासन सहज देत नाही. परंतु शासन खाजगी कंपनीला वॉटर गेम्सकरिता मात्र शेतीचे व वीज निर्मितीकरिता लागणारे पाणी देण्यास परवानगी दिली जाते, हा केवढा मोठा विरोधाभास आहे.

**१.८१** महानगरपालिकेच्या माध्यमातून आजुबाजूच्या गावांना पाणीपुरवठा केला जातो. या गावांना करण्यात येणा-या पाणीपुरवठयाकरिता मीटर व पाणीपट्टी यांच्या मर्यादा आहेत. काही ठिकाणी व्हॉल्व्हच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो. परंतु शासनामार्फत या प्रकल्पाकरिता कोणत्याही मीटरशिवाय, व्हॉल्व्हशिवाय, मर्यादेशिवाय पाणीपुरवठा केला जातो. या पाण्याचा कोणत्याही विकासकामाकरिता उपयोग होणार नाही, हे सर्वांना ज्ञात आहे. वॉटर गेम्सकरिता खाजगी कंपनीला शासन सहजरित्या पाणी उपलब्ध करून देते असे मत व्यक्त करून नाराजी व्यक्त केली.

**१.८२ समितीने "परिच्छेद क्रमांक ४.३.१६ इत्यादीमध्ये दिली गेलेली सूट/सवलती"** यासंदर्भात सचिव, महसूल व वने, मदत व पुनर्वसन (मुद्रांक शुल्क) यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखापरिक्षक यांनी पूना के कलेक्टर के रेकॉर्ड में यह देखा गया है कि एल.सी.एल. को ४.३१ करोड़ रुपये की स्टॅम्प ड्युटी में, ५.३९ लाख रुपये की रजिस्ट्रेशन फीस में और ३.७१ करोड़ रुपये नजराणा फीस में छूट मिली है. यह छूट उस एरिया को भी मिली है जिसका कमर्शियल यूज हुआ है. लवासा में स्थानीय गरीब लोगों को एज्युकेशन और मेडिकल सुविधा देने संबंधी कोई

एविडेन्स नहीं था. सरकार का इंटरेस्ट और प्रकल्प से संबंधित व्यवहार में पारदर्शकता रखनी जरुरी है. इस प्रकल्प में कहीं भी सरकार का हित रक्षण प्रोटेक्ट नहीं हुआ ऐसा दिखायी देता है. इस काम का विज्ञापन अंतर्राष्ट्रीय स्तर पर दिया जाना चाहिए था. लवासा प्रकल्प के बारे में जमीन, पानी और अन्य सुविधाओं को लेकर बहुत विवाद हुआ था. इन सभी बातों को देखते हुए ऐसा लगता है कि एल.सी.एल. को फायदा ही होने वाला था. इन सभी बातों पर सरकार ने सोचना चाहिए. असे मत व्यक्त केले.

**१.८३** महालेखापरिक्षकांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने समितीने लवासा कॉर्पोरेशनला मुद्रांक शुल्कात व नोंदणी फीमध्ये सवलत दिलेली आहे. लवासा सिटी हे पर्यटन स्थळ आहे की व्यावसायिक उपक्रम आहे ? त्या शहरामध्ये काही श्रीमंत लोकांनी सदनिका घेतलेल्या आहेत, त्यामुळे लवासा शहर हे संपूर्णपणे टूरिझम सिटी नाही. या लवासा कॉर्पोरेशन लि.यांना विविध सवलती दिल्यामुळे शासनाचा प्रचंड महसूल बुडाला आहे असा महालेखापालांचा आक्षेप आहे. याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? याबाबत पृच्छा केली असता यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिव यांनी समितीस असे विदित केले की, या प्रकल्पाला मूळ तरतुद दिनांक ७.४.१९९९ रोजी शासनाने निर्णय घेऊन पर्यटनाचा उद्योग म्हणून समावेश केला. तो करीत असताना त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो याचा उल्लेख केला होता. त्यामध्ये हिल स्टेशन्सचा उल्लेख केलेला आहे. पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्यात आल्यामुळे उद्योगासाठी ज्या सवलती मिळतात त्या या प्रकल्पालाही मिळाल्या पाहिजेत अशी भूमिका घेण्यात आली. त्यानंतर सन १९९९, सन २००१ मधील अधिसूचनेनुसार त्यांना सूट मिळावी असे पर्यटन विभागाने मुद्रांक शुल्क विभागाला पत्राने कळविले होते. या संदर्भातील अर्ध समासातील ज्ञापनामध्ये (Half margin memo) असे लिहिले होते की, एका विशिष्ट म्हणजे दिनांक १.४.२००६ ते दिनांक ३०.९.२००७ या कालावधीमध्ये दिलेली सूट चुकीची आहे. त्यावेळी ती अधिसूचना उपलब्ध नव्हती म्हणून या संबंधी आक्षेप घेण्यात आला होता त्या अधिसूचनेमध्ये कोणकोणत्या गावांना टूरिझमचा फायदा द्यावयाचा आहे ते नमूद केलेले आहे त्या युक्तीवादाने या प्रकल्पाला फायदे दिलेले आहेत.

**१.८४** पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु लवासा कॉर्पोरेशनला प्रकल्प सुरू करीत असताना कोणत्या अटी व शर्ती घातल्या होत्या ? अशी पृच्छा समितीने केली असता दिनांक ७.४.१९९९ रोजीचा पर्यटन विभागाचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये १४ गोष्टींना उद्योगाचा दर्जा देण्याचा उल्लेख आहे. त्यामुळे एकदा पर्यटनला उद्योगाचा दर्जा दिल्यानंतर त्यांना आपोआप सूट मिळते. त्यामध्ये त्यांनी काही सवलती दिल्या होत्या की नाही, अटी व शर्तींचा भंग झाला आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे. परंतु अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे द लेक सिटी कॉर्पोरेशन प्रा.लि. ला पहिल्या व्यवहारासाठी सूट दिलेली आहे. त्यानंतर त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळालेला आहे त्यांना सरसकट मुद्रांक शुल्कात सूट दिलेली आहे असे झालेले नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

**१.८५** विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशानुषंगाने महालेखापरिक्षकांनी असे मत व्यक्त केले की, महालेखाकार का कहना यह है कि यह जो एरिया था वह कमर्शियल एरिया था. एल.सी.एल. को उस एरिया में कन्सेशन नहीं मिलना चाहिए.

**१.८६** लवासा शहरात पर्यटन विकास झाल्यानंतर तेथे जगभरातून लोक येतील अशी अपेक्षा आहे. त्या ठिकाणी आतापर्यंत किती पर्यटकांनी भेट दिली आहे ? समितीच्या माहिती प्रमाणे तेथे बाहेरच्या लोकांनी विविध संस्था उभ्या केल्या आहेत त्याच्याशी पर्यटनाचा काहीही संबंध नाही. तसेच काही लोकांनी बऱ्याच मालमत्ता घेऊन ठेवल्या आहेत. त्या ठिकाणच्या मालमत्तांना बराच दर मिळालेला आहे. प्रत्यक्षात पर्यटन कमी झालेले आहे. त्यामुळे त्या प्रकल्पाला व्यावसायिक स्वरुप आलेले आहे. काही लोकांनी सदनिका विकत घेऊन चढ्या दराने विकल्या आहेत. लवासा प्रकल्प विकसित होत असताना स्थानिक गरीब जनतेला सवलतीच्या दरामध्ये वैद्यकीय व शैक्षणिक सुविधा मिळाव्यात अशी शासनाची अपेक्षा होती. या उद्देशाला बगल देऊन त्या प्रकल्पाचा व्यावसायिक वापर करून अटी व शर्तींचा भंग करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी विविध हॉटेल्स उभी राहिली आहेत, प्राणी संग्रहालय निर्माण करण्यात आले आहे त्याच्याशी पर्यटनाचा संबंध नाही. परदेशातील लोकांनी तेथे गुंतवणूक केलेली आहे. पर्यटन विभागाचे आयडेंटिफाईड क्षेत्र ५ हजार हेक्टर इतके आहे ते पर्यटन म्हणून विकसित झालेले नाही. परंतु तेथे व्यावसायिक प्रगती झालेली आहे. ते महालेखापालांना मान्य नाही. या प्रकल्पाला शासनाने कोणत्या उद्देशाने सवलती दिल्या होत्या ? अशी समितीने पृच्छा केली.

**१.८७** मुद्रांक शुल्कात सुट देणे किंवा आकारणी करणे एवढ्या विषयापुरता या विभागाचा संबंध आहे. त्या भागातील सर्व गावे हिल स्टेशन्स म्हणून गणली जातील अशा प्रकारची दिनांक ३१.५.२००१ रोजी अधिसूचना नगरविकास विभागाने निर्गमित केली होती. त्यानंतर पर्यटनास उद्योगाचा दर्जा दिल्याचा निर्णय पर्यटन विभागाने नोंदणी विभागाला दिनांक १९.९.२००२ रोजी कळविले त्यानुसार दिनांक ५.५.२००१ रोजीच्या अधिसूचनेस अधिन राहून या उद्योग घटकास मुद्रांक शुल्काची माफी देण्यात आलेली आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

**१.८८** दिनांक ७.४.१९९९ रोजी पर्यटन विभागाने नोंदणी शुल्क विभागाला कळविले होते. त्यानंतर तीन वेळा मुद्रांक शुल्क विभागाला या संदर्भात पर्यटन विभागाने पत्रे पाठविली होती. हा लवासा प्रकल्प निर्माण करण्याचा निर्णय कोणी घेतला होता ? समितीच्या या प्रश्नावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, दिनांक ७.४.१९९९ रोजीच्या अधिसूचनेमध्ये १४ विषयांचा समावेश आहे. यामध्ये हॉटेल, हेल्थ क्लब, वॉटर स्पोर्टस, अम्युझमेंट पार्क इत्यादी १४ विषय आहेत. त्यानंतर २००१ साली लवासा हे हिल स्टेशन असल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आलेले आहे त्यामुळे ते मुद्रांक शुल्क माफीस पात्र असल्याचे नमूद केले होते.

हिल स्टेशनला सवलत देण्याचा शासनाचा आदेश होता. त्यानुसार त्यांना १९९९ ते २००१ या कालावधीसाठी मुद्रांक शुल्कात सूट दिली आहे. परंतु २००१ ते २००७ या कालावधीमध्ये मुद्रांक शुल्क आकारण्यामध्ये चूक झाली त्याचे कारण काय आहे? याबाबत माहिती देण्यास विभागास सांगितले असता लेखापरिक्षणाच्या अर्ध समासातील ज्ञापनामध्ये (Half margin memo) दिनांक १ जून २००६ ते दिनांक ३० सप्टेंबर २००७ या कालावधीमध्ये दिलेली सूट चुकीची आहे असे नमूद केले होते. परंतु पर्यटन विभागाने लवासा कॉर्पोरेशनला हिल स्टेशन म्हणून जाहीर केलेले आहे. पहिल्या व्यवहारासाठी त्यांना सूट दिली जावी असे त्या अधिसूचनेमध्ये नमूद केलेले होते असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

**१.८९** लवासा हे हिल स्टेशन निर्माण झाले आहे त्याठिकाणी श्रीमंत लोकांनी बंगले बांधले आहेत.

ते लोक तेथे स्वत:ची करमणूक करण्यासाठी येतात पर्यटन हा वेगळा विषय आहे. माथेरान हे पर्यटन स्थळ आहे. परंतु लवासा येथे टूरिझमचा पार्ट थोडा आहे आणि हिल स्टेशनचा पार्ट ९० टक्के आहे. महिंद्रा क्लबने वेगवेगळी ठिकाणे विकसित केलेली आहेत त्यांना हिल स्टेशन्स म्हणावयाचे की पर्यटन म्हणावयाचे? अशी समितीने पृच्छा केली असता पर्यटन उद्योगास चालना व उत्तेजन मिळण्यासाठी व आर्थिक गुंतवणुकीत वाढ होऊन रोजगाराच्या संधीत वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून अधिसूचना काढण्यात आली होती. त्यानंतर लवासा हे हिल स्टेशन म्हणून घोषित झाले. त्या ठिकाणी अटी व शर्तीचा भंग झाला असेल, तेथे पर्यटनामध्ये वाढ झाली की नाही याबाबतचा तपास मुद्रांक शुल्क विभाग तपासू शकत नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**१.९०** लवासा प्रकल्पामध्ये आतापर्यंत झालेल्या बांधकामांमधून किती मुद्रांक शुल्क जमा झाले आहे? तसेच डेव्हलपमेंटची कामे किती झाली आहेत व त्याच्या माध्यमातून मुद्रांक शुल्क किती जमा झाले व किती प्रलंबित आहेत? याबाबत समितीने माहिती विचारली असता पहिल्यांदा शेतकऱ्यांकडून जमीनी घेण्यात आल्या त्यावेळी मुद्रांक शुल्कातुन सूट दिलेली आहे. त्यानंतरच्या काळात त्यांच्याकडून मुद्रांक शुल्क जमा झालेले आहे. तसेच लवासा कार्पोरेशन लि. ने सदर प्रकल्पात विकसित केलेले युनिट/भूखंड यांचे हस्तांतरण केलेल्या दस्तास सन २००२ ते दि. १६ जुलै २०१४ अखेर शासनास जमा झालेली मुद्रांक शुल्क नोंदणी फी ची माहिती खालीलप्रमाणे नमूद केली :—

| अ. क्र. | दु. नि. कार्यालयाचे नाव | लवासाने विक्री/भाडेपट्टाने हस्तांतरीत केलेले एकूण दस्त संख्या | वसुल झालेले (कोटीत) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुद्रांक शुल्क | नोंदणी फी | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | दु.नि.मुळशी क्र.१ | ३०५ | ४.२४ | ०.७८ | ५.०२ | |
| २ | दु.नि.मुळशी क्र.२ | १२३२ | २५.६९ | ३.१९ | २८.८८ | |
| ३ | दु.नि.वेल्हा | ०० | ०० | ०० | ०० | |
| | **एकूण** | **१५३७** | **२९.९३** | **३.९७** | **३३.९** | |

**१.९१** लवासा कंपनीने एकूण केलेले बांधकाम, स्टॅम्प डयुटीची थकबाकी, तेथे रिक्त असलेले गाळे, ही सर्व माहिती समितीला देण्यात यावी. असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी पुढील माहिती समितीस दिली.

नोंदणी महानिरीक्षक यांच्या अहवालानुसार खालीलप्रमाणे माहिती सादर.

**१.९२** लवासा कार्पोरेशन लिमिटेड यांचा लवासा गिरीस्थान प्रकल्प हा एकूण ५ टाऊन मध्ये विकसिता होत असून लवासा कंपनीने एकूण क्षेत्र ४१९२.२६ हे. आर खरेदी केले आहे. त्यामध्ये अपेक्षित बांधकाम क्षेत्र १२१८२१५६ चौ. मी. इतके आहे. त्यापैकी लवासा प्रकल्पातील विकसित झालेले टाऊन क्र.१ व विकसन प्रगती पथावर असलेल्या टाऊन क्र.२ मधील क्षेत्रांमध्ये बांधकाम युनिटची संख्या २८१५ एवढी आहे. त्यापैकी विकसित करून विक्री केलेल्या युनिटची संख्या २३३८ एवढी आहे.

या सर्व युनिटचे हस्तांतरीत केलेल्या व्यवहारामधून (खरेदी खत, गहाणखत, भाडेपट्टा व बक्षीसपत्र) दिनांक १९ जुलै २०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या महसूलाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | दस्तांची संख्या | वसुल मुद्रांक शुल्क (रु.) | वसुल नोंदणी फी (रु.) कोटीत | एकूण प्राप्त झालेला महसूल (रु.) कोटीत |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | २३२० | ४८.०७ | ६.०४ | ५४.११ |

लवासाने विकसित करून विक्री करून शिल्लक असलेली युनिट ४७७ आहेत. सदर युनिटचे विक्रीयोग्य क्षेत्र ६४३०७१ चौ.फु. इतके असून सदरची युनिट, विक्री अभावी रिक्त राहिली आहेत. भविष्यात शासनास या ४७७ युनिटच्या विक्रीनंतर अंदाजे मुद्रांक शुल्क रु. १६.७५ कोटी व नोंदणी फी रु. १.४३ कोटी असे एकूण रु. १८.१८ कोटी इतका महसूल प्राप्त होणे अपेक्षित आहे.

**"नजराणा फी"**

**१.९३** यासंदर्भात महालेखापाल कार्यालयाने उल्लेख केलेल्या ३ कोटी ७१ लाख रुपयांच्या "नजराणा फी" संदर्भात खुलासा करताना अतिरिक्त मुख्य सचिव यांनी अशी माहिती दिली की, ३ कोटी १७ लाख रुपयांचा नजराणा कमी वसुल केला असा महालेखापाल कार्यालयाचा आक्षेप आहे. यामध्ये ४८ प्रकरणांचा उल्लेख करण्यात आला होता. या ४८ प्रकरणांची माहिती महसूल विभागाने दिली आहे. परंतु यासंदर्भातील माहिती विभागाने तपासली असता ४८ प्रकरणांऐवजी अशाप्रकारची ९० प्रकरणे आढळून आली आहेत. या ९० प्रकरणांमध्ये नजराणा वसुल करायला पाहिजे होता. मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ (१) (अ) मध्ये सुधारणा केली होती. दिनांक ८ सप्टेंबर १९८३ चा शासन निर्णयाचा उल्लेख परिच्छेदामध्ये करण्यात आला आहे. अशाप्रकारची जमीन खरेदी करीत असताना सिलींगची जमीन सरप्लस धरली होती. सिलींगची अतिरिक्त जमीन जे लोक भूमिहीन होते त्यांना दिलेली आहे. ३० दिवसांच्या आत कळविले तर सदर जमीनीच्या चालू बाजार भावाच्या किंमतीच्या दोन टक्के प्रमाणे नजराणा लावला जातो आणि ३० दिवसांच्या आत कळविले नाही तर खरेदी विक्री रकमेच्या ७५ टक्के नजराणा लावला जातो.

**१.९४** अतिरिक्त मुख्य सचिवांनी केलेल्या खुलाशास अनुसरून समितीने पुढे अशी पृच्छा केली की, सिलींगची अतिरिक्त जमीन भूमिहीन शेतकऱ्यांना दिली आहे. या जमीनीची मालकी सरकारची आहे. सरकारच्या मालकीची ही जमीन गरीब लोकांना वाटण्याचे शासनाचे धोरण होते. गरीब लोकांना वाटप करण्यात आलेली ही जमीन कंपनीकडून परत घेता येते का?

**१.९५** उपरोक्त समितीच्या प्रश्नावर खुलासा करताना अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीस असे विदित केले की, विभागाने स्पष्टीकरणामध्ये म्हटलेले आहे की, कूळ वहिवाट कायदा ६३, कलम ६३ (एक) (अ) याप्रमाणे ही परवानगी कायद्यामध्ये दिलेली आहे. सन १९८३ चा शासन निर्णय आहे. त्यानुसार ३० दिवसांच्या आत कळविले नाही तर ७५ टक्के नजराणा लावला जातो. या जमीनीसंदर्भात लवासा कार्पोरेशनने कळवायला पाहिजे होते. केवळ ८ केसेस ३० दिवसांच्या आत कळविलेल्या आहेत. उर्वरित प्रकरणांमध्ये ७५ टक्के नजराणा वसुल करायला पाहिजे होता. सध्याचा बाजारभाव आणि विक्रीची किंमत यापैकी जी जास्त रक्कम असेल त्या रकमवेर नजराणा आकारला जातो. ५६ प्रकरणांमध्ये आतापर्यंत ११ कोटी ९० लाख ९१ हजार ९४० रुपये म्हणजे जवळपास १२ कोटी रुपये वसुल केलेले आहेत. २६ प्रकरणे अशी आहेत की, ज्यांचेकडून ७५ टक्के रक्कम वसुल करायची आहे. कायद्याप्रमाणे ज्यांनी ३० दिवसांच्या आत कळविले त्यांच्याकडून २ टक्के प्रमाणे नजराणा वसुल केला आणि ज्यांनी ३० दिवसांच्या आत कळविले नसल्यामुळे, तसेच त्यांनी शर्तभंग केला म्हणून त्यांच्याकडून दिनांक ८ सप्टेंबर, १९८३ च्या शासन निर्णयानुसार ७५ टक्के नजराणा आकरलेला आहे. ५६ प्रकरणामध्ये १२ कोटी रुपये वसुल झालेले आहेत. उर्वरित २६ प्रकरणांसंबधी जिल्हाधिकाऱ्यांकडून कार्यवाही सुरू असून खरेदीखताच्या ७५ टक्के रक्कम नजराणा म्हणून आकारला जातो.

**१.९६** या २६ प्रकरणांमध्ये आपल्याला किती रक्कम प्राप्त झाली आहे? अशी पृच्छा समितीने केली असता खरेदी विक्रीची जी किंमत असते, त्याच्या ७५ टक्के नजराणा रक्कम आपण लावलेली आहे. सन १९८३ चा शासन निर्णय आहे. १९६३ (ए) मधील कलमामध्ये सेलडीड म्हटलेले आहे. शासन निर्णय आणि ॲक्ट यामध्ये तफावत असेल तर शासन निर्णयामध्ये तसा खुलासा केला आहे. शासन निर्णय आणि ॲक्ट यासंदर्भात दिनांक २७ जुलै २०११ रोजी महसूल विभागाला हा प्रश्न जिल्हाधिकारी, पुणे यांनी विचारला होता की, काय करायला हवे. तेव्हा यासंदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेतले असता जमीनीच्या खरेदी किंमतीच्या ७५ टक्के नजराणा रक्कम भरून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात पुणे जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. बाजारभावानुसार नजराणा न घेता खरेदी विक्रीनुसार (Sale Deed) ७५ टक्के नजराणा वसुल केलेला आहे. शासन निर्णयानुसार सेलडीडनुसार जी जास्त रक्कम असेल त्यानुसार नजराणा घेण्यात येतो. असा खुलासा अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीसमोर केला.

**१.९७** The A. G. has raised objection regarding this. What is the specific provision in the Act? आणि शासन निर्णयाला वेटेज देणार की ॲक्टला वेटेज देणार आहात? या समितीच्या प्रश्नाला ॲक्ट मध्ये स्पेसिफिक म्हटलेले नसून ॲक्टला महत्त्व द्यावे लागणार आहे अशी माहिती दिली.

**१.९८** या २६ प्रकरणांचे हक्क बदलाचे, फेरफार झाले आहेत का ? त्यांनी अटी पूर्ण केल्या नाहीत तरी हक्क बदलाचा, फेरफार करण्याचे आदेश कोणी दिले अशी समितीने पृच्छा केली ? तसेच आपण नजराणा फी खरेदी किंमतीवर ७५ टक्के लावलेली असून बाजारभाव आणि खरेदी किंमत यामध्ये प्रचंड तफावत असल्याचे नमूद केले व समितीने व्यक्त केलेल्या मतास अनुसरून शासन निर्णयानुसार Whichever is more ही खरेदी किंमत आहे. असेही मत व्यक्त केले. विभागीय प्रतिनिधींनी सिलींगच्या जमीनीच्या संदर्भात नजराणा फी बाजारभावाच्या ५० टक्के रक्कम मार्केट रेटनुसार घेण्यात येते रेडी रेकनरप्रमाणे घेत नाही असा खुलासा केला.

समितीने पुढे अशी पृच्छा केली की, ५६ प्रकरणांमध्ये ११ कोटी रुपये वसुल झालेले आहेत. या ५६ प्रकरणांमध्ये विभागाने रेडी रेकनर का लावला नाही?

**१.९९** उपरोक्त समितीच्या प्रश्नावर महालेखाकार कार्यालयाचा जो आक्षेप आहे त्यानुसार विभागातर्फे पुनर्तपासणी करू Whichever is more याप्रमाणे तपासणी करून यातील जो फरक असेल तो वसुल करण्यात येईल असे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीस आश्वासित केले.

**१.१००** या अनुषंगाने पुढे महालेखाकारांनी इसमें डिफरन्स है नजराणा फीस २ प्रतिशत रखी गई थी. असे सांगितले यावर माहिती देताना अतिरिक्त मुख्य सचिव यांनी असा खुलासा केला की, यदि ३० दिन के अंदर जानकारी दी जाती है तो दो प्रतिशत नजराणा फीस वसुली के लिए पात्र है. ऐसे पांच केसेस है जिसमें नजराणा की रकम ली गई. इस बारे में एक जी. आर. भी है. १२ करोड़ रुपये की राशि वसुल की गई है. समिती का कहना है कि जो ७५ प्रतिशत के हिसाब से कॅलक्युलेट किया गया है वह किस बेसिस पर किया गया ? Department Officers have pointed out that it has been done in consultation with the Law and Judiciary department.

**१.१०१** Question is why it was referred to Law and Judiciary department? If the G.R. is clear regarding this then you should have collected the money as per G. R. from the concerned party. असे समितीने विचारले असता त्यांनी संदर्भ केला होता असे अतिरिक्त मुख्य सचिवांनी सांगितले.

**१.१०२** शासनाचे स्पष्टीकरण २०११ मध्ये प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले आहे. जमीनीची खरेदी यापूर्वी झालेली असताना हे स्पष्टीकरण लागू होते का? ९ वर्षाचे अंतर का आहे ? तसेच २ टक्क्यांऐवजी ७५ टक्के नजराणा आकारला पाहिजे, रेडी रेकनर किंवा बाजारभावानुसार ती रक्कम किती होते हे निश्चित झाले पाहिजे. खरेदी सन २००७, २००८ व २००९ मध्ये झालेली होती तर सन २०११ मध्ये शासनाकडून स्पष्टीकरण का देण्यात आले? विभागाने ७५ टक्क्यांऐवजी २ टक्के आकारणी करण्याचा निर्णय घेतला, प्रकरण कोर्टात गेले, म्हणून तुम्ही २०११ मध्ये शासनाकडून स्पष्टीकरण घेतले असे समितीचे मत आहे. २००७, २००८ व २००९ मध्ये २ टक्के नजराणा आकारणी करण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्यांनी घेतला त्यांचे नाव, किती एकर जमीन खरेदी झाली याची माहिती द्यावी ११ कोटी रुपयांचा महसूल मिळाल्याचे म्हटले आहे. वास्तविक २०० ते ४०० कोटी रुपयांचा महसूल मिळणे अपेक्षित आहे. इतकी तफावत असल्यामुळेच महालेखापाल यांनी शासनाचे नुकसान झाल्याचे म्हटले आहे ते योग्य आहे असे मत समितीने व्यक्त केले.

**१.१०३** या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, जमीनीची खरेदी विक्री झाली त्यामध्ये सिलिंगच्या जमीनीचे वाटप केल्याबद्दलची नोंद ७/१२ वर नव्हती.

**१.१०४** सरकारकडे सिलिंग ॲक्टनुसार आलेली अतिरिक्त जमीन शेतकऱ्यांना वाटप केली त्याची नोंद शासनाकडे नाही असे विभागाचे म्हणणे आहे. अशी विचारणा समितीने केली असता सिलींगच्या जमीनीचे वाटप केल्याची नोंद ७/१२ वर नव्हती सन १९७५ मध्ये जमीनी वाटलेल्या असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

**१.१०५** जमीनी, शेतमजूर, शेतकरी, भूमीहिन यांच्यापैकी कोणाला वाटप केल्या याची नोंद २५ वर्षापर्यंत शासनाला करता आली नाही याला जबाबदार कोण आहे? याबाबत समितीने विचारणा केली असता कलेक्टर कार्यालय से सारे रेकॉर्ड महालेखाकार कार्यालय के पास आने के बाद ए.जी. कार्यालय उस रेकॉर्ड की जांच करता है उसमें ही यह सारी डिटेल्स पता चली. असा खुलासा महालेखाकार यांनी केला.

**१.१०६** या प्रकरणात सिलिंग ॲक्टनुसार जमीनी वाटप केल्या त्याची नोंद ७/१२ वर नव्हती. सिलिंग ॲक्ट अंतर्गत पुणे जिल्ह्यात किती जमीनी वाटल्या गेल्या याची माहिती समितीला द्यावी असे निदेश समितीने विभागाला दिले तसेच आज तरी ७/१२ वर नोंदी आहेत का? अशी विचारणा केली.

**१.१०७** उपरोक्त समितीच्या प्रश्नावर या केसमध्ये नोंदी नव्हत्या अन्यथा ७/१२ वर नोंदी घेतल्या जात असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच कब्जेदार, ज्यांनी जमीनी विकल्या त्याची नोंद ७/१२ वर आहे तसेच फेरफार झालेले असून रेडी रेफरन्सकरिता ७/१२ वर इतर हक्कावर नोंदी घेण्यात येते, जेणेकरून ७/१२ पाहिल्यानंतर ताबडतोब कळते.

**१.१०८** बाजारभावाच्या किंवा सेल डीडच्या २ टक्के नजराणा घेण्याची जी काही कार्यवाही केलेली आहे अशी जमीन किती एकर आहे ? २ टक्के किंवा ७५ टक्के नजराणा आकारण्यामुळे रक्कम किती होते? २ टक्के किंवा ७५ टक्के आकारणी करण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्यांनी घेतला? सन २०११ मध्ये शासनाकडून स्पष्टीकरण घेण्यासाठी प्रकरण का पाठविले? या सर्व प्रश्नांची माहिती आपण समितीला द्यावी. असे निदेश समितीने विभागास दिले परंतु माहिती अप्राप्त आहे.

**१.१०९** सरकारने सिलिंग ॲक्टनुसार अतिरिक्त जमीनी शेतकऱ्यांना दिल्या, त्याची नोंद १९७५ ते २००५ पर्यंत ७/१२ वर झाली नाही, त्यासाठी सरकारकडे वेळ नाही. २००६-०७ मध्ये जमीनीचे जे खरेदी विक्री व्यवहार झाले त्या संदर्भातील लवासा प्रकल्पाच्या नावाने फेरफार आणि ७/१२ नोंदी एका महिन्यात करण्यासाठी सरकारकडे वेळ होता. तसेच या २६ प्रकरणांमध्ये नजराणा वसुल झालेला नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता ७/१२ शेतकऱ्यांच्या नावे झालेले असून भोगवटादार वर्ग २ म्हणून दाखविले आहे. इतर हक्कामध्ये जमीन धारणा करण्याचे प्रकार असतात त्याची नोंद करावी लागते. असे स्पष्टीकरण अतिरिक्त मुख्य सचिवांनी केले.

**१.११०** वर्ग २ ची जमीन वर्ग १ मध्ये करण्यासाठी परवानगी आवश्यक असताना परवानगी का घेतली गेली नाही? याबाबत खुलासा करताना अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीस असे विदित केले की, शासनाने कलम ६३(१)(अ) मध्ये बदल केला. त्या कलमानुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ आणि टूरिझम व हिल स्टेशनचे धोरण आले त्यासाठी जमीन घेत असतील तर त्यासाठी पूर्व परवानगीची अट काढून टाकली. ३० दिवसांच्या आत खरेदी विक्रीचे व्यवहार कळविले पाहिजेत २ टक्के नजराणा आकारला पाहिजे. ३० दिवसात व्यवहार न कळविल्यास ७५ टक्के नजराणा आकारला पाहिजे. कलम ६३(१) (अ) मधील बदल १९९४ मधील असून २००५ मध्ये दुसरी सुधारणा केलेली आहे. दुसरी सुधारणा म्हणजे कलम ६३(१)(अ) पोट-कलम (२) अन्वये कलम ६३(१)(अ) मधील तरतुदीनुसार खरेदी करावयाची जमीन भोगवटादार वर्ग २ सत्ता प्रकाराची असल्यास, खरेदीदारांनी अशा जमीनी कोणत्याही शर्तीवर धारण केली असली तरी, खरेदीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत खरेदीच्या २ टक्के एवढी रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे जमा करावी अशी तरतुद करण्यात आली आहे. पूर्वीच्या तरतुदीप्रमाणे अशा जमीनीचा वापर ५ वर्षापर्यंत करावयाचा होता, ती मुदत दुसऱ्या सुधारणेप्रमाणे १५ वर्षे केली आहे.

**१.१११** जमीन खरेदी पूर्वीची असल्यामुळे त्यावेळच्या नियमानुसार नजराणा आकारणी केली पाहिजे. ७/१२ वर सिलिंगची नोंद नसल्यामुळे कशाप्रकारे नजराणा आकारणी करावी याची विभागाला माहिती नव्हती असे म्हणता येईल का? या समितीच्या प्रश्नावर सन १९९४ च्या सुधारणेप्रमाणे तशी तरतुद होती. ७/१२ वर सिलिंगची नोंद नसल्यामुळे विनापरवाना जमीन खरेदी झाली. तसेच सन २००५ मध्ये जमीनीच्या वापराची मुदत ५ वर्षाऐवजी १५ वर्षे केली असून जमीनीची खरेदी २००६ ते २००८ मध्ये झालेली आहे. असा खुलासा अतिरिक्त मुख्य सचिवांनी केला.

**१.११२** "नजराणा फी" संदर्भात स्पेशल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट केल्यामुळे इतर सर्व कायदे रद्दबातल झाले. महालेखाकार यांनी ७५ टक्के नजराणा रक्कम का वसुल करण्यात आला नाही, असा आक्षेप घेतला आहे. या मुद्यासंबंधी समितीला माहिती द्यावी असे निदेश समितीने दिले.

**१.११३** नजराणा खरेदी किंमत की बाजार भाव यापैकी कशाच्या आधारे घेण्यात आला? अशी विचारणा महालेखाकार यांनी केली होती. सदर नजराणा रकमेची वसुली खरेदी किंमतीच्या ७५ टक्केप्रमाणे आकारण्यात आलेली आहे. तरतुद अशी आहे की, खरेदी-विक्री व्यवहार झाल्यानंतर १ महिन्याच्या आत शासनास माहिती दिली तर २ टक्के नजराणा फी आकारावी, असा १९९४ चा कायदा आहे. महालेखाकार यांनी ४८ प्रकरणे शासनाच्या निदर्शनास आणुन दिली, परंतु शासनाने ९६ प्रकरणे शोधून काढलेली आहेत. ९६ पैकी ८ प्रकरणामध्ये १ महिन्याच्या आत शासनास कळविण्यात आल्यामुळे २ टक्के प्रमाणे नजराणा आकारण्यात आला आहे. असा खुलासा अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीसमोर केला.

**१.११४** खरेदी किंमतीवर की रेडी रेकनरनुसार नजराणा आकारणी करावी? याबाबत कायदा काय सांगतो, याची माहिती समितीला दयावी असे समितीने विभागास सांगितले असता सदर प्रकल्पास पर्यटन उद्योग म्हणुन जाहीर करण्यात आलेला असून कायदा आणि शासन निर्णय यामध्ये तफावत असेल तर what will prevail? याबाबत कायद्यामध्ये त्रुटी राहिलेली आहे. एक महिन्यात जर खरेदी-विक्री बाबत माहिती दिली तर खरेदी किंमतीच्या २ टक्के नजराणा आणि माहिती दिली नाही व शर्तभंग झाला तर कोणत्या किंमती वर नजराणा आकारावा याबाबत कायद्यामध्ये संदिग्धता आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**१.११५** लॉ सायलेन्ट आहे तेथे शासनाचा फायदा असेल ते लागू का केले नाही? उपरोक्त प्रश्नाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, याबाबत लॉ सायलेन्ट असल्यामुळे सदर प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित होते व म्हणून शासनाकडे संदर्भीत केले होते. शर्तभंग प्रकरणी पर्याय म्हणून ६३(१)(a) ३ व ४ नुसार एन.एस.एस. च्या २० पट रक्कम वसुल करण्याचा अधिकार आहे.

**१.११६** वर्ग - २ जमीन हस्तांतरण संदर्भात १९८३ चा शासन निर्णय आहे. सदर प्रकरण हे विशेष प्रकरण असल्यामुळे तसेच त्यास उद्योग पॉलिसीचा लाभ असल्यामुळे हा शासन निर्णय सदर प्रकरणी लागू होत नाही. त्यामुळे लॉ सायलेन्ट असला तरी या प्रकरणी २० पट रक्कम आकारण्यात आली तरी मिळणारी रक्कम अतिशय कमी असते. या प्रकरणी नुकसान होऊ नये म्हणून शासनाकडे संदर्भ करण्यात आला होता. त्याचे उत्तर प्राप्त झाले असून सदर मार्गदर्शन महसूल व वन विभागाने विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी खरेदी-विक्री व्यवहाराच्या ५० + २५ असे एकूण ७५ टक्के रक्कम आकारून वसुली करण्याबाबत कळविण्यात आले आहे. एकूण ९७ प्रकरणे आहेत. त्यामध्ये सिलींगच्या २९ प्रकरणात सदर फॉर्म्यूल्यानुसार वसुली लावण्यात आली आहे. या २९ प्रकरणामध्ये १७ प्रकरणामध्ये खरेदी-विक्री व्यवहार रेडी रेकनर पेक्षा जास्त दराने होता व १२ प्रकरणामध्ये रेडी रेकनर पेक्षा कमी दर आढळून आला. ऑडीट पॅरानंतर शासनाने धोरण बदलले व त्यानुसार ३६ लाख रुपये करण्याबाबत जिल्हाधिकारी, पूर्णे यांना कळविले. या व्यतिरीक्त २७ प्रकरणे अशी आहेत की त्यामध्ये खरेदी-विक्री व्यवहार झाला नव्हता, मात्र ॲग्रीमेंट व एम.ओ.यू. करण्यात आला होता. त्यामुळे असा प्रश्न निर्माण झाला की, शासनाने खरेदी-विक्री व्यवहाराच्या दरावर दंड आकारण्याच्या

सूचना दिलेल्या आहेत आणि या प्रकरणी खेरदी-विक्री व्यवहार झालेला नसल्यामुळे रेडी रेकनर दराप्रमाणे दंड आकारून ११ कोटी रुपये वसुली करण्यात आली त्यातून शासनाचा २ कोटी रुपयांचा फायदा झाला आहे.

**१.११७** जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, इस पोईन्ट का एग्जिट कॉंफ्रेन्स में जिक्र हुआ था उस समय कलेक्टर ने कहा था कि इस मामले की इन्क्वायरी कर रहे हैं and necessary action would be taken considering the value of land. विभाग यहां पर लॉ सायलेंट होने की बात कर रहे हैं. महालेखाकार का ऐसा कहना है कि सरकार को अपने रेवेन्यू के मामलों में सेफगार्ड की भूमिका अपनानी चाहिए.

**१.११८** महालेखाकार यांच्या मतानुषंगाने अतिरिक्त मुख्य सचिव यांनी पुढील खुलासा केला की, Department think the real solution will be to amend the Law and have a clear cut provision regarding this. If the information is given within a period of one month then 2% of the sale price is charged. The Law will have to clearly provide that if the information is not given within one month then what penalty would be charged? In this regard Department would like to say that, we would immediately move to the Government and make a proviso and amend the Act. If the Government says that it has to be according to Ready Reckoner rate then the difference of 36 lakhs would be recovered.

**१.११९** **"स्वामित्वधनाच्या थकबाकीची वसुली न होणे"** यासंदर्भात महालेखाकारांनी विभागास अशी विचारणा केली की, यह मुरुम उत्खनन का मामला है. इसमें रॉयल्टी चार्जेस के संबंध में ऑब्जेक्शन है. कलेक्टर का कहना था कि इसमें डिस्प्युट चल रहा है. रॉयल्टी चार्जेस देने चाहिए, ऐसा ए.जी. का मत है. अभी इसका क्या स्टेटस है.

**१.१२०** महालेखाकारांच्या उपरोक्त प्रश्नासंदर्भात माहिती देताना अपर मुख्य सचिव यांनी समितीस असे विदित केले की, महालेखापालांनी असा आक्षेप नोंदविला आहे की, लवासा कॉर्पोरेशन लि.ने इमारती, बंगले, दुकाने, कार्यालये, रस्ते आणि धरणे बांधण्यासाठी ८,०८,२४६ ब्रास एवढ्या मुरुमाचे उत्खनन केले होते ते गैरकायदेशीर होते. या उत्खननाबद्दल लवासा कॉर्पोरेशन लि.कडून १५ कोटी ५ लाख रुपये इतकी रॉयल्टी शासनाने आकारणी करावयास पाहिजे होती शासनाने ही रॉयल्टी त्यांच्याकडून आकारलेली आहे त्याशिवाय दंडाची रक्कम ८९ कोटी इतकी आहे. या रॉयल्टीबाबत त्यांनी हायकोर्टात रिट याचिका दाखल करून वसुलीस स्थगिती घेतलेली आहे. ही स्थगिती अद्याप कायम आहे अशी महालेखापालांना विभागाने माहिती दिलेली आहे. या संदर्भातील २-३ रिट याचिका हायकोर्टाने एकत्रित केलेल्या आहेत. हायकोर्टाने मूळ याचिकेवरील निर्णय शासनाच्या बाजुने दिल्यानंतर त्यांनी या वसुलीस सर्वोच्च न्यायालयामधून स्थगिती घेतलेली आहे. लवासा कॉर्पोरेशन लि.संबंधी उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.६४६३/२०१० व ५२५५/२०१० या दोन रिट याचिका प्रलंबित असून स्थगिती कायम आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला स्टे व्हेकेट करून घेण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती उठविल्यानंतर हा प्रश्न मार्गी लागेल.

**१.१२१** विभागाने केलेल्या खुलाशानुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, या दोन्ही रिट याचिका २०१० सालातील आहेत त्याला आता चार वर्षे झालेली आहेत. या याचिकांवरील निर्णय येण्यास विलंब झाला आहे असे विभागाला वाटत नाही काय? यावर खुलासा करताना सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिकेचा विषय शासनामार्फत हाताळला जात आहे आणि हायकोर्टामध्ये प्रलंबित असलेल्या दोन रिट याचिकांची प्रकरणे जिल्हाधिकारी, पुणे हे हाताळत आहेत असे समितीस सांगितले.

**१.१२२** लवासा कॉर्पोरेशन लि. बरोबर शासनाने किती वर्षांचा करारनामा केला आहे? उपरोक्त समितीच्या प्रश्नाला शासनाने लवासा कॉर्पोरेशन लि.बरोबर ३० वर्षांचा करारनामा केलेला आहे. कृष्णा खोऱ्यासाठी १४१ हेक्टर जमीन दिलेली आहे. परंतु महसूल विभागाने कोणतीही शासकीय जमीन दिलेली नाही.

**१.१२३** समितीने पुढे अशी विचारणा केली की, लवासा कॉर्पोरेशन लि.ने विभागाबरोबर ३० वर्षांचा करारनामा केला आहे आणि लवासाने खाजगी व्यक्तींबरोबर ९९९ वर्षांसाठी करारनामा केलेला आहे. हे दोन वेगवेगळे विसंगत करार कसे काय करण्यात आले आहेत?

**१.१२४** उपरोक्त प्रश्नावर अपर मुख्य सचिव यांनी समितीस अशी माहिती दिली की, कृष्णा व्हॅलीसाठी ३० वर्षांचा करार केलेला आहे. लवासा कॉर्पोरेशन लि. ने नॅशनल इंटरनॅशनल हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था, उदा. अपोलो हॉस्पिटल, नॅशनल एरोनॉटिक्स ॲण्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी इत्यादींना दिलेली जमीन वेगळी आहे. या दोन्ही कारणांसाठी खाजगी वाटाघाटीतून त्यांनी जमीन विकत घेतलेली आहे त्याचा शासकीय जमीनीशी काही संबंध नाही.

**१.१२५** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने पुढे अशी पृच्छा केली की, खनिज संदर्भातील काही प्रकरणे न्यायालयात दाखल आहेत. पुण्यातील काही विकासकांनी व नेत्यांनी शासनाविरुद्ध न्यायालयात आव्हान दिले आहे.

**१.१२६** उपरोक्त माहिती संदर्भात माहिती देताना अतिरिक्त मुख्य सचिव यांनी असा खुलासा केला की, माननीय उच्च न्यायालयाने या प्रकरणी शासनाच्या बाजुने निकाल दिला आहे. सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असून दिनांक १२ ऑगस्ट रोजीची तारीख दिलेली

आहे. माननीय उच्च न्यायालयाने या प्रकरणी ४० पानांचा सविस्तर निकाल शासनाच्या बाजुने दिलेला असून खनिज संपत्तीवर शासनाचा अधिकार आहे. खनिज संपत्तीचे उत्खनन केल्यास त्यावर रॉयल्टी लावण्याचा अधिकार हा शासनाचा आहे. गौण खनिजासंदर्भात अधिक माहिती देताना जिल्हाधिकारी यांनी समितीस असे अवगत केले की, सन २०११ मध्ये सदर प्रकरण कोर्टात गेले. त्यानंतर तेथे किती बांधकाम झाले, गौण खनिजाचा किती वापर झाला, तेथे किती खाणपट्टयाला मंजुरी दिली होती, त्यापैकी किती रॉयल्टी वसुल झाली इ. सर्व मुद्यांची माहिती घेण्यात आली आहे. जेवढ्या गौण खनिजाचे उत्खनन झाले त्या प्रमाणात अपेक्षित रॉयल्टी प्राप्त झाली की नाही ही माहिती संकलित केलेली आहे. तसेच या संदर्भातील रेकॉर्ड पूर्ण करावेत, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. मायनर मायनिंगचे सर्व रेकॉर्ड आता अपडेट केलेले असल्याने किती उत्खनन झाले, याची माहिती आता विभागाकडे उपलब्ध आहे.

**१.१२७** समितीने त्यासंदर्भात पुढे अशी विचारणा केली की, गौण खनिजाची रॉयल्टी भरावी लागली की, कंत्राटदार कोर्टात जाऊन स्थगिती आणतात यामुळे शासनाचे नुकसान होते. याबाबत काही तरी ठोस विचार झाला पाहिजे.

**१.१२८** लवासामध्ये ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आहेत काय? स्पेशल टाऊनशिप १० वर्षांकरिता असते भविष्यात तेथे शासनाचे सर्व नियम लागू होतील. सध्या लवासामध्ये किती चौ. मी. बांधकाम झाले, त्यावर किती कर आकारण्यात आला, तेथे मालमत्ता कर लागू करण्यात आला आहे काय, कंप्लीशन सर्टीफिकेट मिळवले होते काय, एसपीए नियुक्त केल्यामुळे या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे की नाही? तेथील काही हॉटेलांनी उंची २०-३० फुटाने वाढवली आहे. हे योग्य आहे काय, यासंदर्भात समितीला विभागाने मार्गदर्शन करावे. असे निदेश दिले असता विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, एसपीएला एमआरटीपी ॲक्ट मधील कलम ४१ (ब) अंतर्गत अधिकार दिलेले आहेत. लोकल गव्हर्नन्स अजूनही जिल्हा परिषद, ग्रामपंचायत कायद्यानुसार लागू आहे. पंचायत राज कायद्यानुसार कर आकारणी केली जाते. एसपीए नियुक्त केलेले असले तरी देखील त्यांचे अधिकार संपुष्टात आलेले नाहीत. एमआयडीसी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर तेथील ग्रामपंचायत व इतर युनिट यांच्यामार्फत कर आकारले जातात. एसपीए नियुक्त केले तरी देखील जिल्हा परिषद कायद्यांतर्गत जे अधिकार देण्यात आलेले आहेत ते बाधित होत नाहीत. येथे संपूर्ण भागाकरिता एक नगर पंचायत स्थापन करणे अधिक योग्य होईल. असे केल्यास महानगरपालिका कायद्यानुसार मालमत्ता कर आकारता येईल. घटनेमध्ये एकूण १८ फंक्शन्सचा उल्लेख केलेला आहे. अर्बन प्लॅनिंग हा एक भाग असून उर्वरित भागाकरिता स्थानिक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे.

**"जल क्रीडा आणि इतर मनोरंजनात्मक क्रीडा प्रकारांवर करमणूक शुल्काची आकारणी न होणे"**

**१.१२९** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, करमणूक कर वसुल करण्याबाबत सध्या विभागाकडे विशेष यंत्रणा नाही. करमणुकीचे कार्यक्रम, मोठ मोठे इव्हेंट यांची तपासणी केली जात नाही. यामुळे कराची आकारणीच होत नाही. आता सध्या काही कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यामुळे कराची वसुली वाढली आहे. मात्र हे प्रमाण आणखी वाढण्याची आवश्यकता आहे.

**१.१३०** समितीने व्यक्त केलेल्या मतास अनुसरून जिल्हाधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, समितीकडून सूचना मिळाल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याच्या कामात वाढ करण्यात आली. एन्टरटेन्मेंट ड्युटी ऑफीसर यांना साधारणपणे आठवड्यात दोनदा भेट करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा तपशील ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. ज्या संस्थांमध्ये मनोरंजनाच्या कार्यक्रमांकरिता परफॉर्मन्स परवाना नसेल त्यांना नोटीस देण्यात आली व तेथील कार्यक्रम बंद करण्यात आले. आता त्यांनी मागणी केल्यानुसार २-४ दिवसांमध्ये त्यांना लायसन्स दिले जाईल. तसेच तिकीट विक्री संदर्भात पाक्षिक अहवाल सादर करण्याची यंत्रणा सध्या तयार करण्यात येत आहे आता दर महिन्याला भेट दिली जाईल.

**१.१३१** लवासामध्ये ग्रामपंचायतीद्वारे कर गोळा केला जातो काय? तसेच लवासाने किती एकर जमीन संपादित केली आहे, यामध्ये किती गावे आहेत, याची माहिती संपादित करून समितीला द्यावी. तसेच लवासा व शासन यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्याची प्रत समितीला द्यावी असे निदेश समितीने विभागाला दिले. समितीच्या उपरोक्त प्रश्नाला ग्रामपंचायतीद्वारे कर आकारला जातो व एकूण १४१ एकर जमीन पाण्यासह दिलेली आहे. एमकेव्हीडीसी व लवासा यांच्यामध्ये करार झालेला असल्याची माहिती अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीस दिली.

**१.१३२** शासन व लवासा यांच्यामध्ये काहीच करार झालेला नाही काय अशी समितीने पृच्छा केली यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, गिरीस्थानाच्या संदर्भात शासनाच्या धोरणाचा हा एक भाग आहे. दि. ३१ मे २००१ रोजी एमआरटीपी ॲक्टमधील कलम २०(४) अंतर्गत गिरीस्थान डेसिग्नेट केले व दि. १ जून २००१ रोजी १८ गावांकरिता मंजुरी दिली. नगरविकास विभागाने कोणताही करारनामा केलेला नाही.

**१.१३३** ३० वर्षाकरिता १४१ एकर जमीन लवासा कॉर्पोरेशनला दिल्यानंतर पहिल्या वर्षी जे लीज रेंट ठरवले होते तेच शेवटच्या वर्षी देखील आहे. खरे तर प्रत्येक वर्षी भाडेपट्टयात वाढ होणे अपेक्षित आहे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच एसपीए असावे की नसावे या संदर्भात नगरविकास विभागाने आपले मत लेखी स्वरूपात समितीकडे पाठवावे असेही निदेश विभागास यावेळी समितीने दिले.

**१.१३४** **"दीर्घमुदतीसाठी भाडेपट्टीने आणि राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संस्थाबरोबर भागीदारीच्या रूपात जमीनीचे प्रदान"** या परिच्छेदा संदर्भात समितीने भाडेपट्टीचा करार किती वर्षापर्यंत करता येतो तसेच लवासा कॉर्पोरेशन लि.ने. ९९९ वर्षाच्या कराराने अपोलो हॉस्पिटल ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थाना दिलेल्या जमीनीचे क्षेत्रफळ किती असून लवासा कॉर्पोरेशनला शासनाकडून

व खाजगी व्यक्तीकडून/संस्थाकडून किती जमीन प्राप्त झाली आहे व नासा या संस्थेला कोणत्या प्रकारातील जमीन दिली आहे व त्यांच्या सोबत किती वर्षाचा करार केला आहे यासंदर्भात विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, याप्रकरणी नमूद परिच्छेदामधील मुद्दे पाहता, नमूद जमीनी या लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी खाजगी लोकांकडून वैयक्तिकरित्या खरेदी केलेल्या आहेत. व त्यांचे खाजगी मालकीच्या जमीनी या त्यांनी ९९९ वर्षांच्या दीर्घमुदतीवर अपोलो हॉस्पिटल, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा इ. सारख्या वेगवेगळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था यांना भाडेकराराने दिलेल्या आहेत.

तरी सदरच्या जमीनी या महसूल व वन विभागाने भाडेपट्टयाने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या नाहीत. सदर जमीनी या त्यांच्या खाजगी (वैयक्तिक) मालकीच्या आहेत. तरी सदर प्रकरणी झालेल्या भाडेकराराबाबत तसेच उपस्थित मुद्यांबाबत या कार्यालयाने स्तरावर भाष्य करणे उचित होणार नाही.

**१.१३५** परिच्छेद क्र. ४.३.१४ तहसिलदार, मुळशी यांचे अहवालानुसार लवासा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या आदिवासी जमीनीच्या बाबतीत आतापर्यंत एकूण १७ प्रकरणात पुर्व परवानगीशिवाय जमीन हस्तांतरण करण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. सदर जमीनीचे ७/१२ चे इतर हक्कात “महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६अ प्रमाणे आदिवासींची जमीन” असा शेरा दाखल नसल्याने सदरचे व्यवहार झालेले दिसून येतात. तसेच सदर जमीनींचे हस्तांतरण वरील १७ प्रकरणांपैकी प्रत्यक्षात ४ खातेदार यांनी त्यांच्या जमीनी लवासा कार्पोरेशन लि. यांचेकडे हस्तांतरण केलेले दिसून येते सदरचे हस्तांतरण सन २००२ ते २००३ याकालावधीत झालेले असून त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे :—

**आदिवासी जमीनधारकांची यादी**

| अ. क्र. | एसआर क्र. | गांवाची नांवे | सर्वे नं. | क्षेत्र | जमीन हस्तांतरण दिनांक | जमीन मालकाचे नांव | जमीन हस्तांतरीत कोणाकडे झाली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | - | मूगांव | ५०/१० | ६.०७ | ६/८/२००३ | काशिनाथ लहानु वाघमारे | लवासा कार्पोरेशनकडे हस्तांतरण |
| २ | - | मूगांव | ५०/१२ | ६.०७ | ६/८/२००३ | काशिनाथ लहानु वाघमारे | लवासा कार्पोरेशनकडे हस्तांतरण |
| ३ | ८/११ | मूगांव | ५०/६ | ५.६६ | ६/८/२००३ | लहाणू भिमा जाधव | लवासा कार्पोरेशनकडे हस्तांतरण |
| ४ | - | मूगांव | ३९/३ | ५.६६ | १०/१२/२००१ | पिढया सदया हिलम | लवासा कार्पोरेशनकडे हस्तांतरण |
| ५ | ९/११ | मूगांव | ५०/७ | ६.०७ | २२/९/२००० | भिवा राया जाधव | पर्थ ब्रिगेंझा |
| ६ | ७/११ | मूगांव | ५०/८ | ६.०७ | १६/९/१९९७ | तुकाराम राघू कोळी | नेल्सन उर्फ ज्ञानेश्वर सखाराम गायकवाड |
| ७ | ५/११ | मूगांव | ५०/९ | ६.०७ | २२/९/२००० | चंदर भिमा जाधव | पर्थ ब्रिगेंझा |
| ८ | १०/११ | मूगांव | ३९/१ | ५.९३ | ११/१/१९९३ | लक्ष्मण बारकू जाधव | दिलीप एम. गोलांडे |
| ९ | - | मूगांव | ३९/२ | ६.०७ | ११/१/१९९३ | जानकू संभू जाधव | केदारनाथ नाटकलाल |
| १० | ६/११ | मूगांव | ३९/४ | ५.६६ | २२/९/२००० | बंडयाभाऊ वाल्हेकर | एम.आर दिवाडकर |
| ११ | ३/११ | मूगांव | ५०/५ | ५.६६ | २२/९/२००० | श्रावण भिवा जाधव | प्रेमा रॉड्रीक्स |
| १२ | - | मूगांव | ३९/५ | ५.६६ | १५/३/२००२ | शंकर दाजी काटकर | अमिन पी हुलयुंडी |
| १३ | ४/११ | मूगांव | ४१/२ | ५.२६ | १७/४/१९९७ | भाऊ पांडू वाल्हेकर | एम. आर दिवाडकर |
| १४ | २/११ | मूगांव | ४१/३ | ५.३० | ११/१/१९९३ | शंकर तुकाराम काटकर | जगदीश हरस्वरुप अगरवाल |
| १५ | १/११ | मूगांव | ५०/४ | ५.६७ | २२/९/२००० | रामा भाऊ काटकर | सरिता हरीष कांचन |
| १६ | - | मूगांव | ४१/१ | ५.६६ | २३/७/२००२ | तुकाराम चंदया काटकर | सारस गौडा |
| १७ | - | मूगांव | ८/२ पै. | ६.०१ | १५/१/२००९ | आत्माराम तुकाराम काटकर | सुरेश वाघु नाक्ती व इतर |
| | | **क्षेत्र** | **९८.५५** | | | | |

**१.१३६** तसेच १७ प्रकरणात किती आदिवासी शेतकऱ्यांचा संबंध आहे व त्यांच्या जमीनी कधीपर्यंत परत करण्यात येणार आहे? यासंदर्भात विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सदर १७ प्रकरणामध्ये एकूण १५ खातेदार आहेत. त्यापैकी २ प्रकरणी ११.३३ हेक्टर आर क्षेत्र आदिवासींना प्रत्यार्पित करण्यात आले असून उर्वरित १५ प्रकरणामध्ये फेरचौकशी उपविभागीय अधिकारी मावळ उपविभाग मावळ करत असून सदरची कार्यवाही ३ महिन्यात पूर्ण करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

**१.१३७ "जमीनीची खरेदी आणि विक्री"** यासंदर्भात डिसेंबर, २००२ मध्ये पुणे (ग्रामीण) भागातील शासनाचा जमीन खरेदीचा दर प्रति चौ. मीटर काय होता? तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी खरेदी केल्या आहेत. त्यातील काही शेतकरी भूमिहीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्या भविष्याचा विचार करता त्यांना वाढीव दर देण्याबाबतचा मुद्दा खरेदी करार करताना करण्यात आला आहे काय? याबाबत माहिती देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, नोंदणी महानिरिक्षक महाराष्ट्र राज्य यांचेकडुन प्रसिद्ध केलेल्या शिध्रसिद्धगणामध्ये या प्रकल्पामध्ये बहुतांशी गांवे विभाग क्र.१ मध्ये समाविष्ट असून या विभागात जिरायत शेतजमीनीचा दर २५००० ते ३२००० रुपये/हेक्टर व तरी/पॅडी जमीनीचा दर ३०००० ते ३७००० हजार प्रति हेक्टरी होता असे दिसुन येते. तथापी याविभागात बिगरशेतीचा प्रती चौ. मिटरचा दर नमुद नाही. मात्र गावठाणातील प्रति चौ. मीटरचा दर ३० रुपये असल्याचे दिसून येते.

**१.१३८** अशा पद्धतीने खरेदी करार करताना भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना वाढीव दर देण्याचा मुद्दा खरेदी खतामध्ये दिसून येत नाही. यासर्व मिळकती शेतकऱ्यांनी स्वेच्छेने विक्री केल्या असून यापैकी कोणतीही जमीन शासनाने सक्तीने संपादित करून लवासा कार्पोरेशन लि. कंपनीला हस्तांतरीत केलेली नाही. भूमिहीन कुटुंबाच्याबाबत व ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी लवासा या प्रकल्पात गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांबाबत शासनाने कोणतीही भूमिका जिल्हाधिकारी कार्यालयाला कळविलेली नाही असेही नमूद केले.

**२.१ "वतनाच्या जमीनीच्या खरेदीमध्ये देय असलेल्या नजराणा फी ची वसुली न होणे"** यासंदर्भात लवासा कार्पोरेशनने जमीन खरेदी आणि त्याचा वापर याच्या तपशीलाचा अहवाल दर सहा महिन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता कंपनीने याबाबतचा तपशील सादर केलेला नाही असे समितीस अवगत केले. तसेच लवासा कार्पोरेशनने ऑक्टोबर, २००६ ते जुलै, २०१० दरम्यान एकूण रु.४४.३६ कोटी बाजारमुल्यांचा या ११९.३२ हेक्टर्स वतन (वर्ग-२) जमीनीची औद्योगिक कारणांसाठी खरेदी करण्यासाठी ७२ वेळा व्यवहार केले होते. या प्रकरणांत २ टक्क्यांनी देय असलेल्या नजराणा फी ची ऑगस्ट, २०११ पर्यंत वसुली का केली गेली नव्हती? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला की, ७२ प्रकरणापैकी वेल्हे तालुक्यातील ६६ प्रकरणे असून त्यापैकी ६२ प्रकरणांमध्ये लवासा कंपनीने जमीन खरेदी घेणे पुर्वी तत्कालीन मूळ मालक/वतनदार यांनी सदर जमीनी रितसर ५० टक्के प्रमाणे नजराणा रक्कम भरून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करून घेतल्या होत्या. त्यामुळे या ६२ प्रकरणात औद्योगिक कारणासाठी खरेदी करणेसाठी २ टक्के नुसार नजराणा फी भरणेचा प्रश्न उद्भवत नाही. उर्वरित ४ प्रकरणात या जमीनी अशा पद्धतीने वर्ग १ मध्ये रुपांतरीत झालेले आदेश अथवा ५० टक्के नजराणा रकमेची चलने खरेदीदार उपलब्ध करून न देऊ शकल्याने या प्रकरणी खरेदी किंमतीच्या ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम रुपये ४८,०८,३७७ दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी एकूण इतकी चलनाद्वारे शासन जमा करून घेणेत आलेली आहे. तसेच ७२ प्रकरणांपैकी उर्वरित ६ प्रकरणे मुळशी तालुक्यातील होती. त्यापैकी ४ प्रकरणामध्ये खरेदी नंतर ३० दिवसांचे आत कंपनीने कळविलेमुळे खरेदी किंमतीच्या २ टक्के रु. ४३५२ वसूल केली आहे. व उर्वरित २ प्रकरणामध्ये खरेदीनंतर ३० दिवसांचे आत कंपनीने न कळविल्याने खरेदी किंमतीच्या ५० टक्के प्रमाणे नजराणा रु. ५,६४,५२६ वसूल केलेली आहे. वरीलप्रमाणे एकूण ७२ प्रकरणामध्ये १०० टक्के वसुली पूर्ण झाली आहे.

**२.२** ३० दिवसांच्या विहीत मुदतीत नजराणा फी चे प्रदान न झाल्याने अटींचा भंग झाला होता. त्यामुळे ७५ टक्क्यांनी रु.३३.२६ कोटी नजराणा फी लागू झाली. या रकमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून वेळीच मागणी का करण्यात आली नाही? अशी समितीने पृच्छा केली असता, लवासा कंपनीने खरेदी केलेल्या वरील ७२ प्रकरणापैकी ६२ प्रकरणी पूर्व खरेदीदाराने जमीन खरेदी करण्यापूर्वीच मूळ जमीन मालकाने शिध्रसिद्धगणकाच्या ५० टक्के नजराणा रक्कम रुपये ४१,३१,९२१ शासन जमा करून या जमीनी भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरित केल्या होत्या त्यामुळे या प्रकरणी शर्तभंग होण्याचा अथवा लवासा कंपनीने पुन्हा नजराणा रक्कम भरणेचा प्रश्न उद्भवत नाही. उर्वरित १० प्रकरणी वरील परि. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून नजराणा रक्कम वसूल केली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**२.३** समितीने पुढे अशी विचारणा केली की, लवासा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वतन जमीनीचे ७२ प्रकरणी व्यवहार झाले आहेत. त्यामध्ये नजराणा फी कधी भरली आहे? उपरोक्त संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, वरील ७२ प्रकरणापैकी ६२ प्रकरणामध्ये रक्कम रुपये ४१,३१,९२१ सन २००६ ते २०१० या कालावधीत विविध तारखांना रक्कम वसूल केलेली आहे.

**२.४** ४ प्रकरणामध्ये ४३५२ रुपये दिनांक २५ मे २००९ रोजी व २ प्रकरणामध्ये रक्कम रुपये ५,६४,५२६ दिनांक २० जून २००९ रोजी व वेल्हे तालुक्यातील ४ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ४८,०८,३७७ दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी वसूल करण्यात आली आहे. तसेच वेल्हे तालुक्यातील ४ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ४८,०८,३७७ दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी वसूल करण्यात आली आहे.

**२.५ "कमाल मर्यादेच्या जमीनिच्या खरेदीत अटींचा भंग झाल्याबद्दल लागू होणाऱ्या नजराणा फी ची वसुली न होणे"** यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, ५६ प्रकरणांत ३० दिवसांच्या आत अर्ज दाखल न झाल्याने महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची मर्यादा कमी करणे) (अधिक जमिनीचे वाटप) आणि (सुधारणा) नियम, २००१ मधील नियमानुसार प्रस्तावित जमीनी या अकृषिक कारणांसाठी खरेदी केलेल्या असल्याने ७५ टक्के प्रमाणे रु.११,८७,१३,५७६ एवढी अनर्जित रक्कम केव्हा भरून घेण्यात आली आहे.

**२.६** ५६ प्रकरणांपैकी ५२ प्रकरणांत दिनांक ३ जानेवारी २०१३ रोजी रु. १०,९९,६१,८९५ वसूल केलेली आहे. २ प्रकरणांमध्ये दि. १४ मार्च २०१३ रोजी रु. ३,८५,६६५ वसूल केलेली आहे. तसेच उर्वरीत २ प्रकरणामध्ये दि. १२ एप्रिल २०१३ रोजी र.रु. ८३,६६,०९६ वसूल केलेली आहे. अशी एकूण रक्कम रुपये ११,८७,१३,६५६ वसूल करण्यात आली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच २६ प्रकरणांबाबत नजराणा रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावरून सुरू असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती नमूद करताना विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, २६ प्रकरणांपैकी ११ प्रकरणे ही लवासा कार्पोरेशनशी संबंधित नाहीत. त्यामुळे लवासा कार्पोरेशन कंपनीकडून नजराणा रक्कम वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित १५ प्रकरणांमध्ये आदेश झालेले आहेत त्यापैकी ४ प्रकरणांत २ टक्के रक्कम मुदतीत भरल्यामुळे कार्यवाही रद्द करण्यात आली आहे. २ प्रकरणांमध्ये दिनांक ३० जुलै २०१४ रोजी रु.१,३६,३६९ वसूल केलेली आहे. ९ प्रकरणातील आदेशात दोष असल्यामुळे सदर आदेश फेरचौकशीमध्ये घेण्यात येऊन फेरचौकशी सुरू केली आहे. तसेच शिल्लक ९ प्रकरणी आदेशामध्ये असलेले दोष दर्शवून लवासा कार्पोरेशन लि. कंपनीने फेरचौकशी करून आदेश होणेबाबत विनंती केल्याने ९ प्रकरणे फेरचौकशीसाठी घेण्यात आल्याने रक्कम वसूलीस विलंब झाला आहे. याप्रकरणी फेरचौकशीचा निर्णय करून नजराणा रक्कम वसूल करणेची कार्यवाही ३ महिन्यांत पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**२.७** लवासा प्रकल्पाची पाहणी तसेच यासंदर्भात अधिक माहिती व वस्तुस्थिती जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक ११ व १२ सप्टेंबर २०१५, दिनांक २० व २७ ऑक्टोबर २०१५ तसेच दिनांक ५ नोव्हेबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची तसेच विभागीय प्रतिनिधींची दिनांक ११ व १२ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली, उपरोक्त दिवशी लवासा स्थळी पाहणी दौरा आयोजित केला होता. लोकलेखा समितीची शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ रोजी पुणे येथील लवासा कॉर्पोरेशनच्या इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर येथे बैठक झाली.

**२.८** समितीच्या अंतर्गत चर्चेदरम्यान समितीने लवासा, पुणे येथील दौरा आयोजित करण्यासंदर्भात समितीची भूमिका स्पष्ट करताना झालेल्या चुका टाळायच्या नाहीत. अतियमितता झालेल्या आहेत, त्या मान्य केल्या आहेत आणि त्यामुळे त्या समितीलाही मान्य कराव्या लागणार आहेत. कारण हा शासन निर्णय आहे. मात्र त्याच्या पलीकडे जे उल्लंघन झाले आहे, त्यात सुधारणा झाली पाहिजे, लोकांना न्याय मिळाला पाहिजे. समितीला या संदर्भात सखोल चर्चा करूनच अहवाल सादर करायचा होता आणि म्हणूनच समितीने लवासाला भेट दिली आहे असे नमूद केले.

**२.९** समितीच्या अंतर्गत चर्चेनंतर जिल्हाधिकारी, पुणे यांनी परिच्छेद क्र. ४.३७ "सर्वेक्षणाशिवाय लवासा गिरीस्थानास परवानगी देण्यात आली" या संदर्भात सादरीकरण करताना नमूद केले की, या संदर्भात टाऊन प्लानिंग विभागाकडून अभिप्राय प्राप्त झालेले आहेत. ते समितीसमोर सादर केलेले आहेत. दिनांक २६ नोव्हेंबर १९९६ च्या गिरीस्थान नियमावलीनुसार किमान ४०० हेक्टर खाजगी क्षेत्राच्यावर क्षेत्र असल्यास गिरीस्थान प्रकल्पास मंजुरी देण्याचे अपेक्षित असून या शासन नियमावलीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करून लवासा गिरीस्थान घोषित केलेले आहे. मंजूर प्रादेशिक योजनेमधील एकूण २० गावांमधील क्षेत्र गिरीस्थान म्हणून दर्शविणेसंदर्भात एमआरटीपी अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) व कलम २० (४) अन्वये फेरबदल मंजूर केला आहे. या संदर्भात सन २००१ मध्ये नोटीफिकेशन पब्लिश केली होती. मुळशी तालुक्यातील १५ गावे आणि वेल्हा तालुक्यातील ३ गावे अशी एकूण १८ गावे उपरोक्त नियमावलीनुसार लवासा कंपनीसाठी हिल स्टेशनकरिता घोषित करण्यात आली आहेत. त्यावेळी एन्व्हॉयरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट देखील झाले होते. पर्यावरण आधारित मूल्यांकनाचा मुद्दा उद्‌भवला होता. केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाच्या निकषानुरूप एन्व्हॉयरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट करून मंजुरी प्राप्त झाली होती आणि त्यानंतर विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्रमांक ५, ६, ११, १२, २१, २२ ते २४ याला अनुसरून वेळोवेळी बांधकाम परवानगी देण्यात आली होती. लवासा हे स्पेशल प्लॅनिंग ऑथोरिटी म्हणून जाहीर करण्यात आले आहे. लवासाला स्पेशल प्लॅनिंग ऑथोरिटी म्हणून काम करायचे आहेत आणि त्यासाठी निकष ठरवून दिले आहेत. लवासाच्या प्रत्येक निर्णयाची छाननी करण्याचे अधिकार शासनाच्या नगर रचना विभागाला देण्यात आले आहेत. सदर विषयाच्या आक्षेपांच्या संदर्भात खुलासा सादर केला आहे.

**२.१०** या अनुषंगाने समितीने केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने काही काळाने त्यास मान्यता दिली आहे. तत्संदर्भात ज्या काही अटी होत्या त्या पूर्णपणे पाळण्यात आल्या आहेत का, त्यामध्ये काही अजून त्रुटी आहेत का ? अशी विचारणा केली असता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी सिव्हर जनरेशन व ट्रिटमेंट, हॉस्पिटल वेस्ट, सॉलिड वेस्ट या तिन्हींच्या बाबतीत नियमांचे पालन केले आहे. आपण दर ६ महिन्यांनी एसटीपी व लेक यांचे मॉनिटरिंग करतो असे अवगत केले.

**२.११** समितीने तेथे झिरो डिस्चार्ज आहे की डिस्चार्ज आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी प्रकल्पामध्ये प्रक्रिया केलेले पाणी गार्डनिंग व बांधकामासाठी वापरले जाते असे अवगत केले.

**२.१२** यावर समितीने झिरो डिस्चार्जचा प्लॅंट उभा राहिला आहे का ? अशी विचारणा केली असता शासकीय प्रतिनिधींनी एसटीपी बनविला आहे व तो कार्यान्वित आहे. हॉस्पिटल वेस्टसाठी ईटीपी आहे असे अवगत केले.

**२.१३ "एलसीएल या प्रकल्प विकासकाला विशेष नियोजन प्राधिकाऱ्याचा दर्जा प्रदान करणे"**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी असे नमूद केले की, एमआरटीपी ॲक्टच्या कलम ४०(१ब) नुसार संबंधित विकासक कंपनीला विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा देण्यात आला आहे. प्राधिकरणाचा दर्जा देण्यात आलेला असला तरी या प्राधिकरणाला इमारत बांधकाम परवानगी देताना कोणत्याही प्रकारची शिथिलता देण्याचा अधिकार देण्यात आलेला नाही. इमारत परवानगी देताना त्यांना एमआरटीपीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. जेवढ्या इमारत बांधकामांच्या परवानग्या देणार आहेत, त्या परवानग्या ३ महिन्यांच्या आत नगररचना विभाग, पुणे यांच्या सहायक संचालकांकडे मंजुरीसाठी जातील लवासाकडून याची पूर्तता होत आहे. तत्संदर्भात असाही आक्षेप घेण्यात आला होता की, लवासाला विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिल्यामुळे ते शासनाच्या नियंत्रणात नाहीत, वाटेल तशा इमारत परवानग्या देत आहेत. सदर बाबतीत खुलासा सादर करण्यात आला आहे. त्यामुळे या मुद्यामध्ये तथ्य नाही. प्रत्येक इमारत बांधकाम परवानगी ३ महिन्यांच्या आत नगररचना विभाग, पुणे यांच्या सहायक संचालक यांच्याकडे मंजुरीसाठी जाणार आहे. त्यामुळे त्यांच्यावर शासनाचे नियंत्रण आहे.

**२.१४ एसपीएकडून आराखडे आणि रेखांकने यांना अनियमित मान्यता देण्यात आली.**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींनी लवासाने नगररचना, पुणे यांच्याकडे दर ३ महिन्यांनी त्यांनी कोणती परवानगी दिली या संदर्भात अहवाल सादर करायचा आहे. सहायक संचालक यांनी तत्संदर्भात काही त्रुटी आहेत का ते तपासायचे आहे. काही त्रुटी असतील तर त्यावर निदेश करून जिल्हाधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी द्यायचे आहे. सहायक संचालक व एसपीए यांनी एकत्रित बसावे आणि त्रुटींच्या संदर्भात चर्चा करावी. त्रुटी योग्य असतील तर तसे सांगावे. जेणेकरून जिल्हाधिकारी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५२, ५३, ५४ नुसार कार्यवाही करतील. विभागाने त्यांना ३ सप्टेंबरला पत्र दिले आहे. परंतु त्यांच्याकडून उत्तर आलेले नाही. असा खुलासा केला.

**२.१५** वेगवेगळे झोन प्लॅन आहेत. झोन प्लॅन सन २००८ ला मंजूर केला होता आणि त्यानंतर एसपीए नियुक्त करण्यात आली, त्यावेळी त्यांनी स्वतः प्लॅन तयार केला, तो जिल्हाधिकारी, सहसंचालक किंवा सहायक संचालक यांचेकडे आला नाही ती त्रुटी होती. तसेच हॉटेलच्या इमारतीची उंची २० मीटर निश्चित केली आहे. मात्र काही जास्त बांधकाम झाले आहे, त्यांना तसे डिस्क्रिशन देखील नाही असे सहायक संचालक, नगररचना, पुणे यांनी नमूद केले.

**२.१६** लवासा एसपीए असल्यामुळे शासनाच्या नगररचना विभागाच्या कोणत्याही परवानग्या घेण्याची त्यांना गरज नाही काय अशी विचारणा समितीने केली असता रेग्यूलेशन असे म्हणत आहे की, शासनाच्या नगररचना विभागाच्या कोणत्याही परवानगीची त्यांना गरज नाही. रेग्यूलेशनप्रमाणे ज्यावेळी एसपीएचा दर्जा मिळतो, त्यावेळी ते स्वतंत्र ऑथोरिटी होतात, त्यामुळे त्यांना शासनाच्या नगररचना विभागाच्या परवानगीची गरज नाही. मात्र ते जे काही निर्णय घेतील, परवानग्या देतील त्या संदर्भातील माहिती ३ महिन्यांच्या आत एडीटीपीकडे सादर करतील, त्यानंतर एडीटीपींना जर त्यामध्ये काही त्रुटी आढळल्या तर ते त्या त्रुटी सादर करू शकतात. सहायक संचालकांनी त्रुटी काढल्या असता, एसपीएनी त्यांच्या त्रुटींना आव्हान दिले, त्यामुळे सहसंचालकांनी मत दिले की, दोन्ही स्वतंत्र ऑथोरिटी आहात, त्यामुळे तुम्ही संयुक्त भेट द्यावी, फॅक्टची चाचणी करून अहवाल सादर करावा असा खुलासा जिल्हाधिकाऱ्यांनी केला.

**२.१७** परिच्छेद आल्यानंतर एसपीएकडे विचारणा करण्याचे ठरले होते. एसपीएला सर्व अधिकार देण्याचे ठरल्यावर ऑब्जेक्शन घेतले होते. त्यावेळी असे ठरले की, ते जे काही नकाशे, प्लॅन पास करतील, त्यांची पुनर्तपासणी शासनाच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालकांच्या माध्यमातून झाली पाहिजे आणि त्यादृष्टीने शासनाचा वचक पुढील कार्यक्रमाला असणार आहे, लवासाच्या विकासाच्या संदर्भात नियंत्रण असणार आहे. नियमावलीचे पालन होणार नाही यासाठी अशा प्रकारे सब क्लॉज टाकला. परंतु त्या सब क्लॉजची रीतसर अंमलबजावणी होत नसेल तर त्या सर्व बाबींचा उपयोग काय आहे ? विभागाने काही तरी केले आहे असे दाखविण्याचा प्रकार शासनाच्या नगररचना विभागाकडून होत आहे असे समितीला वाटत आहे. आपल्याकडे एसपीएने नकाशे, प्लॅन कधी कधी सादर केले आणि आपण काढलेल्या त्रुटींची पूर्तता त्यांनी कधी कधी केली की कधीच केली नाही हे आम्हाला सांगावे. एसपीएने केला तोच कायदा झाला असे झाले असेल तर त्या सब क्लॉजचा काहीही उपयोग नाही असे होईल असे मत समितीने व्यक्त केले.

**२.१८ "पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे अनुपालन न होणे"**

कोणतेही बांधकाम सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेण्यात यावे याबाबत विभागीय प्रतिनिधींनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्प प्रवर्तकास दिनांक ३० मे २००२ रोजी संमतीपत्र प्रदान केले असून त्याची प्रत वने व पर्यावण मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आली असून बंधाऱ्याद्वारे अडविलेल्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी करण्यात यावा जेणेकरून वरसगाव बंधाऱ्यावर कमीतकमी भार पडेल. या व्यतिरिक्त कामासाठी प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर करण्यात यावा. प्रकल्पासाठी लागणाऱ्या पाण्याची गरज बंधाराद्वारा अडविलेल्या पाण्यातून पूर्ण केली जाते. सदरचे पाणी बांधकाम, कार्यालय, हॉटेल कर्मचारी, पर्यटक इत्यादी कामांसाठी वापरले जाते. प्रकल्प प्रवर्तकाने

२.४ द.ल.लि./दिन क्षमतेचा सामायिक मलनिःसारण सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारला असून सदर प्रकल्प सद्यःस्थितीत कार्यान्वित आहे असे जिल्हाधिकाऱ्यांनी समितीस अवगत केले. वने आणि पर्यावरण विभागाने बांधकामास परवानगी दिल्यानंतर स्थानिक वर्तमानपत्रामध्ये, जिल्ह्यातील वर्तमानपत्रामध्ये आणि हा मोठा प्रोजेक्ट असल्यामुळे राज्य स्तरावरील वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन बांधकाम सुरू करीत आहोत आणि त्यास अशी अशी परवानगी मिळालेली आहे असे जाहीर करावे लागते, त्यानंतर बांधकाम सुरू करता येते अशी पद्धत आहे. आपण या गोष्टीची अंमलबजावणी केली होती काय ? या ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळाचे अधिकारी उपस्थित आहेत त्यांना ही बाब माहीत आहे अशी विचारणा केली असता या संदर्भात जनसुनावणी झाली होती असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले.

**२.१९ "आदिवासींच्या जमीनी विना परवाना खरेदी करणे"**

उपरोक्त परिच्छेद संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांनी असे विदित केले की, आदिवासींच्या जमीनी खरेदी करणे या संदर्भात उप विभागीय अधिकारी, मावळ यांनी चौकशी केली. एकूण १७ प्रकरणे होती आणि त्याचे क्षेत्र साधारणतः ९९ हेक्टर होते. १७ प्रकरणांपैकी २ प्रकरणांमध्ये आदिवासींना जमीन प्रत्यार्पित केलेली आहे. त्या जमीनींचे क्षेत्र ११.३३ हेक्टर होते. विनापरवाना हस्तांतरण झालेली जमीन सरकार जमा केली अशी प्रकरणे ११ असून त्या जमीनींचे क्षेत्र २.२६ हेक्टर आहे. तर उप विभागीय अधिकारी, मावळ यांचेकडे सुनावणीसाठी ४ प्रकरणे आहेत.

**२.२०** याअनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, आदिवासींच्या जमीनीची नोंदणी रजिस्टर्ड करण्यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाने अडविले पाहिजे होते. ठाणे, रायगड आणि पूर्णे जिल्ह्यांतील थोडा भाग या ठिकाणी कातकरी समाज आहे. या समाजाला संरक्षण मिळाले पाहिजे असा कायदा सांगतो. ज्या तलाठ्याने हे केले त्याच्या हे लक्षात आले नाही ही गंभीर बाब आहे. हा समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे अशिक्षित आहे त्यांना संरक्षण दिले पाहिजे.

**२.२१** सिलिंगमध्ये अतिरिक्त ठरलेल्या या जमीनी होत्या. या जमीनींचे आदिवासींना सरकारतर्फे वाटप करण्यात आले होते. त्यावर नवीन शर्त शेरा पडला होता. काही ठिकाणी ३६ अ आणि ब असा ७/१२ वर उल्लेख होता. या जमीनी कातकऱ्यांच्या आहेत हे लक्षात आल्यानंतर स्वतःहून कारवाई केलेली असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

**२.२२** एकूण चार प्रकरणे उप विभागीय अधिकारी, मावळ यांच्याकडे सुनावणीसाठी आहे. त्या जमीनींवर कोणते शेरे आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी दोन प्रकरणांमध्ये दाखले सबमिट झालेले नाहीत. १५ प्रकरणांमध्ये दाखले सादर केले नाहीत म्हणून ते फेटाळले. हे प्रकरण फेटाळले असले तरी या जमीनी आदिवासींच्या असल्यामुळे कॅम्प लावून आदिवासींना दाखले दिले. दोन प्रकरणांमध्ये आदिवासी स्थलांतरित झाले आहेत त्यामुळे ते कोठे आहेत याची माहिती नसल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच ती दोन-तीन महिन्यांत सरकार जमा करण्याची कारवाई करण्यात येईल असे समितीस अवगत केले.

**२.२३ "वतनाच्या जमीनीच्या खरेदीमध्ये देय असलेल्या नजराणा फीची वसुली न होणे"**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी वतनाच्या जमीनी खरेदीची एकूण ७२ प्रकरणे असून त्यांपैकी सर्व प्रकरणांमध्ये १०० टक्के वसुली झालेली असल्याचे समितीस अवगत केले.

**२.२४ "कमाल मर्यादेच्या जमीनीच्या खरेदीत अटीचा भंग झाल्याबद्दल लागू होणाऱ्या नजराणा फीची वसुली न होणे"**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी एकूण ९७ प्रकरणे असून त्यामध्ये ३५० हेक्टर जमीन गुंतलेली आहे. ५९ प्रकरणांमध्ये नजराणा रक्कम वसुल केलेली आहे. ७ प्रकरणांमध्ये २ टक्केप्रमाणे रक्कम वसुल करावयाची आहे. १२ प्रकरणी खरेदी किंमत त्यावेळच्या शीघ्रगणकाच्या किमतीपेक्षा जास्त असल्याने महत्तम किमतीप्रमाणे वसुल करावयाची फरकाची रक्कम ३६ लाख २६ हजार ९७७ इतकी आहे. लवासा कंपनीशी संबंधित नसलेली ११ प्रकरणे आहेत. सिलिंग कायद्याप्रमाणे वाटप न झाल्याने चौकशी रद्द केलेली ५ प्रकरणे आहेत. २ टक्के रक्कम मुदतीत भरल्यामुळे चौकशी रद्द केलेली २ प्रकरणे आहेत. आदिवासींना जमीनी परत केल्यामुळे रद्द केलेली २ प्रकरणे आहेत असल्याचा खुलासा केला.

**२.२५ "स्वामीत्वधनाच्या थकबाकीची वसुली न होणे"**

लवासा ने इमारती, दुकाने, रस्ते, कार्यालये आणि धरणे बांधण्यासाठी ८,०८,२४६ ब्रास एवढ्या मुरुमाचे उत्खनन केले होते त्यासाठी १५.०५ कोटी स्वामित्वधन शासनास प्रदान केले नाही याबाबत विभागीय प्रतिनिधींनी ८ लाख ब्रास गौण खनिजाचे उत्खनन झाले होते त्यासाठी १७.७५ कोटी इतका दंड आकारण्यात आला होता. त्यावर लवासाने रिट पिटीशन दाखल केले होते. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दंडाची रक्कम बलप्रयोगाने वसूल करू नये असे आदेश दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात दंडाचे आदेश रद्द करण्याबाबत एसएलपी दाखल केली होती. त्या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले होते की, उत्खनन केलेले गौण खनिज त्याच परिसरात वापरले तर रॉयल्टी लागू होत नाही. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे नमूद केले.

**२.२६** यावर समितीने ज्या ठिकाणचे गौण खनिज काढण्यात येईल ते त्याच ठिकाणी वापरल्यास त्यावर रॉयल्टी लागणार नाही, असे शासनाने परिपत्रक काढलेले आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी शासनाने तसे परिपत्रक काढलेले नाही विभागास वसुली करता येणार नाही असा न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा त्यांना रिलिफ मिळत असेल तर तो वेगळा भाग आहे. परंतु मूळ १७.७५ कोटी रुपयांच्या वसुलीवर उच्च न्यायालयाने निर्बंध लावलेला आहे. यावर समितीने न्यायालयात आपली बाजू चांगल्या प्रकारे मांडली जात नाही. आता वस्तुस्थिती काय आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी यांनी मागील साक्ष झाल्यानंतर शासनाची बाजू व्यवस्थित मांडण्याकरिता नवीन वकील नेमण्याचा निर्णय झाला होता अजून ही केस सुरू असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

**२.२७ "एलसीएलच्या बोटिंग व्यवसायाचा डिसेंबर, २००८ ते मार्च, २०११ चा करमणूक कर वसुल केला नाही"**

याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे अवगत केले की, सन २००८ मध्ये प्रकल्प सुरू झाला. पहिली तीन वर्षे सूट होती. त्यानंतर सन २०११ पासून २०१५ पर्यंत करमणूक कराची रीतसर दंडात्मक रक्कम वसुल केली आहे. विशेष प्रकल्प असल्यामुळे पहिली तीन वर्षे कोणत्याही प्रकारचा करमणूक कर नाही. सादरीकरण संपलेले आहे. सादरीकरणादरम्यान समितीने ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांची नोंद विभागाने घेतलेली असल्याचे नमूद केले.

**२.२८** यानंतर समितीने स्थानिक गोरगरीब रहिवाशांच्या मुलांमुलींकरिता लवासातर्फे चालविण्यात येणाऱ्या क्रिस्टल हाऊस लवासा या शाळेची तसेच इकोले हॉटेलिटर लवासा या हॉस्पिटॅलिटी कॉलेजसची पाहणी केली.

**२.२९** यानंतर समितीने लवासामधील पुनर्वसित ग्रामस्थांची भेट घेऊन लवासामधील पुनर्वसित ग्रामस्थांना लवासा संदर्भात विचारणा केली असता त्यांनी समितीला असे सांगितले की, लवासामुळे ग्रामस्थांना फायदाच झालेला आहे. लवासाने आम्हाला घरे बांधून दिली आहेत. परंतु अद्यापही काही गावांचे पुनर्वसन झालेले नाही. काही ग्रामस्थांना घरे मिळालेली नाहीत, काही ग्रामस्थांची घरे पाण्याखाली गेल्यामुळे त्यांना घरे बांधण्यासाठी जागा दिली पाहिजे.

**२.३०** यानंतर समितीने दासवे गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेकडे प्रयाण केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, श्री. विशाल कुंभार यांनी समितीला अशी माहिती दिली की, सदर प्राथमिक शाळेमध्ये एकूण ४ खोल्या असून, पहिली ते आठवी इयत्तेचे वर्ग सुरू आहेत, ४ शिक्षक आहेत, ८५ विद्यार्थी शिकत आहेत, त्यापैकी ४२ मुले व ४३ मुली आहेत, बाहेरून येणाऱ्या कामगारांची मुले शिक्षण घेतात, कामगार निघून गेल्यानंतर मुलांची संख्या कमी होते.

**२.३१** समितीची शनिवार, दिनांक १२ सप्टेंबर २०१५ रोजी पूर्णे येथील लवासा कॉर्पोरेशनच्या इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर येथे बैठक झाली.

बैठकीच्या सुरूवातीला समितीने लवासा प्रकल्प क्षेत्रामध्ये येत असलेल्या गावांतील नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले. ग्रामस्थांनी पानशेत ते लवासा रस्ता ३० कि.मी.चा असून या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे मागणी केली की हा रस्ता लवासा कॉर्पोरेशनकडे आहे असे ते सांगतात आणि लवासा कॉर्पोरेशनकडे मागणी केली की, हा रस्ता जिल्हा परिषदेकडे आहे असे सांगतात. ग्रामस्थांच्या माहितीप्रमाणे अजुनही तो रस्ता वर्ग करण्यात आलेला नाही. रस्त्याची दुरवस्था झाली आहे. ग्रामस्थ या रस्त्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद तसेच लवासा कॉर्पोरेशनकडे तक्रारी करीत आहेत. परंतु कोणीही दाद लागू देत नाही अशी स्थिती आहे. सदर रस्ता जिल्हा परिषदेकडे असेल तर ग्रामस्थांना तो चांगला करून मिळू शकतो. तसेच स्थानिक कामगारांना दुय्यम वागणूक दिली जात असून स्थानिक कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन मिळत नाही. साडे सहा हजार रुपये महिना म्हणजे रोज २०० रुपये प्रमाणे मिळत असल्याची माहिती ग्रामस्थांनी समितीस दिली.

**२.३२** लवासा आल्यानंतर त्यांनी पिरंगुट घाट ते उरवडे, पानशेत ते दासवे हे रस्ते स्वतःकडे घेतले होते. परंतु त्या रस्त्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे काम केलेले नाही. आता त्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. सदर रस्त्यांचे काम जिल्हा परिषदेकडूनही झालेले नाही आणि लवासा कॉर्पोरेशनकडूनही झालेले नसून रस्त्याची जागा लवासाने अधिग्रहीत केली आहे असे ग्रामस्थांनी समितीस अवगत केले. साईबुद्रुक गावाची लोकसंख्या ७८० आहे. गावातील जमीनी घेतल्या आहेत परंतु त्या जमीनी घेताना खरेदीखताच्या संदर्भात फसवणूक झाली आहे. लोकांना जी जमीन विकायची आहे ती न घेता इतर जमीनींचे खरेदीखत केले आहे. बऱ्याच लोकांची फसवणूक केली आहे. न्यायालयामध्ये प्रकरणे सुरू आहेत. परंतु तत्संदर्भात लवासा कॉर्पोरेशनचे अधिकारी कोणत्याही प्रकारचा सपोर्ट, मदत करीत नाहीत एजंटनी मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे. वेल्ह्याला रजिस्टर ऑफिसमध्ये जाऊन देखील स्वतःच्या जमीनीच्या व्यवहाराच्या खरेदीखताची प्रत मिळत नाही तेथे देखील लवासा दबाव आणते असे ग्रामस्थांनी समितीस सांगितले.

**२.३३** लवासाच्या एसटीपीचे पाणी देवस्थानाच्या ठिकाणी सोडले जात आहे. त्यामुळे ग्रामस्थांना त्रास होत आहे. दिलेल्या नोकऱ्या ठेका पद्धतीने दिल्या असून फक्त ३ महिन्यांचा ठेका दिला जातो असे ग्रामस्थाने समितीस सांगितले.

**२.३४** लवासाचा एसटीपी येथून किती अंतरावर आहे ? ती जागा लवासाची आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता एसटीपी १ कि.मी. वर असून जी जागा लवासाची असून ती गावाच्या बाजूला आहे. तसेच येथे क्रशर प्लँट आहे. दिवस-रात्र तो प्लँट चालतो त्यामुळे गावात धूळ उडते आणि त्याचा त्रास ग्रामस्थांना होतो. तक्रार करण्यास गेलो तर लवासा कॉर्पोरेशनचे अधिकारी ग्रामस्थांना दाद देत नाहीत असे एका ग्रामस्थाने समितीस अवगत केले.

**२.३५** गावात नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. डोंगराळ भागात रामनगर नावाची वस्ती आहे, तेथे टँकरने पाणीपुरवठा होतो मात्र तोही वेळेत होत नाही. ग्रामपंचायतीला नळाने पाणीपुरवठा करण्याची परवानगी द्यावी किंवा तशी सोय लवासाने करून द्यावी असे सांगितले होते परंतु तसे झाले नाही असा खुलासा गावच्या सरपंचांनी समितीसमोर केला.

**२.३६** लवासा कॉर्पोरेशनमार्फत गावठाणांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची व्यवस्था करण्यात यावी. तसेच गावठाणांच्या बाजूला संरक्षण भिंत बांधण्यात यावी. आतापर्यंत जेवढी घरे बांधून दिली आहेत, त्या एकाही घराला शौचालय बांधून दिलेले नाही. प्रत्येक घराला शौचालय आवश्यक आहे. कॉमन शौचालय बांधले आहे. परंतु त्याचा उपयोग होत नाही, त्याची साफसफाई राहत नाही. लवासा कॉर्पोरेशनचे लोक त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

**२.३७** पडळघर येथील मागासवर्गीय समाजाचे पुनर्वसन केले आहे, त्यांना घरे बांधून दिली आहेत. एक वर्षापूर्वी हे काम झाले आहे. परंतु अजूनही घराचा ताबा देण्यात आलेला नाही. मागासवर्गीय समाजातील लोकांना १५-२० घरे बांधून दिली आहेत, तेथे कोणत्याही प्रकारची संरक्षण भिंत नाही. दरडी कोसळत आहेत. गावात अंतर्गत रस्ते नाहीत, ड्रेनेजची सोय नाही, पाण्याची व्यवस्था कायमस्वरूपी केलेली नाही. गावातील ग्रामस्थांना कंत्राटी पद्धतीने काम दिले जात आहे असेही गावातील सरपंचानी सांगितले.

**२.३८** लवासा कॉर्पोरेशनने करारामध्ये पाणीपुरवठा, शाळा, रुग्णालय इत्यादी प्रकारच्या सर्व गोष्टी नमूद केल्या आहेत. आता ग्रामस्थ सांगत असलेल्या अडचणी ज्येन्युईन आहेत. लोकांना मोबदला मिळालेला नाही. १ गटाचे पैसे दिले आहेत आणि ५ गटांना कुंपण घातले आहे अशी स्थिती आहे. लवासा कॉर्पोरेशनमधील अधिकारी ग्रामस्थांना भेटत नाहीत. मुलांना शाळेत जाता येत नाही. आता काही प्रमाणात रस्ते केले आहेत. फक्त लवासाकडे येणारा रस्ता झालेला आहे. गावाकडे जाणारे रस्ते किंवा अंतर्गत रस्ते केलेले नाहीत. सर्व ठिकाणी कुंपण घातल्यामुळे ग्रामस्थांना लांबून जावे लागते. ग्रामस्थ आजारी असेल तर स्थिती खूपच खराब होते. आता थोडी फार सुधारणा झाली आहे. परंतु ८ वर्षांपूर्वी डोलीवरून रुग्णांना पानशेतपर्यंत न्यावे लागायचे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

**२.३९** गावातील धार्मिक स्थळांच्या जागा ग्रामपंचायतीच्या नावावर कराव्यात परंतु तसे केले जात नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीचा, जिल्हा परिषदेचा निधी त्यासाठी वापरता येत नाही. सर्व जागा लवासाच्या कॉर्पोरेशनच्या अखत्यारित आहे. बरीच कुटुंबे पूर्णतः भूमिहिन झाली आहेत. सर्व जागा लवासा कंपनीला गेली आहे, अशा लोकांना घरे बांधण्यासाठी जागा नाही. ग्रामस्थांची मागणी आहे की, ज्यांना घर बांधण्यास जागा नाही त्यांना ३-४ गुंठे भूखंड देण्यात यावा, जेणेकरून त्यांना त्यावर घरे बांधता येतील तसेच दासवे गावात एक विधवा महिला आहे, तिचे घर तिच्या नावावर नाही. विधवा महिलेच्या नावावर ते घर करून द्यावे या संदर्भात खूप वेळा मागणी केली आहे. तिला ३ मुले आहेत. ती एकटी कमवती आहे मात्र घर तिच्या नावावर करून देण्यास लवासा तयार नाही. लवासा कंपनी म्हणत आहे की, जितके दिवस रहायचे तितके दिवस रहावे. परंतु घर नावावर करून देण्यास तयार नाहीत. कराराप्रमाणे भूखंड देणे आवश्यक आहे परंतु लवासाचे अधिकारी देत नाहीत. लवासा कॉर्पोरेशनचे अधिकारी कोणत्याही प्रकारचा रिस्पॉन्स देत नाहीत. लवासा कॉर्पोरेशनने क्रिस्टल हाऊस नावाची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे. मात्र त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. आर्थिक परिस्थिती खालावली आहे असे कारण देऊन शाळेची बस बंद केली आहे. त्यामुळे मुलांना दूर शाळेत चालत जावे लागते. ९० टक्के पालकांकडे गाडी नाही. लवासाने सांगितले आहे की, लवासाची आर्थिक परिस्थिती नाही, ग्रामस्थांना बस देऊ शकत नाही. ग्रामस्थांनी त्यांच्या मुलांना आणणे व नेणे हे काम स्वतः करायचे आहे. शाळेने मुलांना ने-आण करण्याची व्यवस्था स्वतःच करावी असे सांगितलेले आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी कामावर जावे की मुलांना शाळेत सोडायला जावे असा प्रश्न निर्माण झालेला असल्याचा खुलासा दासवे गावातील उप सरपंच यांनी केला. दुसरे म्हणजे ग्रामपंचायतीने शाळेशी पत्रव्यवहार केला तरी त्याची शाळेकडून दखल घेतली जात नाही.

आमच्या भागातील सर्व ग्रामस्थांना, तरुणांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. काही गोष्टी कराराप्रमाणे झालेल्या नाहीत. लवासा कॉर्पोरेशनने क्रिस्टल हाऊस या नावाने शिक्षण संस्था सुरू केली आहे. परंतु ही शाळा कायम स्वरूपी चालविण्यात येईल असे त्यांनी लेखी स्वरूपात लिहून द्यावे. कारण ही शाळा ते केव्हाही बंद करू शकतात असेही समितीस अवगत केले.

**२.४०** यावर समितीने या शाळेला भेट देऊन शाळेची पाहणी केली ती शाळा अतिशय चांगली आहे ग्रामस्थांनी सांगितल्याप्रमाणे ही शाळा बंद न करण्याबाबत त्यांना सांगण्यात येईल असे ग्रामस्थांना आश्वासित केले.

**२.४१** या शाळेमध्ये के.जी.साठी मर्यादित जागा आहेत शाळेतील स्टाफच्या मुलांना पहिले प्राधान्य असते त्यामुळे ग्रामस्थांच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळत नाही. ही शाळा चांगली आहे, पण त्या ठिकाणी वसतिशाळा सुरू करावी, अशी विनंती असून मुलांसाठी बसची व्यवस्था करावी असेही ग्रामस्थांनी समितीकडे मागणी केली.

**२.४२** दासवे ते गडले रस्ता हा १७ कि.मी. चा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. या रस्त्यावरून नीट चालता येत नाही. या रस्त्यावरून वाहनाची ये-जा होत असल्यामुळे लोकांच्या घरात मोठ्या प्रमाणात धूळ जमा होते. तेव्हा या रस्त्यावर पाणी मारले पाहिजे जेणेकरून लोकांच्या घरात धूळ जाणार नाही. या भागामध्ये आदिवासी लोकांची वस्ती आहे. भविष्यात येथील भागाची माळीण दुर्घटनेसाखी होऊ नये त्या दृष्टीने काळजी घ्यावी. रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट असून पाण्याची व्यवस्था केलेली नाही. तसेच लवासा सिटी झाली तेव्हा आमची पाच गावे सोडून बाकीच्या गावांना हिल स्टेशन म्हणून घोषित केली आहेत. ग्रामस्थांची विनंती आहे की, ही पाच गावे देखील हिल स्टेशन म्हणून घोषित करावीत.

**२.४३** आम्हाला पाण्याची समस्या जाणवत आहे. या भागामध्ये एकूण सहा धरण आहेत तरीसुद्धा ग्रामस्थांना पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. शेतीसाठी पाणी मिळत नाही. ग्रामस्थांच्या जमीनी धरणासाठी दिलेल्या आहेत अशी वस्तुस्थिती मुगाव गावच्या ग्रामस्थाने समितीपुढे मांडली.

**२.४४** लवासा सिटी करण्यासाठी स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटी नेमण्यात आली. शासनाने त्यांना ३० टक्के एफ.एस.आय.दिलेला आहे आणि स्थानिक ग्रामस्थांना ०.३.७५ एफ.एस.आय. आहे त्यामुळे घर बांधण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत असेही ग्रामस्थांनी समितीच्या निदर्शनास आणले.

**२.४५** यावर समितीने जर आपले गाव लवासा सिटीमध्ये असेल तर त्या ठिकाणी जेवढा एफएसआय आहे तेवढाच आपणास एफएसआय मिळाला पाहिजे असे अभिप्राय व्यक्त केले.

**२.४६** सीएसआर पॉलिसीनुसार समाजहिताची कोणकोणती कामे करणार आहेत ते कंपनीने जाहीर करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली असता समितीने कंपनीस जो काही नफा होतो त्यातून सीएसआर ॲक्टीव्हीटीज राबविल्या जातात. प्रथम पर्यटनाला चालना मिळू द्यावी असे मत समितीने व्यक्त केले.

**२.४७** दासवे भागातील कातकरी समाजातील लोकांकडे स्वतःच्या मालकीची घरे नाहीत. कंपनीकडून त्यांना भूखंड द्यावा तसेच स्टॅम्प ड्युटी माफ करावी असे ग्रामस्थाने समितीस सांगितले असता समितीने जागा देण्याबाबत लवासा कार्पोरेशनला सांगण्यात येईल असे ग्रामस्थांना आश्वासित केले.

**२.४८** लवासा कॉर्पोरेशन सुरू झाल्यापासून या भागाचा विकास झालेला आहे. ग्रामस्थ तक्रारी करीत राहिले तर लवासा कॉर्पोरेशन बंद होईल. ग्रामस्थांचे खरेदीखत चुकीचे झाले असेल तर त्याबाबत तक्रारी कराव्यात. या ठिकाणी ग्रेडीयन्ट संदर्भात शिथिलता मिळावी. या भागाचा विकास व्हावा एवढीच ग्रामस्थांची इच्छा आहे. या भागात १-२ कि.मी.चा बोगदा करून तेथून पाणी वळविले तर १०० टीएमसी पाणी मिळू शकते असे मत एका ग्रामस्थाने समितीसमोर व्यक्त केले.

**२.४९** ग्रामस्थांकडे अनेक पिण्याच्या पाण्याच्या योजना मंजूर आहेत पण निधी अभावी कामे होत नाहीत. भूगाव ताम्हणी रस्ता वन विभागामुळे होत नाही. या भागामध्ये जिल्हा परिषदेच्या १८ शाळा असून त्या शाळांमध्ये फक्त ३६ शिक्षक आहेत तर २४७ मुले शिक्षण घेत आहेत असेही ग्रामस्थाने समितीस अवगत केले.

**२.५०** आमच्या भागात अनेक प्रकल्पग्रस्त गावे आहेत. पाण्याचा प्रश्न आहे. लवासा कॉर्पोरेशन टँकर पुरविते, पण त्यासाठी घरातील महिला दिवसभर वाट पाहू शकत नाही. ग्रामस्थांना जागा दिली तर पाणीपुरवठ्याची योजना राबवू शकतो. उन्हाळ्यामध्ये पाण्याचा प्रश्न खूप भेडसावतो. शहरात माणशी १२० लीटर पाणी पुरविण्यात येते. या ठिकाणी माणशी ४० लीटर पाणी पुरविण्यात येते. हे निकष बदलून ग्रामस्थांना माणशी ७० लीटर पाणी पुरवावे. येथील भागात पशुधन आहे गाय-म्हैस एका वेळेला ४०-५० लीटर पाणी पिते. लवासा डॅममधील पाण्यावर पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्यासाठी ठेवावे तसेच घन कचऱ्याचा प्रश्न आहे. या भागात जेवढी गावे आहेत त्या गावांतील घनकचरा एकत्र जमा करून त्याची विल्हेवाट लावली पाहिजे असे मत सभापतींनी व्यक्त केले.

**२.५१** मोसे खोरे बचाओ आंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयक श्रीमती सुनिती सुलभा रघुनाथ यांनी समितीपुढे म्हणणे माडताना नमूद केले की, मोसे खोऱ्याचा २० गावांचा परिसर आहे. वरसगाव धरणाचा तो कॅचमेंट परिसर असून जलाशय याच परिसरात आहे. आम्ही या गावातील रहिवासी आहोत. ग्रामस्थांच्या जमीनी फसवणुकीने लवासा कंपनीने बळकावल्या आहेत. काही ग्रामस्थांनी न्यायालयात दावे दाखल केले आहेत. लवासाने जमीनींवर अतिक्रमण करणे, राडारोडा टाकणे, बुलडोझरच्या सहाय्याने जमीन खणून ग्रामस्थांची निवासस्थाने धोकादायक बनविणे, धमकी देणे असे प्रकार करीत आहे. लवासा कंपनीच्या अतिक्रमणापासून व दहशतीपासून ग्रामस्थांना संरक्षण मिळाले पाहिजे.

**२.५२** माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवासा कंपनीला केवळ २००० हेक्टर जमीनीवर काम करण्याची परवानगी आहे. ग्रामस्थांची मुख्य संघटना “जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय” यांच्या वतीने या परवानगीला देखील न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे, हा दावा सध्या प्रलंबित आहे. लवासा कंपनी मनमानी पद्धतीने आमच्या गावामध्ये डोंगर खणणे, झाडे तोडणे, बांधकामे करणे असे सर्व प्रकार करीत आहे. सदर काम ताबडतोब थांबवून केवळ परवानगी असलेल्या क्षेत्रातच लवासा कंपनीला काम करता येईल अशी कार्यवाही करावी. नगररचना विभागाच्या सर्व नियमांचे उल्लंघन लवासा कंपनीने केले आहे. त्याचा कॉग्निझन्स तत्कालीन शासनाने देखील घेतला आहे.

**२.५३** आदिवासी भूधारकांना त्यांची लवासाने अनाधिकाराने बळकावलेली जमीन परत देण्याची प्रक्रिया माननीय उप विभागीय अधिकारी, मावळ-मुळशी यांच्याद्वारे सुरू होती. त्यामध्ये २ आदिवासी भूधारकांना त्यांची जमीन परत देण्याचे आदेश झाले. परंतु अद्याप त्याबाबतची कार्यवाही न झाल्यामुळे हे भूधारक जमीनीपासून आजही वंचित आहेत. लवासाने फसवणूक करून बळकावलेल्या जमीनी परत मिळण्यासाठी आदिवासींनी अर्ज केले होते. परंतु त्यांनी जात दाखले सादर न केल्याचे कारण देऊन ते रद्द करण्यात आले. सदर बाबतीत लवकर कार्यवाही करून या जमीनी मूळ आदिवासींना परत मिळणे आवश्यक आहे. बिगर आदिवासी सिलिंग जमीनधारकांवर देखील अन्याय झालेला आहे. त्यांनी जमीनींचा व्यवहार केला नसताना व सिलिंग कायद्याखाली त्यांना मिळालेल्या जमीनी विकण्याची कायद्यात तरतुद नसताना त्यांच्या जमीनी लवासा कंपनीकडे वळविण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांची मागणी आहे की, हे व्यवहार कसे झाले, मूळ खातेदारांनी केले किंवा कसे, ते नियमित करण्यासाठी जबाबदार कोण आहे याची चौकशी व्हावी. सदर व्यवहार फसवणुकीने झाले असल्याने या जमीनी सरकारजमा करून घेऊन मूळ सिलिंग जमीनधारकांना परत मिळाव्यात. सिलिंगच्या जमीनी लवासाला देण्यात आल्या आहेत. ते बेकायदेशीर आहे. आम्हाला असे समजते की, नजराणा देऊन त्या जमीनी नियमित केल्या आहेत. हा अन्याय आहे. कायद्यानुसार अशा जमीनी व्यापारी कंपनीला देण्याची तरतुद नाही. त्यामुळे त्या जमीनी परत घेऊन संबंधित शेतकऱ्यांना परत दिल्या पाहिजेत.

**२.५४** अनेक व्यवहारांमध्ये असे दिसून येते की, खरेदीखते, ७/१२ उतारा, फेरफार आदी कागदपत्रे संबंधित विभागाकडे उपलब्ध होत नाहीत. परिणामी न्यायालयात दाद मागायची असल्यासही कागदपत्रांची पूर्तता होऊ शकत नाही.

**२.५५** आदिवासींच्या सिलिंगच्या जमीनी बिगर आदिवासींना देण्याची तरतुद नाही तरी देखील त्या जमीनी लवासाला दिल्या आहेत. तत्संदर्भात चौकशी समिती नेमली आहे. उप विभागीय अधिकारी यांच्या स्तरावर चौकशी सुरू आहे. २ आदिवासींच्या जमीनी परत मिळाल्या आहेत. १४ आदिवासींच्या संदर्भात आदेश झालेले आहेत. परंतु जमीन परत मिळालेली नाही. ७/१२ उताऱ्यावर नोंद झाली आहे. परंतु ताबा मिळालेला नाही. लवासा कंपनीने त्या जमीनी नष्ट केल्या आहेत. सदर जमीनी सरकारकडे घेऊन त्या पुन्हा त्यांना देण्यात याव्यात. शेकडो इनामी जमीनीदेखील लवासाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत.

**२.५६** दुष्काळी परिस्थितीमुळे पुणे शहराला व शेतीला पाणीपुरवठ्यात मोठी कपात करावी लागत आहे. मात्र आम्हा भूमिपुत्रांना विस्थापित करून सार्वजनिक हेतूसाठी बांधलेल्या वरसगाव धरणातील पाणी मोठ्या प्रमाणावर लवासा कंपनीला बहाल केले आहे. कॅचमेंटमध्ये बांधलेल्या बंधाऱ्यातूनही मोठ्या प्रमाणात पाणी लवासा कंपनी वरच्या वर पळविते. जीवनावश्यक उपयोगासाठीचे बहुमूल्य पाणी धंदेवाईक व ऐषआरामासाठीचे काम करणाऱ्या लवासा कंपनीला देण्याचे तत्काळ थांबविण्यात यावे. जलाशयामध्ये भराव घालून व त्यामध्ये इमारती बांधून लवासा कंपनी धरणाचे जलसंग्रहण क्षेत्रच कमी करीत आहे. लवासा कंपनीचे ड्रेनेज जलाशयात सोडले जात असल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. १४१ हेक्टर जमीन लवासाला अत्यंत अल्प भावाने म्हणजे पावणे तीन लाख रुपये वर्षाला भाडे घेऊन ३० वर्षांच्या लिजवर देण्यात आली आहे आणि ती कायमस्वरूपी मिळावी असा लवासाने अर्ज केला आहे. १४१ हेक्टर जमीनीमधील १२ हेक्टर जमीनही जलाशयावरची आहे. जमीन अतिरिक्त होती तर विस्थापितांना न देता लवासाला का दिली, हा प्रश्न आहे. नदीचे पाणीदेखील लवासाने पळविले आहे. बेकायदेशीररित्या लवासाला दिलेले पाणी ग्रामस्थांना पुण्याला परत मिळाले पाहिजे. गेली ६ वर्षे असे प्रकार सुरू असून पुण्यात १५ टक्के पाणी कपात आहे मात्र लवासामध्ये जलक्रीडा सुरू आहे. ग्रामस्थांची मागणी आहे की, लवासाला दिलेल्या जमीनी, पाणी परत घ्या आणि बंधारा बांधून जलसंधारण क्षेत्र कमी केले आहे ते पूर्ववत करणे आवश्यक आहे.

**२.५७** लवासाला एसपीए म्हणून घोषित केल्यामुळे येथील ग्रामस्थांच्या नागरी हक्कांवर अतिक्रमण झाले आहे. गौण खनिजाचा देखील प्रश्न आहे. लवासा कंपनीमुळे बरेच प्रश्न निर्माण झाले आहेत. लवासा कंपनीकडून कायदे वळविले आणि वाकविले गेले आहेत असे आम्हाला दुर्दैवाने सांगावे लागत आहे. त्यामुळे आमची विनंती आहे की, हा प्रकल्प ताबडतोब थांबविला पाहिजे.

**२.५८** ग्रामस्थांनी सांगितलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने समितीने या संदर्भात नक्की विचार करण्यात येईल असे आश्वासित केले.

यानंतर समितीने लवासा प्रकल्पाच्या प्रतिनिधींना त्यांचे म्हणणे मांडण्यास संधी दिली. सदरहू प्रतिनिधींनी म्हणणे मांडताना असे नमूद केले की, पहिल्या व्हॅलीमध्ये डेव्हलपमेंट दिसत आहे. त्यामध्ये एज्युकेशन हब प्रस्तावित असून त्यामध्ये शाळा, कॉलेजेस, विदेशी विश्वविद्यालय तसेच मेडीकल सेंटर, इत्यादींचा समावेश आहे.

**२.५९** भुगाव येथील एकूण २३ हजार १४ एकर क्षेत्र नोटीफाईड केलेले आहे. मुगाव येथे नंतर डेव्हलपमेंट होणार आहे. तेथे आय.टी.पार्क, नॉन पोल्यूटिंग इंडस्ट्रीज, बायो टेक्नॉलॉजी सेंटर्स, फिल्म प्रोडक्शन आणि ॲनिमेशन स्ट्युडिओज, मॅनेजमेंट इन्स्टिस्ट्युट, स्पोटर्स ॲकेडमी प्रस्तावित आहेत. हे सर्व डेव्हलप झाल्यानंतर साधारणतः ८० हजार रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या हिल स्टेशनला २० लाख पर्यटक भेटी देतील अशी अपेक्षा आहे.

**२.६०** सन १९९६ मध्ये राज्य शासनाने हिल स्टेशन रेग्युलेशन आणले. ब्रिटीशांनी आपला देश सोडल्यानंतर देशात कोणतेही नवीन हिल स्टेशन तयार करण्यात आले नाही म्हणून हिल स्टेशन कन्सेप्ट आली. नवीन हिल स्टेशन करण्यासाठी प्रायव्हेट सेक्टरचा समावेश करावा असे ठरले. या प्रायव्हेट सेक्टरच्या माध्यमातून नवीन हिल स्टेशन विकसित करण्यासाठी ही पॉलिसी आणली होती.

**२.६१** सुरूवातीला हा भाग भकास दिसत होता. आता डेव्हलपमेंट केल्यानंतर कसा दिसत आहे हे आपणास प्रेझन्टेशनवरील स्क्रीनवर दिसून येत आहे. सन १९९६ मध्ये हिल स्टेशन रेग्युलेशन करण्यात आले. सन २००१ मध्ये हिल स्टेशनचा एरिया डिक्लेअर करण्यात आला. यामध्ये १८ गावांचा समावेश आहे.

**२.६२** लवासा ही नियोजनपूर्व वसवलेली सिटी आहे. न्यू अर्बनिझमचा कन्सेप्ट घेऊन हे शहर वसवित आहोत. या शहरातच live, work, learn and play या सर्व गोष्टींचा समावेश आहे. या सर्व गोष्टी करताना येथील पर्यावरणाला कोणताही धक्का न लावता हा विकास करावयाचा आहे.

**२.६३** मास्टर प्लानमध्ये ॲफोर्डेबल हाऊसिंगचा समावेश आहे. १८ गावांमधील २३ हजार एकर जागेवर ५ टाऊनशीप होणार आहेत. दासवे, मुगाव, धामणहोळ, साक्री-वडवली आणि मोसे अशी पाच सेक्टर्स आहेत. २ हजार ४८ हेक्टरवर क्षेत्रावर बांधकाम करण्याची परवानगी मिळाली असून तेवढ्या जागेवर बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचे काम २०१९ पर्यंत पूर्णत्वास येईल.

**२.६४** या प्रकल्पामध्ये ८० हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. राहण्याच्या ठिकाणा जवळच ऑफीस असणार आहे. काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी व्हीला, स्टुडिओ अपार्टमेंन्स, रिटायर हाऊसिंग इत्यादी निर्माण होणार आहेत.

**२.६५** या ठिकाणी शाळा, कॉलेजेस, मॅनेजमेंट इन्स्टिट्युट, सिम्बॉसिससारख्या इन्स्टीट्युटस येणार आहेत. काही विदेशी युनिव्हर्सिटीच देखील येथे येणार आहेत. हा परिसर आम्ही ट्युरिझम सेंटर म्हणून विकसित करीत आहोत. येथे वॉटर स्पोटर्स सारख्या ॲक्टीव्हिटीज आहेत. क्रिकेट ग्राऊंड, गोल्फ कोर्स, थिम पार्क, इको सफारी फुटबॉल मैदान, इत्यादी विकसित करण्याचा मानस आहे. हे एक ट्युरिझम डेस्टिनेशन करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**२.६६** या प्रकल्पासाठी शासनाने का सहाय्य करावे याचे कारण की. ही एक प्लान्ड हिल सिटी आहे. सन २०३० पर्यंत येथे २.५ लाख लोकसंख्या होईल. येथे वर्षाला किमान २० लाख पर्यटक भेटी देण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी १३ लाख पर्यटकांनी या प्रकल्पाला भेट दिलेली आहे. या प्रकल्पाचा भारताच्या स्थूल उत्पन्नामध्ये ३० हजार कोटी रुपयांचा वाटा असणार आहे. येथील हॉस्पिटॅलिटी, रिटेल या क्षेत्रामध्ये सध्या १ हजार रोजगार उपलब्ध आहेत. त्यामध्ये ३१५ स्थानिक कामगार आहेत. पिक सीझनमध्ये १२ हजार कामगार काम करतात. या प्रकल्पातून शासनास मोठ्या प्रमाणावर महसूल जसे सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, व्हॅट, सर्व्हीस टॅक्स मिळणार आहे. स्टॅम्प डयुटी आणि रजिस्ट्रेशनद्वारे २१०० कोटी रुपये मिळणे अपेक्षित आहेत. त्यापैकी आतापर्यंत ४८ कोटी रुपये मिळाले आहेत.

**२.६७** या प्रकल्पाच्या माध्यमातून येथील परिसराचा विकास होणार आहे. पाणी, शिक्षण, आरोग्य इत्यादी संबंधीचे प्रश्न या प्रकल्पाच्या माध्यमातून सुटणार आहेत. लोकांचे राहणीमान उंचावणार आहे.

**२.६८** दिनांक १५ जुलै २०१० रोजी पर्यटन विभागाने लवासा हिल स्टेशन डेव्हलपमेंटला मेगा ट्युरिझम प्रोजेक्ट म्हणून घोषित केले. परंतु कॉन्टम ऑफ इन्सेन्टीव्हज कोणत्या द्यायच्या याची अजून निश्चिती झालेली नाही. त्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात येत आहे.

आम्ही जेव्हा प्रोजेक्ट सुरू केला तेव्हाचे चित्र आणि आताचे चित्र आपण पहावे. पूर्वी झाडे जाळून शेती केली जात होती. येथे रस्ते, पाणी, वीज, आरोग्य व शिक्षणाच्या सोयींचा अभाव होता, येथील जीवनमान बेअर सबसिस्टन्स लेव्हलवर होते. जर एखादी व्यक्ती आजारी पडली तर तिला उपचारासाठी डोलीमधून पानशेतला घेऊन जावे लागत होते. पावसाळ्यात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याचे प्रेत दोन दोन महिने ठेवावे लागत होते.

**२.६९** अगोदर सांगितल्याप्रमाणे हा २३,०१४ एकरांचा नोटिफाईड एरिया आहे. परंतु आजमितीला त्यातील १०,५७४ एकर जागा विकत घेऊ शकलो आहोत. संपूर्ण जागा शेतकऱ्यांकडून प्रायव्हेट निगोशिएशन करून पारदर्शक पद्धतीने विकत घेतली आहे. शासनाचे त्यामध्ये पॅचेस आहेत, त्याची मागणी केली आहे. जेणेकरून हा प्रकल्प व्यवस्थित सुरू होईल. सदर बाबतीत कार्यवाही सुरू आहे. शासनाकडून ते मिळाले तर प्रकल्पाला आणखी चांगले स्वरूप प्राप्त होऊ शकेल. शासनाची जमीन जवळपास ३३८ हेक्टर आहे, ती अजून मिळालेली नाही, ती सिलिंगची एक्सेस जमीन आहे. आम्ही त्या संदर्भात ५-६ वर्षापासून मागणी करीत आहोत. आम्ही या संदर्भात एचओके या अमेरिकन ग्रुपकडून मास्टर प्लॅन तयार करून घेतला आहे. आपल्याला प्लॅन्ड सिटी करायची आहे. आपण अतिशय अत्याधुनिक पद्धत वापरून काम केले आहे. जेणेकरून प्रकल्प होताना ॲक्युरसी रहावी. आपण येथे फिजिकल इन्फ्रास्ट्रक्चर करीत आहोत. ४१ कि.मी. रोड नेटवर्क केले आहे. वॉटर ट्रिटमेंट प्लँट केले आहेत. टेलिकम्युनिकेशनचे टॉवर उभे केले आहेत. ट्रान्समिशन लाईन केली आहे. आम्ही अशाप्रकारे सर्व काही इन्व्हेस्ट केले आहे. एसटीपी उभा केला

आहे. सदर ठिकाणी अपोलो हॉस्पिटल, अपोलो फार्मासी, टाऊन हॉल, एसबीआयची शाखा सुरू केली आहे. पोस्ट आले आहे. युनियन बँकदेखील आली आहे. आम्ही लवासा सिटी कशाप्रकारे करायची याचे ८ वर्षांपूर्वीच नियोजन केले आहे. पिरंगुट पासून हायवे असल्यामुळे अनेक प्रकारच्या स्मार्ट ॲप्लिकेशन्स आहेत, त्या संदर्भातील ले-आऊट असल्यामुळे तसेच सिटी मॅनेजमेंटच्या सर्व्हिसमुळे राहणाऱ्यांचा फायदा झाला आहे. फायबर फॉर्ममध्ये केबल सर्व घरांमध्ये पोहचल्या आहेत दासवेचा मास्टर प्लॅन आहे.

**२.७०** यावर समितीने पिरंगुटपासून दासवेपर्यंतचा रस्ता कमी रुंदीचा केला आहे. फक्त ५० टक्के विकास झालेला असून भविष्यात रस्ता अपुरा पडणार आहे. लवासाने तो रस्ता ४ किंवा ६ पदरी करण्याची तयारी केली पाहिजे असे मत व्यक्त केले असता लवासाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, तत्संदर्भात शासनाकडे देखील मागणी आहे. २-३ ठिकाणांहून रस्ते करायचे आहेत. पूर्णे-मुळशी-पौड-कोणार तेथून ॲक्सेस प्लॅन केला आहे. एमओईएफची परवानगी मिळाली आहे अल्टरनेट रूटस् आहेत. शासनाकडून परवानगी मिळेल त्यानुसार कार्यवाही करावी लागणार आहे. एवढ्या लोकसंख्येला ॲक्सेस जास्त लागणार आहे. जीआयएस मॅपिंग होत असल्यामुळे इलेक्ट्रिक लाईन किंवा इतर कामांच्या संदर्भात फायदा होत आहे. जीआयएसमुळे प्रत्येक घराचे डिटेलिंग झाले आहे. त्यामुळे कुठे काही फॉल्ट झाला तर लगेच समजतो. माननीय पंतप्रधानांनी देखील लवासाला भेट दिली आहे आणि आम्हाला ॲप्रिशिएट केले आहे. माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबदेखील आले होते. माजी केंद्रीय मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल, राजस्थानच्या मुख्यमंत्री श्रीमती वसुंधरा राजे यांनी देखील लवासाला भेट दिली आहे. तसेच पंजाबचे मुख्यमंत्री देखील लवासाला आले होते. लवासा कन्सेप्ट पाहण्यासाठी सर्व लोक आले होते. राजकारणी तसेच अधिकारी यांनीही लवासाला भेट दिली आहे. लवासा रेसिडेंस फॉर ऑल, हॉटेल्स फॉर ऑल, एज्युकेशन फॉर ऑल, टुरिझम फॉर ऑल असे सर्वसमावेशक स्ट्रक्चर डेव्हलप करीत आहोत. सीएसआर ॲक्टिव्हिटीजकडे देखील लक्ष देत आहे.

**२.७१** लवासाने लायव्हलीहूड अपोर्च्युनिटीजमध्ये एम्प्लॉयमेंट देण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक लोकांना कामाच्या संदर्भात ठेका देण्याचा प्रयत्न केला आहे सेल्फ एम्प्लॉयमेंटसाठी त्यांचे ग्रूप बनवून मदत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. लवासामध्ये प्रशिक्षित झालेल्या माणसाला लवासामध्येच नाहीतर बाहेरगावी संधी असेल तर लवासाच्या माध्यमातून त्याला नोकरी मिळेल हे पाहत आहोत. आजमितीला एकूण ३१५ गावकरी लवासामध्ये नोकरीला आहेत. येथे नोकरीला असलेल्या गावकऱ्याला किमान ८,००० रुपये आणि कमाल ५१,३०८ रुपये प्रति महिना पगार आहे. काही लोकांचे शिक्षण जास्त असल्यामुळे ते अधिकारी पदावर देखील कामाला आहेत त्यांना किमान वेतन कायद्यानुसारच वेतन दिले जाते.

**२.७२** लवासामार्फत किमान वेतन कायद्यानुसार वेतन देण्यात येते पण ते लवासामध्ये काम करणाऱ्या गावकऱ्यांच्या संदर्भात झाले. परंतु ठेका पद्धतीने दिलेल्या कामाला ते लागू होत नाही. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांना ठेका पद्धतीने सुरू असलेल्या कामावर कमी पगार मिळतो. फक्त साडे सहा हजार रुपये पगार मिळतो अशी विचारणा समितीने केली असता ज्यावेळी ठेका देतो त्यावेळी होणाऱ्या करारामध्ये अट टाकतो की, कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन द्यावे लागेल. समितीला हे सॅलरी स्लिपमध्ये पहायला मिळू शकते भविष्यनिर्वाह निधीचे पैसे देखील कपात केले जातात त्यामुळे कदाचित वेतन कमी असल्याचे दिसते सदर बाबतीत एचआरचे नियंत्रण असते. करारातच बंधन असल्यामुळे ठेकेदाराला तसे करता येत नाही अशी माहिती लवासाच्या प्रतिनिधींनी दिली.

**२.७३** लवासाने संपादन केलेल्या १७-१८ गावांतील लोकांसाठी व्यवसाय प्रशिक्षणाची सोय केलेली नाही. प्रशिक्षणाची सोय केली तर त्यांना लवासामध्ये किंवा बाहेर नोकरी करता येईल. आपण त्यांच्यासाठी प्रशिक्षणाची सोय केली पाहिजे. आपण किती स्थानिक लोकांना ठेका दिला आहे, किती लोकांना नोकरी देऊ असे कमिटमेंट केले आहे ? ३१५ लोकांना नोकरी दिली आहे, त्यांची यादी समितीला देण्यात यावी असे समितीने लवासाच्या प्रतिनिधींना सांगितले असता यादी देण्याबाबत समितीस आश्वासित केले.

**२.७४** ५१,३०८ रुपये प्रति महिना इतके कमाल वेतन घेणारा माणूस लवासामध्ये नोकरीला आहे. तो येथील स्थानिक माणूस आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता प्रतिनिधींनी दासवे गावातीलच श्री. नितीन मोरे हा माणूस लवासामध्ये कामाला आहे आणि त्याला ५१,३०८ रूपये प्रति महिना पगार आहे. येथे तो एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून काम करीत आहे. उच्च शिक्षण, इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्यामुळे त्याची प्रगती झाली आहे असा खुलासा लवासाच्या प्रतिनिधींनी केला.

**२.७५** लवासाने नोकरी देण्यासंदर्भात किती लोकांना कमिटमेंट केले आणि किती लोकांना नोकरी दिली, बाकीच्यांना नोकरी कधी देणार आहात ? करार केलेल्या १८६ लोकांबरोबर नोकरी देण्याचा करार केला होता तसेच त्यातील किती लोकांना नोकऱ्या दिल्या याबाबत समितीने विचारणा केली असता ८१ लोकांची मागणी बाकी आहे. त्यातील ४१ जण स्थलांतरित झाले आहेत. १९ जणांची ॲक्टिव्ह मागणी बाकी आहे. सेल्फ एम्प्लॉयमेंटसाठी ४५ स्थानिकांना प्रत्येक रविवारी हरा बझारमध्ये भाज्या विकण्यासाठी जागा दिली आहे असे समितीस अवगत केले.

**२.७६** फक्त १ दुकान दिले आहे त्याला भाडे आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता प्रतिनिधींनी नॉर्मल रेंट आहे. आम्ही छोट्या उद्योगांसाठी स्थानिकांना किमान भाडे घेऊन ४७ दुकाने दिली आहेत. तसेच १३९ स्त्रियांना, १० एसएचजींना प्रशिक्षण दिले आहे. एका बचत गटाने हरा बझारमध्ये एक दुकान सुरू केले आहे. ४५ स्थानिकांना कारपेंटरी, प्लँबिंग, इलेक्ट्रिशिएन, लॅण्डस्केपिंग व हाऊसकिपिंगचे प्रशिक्षण दिले आहे. त्यातील काही जण इलेक्ट्रिशिएन म्हणून लवासा येथेच कामाला लागले आहेत. भविष्यात त्यांना बाहेरही काम मिळेल असे समितीस अवगत केले.

ग्रामस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू ठेवावा जेणेकरून स्किल डेव्हलपमेंट झाल्यावर त्यांना नोकऱ्या मिळतील असे समितीने मत व्यक्त केले.

**२.७७** समितीने क्रिस्टल हाऊस शाळा पाहिली, ती चांगली आहे. परंतु ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, त्यांच्या मुलांना शाळेत घेऊन जाणारी बस असली पाहिजे ती नसल्यामुळे मुलांना शाळेत येता येत नाही. तसेच शाळेत कमी जागा असल्यामुळे प्रवेश मिळत नाही त्यामुळे जागा वाढविल्या पाहिजेत. आर्थिक अडचण आहे असे सांगून अनेकदा मुलांना शाळेत घेऊन जाणारी बस बंद करता. त्यामुळे त्या लोकांना १०-१२ कि.मी. हून मुलांना शाळेत आणावे लागते. तसेच शाळेच्या तुकड्या कमी आहेत, त्या वाढविल्या पाहिजेत. समितीला असेही समजले आहे की, येथे राहणाऱ्यांच्या मुलांना शाळेत प्रवेशासाठी प्राधान्य आहे. मात्र गावकऱ्यांच्या मुलांना अनेकदा प्रवेश मिळत नाही. समितीचे सांगणे आहे की, ग्रामस्थांच्या मुलांच्या प्रवेशासाठी नकार देऊ नये कारण त्यांचा पहिला हक्क आहे. बालवाडीपासून सर्व इयत्तांच्या तुकड्या वाढविण्याची गरज आहे. लवासा आहे, तोपर्यंत शाळेची बस आर्थिक कारणास्तव किंवा इतर कोणत्याही कारणास्तव बंद होता कामा नये. आपण या दोन गोष्टींच्या संदर्भात अंडरटेकिंग दिले पाहिजे अशी समितीची भावना असल्याचे समितीने नमूद केले.

**२.७८** यावर प्रतिनिधींनी नमूद केले की, मागील एक-दोन महिन्यातील प्रश्न आहे. बस कॉन्ट्रॅक्टरचा काही प्रॉब्लेम झाला होता त्यामुळे तो प्रश्न निर्माण झाला होता. परंतु शाळा सुरू झाल्यापासून सातत्याने लवासाची बससेवा सुरू होती.

या शाळेमध्ये तुकड्या वाढविल्या पाहिजे असे लवासाच्या प्रतिनिधींना सांगितले तसेच शाळेमध्ये स्टाफच्या मुलांना प्राधान्य देता आणि ग्रामस्थांच्या मुलांचा नंतर विचार करता. पहिले प्राधान्य गावकऱ्यांच्या मुलांना द्यावे त्यानंतर इतरांचा विचार करावा असे समितीने नमूद केले असता प्रतिनिधींनी गावातील मुलांना प्रवेश नाकारला अशी एकही केस झालेली नाही असे सांगितले.

**२.७९** गावकऱ्यांच्या मुलांना शाळेत नेण्यासाठी गाडी येत नाही अशा तक्रारी आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता प्रतिनिधींनी काही अवघड ठिकाणी शाळेची बस जात नाही असे समितीस अवगत केले.

**२.८०** या ठिकाणी १९ गावे आहेत. त्यातील किती गावांमध्ये गाडी जाते, किती ठिकाणी जात नाही, त्या ठिकाणी कोणत्या प्रकारची अडचण आहे ? या ठिकाणी जिल्हा परिषदेची शाळा आहेत पण त्या शाळेत मुले जात नाहीत. तेथे एकूण ३६ शिक्षक आहेत, १८७ विद्यार्थी आहेत. गावकऱ्यांची मागणी आहे की, या ठिकाणी निवासी शाळा बांधली पाहिजे. त्यासाठी लवासा कॉर्पोरेशनने पुढाकार घेतला पाहिजे. गावकऱ्यांची मागणी समितीला रास्त वाटते. लवासाने या मागणीचा विचार करावा असे समितीने सुचित केले.

**२.८१** या ठिकाणी इयत्ता सातवीपर्यंत शाळा आहेत. त्या बारावी इयत्तेपर्यंत करण्याची आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले. सर्व गावे एकत्र करून एक स्मार्ट सिटी केली व त्यांना सुविधा दिल्या असे लवासाने सांगितले. समितीने सकाळी गावकऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यापैकी एका गावकऱ्याने सांगितले की, आमच्या चार गावांचा देखील हिल स्टेशनमध्ये समावेश करावा. लवासा सिटीमध्ये त्या चार गावांचा समावेश करावा अशी गावकऱ्यांनी मागणी केलेली आहे असे लवासाच्या प्रतिनिधीस सांगितले असता यावर प्रतिनिधींनी जसजसे हा विभाग विकसित होईल तस तसा विकास होणार आहे. आपण प्रकल्प वाढण्यास वेळ दिला पाहिजे. या भागाचा एकसंधपणे विकास होत असेल तर ती चांगली बाब आहे. लवासाने जिल्हा परिषदेची शाळा बांधून दिलेली आहे असे समितीस अवगत केले.

**२.८२** यावर समितीने लवासाने शाळा बांधून दिलेली नाही तर अपग्रेड करून दिलेली आहे. समितीने त्या शाळेची काल पाहणी केली त्या शाळेच्या आवारातील कुंपणद्वार तुटलेले आहे. लवासाने ही शाळा दोन वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केलेली आहे. गावातील लोकांना कॉमन टॉयलेट बांधून दिलेले आहे. आपण प्रत्येकाला स्वतंत्र शौचालय बांधून द्यावे अशी गावकऱ्यांची मागणी असल्याचे समितीने नमूद केले.

यावर प्रतिनिधींनी लोकांना घराजवळ शौचालय नको. तरी देखील समितीच्या मागणीचा विचार करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

**२.८३** लोकांच्या पाणीपुरवठ्या संबंधी तक्रारी आहेत. काही ठिकाणी टँकरने वेळेवर पाणी मिळत नाही अशा तक्रारी आहेत अंतर्गत रस्ते नाहीत. देवळाची जागा नावावर करून दिली पाहिजे. तीर्थक्षेत्राबाबत तक्रारी आहेत, पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही अशा अनेक तक्रारी आहेत. लवासाने त्यासंदर्भात आपला अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले. तसेच पूर्णे शहरापासून ४० कि.मी.अंतरावर हा प्रोजेक्ट आहे. हा प्रकल्प सुरू झाला तेव्हा येथे एकही रस्ता नव्हता. नंतर लोकांनी जमीनी विकण्यास सुरूवात केली. कंपनीच्या आणि स्थानिक एजन्टस्नी जमीनी घेण्यास सुरूवात केली. जर एखाद्याकडून एका गटाची जमीन विकत घेतली असेल तर त्याच्या दुसऱ्या गटावर देखील कुंपण घालण्यात आले. पाणलोट क्षेत्राच्या जमीनीवर बंगले बांधलेले आहेत. इरिगेशनने लवासाला अतिशय कमी दरात लीजवर जमीन दिलेली आहे. त्याबाबत कोणते ॲग्रीमेंट झाले हे माहीत नाही शासनाला त्याचा काही लाभ झाला नाही.

**२.८४** चार-पाच गावांनी त्यांना लवासामध्ये घ्यावे अशी मागणी केलेली आहे. पडळघर रस्त्याचे काम झालेले नाही. चांदणी चौकातून जो नवीन रस्ता केलेला आहे तो शासनाने केलेला आहे. वीजदेखील शासनाने आणली आहे. लवासाच्या आतील सात कि.मी. चा रस्ता देखील शासनाने केलेला आहे. सद्या अशी परिस्थिती आहे की, पडळघर रस्त्याची अवस्था अतिशय खराब आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, वीज नाही. लवासा सिटी विकसित झाली पाहिजे पण येथील लोकांना न्याय मिळाला पाहिजे. या ठिकाणी स्थानिक फक्त २० टक्केच राहिलेले आहेत. धनगर, आदिवासी आणि कातकरी समाजातील लोकांची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. मुलांना २० कि.मी. अंतरावरून पायी शाळेत जावे लागते. प्रकल्पामुळे आजूबाजूच्या लोकांना लाभ झाला पाहिजे. १२ हेक्टर क्षेत्रावर इरिगेशनच्या जागेवर बंगले बांधले आहेत. काही ठिकाणी एन.ए.प्लॉट न होता बांधकाम सुरू केलेले आहे. प्रोजेक्ट करताना स्थानिक लोकांचा विचार केला पाहिजे.

**२.८५** गौण खनिजाबाबत लवासा कॉर्पोरेशनला दंड झाला पण तो वसुल झाला नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी १२ हेक्टर क्षेत्र ले-आऊट मधून वगळले होते. त्या वगळलेल्या क्षेत्रावर बांधकाम झालेले आहे. गावकऱ्यांनी तक्रारी करूनही काही झाले नाही. यामध्ये महसूलचे अधिकारी गुंतलेले आहेत. काही ठिकाणी बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी करण्यात आल्या. काही लोकांना जमीनीचा परतावा मिळालेला नाही. ज्यांच्याकडे १०-२० एकर शेती होती ते आज बेघर झालेले आहेत. हायफ्लड एरियाच्या ५०० मीटरच्या परिसरात बांधकाम करू नये असा नियम आहे. असे असताना देखील हायफ्लड भागात बांधकाम झालेले आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, ८० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. आतापर्यंत किती स्थानिकांना रोजगार मिळालेला आहे ? येथील लोक वॉचमनचे काम करीत आहेत. त्यांची मुले बाहेर शिकत आहेत. लवासाला शासनाने सर्व लाभ दिलेले आहेत. त्यांना एन.ए.च्या मान्यतेसाठी शासनाकडे यावे लागत नाही. ज्यांच्या जागा गेलेल्या आहेत असे खूप लोक आहेत. या संदर्भात एक समिती नेमावी आणि लोकांकडून अर्ज मागवून त्यांना न्याय द्यावा.

**२.८६** गावकऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्या तक्रारी संदर्भात सर्व कागदपत्रे आपल्याकडे पाठविली जातील. चौकशी करावी व त्याचा अहवाल सादर करावा असे निदेश समितीने लवासा प्रकल्प प्रतिनिधींनी दिले.

**२.८७** पडळघर गावातील पुनर्वसन झालेल्या लोकांसाठी २० घरे तयार केली आहेत. परंतु त्यांना ताबा देत नसल्याबाबत समितीने विचारणा केली असता प्रतिनिधींनी तेथे १६ घरांचे लेआऊट तयार केले आहे, १४ घरे बांधून तयार आहेत. तेथे भालेराव व ओव्हाळ असे दोन गट आहेत. त्यातील एका व्यक्तीचे भांडण आहे. त्याला वेगळ्या प्रकारचे घर बांधून पाहिजे. आम्ही सर्वांना एकत्र बसविले आणि त्यांच्या एकमताप्रमाणे करू असे सांगितले. किमान १४ लोकांचे करार तरी करू असे ठरले. कोणाचेही एकमत होत नसल्यामुळे ते तसेच राहून गेले आहे. त्या व्यक्तीला इतरांसारखे घर नको आहे. त्याला आणखी एक घर पाहिजे आहे कॉमन जागाही त्या व्यक्तीला पाहिजे आहे. परंतु बाकीच्या लोकांना ते मान्य नाही. या भांडणामुळे हे काम राहिले आहे. त्या व्यक्तीचे म्हणणे आहे की, त्यांना ओपन जागेत घर बांधून मिळत नाही, तोपर्यंत करार करू नये. हा विषय जरा क्लिष्ट असल्यामुळे काम राहिले आहे तथापि ड्राफ्ट तयार आहे असे समितीस अवगत केले.

**२.८८** यावर समितीने एक नको म्हणतो म्हणून सर्वांच्या घरांचा ताबा राहिला आहे, हे बरोबर नाही. आपण यातून काही तरी मार्ग काढावा असे अभिप्राय व्यक्त केले असता प्रतिनिधींनी सर्वांना मान्य होईल असा मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. परवाच्या बैठकीत सांगितले आहे की, १४ जण तयार आहेत, त्यांच्या घरांच्या ताब्याचा करार करू असे नमूद केले.

यावर समितीने आपण त्यांना घराचा ताबा केव्हापर्यंत देणार आहात ? अशी विचारणा केली असता प्रतिनिधींनी मागच्या आठवड्यातच त्या संदर्भातील बैठक झाली आहे असे समितीस विदित केले.

**२.८९** समितीने भूमिहिनांना घरासाठी जागा देत नाही अशीही तक्रार आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात लक्ष घालावे असे समितीने सुचित केले.

**२.९०** ७२ ठिकाणी टँकरद्वारे पाणी देत असून ट्रिटेड ड्रिंकिंग वॉटर सप्लायसाठी दासवे येथे पाईपलाईन करीत आहोत. आपल्याला जिल्हा प्रशासनाचे अधिकारी देखील सांगतील की, अत्यंत दुर्गम ठिकाणीसुद्धा पाणीपुरवठा सुरू आहे. वॉटर लाईनचा मुद्दा सुटणार आहे असा खुलासा लवासाच्या प्रतिनिधींनी केला.

**२.९१** वरसगाव धरणात बंधारा घातला आहे, त्या संदर्भात परवानगी घेतलेली नाही. धरणात बंधारा घातल्यामुळे लवासाला ते सर्व पाणी मिळत आहे आणि फक्त २० टक्के पाणी गावाला मिळत आहे. लवासा सांगत आहे की, टँकरने पाणी देतो, पाणीपुरवठा करतो, पाईपलाईन टाकतो. परंतु अडचणच अशी आहे की, धरणात बंधारा घातल्यामुळे खाली पाणीच येत नाही अशी विचारणा समितीने केली असता उन्हाळ्यामध्ये परिस्थिती अत्यंत वाईट होती. बंधारा नव्हता, त्यावेळी तेथे पाणीच साठायचे नाही आता बंधारा बांधल्यामुळे पाणी साठते. परिणामी आपण त्याचा वापर लोकांसाठी करू शकतो असे लवासाच्या प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**२.९२** यावर समितीने बंधाऱ्यामुळे साठलेल्या पाण्याचा शेअरिंग रेश्यो काय आहे ? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी पाणी वापराच्या संदर्भात कृष्णा खोरे महामंडळाच्या समवेत करार झाला आहे, त्यानुसार त्यांनी परवानगी दिली असून गावकऱ्यांना जसे पाणी पाहिजे तसे देत आहोत असे विदित केले.

**२.९३** समितीने काल अपोलो हॉस्पिटल पाहिले. परंतु समितीला त्या हॉस्पिटलमध्ये एकही रुग्ण आढळून आला नाही. आपल्या सांगण्याप्रमाणे ते ६० बेडेड हॉस्पिटल आहे, ओपीडी आहे, औषध वाटप केले जात आहे. परंतु त्या हॉस्पिटलकडून ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा दिल्या जात नाहीत.समितीची सूचना आहे की, आपण त्या हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरू करावी. आपण या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची मदत घ्यावी. लवासामधील १८-२० गावांतील लोकांना त्या हॉस्पिटलमध्ये मोफत सुविधा मिळाली पाहिजे. मुंबईतील सर्व मोठ्या म्हणजे अंबानी हॉस्पिटल, लिलावती हॉस्पिटल अशा हॉस्पिटलमध्ये १५-२० बेड गरिबांसाठी आरक्षित ठेवलेले असतात आणि त्यांना मोफत औषधोपचार होतो. आपणही येथे मोठे हॉस्पिटल बांधले आहे. गावातील लोक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचार घेतात. मात्र ती शासनाची यंत्रणा आहे. गावांतील लोकांना हॉस्पिटलमध्ये उपचार मिळाले पाहिजेत ही बाब समितीने उपस्थित केली असता प्रतिनिधींनी भोईणीमध्ये चालविण्यात येणारे प्राथमिक आरोग्य केंद्र अपोलो हॉस्पिटलमार्फतच चालविले जाते आणि त्यांच्यामार्फतच रुग्णांना मोफत औषधे दिली जातात असा खुलासा प्रतिनिधींनी केला.

**२.९४** ती ओपीडी आहे गावातील लोकांना ऑपरेशन करण्याची, डिलिव्हरी करण्याची गरज असेल तर त्यासाठीची व्यवस्था अपोलो हॉस्पिटलमध्ये झाली पाहिजे. राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजना राबविली जाते, ती योजना आपल्या हॉस्पिटलमध्ये सुरू झाली पाहिजे आणि त्या माध्यमातून देखील गरिबांना मोफत आरोग्य सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. अपोलो हॉस्पिटल बरोबरच्या करारात असे नसेल तर आपण त्यांना सांगावे की, समितीची अशी विनंती आहे, असे केले पाहिजे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

**२.९५** यावर समितीने सांगितल्याप्रमाणे जरूर करण्यात येईल. येथे येण्यासाठी प्रत्येक हॉस्पिटल व व्यवसाय यांना विनंती करून आणावे लागते. कारण व्यवसाय अगोदर की इन्फ्रास्ट्रक्चर अगोदर असा प्रश्न पडतो. आपण त्यांच्यावर किती बंधने टाकावीत हा देखील प्रश्न असल्याचा खुलासा प्रतिनिधींनी केला.

**२.९६** लवासा येण्याअगोदर देखील येथील लोक जगत होते. परंतु तुम्ही आल्यावर त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे, आरोग्य सुधारले पाहिजे असे समितीला वाटते. अपोलो हॉस्पिटलच्या माध्यमातून राजीव गांधी जीवनदायी योजनेचा त्यांना लाभ मिळाला पाहिजे. लवासाने अपोलो हॉस्पिटल आणले आहे, ते स्वतः आलेले नाही. लवासाने त्यांच्याबरोबर करार करून त्यांना आणले आहे. हे हॉस्पिटल केवळ व्हिजिटर्ससाठी नसावे तर गावकऱ्यांसाठी देखील असावे. आपण गावकऱ्यांच्या जागेवर हे आणले आहे हे लक्षात घ्यावे. आपण गावकऱ्यांना लाभ मिळण्यासाठी डे केअर सेंटर राबवित आहात. मात्र डिलिव्हरी, छोटी-मोठी ऑपरेशन्स असतील तर ती हॉस्पिटलमध्ये झाली पाहिजेत. आपण राजीव गांधी जीवनदायी योजना हॉस्पिटलमध्ये राबवावी आणि त्याचा लाभ गावकऱ्यांना मिळावा हेच समितीचे मत असल्याचे नमूद केले असता लवासाकडून जेवढे शक्य आहे तेवढे आम्ही करीत आहोत. लवासाने मंदिरे बांधून दिली आहेत, ग्रामपंचायतींची कार्यालये, शाळा बांधून दिली आहे, शाळेसाठी बस सेवा दिली आहे, रस्ते केले आहेत. लवासाने ४१ कि.मी.चे रस्ते केले आहेत असा खुलासा लवासा प्रतिनिधींनी केला.

**२.९७** रस्त्याची कनेक्टिव्हिटी नाही असे समितीने सांगितले असता काही दुर्गम ठिकाणी रस्ते व्हायचे आहेत असा खुलासा लवासा प्रतिनिधींनी केला.

**२.९८** लवासाने शासनाकडून जागा हस्तांतरित करून घेतली आहे. जिल्हा परिषद पूर्वीसारखे रस्ते बांधणार नाही. कारण ती जागा आता लवासाची झाली आहे ही बाब समितीने उपस्थित केली असता ग्रामीण रस्ते लवासाकडे गेले आहेत सन २००१ ते सन २००८ च्या दरम्यान सर्व रस्ते हस्तांतरित केले आहेत अशी माहिती लवासा प्रतिनिधीनी दिली.

**२.९९** दासवे ते गडले रस्ता लवासाकडे आहे का ? व पानशेत ते दासवे रस्त्याची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता प्रतिनिधींनी आम्ही त्या रस्त्याच्या संदर्भात विशेष दुरुस्ती करू शकलेलो नाही असे नमूद केले.

**२.१००** यावर समितीने लोक त्या रस्त्यावरून जाऊच शकत नाहीत ही बाब स्पष्ट केली असता प्रतिनिधींनी त्या रस्त्यावरून होणारी वाहतूक अतिशय तुरळक आहे. भविष्यात त्या संदर्भात जरूर लक्ष देऊ असे समितीस विदित केले.

**२.१०१** दासवे ते मुगाव हा रस्ता देखील तसाच आहे. समितीच्या मते जवळपास ४९ कि.मी.चे रस्ते करायचे आहेत ते केव्हापर्यंत पूर्ण करणार आहात, ते लोकांसाठी केव्हा सोयीचे करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता या आर्थिक वर्षात शक्य होईल तेवढे रस्ते व्यवस्थित करणार आहोत असा खुलासा लवासा प्रतिनिधींनी केला.

**२.१०२** यावर समितीने आपण शक्य होईल तेवढे, अंदाजे असे शब्द वापरू नका. आपण हे रस्ते व्यवस्थित करणार की नाही या संदर्भात नेमके सांगावे. आपण ते रस्ते जिल्हा परिषदेकडून घेतले आहेत त्यामुळे ते व्यवस्थित करण्याची जबाबदारी आपली आहे. जिल्हा परिषदेकडे ते रस्ते करण्यासाठी पैसे नाहीत असे काही नाही. परंतु ती जागा आता आपली झाली आहे. तुम्ही तुमच्या क्षेत्रामध्ये त्यांना येऊ देत नाही. त्यामुळे ते रस्ते आपण केले पाहिजेत असे समितीचे मत असल्याचे नमूद केले व रस्त्यांच्या संदर्भात आपली अशीच भूमिका राहिली तर लवासाला देण्यात आलेले रस्ते पुन्हा ताब्यात घेण्यासाठी समितीला शिफारस करावी लागेल असेही स्पष्ट केले असता प्रतिनिधींनी आमचे रिस्ट्रक्चरिंग होत आहे. आम्हाला थोडा वेळ लागेल आपण त्या दृष्टीने आम्हाला वेळ द्यावा. रस्ते सुस्थितीत आणण्याचा जरूर प्रयत्न करण्यात येईल समितीने आम्हाला थोडा वेळा द्यावा. जेवढे शक्य आहे तेवढे आपण करणार आहोत असे समितीस विदित केले.

**२.१०३** समितीने या आर्थिक वर्षात लवासाच्या अखत्यारितील सर्व रस्ते वाहतुकीसाठी योग्य झाले पाहिजेत अशी सूचना केली. आपण समितीला तशी लेखी ग्वाही द्यावी अशी विचारणा केली असता प्रतिनिधींनी सकारात्मक उत्तर दिले व पाण्याच्या संदर्भात पूर्वी उन्हाळयात भयंकर परिस्थिती होती. आता बंधाऱ्यामध्ये पाणी साठल्यामुळे ग्रामस्थांना फायदा होत आहे असे नमूद केले.

**२.१०४** यावर समितीने आपण पाणीपुरवठा योजना केल्या नाहीत. आपण करारामध्ये म्हटले होते की, आम्ही तेथील गावांना पाणी, वीज देऊ. परंतु ते आजतागायत झालेले नाही अशी विचारणा केली असता प्रतिनिधींनी दासवे येथे नळ पाणीपुरवठा योजना सुरू केली आहे. विकास होत आहे तशा सर्व गोष्टी होणार आहेत. जेथे नळ पाणीपुरवठा योजना नाही तेथे टँकरने पाणीपुरवठा करीत आहोत असे समितीस अवगत केले.

**२.१०५** प्रकल्प सुरू करीत असताना आपण नियोजन केले असेल. त्यामुळे आता आपण रस्ते, पाणी नाही असे म्हणू शकत नाही. एकूण १८ गावांत जवळपास साडे तीन हजार लोकसंख्या आहे. आपण त्यांच्या मिळून २-३ वसाहती केल्या असत्या तर एकाच ठिकाणी सर्वांना सोयी देता आल्या असत्या. आपण तशा वसाहती प्लॅन का केल्या नाहीत ? आपल्याला त्यांना इमारती बांधून देता आल्या असत्या, पाणी, वीज इत्यादी सुविधा देता आल्या असत्या. आपले ही सर्व कामे कमी खर्चामध्ये झाली असती. आपण तसे का केले नाही ? आपल्याला एका इमारतीला पाणी देण्यास जेवढा खर्च होत आहे, तेवढ्या खर्चात १८ गावांच्या पाणीपुरवठा योजना झाल्या असत्या सर्व काही विसंगत आहे. लवासा आपली सोय पाहत आहे. आदिवासी किंवा इतर ग्रामस्थांकडे आपले लक्ष नाही असे समितीने नमूद केले असता हा प्रकल्प करीत असताना येथे गावे म्हणता येतील अशी धामणओहोळ व गडले अशी दोनच गावे होती आणि आजही ती अस्तित्वात आहेत. पूर्णपणे जमीन गेल्यामुळे लोक पुनर्वसित झाले होते. वाड्यावस्त्यांमध्ये लोक राहत होते. परंतु धामणओहोळ व गडले या दोन्ही गावठाणांना विस्थापित होण्यासाठी जागा नव्हती, त्यांची स्वतःची गावठाणे अस्तित्वात होती. आजही त्यांचे अस्तित्व आहे, त्यांना विस्थापित करून दुसरीकडे नेणे हे आमच्या अखत्यारित नाही. त्यामुळे दोन्ही गावठाणांचे अस्तित्व राहील. आमचा त्या संदर्भात कोणताही उद्देश नसल्याचा खुलासा लवासा प्रतिनिधींनी केला.

**२.१०६** तसेच गावासाठी काही करता येईल या दृष्टीने आम्ही प्रयत्न करतो. जिल्हापरिषदेची पाणी पुरवठा योजना असेल, लोकवर्गणीचा प्रश्न असेल तेथे आम्ही मदत करतो असे ही नमूद केले.

**२.१०७** प्रोजेक्ट इन्व्हॉयमेंट यांनी नमूद केले की, स्क्रीनवर एका बाजुला दासवेचे एप्रिल, २००२ चे चित्र दिसत आहे आणि बाजुला आम्ही डेव्हलपमेंट केल्यानंतरचे चित्र असत आहे. सुरूवातीला ही पडीक जमीन होती. आम्ही या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत घेऊन हा विकास केलेला आहे. त्यानंतर आम्ही दासवे डॅम केला. दासवे डॅम बांधल्यानंतर ग्रीन कव्हरमध्ये आमूलाग्र फरक झालेला दिसून येत आहे. जमीनीखालील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ झालेली आहे. स्थानिक पातळीवरील झाडांचा अभ्यास करून येथे कोणत्या प्रकारच्या झाडांच्या प्रजाती चांगल्याप्रकारे रुजू शकतील याचा अभ्यास करून त्याप्रमाणे येथे मूळ प्रजातींची लागवड केलेली आहे. आम्ही ७ लाख झाडांची लागवड केली तर ८ लाख झुडुपांची लागवड केलेली आहे. आम्ही येथे ऑरगॅनिक फार्मिंग करतो. येथे कोणत्याही प्रकारचे कीटकनाशके फवारली जात नाहीत. आमच्या येथे नर्सरी देखील आहे. महाराष्ट्र शासनाच्या मत्सव्यवसाय विभागाच्या मदतीने येथील तलावात चार लाख मत्स्य बीज टाकली आहेत. त्याशिवाय छोटी छोटी तळी केलेली आहेत. या ठिकाणी विविध पक्षी आहेत. येथील लागवडीसाठी हायड्रो सिडींगचा वापर केलेला आहे. त्याशिवाय थीमपार्कस, वॉटर पार्क, टयुरिझम पार्क केलेले आहे. छोटे छोटे पूल करताना सौंदर्यामध्ये भर पडण्यासाठी बांबुचा वापर केलेला आहे त्याचे चित्र समितीसमोर दिसत आहे.

**२.१०८** हवेतील प्रदूषण तपासण्यासाठी एक व्हॅन आहे. त्यामध्ये ॲनलायझरची सोय आहे. या संदर्भातील कम्प्लायन्स रिपोर्ट एमपीसीबीकडे पाठवित असतो. घरातील ओला आणि सुका कचरा वेगवेगळा करण्यात येऊन त्याची विल्हेवाट लावण्यात येते. घरांसाठी टू-बीन सिस्टीम तर व्हिलांसाठी थ्री-बीन सिस्टीम आहे. कचऱ्यापासून खत तयार करून ते लागवडीसाठी वापरले जाते.

**२.१०९** येथे ५ सिव्हरेज ट्रिटमेंट प्लान्ट असून त्यापैकी २ कार्यान्वित आहेत. त्याची क्षमता २.४ एमएलडी इतकी आहे. त्याचे इन्डीपेन्डंट एक्स्पर्ट करून ऑडीट करून घेण्यात येते.

**२.११०** समितीने या भागातील लोकांना कोणकोणत्या प्रकाराच्या सुविधा देण्यात येणार आहेत याचा करारानामा करण्यात आला होता. या करारनाम्यानुसार किती अटींची पूर्तता करण्यात आली, अजून किती अटींची पूर्तता करावयाची आहे लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे याबाबत विचारणा केली असता यावर प्रतिनिधींनी नमूद केले की, लोकांना घरगुती वापरासाठी एका कुटुंबाला मोफत ४०० लीटर पाणी देण्यात येते. परंतु कर्मिशिअल वापरासाठी वॉटर पॉलिसी फायनल करीत आहोत.

**२.१११** लवासाने लोकांच्या जमीनी बळकावल्या असा आरोप करण्यात येतो, लवासाने सर्व पेमेंट चेकने केलेले आहे व डॉक्युमेंट रजिस्टर्ड केलेले आहे. त्यानंतरच जमीन आमच्या नावावर झालेली आहे. लवासाने कोणताही व्यवहार कॅशने केलेला नाही. या ठिकाणी ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी येणार होती. परंतु त्याच दरम्यान लंडनच्या संडे टाईम्स या दैनिकात लवासा येथे आदिवासींच्या जमीनी बळकाविण्यात येत आहेत अशी बातमी आली. या बातमी विरुद्ध आम्ही न्यायालयात दावा दाखल केला आणि निकाल आमच्या बाजुने लागला. त्यावर संडे टाईम्सने आमची माफी देखील मागितलेली आहे. न्यायालयाने संडे टाईम्सला लवासा कंपनीची बदनामी केल्याबद्दल जो दंड ठोठावला होता ती रक्कम आम्ही शाळेला दिली आहे.

**२.११२** समितीने एक हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर बांधकाम करण्यात आलेले आहे, ते बांधकाम आपण तोडले काय? दुसरे म्हणजे येथे भेट देणाऱ्या लोकांकडून १०० रुपये एन्ट्री फी आकारली जाते त्यावरील सर्व्हीस टॅक्स शासनाकडे जमा करता काय? याबाबत विचारणा केली असता समितीने प्रतिनिधींनी लवासा सिटीला भेट देणाऱ्या लोकांकडून आम्ही चारचाकी वाहनासाठी १०० रुपये तर मोटारसायकलसाठी ३० रुपये पार्किंग चार्जेस घेतो. स्थानिक गावकऱ्यांकडून कोणतीही रक्कम आकारण्यात येत नाही असे नमूद केले.

**२.११३** लवासाने एक हजार मीटर उंचीवर लवासा सिटीचे एन्ट्रीगेट उभारलेले आहे. त्या गेटला शटर नाही ते सिम्बॉलिक आहे. आम्हाला तो गेट तोडण्याचे आदेश दिलेले नाहीत आणि आम्ही ते गेट तोडू असे कोणाला लिहून दिलेले नसल्याचेही प्रतिनिधीनी समितीस अवगत केले.

**२.११४** यावर समितीने आपल्यावर एक हजार मीटर उंचीचे बंधन टाकलेले आहे. एका हॉटलने डी. सी. रुल्सचे व्हॉयलेशन केलेले आहे याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी सन २००४ मध्ये हे बांधकाम केलेले आहे. पण सरकारने अजून कन्डोन केलेले नाही. डायरेक्टर, टाऊन प्लानिंगकडे फाईल प्रलंबित आहे असे नमूद केले.

**२.११५** समितीने तुम्ही जे नकाशे पास करता ते ३ महिन्यांत सहायक संचालक, नगर रचना विभाग, पुणे यांना दाखविणे बंधनकारक आहे. आपण त्यांना अशाप्रकारे केव्हापासून सर्व माहिती देत आहात ? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी लवासा कॉर्पोरेशनला एसपीए म्हणून नियुक्त केले. त्यावेळी एक अट अशी घातली की, लवासा कॉर्पोरेशनने बांधकामाला परवानगी दिल्यानंतर ३ महिन्यांच्या आत त्या संदर्भातील कागदपत्रे एडीटीपी यांना दिली पाहिजेत. त्याप्रमाणे लवासा कॉर्पोरेशनने त्यांना २३ वेळा कागदपत्रे दिली आहेत. सन २००८ नंतर ३ महिन्यांच्या आत हे सर्व दिले आहे. आम्ही सन २००९ पासून सुरूवात केली, तेव्हापासून एसपीएने घेतलेल्या सर्व बांधकामांच्या परवानगीची माहिती एडीटीपी यांना दिली आहे असे नमूद केले.

**२.११६** यावर समितीने आपला एडीटीपी बरोबर काही पत्रव्यवहार झाला आहे का? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी सन २०१० ला पत्रव्यवहार झाला होता. त्यावेळी त्यांनी नऊ मुद्दे लिहून दिले होते आणि आम्ही त्याचे पूर्ण स्पष्टीकरण त्यांना दिले आहे. मात्र त्यानंतर शासनाने आमच्याकडे कोणताही पत्रव्यवहार करून कोणताही मुद्दा उपस्थित केलेला नाही. गेल्या ३ तारखेला त्यांचे पत्र आले असून त्यामध्ये काही मुद्दे उपस्थित केले आहेत. आम्ही त्या मुद्यांचे पूर्णतः स्पष्टीकरण दिले आहे असे विदित केले.

**२.११७** समितीने लवासाचा सन २००८ पूर्वीचा डीपी आहे, त्याप्रमाणे काम सुरू आहे की एसपीए म्हणून नवीन प्लॅन तयार केला आहे? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी आम्ही सन २०११ मध्ये मास्टर प्लॅन तयार केला, तो जाहीर केला, सूचना व हरकती मागविल्या आणि तो प्लॅन शासनाकडे मान्यतेसाठी दिला अशी माहिती समितीस दिली.

**२.११८** यावर समितीने आपण करीत असलेले बांधकाम सन २०११ च्या प्रस्तावित प्लॅनप्रमाणे करीत आहात की जुन्या प्लॅनप्रमाणे करीत आहात? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ४६ प्रमाणे एसपीए म्हणून आम्ही बांधकामांना परवानगी देतो. प्लॅन तयार केला आहे, जाहीर केला आहे, त्यानुसार परवानगी दिली पाहिजे आणि त्याप्रमाणे परवानगी दिली जाते असे नमूद केले.

**२.११९** आपण बांधकामांना जुन्या प्लॅनप्रमाणे मंजुरी देता की अजुनपर्यंत शासनाने मंजूर न केलेल्या प्लॅनप्रमाणे मंजुरी देता? आपण प्लॅन तयार केला, जाहीर केला, सूचना व हरकती मागविल्या आणि तो शासनाकडे ॲप्रूव्हलसाठी सादर केला, तो प्लॅन अजुनपर्यंत मान्य झालेला नसल्यामुळे त्याप्रमाणे तुम्ही बांधकाम करू शकत नाही. त्यामुळे आपल्याला जुन्या प्लॅनप्रमाणेच बांधकामांना मंजुरी देणे बंधनकारक आहे असे समितीने अभिप्राय व्यक्त केले असता प्रतिनिधींनी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ४६ मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, जो प्लॅन मंजूर केला आहे, जाहीर केला आहे, या सर्व गोष्टींचा विचार करून बांधकामांना परवानगी देण्यात यावी हे स्पष्ट केले.

**२.१२०** यावर समितीने एसपीएने मंजूर केलेले नकाशे विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत मंजूर होतात, ते तुम्ही पाठविल्यानंतर सहायक संचालक, नगर रचना हे असहमत झाले होते. परंतु तरीही त्या गोष्टी केल्या आहेत. काही डिस्पुट होते अशी समितीची माहिती आहे. नगर रचना विभागाने आक्षेप घेऊनही त्या गोष्टींमध्ये काही बदल करण्यात आलेले नाहीत हे खरे आहे का ? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी सन २०११ मध्ये ९ मुद्दे उपस्थित केले होते, त्यातील एक मुद्दा असा होता की, आपण अजून प्लॅन जाहीर केला नाही, सर्व परवानग्या पाठविल्या. परंतु फक्त २ परवानग्यांना उशीर झाला आहे. आम्ही त्या सर्व मुद्यांचे स्पष्टीकरण दिले आहे. आम्ही ते स्पष्टीकरण दिल्यानंतर शासनाकडून लवासाला कोणत्याही प्रकारचे पत्र आलेले नाही असा खुलासा केला.

**२.१२१** झालेल्या चर्चेनुषंगाने समितीने समितीची भूमिका स्पष्ट करताना नमूद केले की, ग्रामस्थांच्या अडचणी लक्षात आल्या पाहिजेत, त्यावर तोडगा निघाला पाहिजे म्हणून समिती आली आहे. शेवटी सर्वांचीच इच्छा आहे की, लवासा झाले पाहिजे. परंतु त्याचबरोबर ग्रामस्थांच्या सोयीसुविधांकडेही लक्ष दिले पाहिजे. आपण ग्रामस्थांना जे काही कमिट केले आहे त्याचे पूर्ण पालन कराल अशी अपेक्षा आहे.

**२.१२२** लवासा झाला पाहिजे असे समितीचे मत आहे परंतु समितीच्या सूचनांना गंभीरतेने घ्यावे आणि ग्रामस्थांना कबूल केल्याप्रमाणे सोयीसुविधा द्याव्यात. ग्रामस्थांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होता कामा नये असे मत समितीने व्यक्त केले.

यानंतर समितीने फक्त जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली.

**२.१२३ एलसीएल या प्रकल्प विकासकाला विशेष नियोजन प्राधिकाऱ्याचा (एसपीए) दर्जा प्रदान करणे :-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात एसपीएची बॉडी कॉन्स्टिट्यूट केली आहे, त्यामध्ये विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, संचालक, नगर रचना विभाग, पुणे यांची काय भूमिका आहे, त्यांचे काय अधिकार आहेत या संदर्भात समितीने विचारणा केली असता एमआरटीपी ॲक्टच्या कलम ४०(१ब) अन्वये लवासा कंपनीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली. लवासा हे विशेष नियोजन प्राधिकरण आहे आणि त्यामध्ये सर्व एसपीएचेच सदस्य आहेत, फक्त राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगर विकास विभाग हे सदस्य आहेत असे प्रतिनिधींनी नमूद केले.

**२.१२४** यावर समितीने एसपीएमध्ये किती जणांची समिती आहे? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी तसे काहीही नमूद केलेले नाही अशी माहिती दिली.

**२.१२५** यावर समितीने संचालक, नगर रचना विभाग यांच्या व्यतिरिक्त शासनाचे प्रतिनिधी म्हणून त्यामध्ये कोणीही नाही का ? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी नकारात्मक उत्तर दिले. मात्र एसपीए नकाशे व आराखडे मंजूर करील, ते ३ महिन्यांच्या आत सहायक संचालक, नगर रचना विभाग यांच्याकडे पाठवेल असा नियम आहे.

**२.१२६** यावर समितीने एसपीएने ३ महिन्यांच्या आत मंजूर केलेले नकाशे व आराखडे सहायक संचालक, नगर रचना विभाग, पुणे यांच्याकडे पाठवायचे आहे. मात्र त्यांना त्यामध्ये त्रुटी दिसल्या तर तरतुद काय आहे? याबाबत समितीने विचारणा केली असता प्रतिनिधींनी सदर बाबतीत लिगल ॲक्शन घेण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना कळवायचे आहे असे नमूद केले.

**२.१२७** यावर समितीने लवासा कंपनीने एसपीए झाल्यानंतर नकाशे व आराखडे या संदर्भात २३ वेळा प्रस्ताव पाठविले होते. मात्र नगर रचना विभागाने एकदा त्रुटी काढली आणि आता समिती आली म्हणून दुसऱ्यांदा सप्टेंबरमध्ये त्रुटी काढली.

**२.१२८** अगोदर त्यांनी जे बांधकाम केले आहे, त्या संदर्भात नगर रचना विभागाने त्यांच्यावर काही ॲक्शनच घेतलेली नाही. फ्लडलाईनमध्ये, पाणलोट क्षेत्रात किंवा सिंचनाच्या क्षेत्रात बांधकामे केली आहेत किंवा प्रस्तावित रूंदीकरणाचे बांधकाम केले आहे त्यासंबंधी काय ॲक्शन घेण्यात आली आहे ? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी दिनांक ७ जून २००८ ला जिल्हाधिकाऱ्यांनी शेवटचा प्लॅन मंजूर केला, त्यामध्ये हे क्षेत्र वगळण्यात आले आहे. लवासाची दिनांक १२ जून २००८ ला एसपीए म्हणून नेमणूक झाली, त्यानंतर त्यांनी यावर देखील बांधकाम प्रस्तावित केले आहे आणि आता तो कोर्ट मॅटर आहे याबाबत समितीस अवगत केले.

**२.१२९** यावर समितीने कोर्ट मॅटर आपण केला की लवासाने केला आहे? याबाबत विचारणा केली असता लवासाने कोर्ट मॅटर केला आहे असे प्रतिनिधींनी सांगितले.

**२.१३०** यावर समितीने समितीवर संचालक, नगर रचना विभाग, पुणे हे असताना असे होत असून सन २००८ मध्ये लवासाची एसपीए म्हणून नेमणूक झाली. एचसीसी कंपनीने बांधकाम केले एचसीसीची लवासा कॉर्पोरेशन ही सबसिडीअरी कंपनी आहे. सबसिडीअरी कंपनीला एसपीए म्हणून नेमले. एसपीएमध्ये प्लॅनरसहित सर्वजण लवासाचे आहेत. फक्त शासनाचे संचालक, नगररचना विभाग हे सदस्य आहेत. सन २००८ मध्ये एसपीएने अगोदरचे बांधकाम रेग्यूलराईज केले म्हणून ते कोर्टात गेले. संचालक, नगररचना विभाग हे सदस्य असुनही बेकायदेशीर काम चालत असेल तर त्यांनी त्याचे रिपोर्टिंग शासनाला केले पाहिजे होते असे मत समितीने व्यक्त केले.

**२.१३१** पाणलोट क्षेत्रामध्ये बांधकाम झाले. सन २००९ मध्ये नवीन एसपीएने त्याला परवानगी दिली ह्या सर्व बाबी समितीने निदर्शनास आणल्या असता जिल्हाधिकाऱ्यांनी ते वगळले होते. मात्र एसपीए फॉर्म झाल्यावर त्यांनी तेथे बांधकाम केले. आमच्याकडे दिनांक १२ जानेवारी २०११ ला म्हणजे ३ महिन्यांनी सबमीट करायचे होते, ते त्यांनी अडीच वर्षांनी सबमीट केले असा खुलासा प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

**२.१३२** याबाबत समितीने आपण त्या संदर्भात आक्षेप घेतले का ? अशी विचारणा केली असता प्रतिनिधींनी हकरत घेतल्याचे नमूद करुन चौकशी करण्यात आल्याचे समितीस विदित केले.

**२.१३३** यावर समितीने तुम्ही आक्षेप घेतला मग त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी काय कारवाई केली? याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी नोटिफिकेशनच्या परिच्छेद क्रमांक ५ मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "The Special Planning Authority shall follow the Development Control Regulations and the provisions of the sanctioned Regional Plan and amendments made to it from time to time. Any violation in Development Control Regulation and provision of Regional Plan shall be liable for legal action by the Collector, Pune." एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५६ अन्वये कारवाई करण्यात येते, ते येथे अनुज्ञेय आहे. मल्टिपल ऑथोरिटी असल्यामुळे आणि पुढील कार्यपध्दती स्पष्ट नसल्यामुळे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. दिनांक ०७ जानेवारी २००९, दिनांक २२ ऑक्टोबर २०१०, दिनांक ३० ऑगस्ट २०१०, दिनांक ०९ ऑगस्ट २०१० ला त्रुटी आढळली, त्यांनी त्यानंतर त्यांना कळविले, त्यानंतर ते म्हणतात की, आम्ही खुलासा सादर केला आहे. त्यामुळे हे प्रकरण तेथेच राहिले आहे. मुख्य कारण म्हणजे याला संचालक, नगररचना विभाग, पुणे हेच परवानगी देत आहेत असे समितीस अवगत केले.

**२.१३४** समितीने खुलासा कोणाला सादर करण्यात आला ? अशी विचारणा केली असता एडीटीपीकडून त्यांना त्रुटी कळविण्यात आल्या. लवासा कॉर्पोरेशन म्हणत आहे की, आम्ही त्यांना उत्तर दिले आहे. परंतु उत्तर समाधानकारक आहे की नाही हे पाहून उत्तर समाधानकारक नसल्यास त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई केली पाहिजे, या संदर्भात स्पष्टता झाली नाही. २-३ वर्षे प्रकरण तसेच राहिले. जुलै, २०१४ मध्ये तत्कालीन लोकलेखा समितीसमोर साक्ष झाली. त्यावेळी देखील हा मुद्दा उपस्थित झाला होता की, एसपीएने सॅक्शनड् प्लॅन वेळोवेळी एडीटीपीकडे पाठविला नाही किंवा त्यांनी तो तपासणी करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला नाही किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव आला तर पुढची कारवाई झाली नाही. तसेच कार्यालयाने डीटीपीला कळविले की, आतापर्यंत किती प्रस्ताव प्राप्त झाले, त्यामध्ये काही त्रुटी आहेत, किती केसेस रेग्युलर करण्यासारख्या आहेत, किती केसेसमध्ये तोडकाम करणे आवश्यक आहे.त्याबाबत कोणती ॲक्शन घ्यावी हे आपण आम्हाला सुचवावे. या ठिकाणी असल्यामुळे त्यांच्याकडून डायरेक्ट सॅक्शन मिळते. स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीमध्ये टाऊन प्लानिंगचे प्रतिनिधी आहेत. आपण ज्या त्रुटी काढल्या आहेत त्याची आपण त्यांना माहिती द्यावी. दोघांनी संयुक्त स्पॉट व्हिझीट करावी. त्यानंतर आपण शेवटच्या निष्कर्षापर्यंत पोहोचून आम्हाला मत कळवावे म्हणजे यापुढे कोणती कार्यवाही करावयाची आहे हे आम्ही आपणास गाईड करतो. एसपीएचे अधिकारी आणि ते पुढील एकदीड महिन्यात संयुक्त व्हीझीट करतील. ज्या केसेसमध्ये रेग्युलरायझेशन होऊ शकते त्या ठिकाणी दंडात्मक कारवाई करून ते रेग्युलराईज करू शकतो. जर तोडकाम करणे आवश्यक असेल तर तोडकाम करावे लागेल अशी माहिती समितीस दिली.

**२.१३५** या अनुषंगाने समितीस दिलेल्या पुस्तिकेतील "तीन महिन्याच्या आत सहायक संचालक नगररचना यांच्या निदर्शनास आणून परवानगी द्यायची आहे " हा मजकूर नमूद करून त्यामुळे विशेष नियोजन प्राधिकरणावरील राज्य शासनाचे नियंत्रण नाही. या मुद्यामध्ये तथ्य दिसून येत नाही." पण जे काही घडले त्यामध्ये स्पष्टपणे राज्य शासनाचे नियंत्रण कागदोपत्री आहे. पण प्रत्यक्षात नाही. आपल्या विभागाने निष्काळजीपणे व्यवहार केलेला आहे. वेळकाढूपणाचे धोरण घेतले. अडीच वर्षानंतर प्रस्ताव सबमीट केला. त्यानंतर चार वर्षे झाली तरी अजूनपर्यंत कोणती कामे रेग्युलराईज करता येतील हे अजून ठरलेले नाही. हे ठरविल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना कारवाई करता येईल. यामध्ये नगररचना विभागाची भूमिका संदिग्ध आहे असे समितीला स्पष्टपणे जाणवते अशी भावना समितीने व्यक्त केली.

**२.१३६** १२ हेक्टर हे कमी क्षेत्र नाही जिल्हाधिकाऱ्यांनी जे क्षेत्र ले-आऊट वगळा असे सांगितलेले असताना त्या क्षेत्रावर बांधकाम होत आहे आणि आपण त्या बांधकामावर ॲक्शन घेतलेली नाही ही बाब समितीने निदर्शनास आणली असता यामध्ये डायरेक्टरचा कुठेही सहभाग नाही असे प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**२.१३७** जेव्हा एसपीएची रचना करण्यात आली त्यामध्ये नगररचना विभागाचा एक प्रतिनिधी त्यामध्ये घेतलेला आहे. एखादी गोष्ट नियमाला धरून होत नसेल तर तो प्रतिनिधी तसे सांगतो. जेव्हा एसपीएची बैठक होत असेल त्यावेळी आपल्या प्रतिनिधीनी सरकारची बाजू मांडणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी तशी बाजू मांडलेली नाही. स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीच्या जितक्या मिटींग्ज झाल्या त्याचे मिनिटस तपासण्याची आवश्यकता आहे. अेडीटीपीने त्यांचे रिपोर्टस जिल्हाधिकाऱ्यांना दिल्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली ? आपल्या ताब्यात २३ हजार हेक्टर जमीन येणार आहे. त्या जिल्ह्यामध्ये सिटी वसत आहे. तेव्हा अडीटीपीकडून माहिती येत नसेल तर ती गंभीर बाब आहे. तेव्हा स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीच्या जेवढ्या मिटिंग्ज झाल्या त्याचे मिनिटस समितीकडे दिले पाहिजेत असे अभिप्राय समितीने व्यक्त केले असता विशेष नियोजन प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त समितीस सादर करण्यात आले.

**२.१३८** आतापर्यंत स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटीच्या किती बैठका झाल्या याची माहिती अधिकारी देऊ शकत नाही. SPA वर आपला एक प्रतिनिधी असतो. आपल्या विभागाचे संचालक किती बैठकींना हजर होते ही माहिती आपल्याकडे असणे आवश्यक होते. अधिकारी समितीला अपेक्षित माहिती देऊ शकले नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता प्रतिनिधींनी सॅक्शन पोझलमध्ये डायरेक्टरचे मत कुठेही नाही. एसपीएच्या डयुटीज आणि फंक्शन्स काय असाव्यात यापुरता ते सदस्य आहेत अशी माहिती प्रतिनिधींनी समितीस दिली.

**२.१३९** सहायक संचालक, नगररचना, पुणे यांनी दोन महिन्यापूर्वीच या पदाचा कार्यभार स्वीकारलेला आहे ही बाब समितीच्या निदर्शनास आणली असता यांनी संचालकांना सुद्धा मिटींगला बोलाविले पाहिजे होते. समितीची प्रतिष्ठा अधिकारी लक्षात घेत नाहीत असे समितीला वाटते असे मत समितीने व्यक्त केले.

एसपीएचे सदस्य असल्यामुळे संचालकांनी बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. पण दुर्दैवाने तसे झाले नाही याबाबत प्रतिनिधींनी समितीसमोर दिलगिरी व्यक्त केली व एसपीएने अेटीडीपीला सादर केलेला अहवाल आणलेला आहे. त्यामध्ये कोणत्या त्रुटी होत्या याची देखील माहिती त्यांनी आणलेली आहे. आतापर्यंत SPA च्या किती बैठका झाल्या, त्यापैकी किती बैठकींना संचालक हजर होते याची माहिती दोन दिवसांत समितीला सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

**२.१४०** यावर एसपीएने मागील पाच सहा वर्षात जेवढे प्रस्ताव मंजूर केले आहेत त्याची सखोल चौकशी करावी व जेथे जेथे उल्लंघन झालेले आहे त्याची माहिती सादर करावी. समिती पुन्हा मुंबईला सचिवांची साक्ष घेणार आहे, तेव्हा पुढील एक महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रकरणे कारवाईसाठी प्रस्तावित झाली पाहिजे अशी समितीची भूमिका स्पष्ट केली असता प्रतिनिधींनी यानुषंगाने कार्यवाही करण्याचे समितीस आश्वासित केले.

**३.१** समितीने ग्रामस्थांसोबत चर्चा केली. त्यावेळी समितीला अशी माहिती मिळाली की, आपण पाण्यावर प्रक्रिया न करता प्रदूषित पाणी तसेच बाहेर सोडता. ते पाणी गुरांसाठी धोकादायक आहे लवासाने झिरो डिस्चार्ज केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

**३.२** गावकऱ्यांच्या जमिनी संदर्भात अनेक तक्रारी आहेत. एका गावकऱ्याने सांगितले की, त्यांचे वडील मयत झाले असताना त्यांच्या नावाने व्यवहार रजिस्टर्ड झालेला आहे. समितीकडे आलेल्या तक्रारी आम्ही आपल्याकडे देतो. आपण त्याबाबत शक्य असल्यास सुनावणी घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. कारण काही लोक लवासाच्या बाजूने बोलत होते. काही लोकांना अजून पाणलोट क्षेत्राचा परतावा मिळालेला नाही. लोकांची भावना आहे की, त्यांना काही मिळाले नाही, त्यांच्या जमिनी लाटल्या गेल्या त्याची चौकशी करावी.

**३.३** बुडीत क्षेत्रावर बांधकाम होत नाही. एकांत हॉटेल हे पांदणवर उभारले आहे या सर्व बाबी समितीने नमूद केल्या व एखाद्या कामाचे उल्लंघन झाले असेल तर त्यावर कारवाई करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. SPA स्वतंत्र असली तरी त्यांच्या कामाचा त्रैमासिक अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी मागितला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

लवासाला थंड हवेच्या ठिकाणाचा दर्जा दिलेला आहे दरवर्षी जवळपास १३ लाख पर्यटक या थंड हवेच्या ठिकाणाला भेट देत असतात. पर्यटकांच्या भेटीमुळे लवासाला आतापर्यंत किती महसूल मिळाला आहे याची माहिती समितीला सादर करण्यात यावी. शासन व लवासा कॉर्पोरेशन यांच्यामध्ये झालेल्या करारात कोणत्या अटी व शर्ती होत्या, करारातील अटी व शर्ती यांमधील कोणत्या अटी व शर्तींची पूर्तता लवासा कॉर्पोरेशनने केली आहे किंवा त्यांचे उल्लंघन/भंग केला आहे या संदर्भातील माहिती समितीला सादर करण्यात यावी. असे निदेश दिले.

**३.४** सदर बाबतीत २ टक्के नजराणा रक्कम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तो निर्णय कोणत्या अधिकारात घेण्यात आला आहे या संदर्भातील माहिती देखील समितीला सादर करण्यात यावी असे निदेश दिले.

**३.५** यावर प्रतिनिधींनी भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी औद्योगिक कारणाकरिता पाहिजे असतील तर कुळ कायद्याच्या कलम ६३ ए प्रमाणे कोणतीही पूर्वपरवानगी न घेता देखील जमिनी खरेदी करता येतात. जमिनी खरेदी करून १ महिन्याच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करून २ टक्के नजराणा रक्कम भरण्याची तरतूद आहे. सदर कायद्यात सन १९९४ मध्ये सुधारणा करण्यात येऊन औद्योगिकीकरण वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असा खुलासा केला.

**३.६** ६ प्रकरणांमध्ये २ टक्के रक्कम भरण्यात आली आहे. २ प्रकरणांच्या संदर्भात अगोदर परवानगी घेतली नाही म्हणून ५० टक्के नजराणा रक्कम भरावी लागली आहे ही बाब समितीच्या निदर्शनास आणली.

**३.७** समितीने आदिवासींच्या जमिनींच्या ९८ हेक्टर जमिनीपैकी फक्त १४ हेक्टर जमिनीचा निर्णय झाला आहे याबाबत विचारणा केली असता प्रतिनिधींनी ८४ हेक्टर जमिनीची ४ प्रकरणे प्रलंबित आहेत. ही प्रकरणे १ महिन्याच्या आत नियमाप्रमाणे निकाली काढण्याचे कबूल केले आहे असे नमूद केले.

**३.८** यावर आदिवासीच्या जमिनीच्या संदर्भात कायदे मंजूर झाले आहेत, त्यानुसार कार्यवाही झाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

लवासा कॉर्पोरेशनचे म्हणणे आहे की, १ हजार मिटरपेक्षा जास्त उंचीचा फक्त गेट आहे. प्रशासनाने या संदर्भातील वस्तुस्थिती समितीला कळवावी. केंद्र सरकारच्या वन व पर्यावरण विभागाने २०४८ हेक्टर जमिनीवर बांधकाम करण्यास मान्यता दिली आहे आणि त्याच्या पलीकडे कोणतेही बांधकाम केलेले नाही असे लवासा कॉर्पोरेशनने सांगितले आहे. परंतु ग्रामस्थांचे म्हणणे असे आहे की, लवासा कॉर्पोरेशनने त्या मर्यादेच्या पलीकडेही पुष्कळसे बांधकाम सुरू केले आहे. सदर प्रकरणी वस्तुस्थिती काय आहे, केंद्र सरकारच्या वन व पर्यावरण विभागाच्या अटी व शर्ती यांचा भंग होत आहे का याचीही माहिती घेऊन समितीला सादर करण्यात यावी. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, इनामी जमिनी लवासाला कशा हस्तांतरित करता येतील ? ग्रामस्थांचे म्हणणे असे होते की, शेतकऱ्यांना देण्यात आलेली जमीन परस्पर हस्तगत करून लवासा कॉर्पोरेशनला देण्यात आली आहे. आपल्याकडून ही कार्यवाही कोणत्या नियमाखाली करण्यात आली याचीही माहिती समितीला सादर करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता प्रतिनिधींनी वर्ग-२ च्या जमिनी असल्यामुळे सदर बाबतीतील नोंद नव्हती. तत्संदर्भात दंड आकारून ते नियमित करण्यात आले आहे. १२ कोटी रूपये प्राप्त झाले आहेत असे समितीस अवगत केले.

**३.९** जिल्हा प्रशासनाकडून लवासा कॉर्पोरेशनला अनेक नियम बाजूला ठेवून रिट्रॉस्पेक्टिव्ह सूट देण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने भविष्यात शासनाला लवासा कॉर्पोरेशनकडून किती महसूल मिळेल याचाही अंदाज काढून त्याची माहिती समितीला सादर करण्यात यावी. समिती सर्व बाबींचा सर्वंकष विचार करून अंतिम निर्णय घेणार आहे. आतापर्यंतच्या चर्चेत असे निष्पन्न झाले आहे की, लवासा कॉर्पोरेशनला म्हणजेच एसपीएला ब्लँकेट अधिकार देण्यात आले आहेत आणि शासनाचे टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट मात्र झोपले आहे. समिती या संदर्भात गंभीर आहे. सदर बाबतीत जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर काही सोक्षमोक्ष झाला पाहिजे अशी समितीची अपेक्षा असल्याचे समितीने बैठकीच्या शेवटी प्रकर्षाने नमूद केले.

**३.१०** समितीने अधिक माहिती व सद्यःस्थिती जाणून घेण्याकरिता विभागीय सचिवांची तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी लवासा येथे दिनांक ११ व १२ सप्टेंबर, २०१५ रोजी समितीच्या अभ्यास दौऱ्याच्या वेळी घेण्यात आलेल्या बैठकीत प्रशासनाच्यावतीने संचालक, नगररचना, जिल्हाधिकारी, पुणे व विभागीय आयुक्त, पुणे उपस्थित होते. सदरील अभ्यास दौऱ्यामध्ये बरीच माहिती समितीस प्राप्त झाली होती व त्यानुषंगाने बैठकीस उपस्थित संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना समितीने सूचना दिल्या होत्या. तसेच, सदर अभ्यास दौऱ्याच्या वेळी समितीस ३२ लोकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्यासंदर्भात जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी यांना कार्यवाही करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. आदिवासींची जमीन परत घेण्याबाबतच्या विषयाचे एक पत्र समितीस प्राप्त झालेले असून इतर प्रकरणी कोणताही अहवाल अद्याप समितीस प्राप्त झालेला नाही. लवासा येथे स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटीनंतरच्या कालावधीमध्ये एमआरटीपी ॲक्ट झालेला आहे, त्याबाबत एडीटीपीकडून कोणती माहिती घेण्यात आली आहे, त्याबद्दल जिल्हाधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली याबाबतचा संपूर्ण आढावा सादर करण्याबाबत समितीने सूचना दिली होती. परंतु अद्याप कोणताही अहवाल समितीस प्राप्त झालेला नाही. या संदर्भात विभागाने आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी ते मांडावे. असे निदेश समितीने दिले.

**३.११** या अनुषंगाने माहिती देताना जिल्हाधिकारी, पुणे यांनी समितीस असे विदित केले की, लोकलेखा समितीच्या लवासा येथील अभ्यास दौऱ्या दरम्यान सन्माननीय समिती सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये ११ मुद्दयांचा समावेश होता त्यावर प्राथमिक छाननी करण्यात आली असून त्याची माहिती घेण्यात येत आहे. सदर प्रकरणी काही विषयाबाबत इंटर डिपार्टमेंटल कोऑर्डिनेशनचा प्रश्न असल्याने त्यासंदर्भातील माहिती त्यांचेकडून प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू असून त्याबाबतची माहिती समितीस वेळोवेळी अवगत करून देण्याची दक्षता घेण्यात येईल. तसेच, समितीच्या दौऱ्याच्या वेळी एकूण ३१ निवेदने ग्रामस्थ व जन आंदोलकामार्फत प्राप्त झाली होती. सदरील प्रत्येक निवेदनामध्ये एका पेक्षा अधिक मुद्दयांचा समावेश होता. सदरील निवेदने महसूल व वन विभाग, जिल्हा परिषद व नगररचना या विभागांशी संबंधित असल्याने त्यांचेकडे ती पाठवण्यात आली आहेत. प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करून देण्यात आली असून त्याबाबतचे एक रजिस्टर तयार करण्यात आले आहे. सदरील तक्रारींचे निवारण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याची दक्षता घेण्यात येईल. सदर तक्रारींचा गोषवारा तयार करण्यात आला आहे.

**३.१२** लवासा प्रकल्पाच्या संदर्भात ज्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. यामध्ये रस्त्यांच्या तक्रारी असतील, तेथील लोकांना रस्ते तयार करून देण्यात येतील असे सांगितले असेल व रस्ते करण्यात आले नसतील, किंवा त्यांना जो निधी देण्यात येणार होता तो निधी मिळाला नसेल यासंदर्भात काही तक्रारी असतील. या सर्व तक्रारीच्या संदर्भात कारवाई करणे अपेक्षित आहे. लवासा कंपनीच्या विरोधात ज्या तक्रारी आहेत त्या शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत काय? याबाबत शासनाने लवासा कंपनीला नोटीस दिली आहे काय ? याबाबत पुढे काय कारवाई करण्यात आली आहे. ज्या तक्रारी आल्या त्यांचे निरसन करण्यात आले आहे काय? तसे केले नसेल तर यासंदर्भातील गाईडलाईन्स समिती विभागाला देऊ शकेल असे समितीने विभागास सांगितले.

**३.१३** सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे तक्रारीच्या अनुषंगाने माहिती घेतली असता लवासामध्ये १२.३६ हेक्टर बुडीत क्षेत्रातील जागा होती. सन २००८ मध्ये हा ले-आऊट न्यायप्रविष्ठ होता परंतु यामध्ये एसपीएने बांधकाम परवानगी दिली. जिल्हाधिकारी यांच्याकडे जागेबाबत प्लॅन सादर केला होता परंतु एनए परवानगी घेण्यात आली नव्हती. लवासा कंपनीला विचारणा करण्यात आली होती की, टाऊन प्लॅनिंगचे ओपिनियम घेण्यात आले होते काय? याबाबत कंपनीने त्यांच्या खुलाशात अशी माहिती सादर केली होती की, सन २००८ मध्ये एसपीए गठीत झाली होती. त्यांनी या जागेचा ले-आऊट नकाशा मंजूर केला होता. सदर प्रकरणाबाबत हायकोर्टाने आदेश दिले होते. त्या आदेशामध्ये कंन्स्ट्रक्शन कंपनीला स्वतःच्या रिस्कवर बांधकाम करावयास मुभा देण्यात आली होती असा खुलासा जिल्हाधिकारी, पुणे यांनी केला.

**३.१४** सन्माननीय समिती सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी जी तक्रार केली आहे त्याबाबत विभाग सहमत आहे काय. सन २००८ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी एसपीएने दिलेला प्लॅन मंजूर केला असे विभाग सांगत आहात ही बाब शासनाने मान्य केली होती काय? या अनुषंगाने काय करता येईल हा मूळ प्रश्न आहे. या प्रश्नाबाबत शासनाची काय भूमिका आहे, शासनाची काही वेगळी भूमिका आहे काय? १२ हेक्टर क्षेत्रावर प्लॅन मंजूर न करता बांधकाम केले आहे. सन २००८ मध्ये एसपीए ने जो प्लॅन मंजूर केला त्याला शासनाची परवानगी मिळालेली नाही. तो प्लॅन अजूनही शासनाच्या विचाराधीन आहे. त्याला गृहीत धरून बांधकाम करण्यात आले आहे. यासाठी अद्याप किती वर्षे लागणार आहेत अशी विचारणा समितीने केली असता सन २००८ मध्ये ले-आऊट मंजूर झाला. त्या नंतर कलम ११५(३) नुसार विशेष नियोजन प्राधिकरण तयार करून विकास प्रारूप आराखडा तयार केला या दोन्ही मध्ये जे नियम होते ते लागू राहिले आहे. यामध्ये कायदेशीर स्थिती सकृतदर्शनी अशी दिसते की, त्यांना हे बांधकाम करणे शक्य नव्हते. सन २००८ मध्ये लवासामध्ये बांधकामासाठी जी जमीन होती ती विकत घेण्यात आली आहे. तेव्हा सन २००८ मध्ये त्या क्षेत्रावर विकास करण्यात येत आहे असे दाखविण्यात आले होते. यामध्ये बदल झाला तेव्हा वेगळा आराखडा होता असे सकृतदर्शनी त्या ठिकाणी दिसत आहे. एसपीए तयार झाल्यानंतर एखाद्या नियोजन प्राधिकरणाला अधिकार दिले जातात परंतु त्यांच्याकडून प्लॅन मंजूर केला जात नाही. त्या ठिकाणी नियमानुसार एखादे काम होत नसेल तर कारवाई करण्याची आवश्यकता असते. आता एसपीए तयार झाले आहे. त्यामुळे नियमानुसार परवानगी देणे हा एक भाग झाला ती एसपीए देत आहे. परवानगीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले. तसेच एखाद्या महानगरपालिकेमध्ये इमारतीला परवानगी देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना असतात व नियोजन प्राधिकारी महानगरपालिका असते. याचप्रमाणे येथे नियोजन प्राधिकरण ही कंपनी आहे. त्या नियोजन प्राधिकारणाचे सर्व अधिकार वापरण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीला नियोजन प्राधिकरण संबोधता येईल असे त्यांचे अधिकार आहेत. कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी या ठिकाणी बांधकाम परवानगी देत आहे. सदर परवानगी नियमानुसार देणे आवश्यक होते. एसपीए समोर विषय गेल्यावर एसपीएच्या म्हणण्यानुसार त्या ठिकाणी तसे करता येत नाही. एसपीएच्या काही बैठका झाल्या होत्या त्या बैठकीतील कार्यवृत्ताचा विभागामार्फत अभ्यास करण्यात आला होता. यामध्ये तत्कालीन संचालक, नगररचना काही बैठकांना हजर होते. एसपीएच्या एकूण आठ बैठका झाल्या आहेत. यातील सात बैठकांना संचालक उपस्थित होते. एका बैठकीला उपस्थित नव्हते. त्याच बैठकीमध्ये कलम ११५(३) नुसार आराखड्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली होती. त्याच्या पुढील बैठकीत हा विषय पुन्हा चर्चेला आल्याचे दिसत आहे. सदर जमिनी लवासा कंपनीने रितसर विकत घेतल्या आहेत. त्यांच्यावर कोणताही विवाद नाही. हा आराखडा रितसर करण्याचा ठराव झाल्याचे दिसून येते. असे कागदपत्रावरून दिसून येते. लवासाने विकत घेतलेल्या जमिनीवर आराखडा तयार करण्यात आला असेल तर अडचण नाही विकत घेतलेल्या जमिनीचा समावेश आराखड्यात नसावा असा त्यातून निष्कर्ष निघू शकतो. या अनुषंगाने तपासणी करण्याची आवश्यकता आहे असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच यामध्ये शासनाची भूमिका न्यायालयासमोर मांडण्यात आली. परंतु सदरहू जमीन कंपनीने विकत घेतली असेल व त्याबाबत काही न्यायिक वाद नसेल तर त्याबाबत तपासणी करावी लागेल. कागदपत्रावरून असे दिसते की, एका व्यक्तीने लवासा विरोधात उच्च न्यायालयात पीआयएल दाखल केली होती. त्या केसमध्ये त्यावेळी माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले होते. त्यानंतर त्याबाबत काहीही झालेले नाही. असे रेकॉर्डवरून दिसून येते. याबाबत आम्ही चौकशी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा ही केस प्रलंबित असल्याचे दिसून आले. तसेच कंपनीकडून जलसंपदा विभागासोबत बांधकामाच्या बाबतीत कशा प्रकारे करार केला, त्याबाबतचा आराखडा तपासावा लागेल व ही बाब अंतिम करताना कोर्टाला कळवावी लागेल असेहीं समितीस अवगत केले.

**३.१५** एसपीएने प्लॅन तयार केला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी जी तक्रार केली आहे, त्यानुसार १२ हेक्टर जागेवर बांधकाम झाले आहे या जागा शेतकऱ्यांच्या आहेत. त्यावर बांधकाम करता येत नाही. त्याचप्रमाणे डेव्हलपमेंट प्लॅनला शासनाने मंजुरी दिलेली नाही. What is the ambiguity in between these two plans? त्या प्लॅनबाबत अडचणी आहेत. बांधकाम झाल्याचे आपणाला समर्थन करता येत नाही अशी स्पष्ट भूमिका आहे. टाऊन प्लॅनिंग विभागाच्या अधिकाऱ्यांने बैठकीच्यावेळी काय म्हटले आहे हे अत्यंत महत्वाचे आहे. एसपीए शासनाच्या विरोधात आहे. लवासाच्या बाजुने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. एसपीए यांनी जो प्लॅन दिलेला आहे तो चुकीचा आहे, लोकांच्या जमिनीवर बांधकाम करण्यात आले आहे. जागेचा विकास करण्यासाठी एसपीएची नियुक्ती करण्यात आली आहे. प्लॅन मंजूर करण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. लवासा कंपनीने एसपीएच्या माध्यमातून फार अभ्यास केलेला नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या आहेत त्यांना फायदा दिलेला नाही. प्रश्न असा आहे की, याबाबत जिल्हाधिकारी यांचे मत काय आहे. तसेच एमआरटीपी ॲक्टनुसार काम व्हायला पाहिजे त्यामुळे एसपीए बरखास्त करून त्याची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग यांनी यासंदर्भातील एटीआर (Action taken report) देणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी हे उत्तर देऊ शकत नाही. नगर विकास खात्याचे सचिव यांचे या संदर्भात काय मत आहे ते त्यांनी समितीला सांगावे अशी सूचना समितीने केली.

**३.१६** डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग यांच्यासोबत दोन तीन वेळा बैठक झाल्याचे दिसत आहे. वेगवेगळ्या वेळी जे विषय मांडण्यात आले त्यावेळी संचालकांनी काय म्हटले आहे त्याची माहिती आहे. कलम ११५ खाली जो प्लॅन मंजूर केला त्यासंदर्भात संचालक टाऊन प्लॅनिंग यांनी विरोधात मत व्यक्त केले आहे व त्यांचे विरोधातील मत नोंदवून घेण्यात यावे असे त्यांनी सांगितले होते. त्यांचे मत रेकॉर्ड करून घेण्यात आले आहे. एसपीए संचालकांच्या मताच्या विरोधात शिफारस केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.१७** एसपीए यांच्या मताच्या विरोधात शिफारस करण्यात आलेली आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली असता विभागीय सचिव यांनी एसपीएची पुनर्रचना करताना एसपीएची काय भूमिका आहे, याबाबत सन २०१०-२०११ मध्ये शासन स्तरावर विचार करण्यात आला होता. विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा देण्यात आला आहे त्याची पुनर्रचना करण्याची गरज आहे. असे लक्षात आल्यानंतर त्या संबंधीचा अहवाल मागविण्यात आला होता. तत्कालीन संचालकांनी अहवाल पाठविला होता त्यावेळी मात्र या विषयावर निर्णय झालेला नाही. यासंबंधी सर्व माहिती गोळा करून शासनाची भूमिका निश्चित करण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत विशेष नियोजन प्राधिकरण बंद केल्यास या जागेचे नियोजन जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित किंवा पीएमआरडीए यांच्याकडे राहू शकते. यासंदर्भातील विषय शासन स्तरावर आहे. यासंदर्भातील निर्णय एक ते दोन महिन्यात होणार असून शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात येईल. तिसरा विषय असा उपस्थित करण्यात आला होता की, यामध्ये सहायक संचालक नगर रचना यांचा रोल काय आहे. कंपनीला अधिकार देताना अशी स्पष्ट अट टाकण्यात आली होती की, दर तीन महिन्यांनी इमारतीचा प्लॅन मंजूरीकरिता सहायक संचालक नगर रचना यांना सादर करण्यात यावा. त्यांनी तपासणी केल्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास त्या त्रुटी दूर करून तो प्रसिध्द करण्यात यावा. सन २०११ पासून वेळोवेळी सहाय्यक संचालक नगर रचना यांनी एसपीएच्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. कंपनीने याबाबत पूर्तता न करता वेगवेगळ्या वरिष्ठ स्तरावर पत्र व्यवहार केलेला असून त्रुटीबाबत कोणतीही पूर्तता करण्यात आली नाही. यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांनी गेल्यावर्षी सहायक संचालक यांना जुने व नवीन अहवाल देण्यास सांगितले आहे. सदर अहवालाची तपासणी करण्यास सांगण्यात आले आहे. सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत. नोटीसीमध्ये एक महिन्याची मुदत दिलेली आहे. त्यामुळे विशेष नियोजन प्राधिकारण स्वतंत्र परवानगी देत आहे आणि त्या ठिकाणी नियमानुसार ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्याचे अधिकार शासनाला आहेत. ही भूमिका एमआरटीपी ॲक्टनुसार घेण्यात आली आहे. कोर्टाने निर्णय दिल्यानुसार कारवाईचे आदेश दिले आहेत. विशेष नियोजन प्राधिकरण स्थापन करण्याचा उद्देश अविकसित भागाचा विकास करणे असा होता. आता विकसित भागासाठी विशेष नियोजन प्राधिकरण निर्माण करण्यात आले आहे. सन २००२ मध्ये शासनाने कायद्यामध्ये दुरूस्ती करून विधानमंडळाची मान्यता घेऊन कंपनीला विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा देण्याबाबत तरतूद केली आहे. या अनुषंगाने सन २००८ मध्ये या कंपनीला विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानंतरच्या या सर्व घडामोडी आहेत. ज्यांनी स्वतः नियमांचे पालन करावयाचे आहे त्यांनीच नियम बाजूला ठेऊन आणि त्यामध्ये आम्हाला सवलती पाहिजेत अशी भूमिका मांडून, हे पुढे केले आहे. यामध्ये त्यांना स्वतःला कोणतीही परवानगी वापरता येणार नाही, असे मूळ परवानगीमध्ये नमूद केले असल्यामुळे याचा पुनर्विचार करण्याचा शासनाचा मानस आहे. तो विभागातर्फे पुढील २ महिन्यात करु अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**३.१८** समितीने एसपीएने दिलेली मंजुरी ३ महिन्याच्या आत सहायक संचालक, नगर रचना यांचेकडे पाठविली पाहिजे. ही बाब स्पष्ट करण्याबाबत विचारणा केली असता नियोजन प्राधिकरण म्हणून ते मान्यता देत नाहीत. त्यांचे जे अधिकारी आहेत ते बिल्डींग प्लॅनला मंजुरी देतात आणि ती त्यांनी एडीटीपीकडे पाठविणे आवश्यक आहे असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

**३.१९** सन २००८ मध्ये एसपीएची निर्मिती झालेली आहे. परंतु, सन २०११ पर्यंत एकही नकाशा किंवा जी मान्यता दिलेली आहे त्याचे रिपोर्टींग टाऊन प्लॅनिंग विभागाकडे गेलेले नाही. त्यावेळी श्री.भोपळे नावाचे अधिकारी एडीटीपी होते. समितीने लवासा येथे साक्ष घेतली त्यावेळी

त्यांनी सांगितले की, लवासाची निर्मिती झाल्यानंतर त्यांनी बांधकाम केले. त्यांनी प्रत्येक तीन महिन्यांनी त्यांचे बिल्डींग प्लॅन संचालक, नगर रचना यांचेकडे पाठवावयास पाहिजे होते. परंतु, ते अडीच वर्षांनी सादर केलेले आहेत. त्यानंतर आपण सांगितले की, त्यांनी स्क्रुटीनी करून जिल्हाधिकाऱ्यांना कळवावे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे त्रुटी सादर करण्यापूर्वी त्या संचालकांकडे सादर केल्या. समिती ११ तारखेला लवासा येथे भेट देणार होती. त्यानंतर ३ सप्टेंबर रोजी त्याला गती मिळाली. आपण एसपीए बद्दल सांगितले की, एसपीएच्या पुनर्गठनाचा विचार करतो त्यामध्ये पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश होता. परंतु, त्यांना वगळून त्यामध्ये मॉडिफिकेशन करण्यात आले आणि त्यामध्ये संचालक, टाऊन प्लॅनिंग यांचा समावेश करण्यात आला. एसपीएचे पुनर्गठन करण्याची मागणी आपण मान्य केली आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी, संचालक, नगर रचना तसेच आयुक्त, पीएमआरडीए किंवा आयुक्त महानगरपालिका या स्तरावरील तीन अधिकाऱ्यांचा समावेश असला पाहिजे. तसेच, ३ अधिकाऱ्यांपैकी २ अधिकारी बैठकीस उपस्थित असतील तरच बैठक होणार अशी भूमिका आपण घेणार आहात काय ? अशी समितीने विचारणा केली असता समितीने जो पहिला विषय उपस्थित केला त्याबद्दल खात्री करून घ्यावी लागेल की, त्यांनी पाठविले होते किंवा नाही. त्यांनी सन २०११ पर्यंत पाठविले नाही असा उल्लेख मागील बैठकीत आला असला तरी खात्री करुन घ्यावी लागेल. त्यांच्यावर पाठविण्याचे बंधन होते. परंतु, त्यांनी पाठविले नसेल तर याबाबत खात्री करुन या मुद्याबाबत त्यांच्यावर कारवाई होऊ शकते. तसेच, एसपीएचे पुनर्गठन करण्याबाबत दुसरा विषय उपस्थित केला आहे. एसपीएचे पुनर्गठन करण्याबाबत काही वाद असण्याचे कारण नाही. एसपीएचे पुनर्गठन करणे किंवा ते बरखास्त करण्याचा निर्णय शासन घेऊ शकते. शासनाने एसपीएचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेतला तर समितीने सूचना केल्याप्रमाणे त्यामध्ये ३ किंवा त्यापेक्षा जास्त प्रतिनिधी असतील, अशी शासनाची भूमिका आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.२०** एसपीए संदर्भात सचिव महोदयांनी सांगितले की, त्यामध्ये बदल करतो ही चांगली बाब आहे. ले-आऊट व्यतिरिक्त इतर डेव्हलपमेंट करण्याच्या संदर्भात जी परवानगी आवश्यक आहे ती परवानगी लवासा कंपनीच्या जबाबदारीवर देण्यात आली होती. त्यांच्या जबाबदारीवर परवानगी देऊन त्यांनी काम केले. ती परवानगी कोणत्या ॲथॉरिटीने दिली? ती परवानगी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली की कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली अशी परवानगी देता येते काय? याबाबत समितीने विचारणा केली असता सन २००८ च्या ले-आऊटमधील जो भाग वगळला त्यावर झालेल्या बांधकामाच्या संबंधिचा हा विषय आहे. त्यासंबंधीची परवानगी जिल्हाधिकारी स्तरावर किंवा कनिष्ठ स्तरावर किंवा वरिष्ठ स्तरावर देण्यात आलेली नाही. एसपीएच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर बांधकाम परवानगी दिलेली आहे. ज्यावेळी हे निदर्शनास आले त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांकडून नोटीस देण्यात आली. त्यावेळी उच्च न्यायालयाचा निर्णय त्यांच्या समोर ठेवण्यात आला आणि त्यांना सांगण्यात आले की, तुम्हाला तुमच्या रिस्क ॲन्ड कॉस्टवर बांधकाम करता येईल. परंतु, यामध्ये कोणताही थर्ड पार्टी इंटरेस्ट क्रिएट करता येणार नाही. त्यांनी अशा प्रकारचा थर्ड पार्टी इंटरेस्ट क्रिएट केला किंवा नाही, हे विभागातर्फे तपासून घेऊ असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

**३.२१** जी परवानगी दिली ती कायदेशीर आहे किंवा नाही, याची तपासणी केली गेली काय? याबाबत माहिती देताना विभागीय सचिव यांनी हे स्ट्रँडेड व्हावयास पाहिजे सन २००८ च्या ले-आऊटला मान्यता मिळाली नाही. जोपर्यंत आराखडा मंजूर होत नाही तोपर्यंत त्यावर कोणतेही बांधकाम होणार नाही असे स्पष्ट केले.

**३.२२** या अनुषंगाने समितीने लवासाने जबाबदारी स्वीकारून त्याच्या अधिकार क्षेत्रात बांधकाम करावे अशी ॲथॉरिटीने परवानगी दिली. ते कायदेशीर आहे काय आणि अशी परवानगी देता येते काय? अशी विचारणा केली असता.

**३.२३** ॲथॉरिटीने परवानगी द्यावयास नको होती असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

कोर्टाच्या आणि कायदेशीर आधारावर याबाबत तपासणी केल्यानंतरचे मत समितीला सांगावे असे विभागास सूचित केले असता थर्ड पार्टी इंटरेस्ट आणि जलसंपदा विभागाबरोबर केलेला करारनामा तपासून घ्यावा लागेल. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.२४** दोन्ही प्लॅन फायनल केल्याशिवाय तेथे बांधकाम करता येते काय? या समितीच्या प्रश्नाला जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केलेले रेखांकन केवळ जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केलेले आहे असे नाही. एसपीएची निर्मिती झाल्यानंतर त्यांच्या पहिल्या आणि दुसऱ्या बैठकीमध्ये याच रेखांकनाला पुन्हा मान्यता दिलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.२५** लवासाने तेथील रस्ते तयार करुन देणे बंधनकारक आहे. नगरविकास विभाग त्यांना सूचना देऊ शकतो. हा विषय तेथील लोकांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. ही बाब समितीने नमूद करून लवासा बरोबर ॲग्रीमेंट कोणी केले? अशी विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी लवासा बरोबर ॲग्रीमेंट किंवा करार करण्यात आलेला नाही. कदाचित, महसूल विभागाकडून सुद्धा झालेला नाही. त्या ठिकाणी खूप कमी लोक राहतात. आपण मूळ गावठाण हलविले होते आणि जे लोक त्या ठिकाणी राहिले ते डोंगराच्या बाजुने सरकले. त्या ठिकाणी बरेच आदिवासी लोक छोट्या वाड्या, वस्त्या करून राहिले. त्यांना त्याही वेळी फार कमी प्रमाणात आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होत होत्या. जिल्हापरिषदेच्या एका लाँचने रविवारी या गावांमध्ये डॉक्टर जायचे. त्या काळात या गावांमध्ये पाणीपुरवठ्याची कोणतीही योजना नव्हती. सन २००१ मध्ये विशेष नियोजन प्राधिकरण यांनी हे थंड हवेचे ठिकाण म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला. याकरिता २० गावे निश्चित करण्यात आली. सन १९९६ मधील

शासन निर्णयामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. त्यावेळच्या अस्तित्वात असलेल्या धोरणानुसार सदर कंपनीला विकास करण्याची परवानगी देण्यात आली. या दोन्ही बाबींचा विचार करून जिल्हापरिषदेने कंपनीसोबत केलेला करार बंधनकारक आहे. आता त्यांच्यावर ही सर्व जबाबदारी आलेली आहे. आजच्या बैठकीत ग्राम विकास विभागाचे सचिव नसल्यामुळे या बाबत अधिक स्पष्टीकरण मिळू शकत नाही. धोरणानुसार कंपनीवर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली होती, ती त्यांनी पूर्ण केली आहे काय, या संदर्भातील अहवाल समिती समोर ठेवण्यात येईल असे आश्वासित केले.

**३.२६** जे ११ मुद्दे देण्यात आलेले आहेत ते विवादात्मक व क्लिष्ट आहेत. एका प्रकरणात १२.५ हेक्टर जागेचा प्रश्न आहे. हाय फ्लड लाईनच्या आत बांधकाम झालेले आहे. याकरिता ॲक्शन प्लान ठरविणे आवश्यक आहे. पाटबंधारे विभाग व जिल्हापरिषदेने सोयी सुविधांच्या संदर्भात करार केलेला आहे. त्या कराराचे पालन न झाल्यास जिल्हापरिषद किती कालावधीमध्ये कारवाई करू शकते, या संदर्भात संबंधित विभागाने समितीला माहिती दिली पाहिजे. असे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले.

### ३.२७ “ दिर्घ मुदतीसाठी भाडेपट्टीने आणि राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर भागीदारीच्या रूपात जमिनीचे प्रदान”

उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात समितीला माहिती द्यावी. असे समितीने सांगितले असता एकूण १७ प्रकरणे होती. या प्रकरणांमध्ये ९८ हेक्टर ५५ आर जागा होती. या प्रकरणांचे एकूण ३ भाग करण्यात आले. २ प्रकरणांमधील एकूण ११ हेक्टर ३३ आर जागा रितसर आदेश काढून मूळ आदिवासी मालकांना प्रत्यार्पित करण्यात आली. १३ प्रकरणांमध्ये ७२ हेक्टर १५ आर जागा होती. ही जमीन सरकार जमा करण्यात आली. उर्वरित २ प्रकरणांबाबत कार्यवाही झालेली नाही. ही २ प्रकरणे प्रांत स्तरावर प्रलंबित असून मूळ मालक सापडत नाही. तसेच आदिवासीचा दाखला देखील उपलब्ध नाही. त्यांचा शोध घेऊन नियमानुसार कार्यवाही केली जाईल. १७ पैकी १५ प्रकरणांमध्ये नियमानुसार कार्यवाही झालेली असल्याचा खुलासा जिल्हाधिकारी यांनी केला.

**३.२८** १५ प्रकरणांमध्ये कार्यवाही झालेली आहे. दोन प्रकरणांमध्ये आदिवासींना जमीन देण्यात आली असे सांगण्यात आले. मात्र ही जागा त्यांना परत दिली गेली नाही, असे समितीला सांगण्यात आले होते. ही जमीन त्यांना परत का केली गेली नाही, ती शासनाला प्राप्त झाली आहे काय ? अशी विचारणा केली असता दोन प्रकरणामध्ये ११ हेक्टर ३३ आर जमीन होती. जागेची मोजणी करून मूळ मालकाच्या ताब्यात ती देण्यात आली आहे. १३ प्रकरणात जागा सरकार जमा झालेली आहे. अपील कालावधी संपल्यानंतर मोजणी करून मूळ मालकाला जागा हस्तांतरित करण्यात येईल. तसेच जी जागा हस्तांतरित करण्यात आली, त्या जागेवर बांधकाम झालेले नाही. असा खुलासा जिल्हाधिकारी यांनी केला.

**३.२९** सध्या भाडेतत्वावर जमिनी लिहून घेण्याचा प्रयत्न करून आहे. जमिनी मूळ मालकाला परत केल्यानंतर भाडेतत्वावर घेतल्या जात आहेत काय याची माहिती घेणे गरजेचे आहे. अशा किती घटना उघडकीस आल्या आहेत ? जमिनी विकत घेतल्यानंतर त्या जमिनी भाडेतत्त्वावर दाखवल्या असतील तर हा विषय महसूल विभागाशी संबंधित आहे. जिल्हाधिकाऱ्यांना या बाबत अधिक माहिती आहे काय? याबाबत समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय होऊ शकत नाही. आदिवासींच्या जमिनीच्या ७/१२ च्या हस्तांतरणास बंदी असल्याचा शेरा त्यावर नमूद केलेला आहे काय, याची मी खात्री करून घेतो. या संदर्भात आदिवासींमध्ये जनजागृती करावयाची असल्यास ती देखील केली जाईल असे नमूद केले.

**३.३०** समितीने रॉयल्टीच्या रकमेच्या वसुलीच्या संदर्भात स्पष्टीकरण करावे. असे निदेश दिले असता लवासा परिसरामध्ये ८ लाख ८ हजार २४६ ब्रास मुरूमचे उत्खनन करण्यात आले होते. प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या ठिकाणी मोजणी करून दि. ३ मार्च १२ रोजी तहसील मार्फत कंपनीला नोटीस देण्यात आली होती. स्वामित्व धन व अनधिकृत उत्खननाच्या अनुषंगाने ९ कोटी ४२ लाख रुपयांच्या दंडात्मक रकमेची मागणी करण्यात आली. या बाबत कंपनीने रिट पिटीशन दाखल केली. लवासा कॉर्पोरेशनकडून सक्तीची वसुली करू नये, असे उच्च न्यायालयाने निर्णय दिला. वसुलीला स्थगिती देण्यात आली असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाकडून पुढील निकाल लागल्यानंतर त्वरित कारवाई करण्यात येईल. सदर प्रकरणाकरिता श्री. नितीन देशपांडे, सहाय्यक सरकारी वकील यांना नियुक्त केले असून त्यांच्यामार्फत पाठपुरावा सुरू असल्यास खुलासा स्थानिक प्राधिकारी यांनी केला.

**३.३१** जमिनीवरील मुरूमाचा वापर परत त्याच जागेवर केला असल्यास त्यावर रॉयल्टी आकारू नये, असा निर्णय कोर्टाने दिलेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात एका एसएलपीमध्ये फेब्रुवारी, २०१५ मध्ये निर्णय दिलेला आहे की, विकास कामे करण्यासाठी उत्खनन करून माती काढण्यात येऊन त्याचा इन-सीटू वापर होत असल्यास रॉयल्टी आकारण्याची गरज नाही. दि. ११ मे २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना काढून सर्व जिल्ह्यांना हे लागू केलेले आहे. एखाद्या प्लॉटवरील मातीचे उत्खनन झाले असल्यास त्या प्लॉट मालकाकडून रॉयल्टी किंवा दंड आकारणे योग्य होणार नाही. या ठिकाणी मुरमाचे उत्खनन झालेले असून डोंगरफोड झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, जिल्हाधिकारी किंवा नियोजन प्राधिकरण यांनी ले-आऊट मंजूर केला, माती काढल्याशिवाय

विकास होऊ शकणार नाही, त्यामुळे हे उत्खनन विकासासाठी केले जाणारे आहे. येथे जे उत्खनन झालेले आहे, ते रस्ते व इतर विकासात्मक कामासाठी केलेले असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी समितीस दिली.

**३.३२** सर्वोच्च न्यायालयामध्ये बिल्डर्स असोसिएशन गेलेली आहे. इमारतीच्या बांधकामासाठी खनिजाचे उत्खनन केले गेल्यास दंडात्मक कारवाई होऊ नये. उत्खनन केलेल्या खनिजाचा वापर रस्ते इतर विकासात्मक कामासाठी होत असेल तर कमीत कमी रॉयल्टी वसूल केली जावी. या संदर्भात वकिलांच्या सल्ल्यानुसार लवासा कडून रॉयल्टी वसूल झाली पाहिजे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांमुळे याला स्टे मिळाला आहे असे बिलकुल नाही. जे स्वतःच्या जागेवर घर बांधत आहेत ते उत्खननातील मातीचा वापर स्वतःच्याच कामाकरिता करीत असतील तर त्यांच्यावर दंडात्मक वसुली करता येत नाही. जेथे असे होत नसेल तेथे आपण रॉयल्टी वसूल करणे व त्यांनी देणे बंधनकारक आहे. त्यामुळे या प्रकरणातील रॉयल्टीची वसुली माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची प्रत माननीय उच्च न्यायालयात दाखवून स्थगिती उठविण्याबाबत प्रयत्न केला पाहिजे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले असता.

**३.३३** यावर स्थानिक प्रतिनिधींनी आम्ही सहाय्यक सरकारी वकील श्री. नितीन देशपांडे यांच्यामार्फत माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून स्थगिती उठविण्याबाबत विनंती केलेली आहे असे नमूद केले.

**३.३४** काही लोकांचे पुनर्वसन केले आहे. मात्र तेथे लोकांच्या मागणी प्रमाणे त्यांना मुलभूत सुविधा देण्यात आलेल्या नाहीत. समितीने तेथील गावांना दिलेल्या भेटीच्या वेळी तेथील लोकांनी सांगितले की, त्यांना स्वतंत्र टॉयलेट्स बांधून पाहिजे आहेत. कारण सामूहिक टॉयलेट्समध्ये स्वच्छता ठेवली जात नाही. तसेच, काही लोक भूमीहीन आहेत, त्यांना प्लॉट्स उपलब्ध करून दिले पाहिजेत, अशी त्यांची मागणी आहे. याबाबत शासनाची काय भूमिका आहे, शासन लवासा कार्पोरेशनकडून हे कसे घडवून आणणार ? आपण जेव्हा लोकांचे पुनर्वसन करतो तेव्हा रस्ते, पाणी, ड्रेनेज, वीज अशा मुलभूत सुविधा त्यांना उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. त्या पूर्ण एरियात लवासा कार्पोरेशनचे अधिपत्य आहे. तेथे ग्रामपंचायत किंवा कोणतीही लोकल बॉडी नाही. तेथे विकास करण्याची पूर्ण जबाबदारी लवासा कार्पोरेशनवर आहे. मात्र तेथे अनेक गावांत अद्यापही टँकरने पाणी पुरविण्यात येते. कधी कधी तरी लोकांना टँकरकरिता दिवसभर वाट पाहावी लागते अशी परिस्थिती आहे. समितीला आपल्या भेटीच्या वेळी अशा अनेक गोष्टी आढळून आल्या आहेत. महसूल विभागाला याबाबतीत काही सांगावयाचे असल्यास सांगावे असे समितीने सूचित केले.

**३.३५** शासनाचा यामध्ये रोल नसल्याने आतापर्यंत याचे मॉनिटरिंग झालेले नव्हते. मात्र समितीने तेथे भेट दिल्यानंतर काही प्रश्न समोर आले आहेत. जसे की, वैयक्तिक स्वच्छतागृहाची मागणी आहे, रस्त्यांचे प्रश्न आहेत, टँकरद्वारे केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न आहे शाळेत मुलांना ॲडमिशन मिळत नाही. तसेच आरोग्य यंत्रणा उपलब्ध असूनही त्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळत नाही. याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर स्थानिक बीडीओ यांना याचे दायित्व देण्यात आले आहे. त्यांच्या ज्या रास्त मागण्या आहेत त्या पूर्ण झाल्याच पाहिजेत याकरिता स्थानिक पातळीवर प्रयत्न करीत आहोत आणि हा प्रश्न सुटणार असल्याचे समितीस आश्वासित केले.

**३.३६** पाण्यासाठीच्या शासकीय योजनांना परवानगी न देता त्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे, याबाबत शासनाची काय भूमिका आहे? अशी विचारणा केली असता.

**३.३७** जेथे ग्रामपंचायती आहेत अशा ठिकाणी पाण्याची टंचाई असल्याने मागणी आल्यानंतर शासन टँकर उपलब्ध करून देते. या प्रकरणात लवासामार्फत पाणीपुरवठा होत आहे. मात्र लवासामार्फत तेथील लोकांना सुविधा मिळत आहेत की नाहीत यावर सनियंत्रण करण्याची स्थानिक पातळीवर कोणतीही यंत्रणा नाही ती उभी करीत आहोत. याही पुढचे पाऊल टाकून आम्ही मुलभूत सुविधांची एक चेकलिस्ट तयार करून देऊ शकतो त्या मिळत आहेत की नाहीत याची पाहणी यंत्रणेमार्फत करून त्याचा त्रैमासिक अहवाल प्राप्त करता येईल असे नमूद केले.

**३.३८** तेथील अनेक लोकांचे असे म्हणणे आहे की, पाणीपुरवठयाकरिता आम्ही आमच्याकडे असलेले क्षेत्र सरकारला देऊ मात्र आम्हाला विहीर खोदण्याची परवानगी द्यावी. मात्र आपल्याकडून अशी परवानगी मिळत नाही. बऱ्याच लोकांचे विहिरींकरिताचे अर्ज प्रलंबित आहेत. ग्रामसेवक ते अर्ज पुढे पाठवित नाहीत याबाबत विभागाने लक्ष घालावे तसेच हे सर्व पाहून ते स्पेशल प्लानिंग ऑथॉरिटी झाले म्हणजे स्वतंत्र राष्ट्र झाले आहेत, असे म्हणावे अशी परिस्थिती आहे. आताच जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, तेथील लोकांना पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य अशा मुलभूत सुविधा मिळत आहेत की नाहीत हे पाहण्याकरिता सिस्टम नाही. तसेच, स्थानिक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, लोकांना विहीर खोदण्याकरिताही परवानगी दिली जात नाही. त्यामुळे मला असे वाटते की, याबाबत जिल्हापरिषदेबरोबर झालेल्या ॲग्रिमेंटची कॉपी मागवून घ्यावी. तेथील स्थानिक लोकांच्या भवितव्याचा प्रश्न असल्याने या मुलभूत सुविधांचे मॉनिटरिंग करण्याची यंत्रणा शासनाकडे नसेल तर तातडीने किती दिवसांत या संदर्भातील मॉनिटरिंग करून तिचा अहवाल समितीला पाठविणार याबाबतचा निर्णय घ्यावा असे समितीने सूचित केले. तसेच एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत एसपीए गठित केल्यानंतर शासनाचे संपूर्ण अधिकार अबॉलिश झाले आणि त्यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रात त्यांच्या स्तरावर संपूर्ण कारवाई केली. शासन म्हणून त्यांना जागा देताना तुम्ही पूर्ण विचार करून त्यांना अधिकार दिले आहेत. त्या ॲग्रिमेंटची प्रत आपण पाहिली आहे का? एसपीए हा

लवासापुरता मर्यादित विषय आहे असे मला वाटत नाही. लवासाचे उदाहरण पाहिल्यानंतर परत अशाप्रकारची निर्मिती करावयाची की नाही असा जरी प्रश्न आपल्या मनात येत असला तरी, भविष्यात वेगाने करावयाचा विकास, स्मार्ट सिटी वगैरेंचा विचार करता याबाबत पुर्नविचार करण्याची गरज असल्याचेही मत समितीने व्यक्त केले.

**३.३९** एका विशिष्ट कपंनीला हे अधिकार देण्याकरिता सन २००२ मध्ये कायद्यात दुरूस्ती करण्यात आली. आज तेथील परिस्थिती पाहता जिल्हाधिकारी, शासन, लोकप्रतिनिधी व सर्वोच्च स्थानी असलेल्या व्यक्तींनी एसपीए पॉलीसी केली पाहिजे. शासनाने नवीन एसपीए स्थापन करून कंपनीच्या लोकांना त्यामध्ये प्रतिनिधीत्व द्यावे असे समितीने अभिप्राय नोंदविले व याबाबत तेथील लोकांच्या मुलभूत सुविधांबाबत तातडीने निर्णय कधी पर्यंत करणार? अशी विचारणा केली असता शासनाच्या हिल स्टेशन धोरणानुसार काही गोष्टींची जबाबदारी त्या विकासकावर टाकलेली होती. त्याप्रमाणे यादीतील १८ गावांमध्ये रस्ते, वीज, पाणी, ड्रेनेज अशा मुलभूत सुविधा विकासकाने करावयाच्या होत्या. तसे ॲग्रिमेंट नाही. आपले धोरण त्यांनी मान्य करून त्या अंतर्गत परवानगी घेतली. हा विषय त्या १८ गावांपुरता मर्यादित आहे. या पलीकडच्या क्षेत्राबाबत सांगावयाचे झाले तर, आता चर्चेतून प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्या पलीकडे राहणाऱ्या क्षेत्रातील लोकांकरिता जिल्हापरिषदेबरोबर वेगळा करार झालेला आहे. त्या अंतर्गत त्यांच्यावर काही वेगळी जबाबदारी असेल का हे खात्रीपूर्वक सांगू शकत नाही कारण त्याची माहिती नाही. दुसरी गोष्ट म्हणजे एसपीए म्हणून नाही तर हिल स्टेशन डेव्हलपर म्हणून त्यांच्यावर ही जबाबदारी आहे. ते पुढे एसपीए झाले म्हणून ही जबाबदारी जाणार नाही, कारण ती त्यांची मुलतः जबाबदारी आहे. लवासाचा विषय समोर आल्यानंतर त्या कंपनीला अलाऊ करण्याकरिता कायद्यामध्ये अमेंडमेंट करण्यात आली का, असा प्रश्नही येथे उपस्थित करण्यात आला. या अनुषंगाने हे सांगू इच्छितो की, सन २००२ मध्ये कायद्यामध्ये अमेंडमेंट करण्यात आली. लवासासाठी मुद्दाम कायद्यात अमेंडमेंट केली आहे का ते पहावे म्हणून मी या कायद्याच्या स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्ट ॲन्ड रिझन्सचाही अभ्यास केला. मात्र स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्ट ॲन्ड रिझन्सवरून तसे वाटत नाही. कदाचित जेएनपीटीसाठी ती अमेंडमेंट केली असावी असे कागदपत्रावरून वाटते. सन २००२ मध्ये केलेल्या कायद्यातील दुरूस्तीचा फायदा सन २००८ मध्ये लवासाला देण्यात आला ही वस्तुस्थिती आहे. स्पेशल टाऊनशिपचे प्रोजेक्ट मोठया प्रमाणावर हाती घेताना शासनाने या धोरणात सन २००६ व सन २०१२ मध्येही दुरूस्ती केली. त्यानुसार यापेक्षाही जास्त जबाबदारी विकासकावर टाकण्यात आली होती. तसेच, विशेष नियोजन प्राधिकरण कोणालाही केलेले नाही. या अनुषंगाने हिल स्टेशनच्या धोरणात काही सुधारणा करण्याची गरज आहे तसेच, या सर्व गोष्टींचा पुनर्विचार होण्याची गरज असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.४०** समिती काही तेथे वारंवार पाहणी करण्यास जाऊ शकणार नाही. त्यामुळे मॉनिटरिंग करण्याची जबाबदारीही यांची आहे. त्याकरिता एखादी एजन्सी नेमावी किंवा कलेक्टरकडे ही जबाबदारी दिली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच सन २००८ नंतर विकासकाने ज्या काही सुविधा दिल्या पाहिजे होत्या त्या दिल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याबाबत धोरणात बदल करावयाचे असतील तर जरूर करावेत मात्र सदरहू गोष्टी किती कालावधीत द्याव्यात याकरिताचा कालबद्ध कार्यक्रम केला जाणार आहे काय ? कंपनीने किंवा विकासकाने ज्या गोष्टी करण्याचे कबूल केले होते त्या करणे टाळण्याचे काम योजनापूर्वक सुरु आहे, सदर प्रकरणी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला पाहिजे, तसेच मॉनिटरींग कोणी करावयाची हे देखील निश्चित करण्याची आवश्यकता आहे. असे अभिप्राय समितीने नोंदविले.

**३.४१** एमआरटीपी कायद्याच्या कलम ४० (1B) मध्ये असे नमूद आहे की, "Notwithstanding anything contained in sub-section (*1*), the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint any agency or authority created by or in accordance with Government order or instrument, or any company or corporation established by or under any State or Central law, to be the Special Planning Authority for any notified area." हा कायदा २००२ साली आला होता. त्यावेळी हा कायदा जेएनपीटी संदर्भातच असेल असे मला वाटते. परंतु याबाबत मी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. पूर्वी विशेष नियोजन प्राधिकारी हे जिल्हाधिकारी होते. त्यामुळे संबंधित क्षेत्राबाबत संपर्क व त्यांना नेमून दिलेली जबाबदारी या दोन्ही गोष्टी कदाचित सहज होत असाव्यात. त्यानंतरच्या काळामध्ये विशेष नियोजन प्राधिकरण झाल्यामुळे त्यांच्या स्तरावरुन परवानगी देणे सुरु झाले व त्यामुळे हा खंड पडल्याची शक्यता असून सदर परिस्थिती निर्माण झाली असावी. सदर प्रकरणी दुरुस्ती करुन जबाबदारी पार पाडण्यासाठी काय करावे लागेल, याबाबतच्या सूचना नगर विकास विभागाकडून लगेच काढण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

**३.४२** लवासा क्षेत्रात पिण्याचे पाणी, शौचालये, आरोग्याची सुविधा याबाबत बिकट परिस्थिती आहे. सदर ठिकाणी ५० बेडचे अपोलो हॉस्पिटल असून तेथे केवळ ओपीडीची सुविधा असल्याने रुग्ण येत नाहीत. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्याबाबत अपोलो हॉस्पिटलला समितीने सूचना दिली होती. परंतु त्यांनी हे परवडत नसल्याचे कारण सांगितले. तसेच, ओपीडीच्या माध्यमातून ग्रामस्थांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा फायदा मिळवून देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी व प्रशासनास समितीने दिल्या होत्या, त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे ? लवासा क्षेत्रातील रस्त्यांच्या प्रश्नाबाबत कंपनीची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याचे कारण पुढे करीत सदर काम टप्प्याटप्प्याने करण्यात येईल, असे लवासा कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले आहे. सदर क्षेत्रात पूर्वी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रस्त्यांचे काम करण्यात येत होते. परंतु

त्यांनी ते आता लवासा कॉर्पोरेशनकडे हस्तांतरीत केले आहे. रस्ते चांगले नसल्याने लवासा येथून पुणे येथे येण्या-जाण्याकरिता गावकऱ्यांना त्रास होतो, याबाबतची तक्रार सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी केली आहे. सदरील दोन्ही प्रश्नाबाबत जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी, पुणे यांनी समितीस असे विदित केले की, राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यात ३७ हॉस्पिटल्स सुरु आहेत. लवासा येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु करण्यासाठी आरोग्य विभागाकडे ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सूचना देण्यात होत्या. त्यानुसार त्यांनी अर्ज सादर केला आहे. आरोग्याबाबतच्या सुविधा जिल्हा परिषदेमार्फत उपलब्ध केल्या असून त्याचा लाभ ग्रामस्थांना मिळवून देण्याबाबतचे आदेश जिल्हा परिषदेला देण्यात आलेले आहेत. लवासा येथील अपोलो हॉस्पिटल इम्पॅनल्ड होईल व त्यांच्यामार्फत लोकांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा फायदा मिळवून देण्यात येईल, अशी जिल्हा प्रशासन खात्री देत आहे. तसेच, लवासा क्षेत्रातील रस्ते करारनामा करुन लवासा कॉर्पोरेशनला हस्तांतरीत करण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी लवासा कॉर्पोरेशनबरोबर करारनामा करुन रस्ते हस्तांतरीत केले आहेत. सदर करारनाम्याचे पालन संबंधित कंपनी करीत नसेल तर जिल्हा परिषद सदर रस्ते त्यांच्या अधिकार क्षेत्रात घेण्याबाबत पुढील कार्यवाही करु शकते. सदर बाब तपासण्याची सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा परिषदेस देण्यात आली आहे.

**३.४३** जिल्हाधिकारी, पुणे यांच्या वक्तव्यानुसार लवासा क्षेत्रातील सर्व समस्या त्यांच्या विभागाशी संबंधित नसून विषयानुसार संबंधित विभागांना पत्र पाठविले आहे, त्याबाबत प्रत्येक साक्षीमध्ये समितीने संबंधितांना विचारणा करावी. परंतु समिती प्रत्येक साक्षीच्या वेळी लवासाचा विषय घेऊ शकत नाही. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी अहवाल मागवून घ्यावा व तो समितीला सादर करावा असे निर्देश समितीने दिले.

**३.४४** लवासा कॉर्पोरेशनकडून आथिर्क परिस्थिती बरोबर नसल्याचे कारण रस्त्यांच्या बाबत सांगण्यात येते, ही बाब समर्थनिय नाही. लवासा क्षेत्रातील लोकांना येण्या-जाण्याकरिता त्रास होतो. त्यामुळे सदर प्रकरणी शासनाच्यावतीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. लवासा क्षेत्रातील लोकांना मुलभूत सुविधा देण्याची बाब लवासा कॉर्पोरेशनने मान्य केली आहे. परंतु त्यांच्याकडून त्या पुरविण्यात येत नाहीत, त्यामुळे शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? लवासाच्या भागामध्ये शासनाचे मॉनेटरींग असेल तर शासनाच्या योजना व पैसा मिळाल्यास तेथील समस्या सोडविणे शक्य होईल असे मत समितीने व्यक्त केले.

**३.४५** नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांनी निवेदन केल्यानुसार, लवासा क्षेत्रात धोरणाप्रमाणे मुलभूत सोयी-सुविधा अस्तित्वात असणे आवश्यक आहे, त्याची खात्री जिल्हा प्रशासनाने करावयाची आहे. सदर प्रकरणी आज कोणत्या सोयी-सुविधा अस्तित्वात आहेत, त्यामध्ये कोणत्या बाबीमुळे गॅप निर्माण झाला आहे, ती भरुन काढण्याची जबाबदारी कोणाची आहे, ती जबाबदारी लवासा अंतर्गत असेल तर तो गॅप भरुन काढण्याची जबाबदारी लवासा कॉर्पोरेशनची आहे, अशा वेळी त्यांची आर्थिक परिस्थिती दुय्यम बाब आहे. लवासाच्या अधिकार क्षेत्राबाहेर पाईप लाईन, विहीर घेणे, रस्ते इत्यादि बाबी असतील तर ती कामे जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली पाहिजेत असा खुलासा जिल्हाधिकारी, पुणे यांनी केला.

**३.४६** १८ गावांना हिल स्टेशन म्हणून डेव्हलप करण्यासाठी एसपीए निर्माण केली. एसपीए कडून विकास करण्यात येत नसेल तर शासनाने त्यांना नोटीस देऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, झालेल्या करारानुसार सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही लवासाची आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या यंत्रणेला तेथे पाठवून कोणत्या सुविधा पुरविण्याची आवश्यकता आहे, कोणत्या सुविधा पुरविल्या जातात, याची तपासणी करणे आवश्यक आहे. लवासा क्षेत्रात देखरेख करण्याचे काम प्रशासनाचे आहे आणि प्रशासनाने ते केले पाहिजे. विशेष नियोजन प्राधिकरण असणे किंवा नसणे याचा सुविधा पुरविण्याच्या विषयाबाबत काहीही संबंध नाही. हिल स्टेशनमध्ये ज्यावेळी त्यांचा समावेश करण्यात आला त्यावेळी त्यांनी या धोरणाचा स्वीकार केला आहे. त्यांतर्गत त्यांच्यावर सुविधा पुरविण्याची जी जबाबदारी आहे ती त्यांच्या क्षेत्रापुरती त्यांच्यावर बंधनकारक आहे असे मत समितीने व्यक्त केले व जिल्हाधिकारी यांच्या म्हणण्यानुसार, लवासा क्षेत्राची पाहणी करुन काही बाबी बेकायदेशीर असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. प्रशासनाने जी कारवाई करावयाची आहे ती करावी. परंतु त्या ठिकाणी ज्या सुविधा नाहीत त्या तात्काळ देण्यासाठी संबंधित प्रशासनाने मनावर घेतल्याशिवाय त्या होणार नाहीत. सदर प्रकरणी तपासणी, वसुली वा कारवाई करावयाची आहे ती सुरुच ठेवावी. परंतु तात्काळ बैठक घेऊन लवासा क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी निधी मिळवून देण्यात यावा. विभागाचे धोरण म्हणून लवासा पर्यटन केंद्र स्थापन करण्यात आले त्यामागे अशा प्रकारचे अनेक प्रकल्प उभे राहिले पाहिजेत असा उद्देश असावा. शासनाचे धोरण लवासा सारखे प्रकल्प उभे करण्याचे आहे की उभे राहू नये असे अशा प्रकारचे आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय आयुक्त यांनी सर्व यंत्रणांची बैठक घेऊन लवासा क्षेत्रात आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत नियोजन करावे, अशा सूचना विभागाकडून देण्यात येतील. शासनाचे हिल स्टेशन संबंधीचे धोरण आजही अस्तित्वात आहे. त्यानुसार वेगवेगळे लोक जमिनी एकत्र करुन त्यासंबंधीच्या परवानग्या शासनाकडे मागतात व सदर प्रक्रिया शासनाकडून तीन टप्प्यात पार पाडण्यात येते. त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आज निर्माण झालेली आहे. विशेष नगर वसाहत स्थापन करण्याकरिता मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून बरीच मोठी जबाबदारी विकासकास देण्यात येते त्यामुळे त्यांना अनेक परवानग्या घेण्याची आवश्यकता नसते. म्हणून विशेष नगर वसाहत या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे व त्यामध्ये शासनाकडून आवश्यक दुरुस्ती करुन सुधारणा करण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

**३.४७** लवासा क्षेत्रामध्ये समुद्र सपाटीपासून १००० मीटर पेक्षा जास्त ऊंचीवर करण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई करण्यात आली

आहे काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता सदर प्रकरणी नोटीस देण्यात आली असून उत्तरासाठी संबंधिताना १ महिन्याची मुदत देण्यात आली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.४८** याबाबत अधिक माहिती देतांना स्थानिक प्राधिकारी यांनी लवासा क्षेत्रात समुद्र सपाटीपासून १००० मीटर पेक्षा जास्त ऊंचीवर करण्यात आलेल्या बांधकामाबाबत दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. असे समितीला अवगत केले आहे.

**३.४९** लवासा क्षेत्रात समुद्र सपाटीपासून १००० मीटर पेक्षा जास्त ऊंचीवर करण्यात आलेल्या बांधकामांची संख्या किती आहे ? अशी विचारणा केली. तसेच लवासा क्षेत्रात समुद्र सपाटीपासून १००० मीटर पेक्षा जास्त ऊंचीवर झालेल्या बांधकामांना पर्यावरण विभागाची परवानगी नाही. शासनाकडून अशा बांधकामांची शहानिशा करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ? अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी कारवाई करणार असे सांगितले असल्याचा पुनर्उच्चार विभागीय सचिवांनी केला.

**३.५०** सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी एक तक्रार केलेली आहे, त्याचप्रमाणे अशा ३२ लोकांनी लवासा कंपनी विरोधात तक्रारी केलेल्या आहेत. या ३३ तक्रारीबाबत काय करवाई केली याची महिती समितीला एक महिन्याच्या आत लेखी. स्वरूपात सादर करावी. असे समितीने निदेश दिले.

**३.५१** यासाठी एक महिन्याचा कालावधी अत्यंत कमी आहे, कारण हा विषय अतिशय किचकट आहे त्यामुळे या कामासाठी तीन महिन्याचा कालावधी द्यावा अशी विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली.

**३.५२** यावर संबंधित सर्व कागदपत्रे समितीकडे सादर करावीत. तसेच योग्य ती कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले. जिल्हाधिकारी, पुणे व लवासा कॉर्पोरेशन लि. यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-'अ')**

**३.५३** दिनांक ११ व १२ सप्टेंबर २०१५ ला समिती लवासा कॉर्पोरेशनच्या प्रकल्पाला भेट देण्यासाठी गेली होती, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे व लवासा कॉर्पोरेशन लि. यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-'अ')** काही स्थानिक प्रश्नांबद्दल ग्रामविकास विभागाकडून काही विशिष्ट माहिती जाणून घेण्याकरिता समितीने ग्रामविकास विभागाच्या सचिवांची दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ रोजी पुन्हा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने लवासा कॉर्पोरेशनने जागा विकत घेतली आहे, तेथील ग्रामीण रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीचा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या माध्यमातून होत होता. लवासा कॉर्पोरेशनने तेथील सर्व रस्त्यांची पार्टली खरेदी केली आहे. मात्र त्या रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीचे काम लवासा कॉर्पोरेशनकडून पूर्णपणे होत नाही. अंदाजे ४ हजार ग्रामस्थ २० गावांमध्ये राहतात, त्यांना खूप अडचणी येत आहेत. तत्संबंधाने ग्रामविकास विभागाची काय भूमिका आहे ? तेथे धार्मिक स्थळे आहेत. समितीने गावकऱ्यांशी भेट घेतली होती, त्यांनी मागणी केली की, धार्मिक स्थळांची जागा ग्रामपंचायतीच्या नावावर झाली पाहिजे, जेणेकरून शासनाच्या निधीच्या मदतीने विकास करता येईल. परंतु लवासा कॉर्पोरेशनकडून जागा देण्यात येत नाही. सदर विषयाच्या बाबतीत ग्रामविकास विभागाच्या भुमिकेसंदर्भात विचारणा केली.

**३.५४** विभागीय सचिव यांनी असे विदित केले की, जिल्हा परिषदेकडून सन २००७ ला ठराव करून १०९ कि.मी. रस्ता देखभाल दुरूस्तीसाठी लवासा कॉर्पोरेशनला देण्यात आला आहे, ते सध्या देखभाल दुरूस्तीचे काम करीत आहेत. तसेच यासंदर्भात अधिक माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी नमूद केले की, लवासा कॉर्पोरेशनच्या हद्दीमध्ये इतर जिल्हा मार्ग क्रमांक ६५ व ६६ असे एकूण २ इतर जिल्हा मार्ग होते. इतर जिल्हा मार्ग क्रमांक ६६ ची सर्वसाधारणपणे ३४ कि.मी. लांबी आणि इतर जिल्हा मार्ग क्रमांक ६५ ची ५७ कि.मी लांबी आहे. तसेच इतर जिल्हा मार्ग क्रमांक ६६ मधील आणखी १८ कि.मी. अशी एकूण १०९ कि.मी. लांबीचा रस्ता लवासा कॉर्पोरेशनकडे त्यांच्या मागणीनुसार आणि जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभा क्रमांक ९६ अन्वये दिनांकित १० ऑगस्ट २००७ प्रमाणे जिल्हा परिषदेकडे मालकी ठेवून केवळ देखभाल दुरूस्तीसाठी हस्तांतरित करण्यात आला आहे. रस्ते हस्तांतरित करण्यात आले आहेत, इतर जिल्हा मार्ग क्रमांक ६६ ची डागडुजी करीत आहेत. जिल्हा मार्ग क्रमांक ६५ मध्ये सुधारणा होऊन तो एमडीआरमध्ये कन्व्हर्ट झाला आहे. त्याची एकूण लांबी ५७ कि.मी. आहे, तो राज्य मार्ग क्रमांक ६० ला जोडला आहे. त्यामुळे डागडुजीच्या संदर्भात काही मुद्दे असतील. तथापि, मालकीच्या संदर्भात कोणतीही शंका नसून मालकी ही पूर्णपणे जिल्हा परिषद, पुणे यांची आहे.

**३.५५** यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००७ मध्ये ऑगस्ट महिन्यात रस्ता घेतला, म्हणजे सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पाच्या वेळी घेण्यात आला आता ८ वर्षे पूर्ण झाली आहेत आपण रस्ते किती वेळात करतो ? आपण रस्ते रिकन्स्ट्रक्टिंग करायचे असतील, रि-सरफेसिंग करायचे असतील तर ४-५ वर्षांनी करतो. आता ८ वर्षे झाली आहेत. विभागाने त्यांना देखभाल दुरूस्तीसाठी दिले आहेत. रस्त्याचे शेवटचे रि-सरफेसिंग कधी झाले होते, सन २००७-०८ ला ठराव करून त्यांना देखभाल दुरूस्तीसाठी दिल्यानंतर रि-सरफेसिंग, रिकन्स्ट्रक्टिंग कधी झाले ? तेथे खूप पाऊस पडतो आहे, त्यामुळे रस्त्यांची परिस्थिती वाईट होते. समितीला एवढेच विचारावयाचे आहे की, सन २००७ पर्यंत रस्ता कधी केला आणि त्यानंतर कधी केला आणि तो रि-कन्स्ट्रक्ट कोणाच्या खर्चाने केला आहे ?

**३.५६** सदर बाबतीत २ भाग आहेत. इतर जिल्हा मार्ग ६५ व ६६. इतर जिल्हा मार्ग ६५ चे हस्तांतरण झाले नाही ड्युली ठराव झाला, पण हस्तांतरण करणे किंवा काम करणे हे लवासाने आजिबात केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे असे स्थानिक प्राधिकारी यांनी सांगितले यावर समितीने त्यांनी देखभाल दुरूस्ती केली नाही ठराव केला म्हणून लवासाने दुर्लक्ष केले. त्यामळे लोकांच्या हालअपेष्टाच झाल्या असतील असे मत समितीने व्यक्त केले.

**३.५७** स्थानिक प्राधिकारी यांनी यांस अस्विकृती दर्शवून काही लेन मिसिंग आहे, ती एस्टॅब्लिश करण्याचे काम बांधकाम विभागाने हाती घेतले आहे. इतर जिल्हा मार्ग ६६ ची रोड लेन जवळपास ५४ कि.मी. आहे असे स्पष्ट केले.

**३.५८** यावर सन २००७ च्या अगोदर रस्ते हस्तांतरित केले, ते रि-कन्स्ट्रक्टिंग सन २००७ पूर्वी कधी केले आणि सन २००७ नंतर कधी केले आणि कोणाच्या खर्चाने केले किंवा झाले की नाहीत ? याबाबत समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी यासंदर्भात माहिती देण्याकरिता वेळ मिळण्याबाबत समितीस विनंती केली.

**३.५९** जिल्हापरिषदेने स्वतःची मालकी ठेवून लवासाला रस्ते हस्तांतरित केले आहे. त्यामुळे त्यांनी देखभाल दुरूस्ती केली नाही तर तेथे राहणाऱ्या लोकांना वाऱ्यावर सोडणार का ? आपल्याला त्या लोकांना वाहतुकीसाठी, येण्याजाण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकाक आहे. समिती दौऱ्यावर आली, लोकांनी सांगितले की, शाळेची बस येत नाही. कारण रस्ते बरोबर नाहीत. लवासा कॉर्पोरेशनचे अधिकारी सांगतात की, रस्ते बरोबर नसल्यामुळे बस बंद करतो. लवासा कॉर्पोरेशन देखभाल दुरूस्ती करीत नसेल तर आपण केली पाहिजे. कारण आपली मालकी ठेवून त्यांना रस्ते देखभाल दुरूस्तीसाठी दिले आहेत. त्यामुळे ती जबाबदारी जिल्हा परिषदेची असली पाहिजे आणि त्याप्रमाणे जिल्हा परिषद काम करण्याचा प्रयत्न करीत आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी एकदा लवासा कॉर्पोरेशन बरोबर चर्चा करून ते दुरूस्तीचे काम हाती घेणार असतील तर त्यांच्याकडून करून घेण्यात येईल, लवासाने असमर्थता दर्शविली तर जिल्हा परिषद नक्की ते काम हाती घेऊन करेल असे समितीस आश्वासित केले.

**३.६०** जिल्हा परिषदेचा रस्ता आहे. लवासा कॉर्पोरेशनने तो रस्ता दुरूस्त केला नाही अशा प्रकारचे निवेदन ग्रामस्थांनी ८ वर्षांत दिले होते का ? समितीला सांगण्यात आले की, वारंवार अशी निवेदने दिली आहेत. लवासा कॉर्पोरेशनने नियमांचे पालन केले नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची होती. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद म्हणून आपण कोणती कार्यवाही पार पाडली, कोणते प्रयत्न केले, करार करून, रस्ता हस्तांतरित करून परत बघायचे की नाही ? याबाबत समितीने विचारणा केली तसेच जिल्हा परिषदेचे सदस्य श्री. इंगोले यांच्या म्हणण्यानुसार लवासा आल्यानंतर त्यांनी पिरंगुटदास ते उडवळे, पानशेत ते दासवे हे रस्ते स्वतःकडे घेतले होते. परंतु त्या रस्त्यांच्या संदर्भातील कोणतेही काम केले नाही. आता त्या रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. सदर रस्त्यांचे काम जिल्हा परिषदेकडूनही झालेले नाही आणि लवासाकडूनही झालेले नाही. त्यामुळे या संदर्भात देखील विचार व्हावा असे मत समितीने व्यक्त केले.

**३.६१** उपरोक्त अनुषंगाने स्थानिक प्राधिकारी यांनी जिल्हा परिषदेने पत्राने लवासा कॉर्पोरेशनला कळविले आहे. दिनांक २५ जुलै २०११, दिनांक ८ऑगस्ट २०११, दिनांक १९ सप्टेंबर २०११, दिनांक ७ एप्रिल २०१४, दिनांक २९ एप्रिल २०१४ या ५ पत्रान्वये त्यांना सदर रस्ता तुमच्याकडे हस्तांतरित केल्यामुळे त्याची डागडुजी करण्यात यावी अन्यथा तो करारनामा रद्द करण्यात येईल अशा प्रकारचे पत्र देण्यात आले आहे असे समितीस अवगत केले.

**३.६२** यावर लवासाने प्रतिसाद काय दिला ? अशी विचारणा समितीने केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी प्रतिसाद आलेला नाही असे नमूद केले.

**३.६३** प्रतिसाद आलेला नाही करार केल्यानंतर कोणी नियमांचे पालन करीत नसेल तर किती वर्षांपर्यंत पत्र लिहायचे आणि बघ्याची भूमिका घ्यायची ? विभागाला वाटत नाही का की, कराराचे पालन केले नाही तर त्यांच्या विरोधात २, ४, ६ महिन्यांत किंवा जास्तीत जास्त एक वर्षात कारवाई झाली पाहिजे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिव यांनी जिल्हा परिषदेला रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी मर्यादित निधी मिळत आहे. त्यामुळे कदाचित त्यांनी पुढे आल्यास करता येईल असे समितीस अवगत केले.

**३.६४** समितीने सन २०११ पासून लवासा कॉर्पोरेशनने कोणतीही कार्यवाही केली नाही, काळजी घेतली नाही त्यामुळे विभाग म्हणून आपण काय कारवाई केली किंवा किती दिवसांत करणार आहात ? याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी हा रस्ता जिल्हा परिषदेचा आहे. आम्ही जिल्हा परिषदेला तत्काळ या विषयात नजरेस आणू शकतो, ते जिल्हा परिषदेने करावयाचे आहे. परत असे घडू नये याची काळजी घेण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

**३.६५** सन २०११ ते सन २०१४ पर्यंत ५-६ वेळा लवासा कॉर्पोरेशनला पत्र दिल्यानंतरही कारवाई झाली नसेल तर ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये कराराच्या संदर्भातील दावा दाखल केला नाही, शासनाला सूचना दिली नाही त्या अधिकाऱ्यांवर विभाग कारवाई करणार आहे का ? अशी विचारणा केली असता पहिल्यांदा जिल्हापरिषदेचे अभिप्राय घेण्यात येतील तसेच ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेला काही स्वतंत्र विषय दिले

आहेत. इतर विभागांसारखा जिल्हा परिषदेने ठराव घेतला आहे. विभागातर्फे जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आणण्यात येते की, सन २००७ ला ठराव केला आहे, ६-७ वेळा पत्र दिले आहे. जिल्हा परिषदेकडून उत्तर आल्यावर पुढील कारवाई विभाग करू शकतो असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**३.६६** सद्यःस्थितीत तेथे रस्ते आहेत. दरवर्षी रस्ते दुरूस्तीचा कार्यक्रम शासनाच्या वतीने जिल्हा परिषदेला देण्यात येतो. शासनाला नजरेस आणून दिलेला विषय अतिशय गंभीर आहे. लोकलेखा समितीच्या समोर हा विषय आला आहे. लवासा कॉर्पोरेशन कराराप्रमाणे नियम पाळत नसेल तर ते योग्य नाही, तेथे राहणाऱ्या लोकांना सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत, त्यामुळे या दृष्टीने विशेष दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत या रस्त्यांची कामे हाती घेणार का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिव यांनी आता ही बाब नजरेस आणल्यामुळे जिल्हा परिषदेला या संदर्भात विचारणा करण्यात येईल असे नमूद केले.

**३.६७** सदर विषय समोर आल्यानंतर समितीने तेथील ग्रामस्थांबरोबर बैठक घेतली आणि त्या बैठकीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे देखील उपस्थित होते. लवासा कॉर्पोरेशनने देखील भूमिका मांडली की, आमची आर्थिक परिस्थिती नाही की, आम्ही ते रस्ते लगेच दुरूस्त करू शकू. आता त्यांनी हात वर केले आहेत. लवासा कॉर्पोरेशन त्या संदर्भात कारवाई करणार, तोपर्यंत आपण लोकांना वाऱ्यावर सोडू शकत नाही. त्यामुळे या दृष्टीने शासनाने जिल्हा परिषदेची भूमिका स्पष्ट करावी. समितीने जाऊन स्वतः पाहिले आहे. लोकांच्या अडचणी जाणून घेतल्या आहेत. आता शासनाने निर्णय घ्यायचा आहे. आता विचारण्याचे कारण नाही. शासनाचा विभाग जिल्हा परिषदेला रस्ते दुरूस्तीसाठी १०-२० कोटी रूपये देतो. समितीचे म्हणणे असे नाही की, तुम्ही आजच्या आज दुरूस्ती करावी. परंतु लोकांच्या येण्याजाण्यासाठी सोयीचे झाले पाहिजे, या दृष्टीने आपण कार्यवाही याच वर्षी करणार का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिव यांनी तक्रार आल्यानंतर तत्काळ पत्र पाठवून पुढील कार्यवाही केली जाणार आहे असे विदित केले.

**३.६८** लवासाची डेव्हलपमेंट सुरू असून, त्या ठिकाणचे रस्ते उत्कृष्ट आहेत. परंतु, गावातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. समिती विकासाच्या विरोधात नाही पण तोच विकास लोकांच्या जीवाशी येणार नाही, याची दक्षता मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी घेण्याची गरज आहे असे अभिप्राय समितीने नोंदविले असता विभागीय सचिव यांनी गेल्या ७ ते ८ वर्षात जर कोणतीच कार्यवाही केलेली नसेल तर या बाबत जिल्हा परिषदेला योग्य त्या सूचना देण्यात येतील. तसेच विशेष दुरुस्ती निधीमधून रस्त्यांच्या दुरुस्तीचे कामे घेता येतील किंवा कसे याचा अभ्यास करण्याबाबत सांगण्यात येईल असे विदित केले.

**३.६९** या रस्त्यांच्या संदर्भात जे ॲग्रिमेंट केलेले आहे ते रद्द केले जाणार आहे काय ? सदर रस्ता लवासा कॉर्पोरेशनला हस्तांतर केलेला आहे. लवासासोबत करार करायचे आणि त्यानंतर विभागाने रस्ता दुरूस्त करावयाचा हे काही बरोबर नाही. लवासाला रस्ता हस्तांतर केल्यानंतर पुन्हा जर तो रस्ता शासनाने केला तर महालेखाकार यांच्याकडून आक्षेप येऊ शकते, याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी जिल्हापरिषदेने ठराव केलेला आहे असे विदित केले.

**३.७०** यासंदर्भात अधिक माहिती देताना स्थानिक प्राधिकारी यांनी नमूद केले की, या ठिकाणी दोन विषयावरील चर्चा उपस्थित केली जात आहे. सन २००७ मध्ये लवासाला ओडीआर क्रमांक ६५ आणि ६६ हस्तांतरीत केलेला आहे. त्यांनी देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित होते. सन २००७ पूर्वी सदर रस्त्याचे सर्फेसिंग कधी केले आणि सन २००७ नंतर सर्फेसिंग कधी केले. ओडीआर क्रमांक ६६ चे सर्फेसिंग सन २००४ पासून ते सन २००७ पर्यंत निधीच्या उपलब्धतेनुसार ३ वर्षांत टप्प्याटप्प्याने केले होते. सन २००७ नंतर लवासाकडे ट्रान्सफर झाल्यानंतर १० कि.मी.पर्यंतचा रस्ता वेलमेंटेन ठेवलेला आहे. उर्वरित रस्त्याच्या संदर्भात त्यांना अंतिम नोटीस देण्यात येईल. जो रस्ता मेटेनन्स करण्यासाठी हस्तांतरित केलेला आहे, तो रस्ता मेटेंन केला नाही तर जिल्हापरिषदेने केलेला ठराव रद्द करण्याची कारवाई करावी लागेल अशा प्रकारची नोटीस त्यांना देण्यात येईल.

**३.७१** समितीने यावर अशी कारवाई किती दिवसात केली जाणार ? अशी विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी सदर कारवाई करण्यासाठी ३ महिन्यांचा अवधी देण्यात यावा अशी समितीस विनंती केली व त्यांनी सन २००५ मध्ये जिल्हा परिषदेकडे मागणी केली होती. म्हणून जिल्हा परिषदेतील सर्वसाधारण सभेत ठराव करुन मालकी जिल्हापरिषदेकडे ठेऊन त्यांच्याकडे तो रस्ता हस्तांतरित करावा असा निर्णय घेण्यात आला होता अशी माहिती समितीस दिली.

**३.७२** यावर समितीने सदर रस्ता देखभाल करण्यासाठी दिलेला असून, तो रस्ता लवासाच्या खर्चातून बांधला पाहिजे असे मत नमूद केले व त्यावेळी त्यांच्यावर अटी व शर्ती टाकण्यात आल्या होत्या काय ? अशी विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी त्यावेळी अटी व शर्ती

कोणत्या होत्या, या बाबतची शहानिशा केली जाईल आणि त्यानंतर नोटीसा बजावून तीन महिन्याच्या आत हा प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाईल असे समितीस आश्वासित केले.

**३.७३** पुढील ३ महिन्यांत कोणत्याही परिस्थितीत ते रस्ते झालेच पाहिजे, या दृष्टीकोनातून जिल्हा परिषदेने कार्यवाही करावी व त्यासंदर्भातील अहवाल समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा अशी समितीची सूचना आहे असे अभिप्राय व्यक्त केले असता स्थानिक प्राधिकारी यांनी जनरल बॉडीचा ठराव तसेच इतर कायदेशीर बाबी तपासून जिल्हा परिषदेला पुढील कार्यवाही करावी लागणार आहे असे समितीस विदित केले.

**३.७४** यासंदर्भात कायदेशीर पेचप्रसंग निर्माण होण्याची शक्यता देखील नाकारता येणार नाही. सद्यःस्थितीत त्यांनी रस्ते घेण्याचे नाकारले तर आपल्याला कोर्टात जाण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय असणार नाही. सदर रस्ते त्यांनी घेण्याचे नाकारले तर त्या रस्त्यावर टोल उभारण्याची गरज आहे असे समितीने अभिप्राय नोंदविले असता यावर स्थानिक प्राधिकारी यांनी या सर्व बाबींची संपूर्ण तपासणी करण्यासाठी जिल्हा परिषदेला आणखी ६ महिन्यांचा कालावधी देण्यात यावा अशी विनंती केली.

**३.७५** २० गावांपैकी १८ गावे लवासामध्ये येत आहेत. या १८ गावात काही ठिकाणी पाणीपुरवठा टँकरने केला जात आहे. त्या गावांच्या विकासासाठी डीपीआर तयार केलेला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी लवासा कॉर्पोरेशन अंतर्गत ९ ग्रामपंचायती येत असून ग्रामपंचायत दासवे, मोईनी, आडमाड, धामनओळ या मुळशी तालुक्यातील ग्रामपंचायती आहेत. त्या ठिकाणच्या पक्क्या रस्त्यांची सुविधा जिल्हापरिषदेने केलेली आहे. दासवे गावात लवासामार्फत पाणीपुरवठा केला जातो अशी समितीस माहिती दिली.

**३.७६** तसेच दासवे आणि मोईनी गावात नळाद्वारे आणि टँकरद्वारे देखील पाणीपुरवठा केला जातो. आडमाळ आणि पाथरसेल या गावात टँकरने पाणीपुरवठा केला जातो असे समितीस विदित केले.

**३.७७** अशा गावांना टँकरमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने उपाययोजना केलेल्या आहेत की नाही ? याबाबत समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी अशा गावात जलयुक्त शिवार योजना राबविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे असे समितीस अवगत केले.

**३.७८** समितीने पाणी देण्यासंदर्भात लवासा कॉर्पोरेशनची कोणती जबाबदारी आहे ? अशी विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी पाणी देण्यासंदर्भात लवासा कॉर्पोरेशनची कोणतीही जबाबदारी नाही असे नमूद केले असता त्या संबंधित दोन गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली पाहिजे असे मत समितीने नोंदविले.

**३.७९** स्थानिक प्राधिकारी यांनी काही गावांमध्ये लवासा कॉर्पोरेशन हे मानवतेच्या दृष्टीकोनातून पाणी पुरवठा करीत आहे असे समितीस विदित केले.

**३.८०** यावर समितीने मग एवढी वर्षे जिल्हा परिषदेने अशी कार्यवाही का केली नाही ? यावर विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी पाण्याचा स्त्रोत लवासाच्या हद्दीत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत जागेची मागणी करुन पुढील कार्यवाही केली जाणार आहे अशी माहिती दिली.

**३.८१** वरसगाव धरणालगत असलेली साईव, मोसे, सांडवघर, घडवली व तव ही पाच गावे लवासा सिटी अंतर्गत येत नसून, या गावांच्या विकासासाठी जिल्हा परिषदेने कोणती उपाययोजना केली आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी त्या ठिकाणी जलवाहतुकीची सुविधा दिलेली आहे. तरंगता दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. वाहतुकीसाठी लॉन्चची सुविधा दिलेली आहे असे नमूद केले.

**३.८२** वरसगाव धरणालगत असलेली साईव, मोसे, सांडवघर, घडवली व तव ही पाच गावे लवासा सिटी अंतर्गत येत नसून, या गावांच्या विकासासाठी जिल्हा परिषदेने कोणती उपाययोजना केली आहे व त्या गावांना गिरीस्थानाचा दर्जा देण्याबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येणार आहे काय, असल्यास किती कालावधीमध्ये होणे अपेक्षित आहे याबाबत समितीने विचारणा केली असता स्थानिक प्राधिकारी यांनी संबंधित गावांना गिरीस्थानाचा दर्जा देण्यासंदर्भातील प्लॅनिंग प्रोसेसमध्ये आहे असे समितीस अवगत केले.

**३.८३** लवासा कार्पोरेशन संदर्भात पर्यावरण विभागाशी संबंधित परिच्छेद ४.३.८ बाबत सद्यःस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने पर्यावरण विभागाच्या सचिवांची साक्ष दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ रोजी घेतली.

**"पर्यावरणीय मंत्रालयाच्या मान्यतेशिवाय प्रकल्पाला दिलेली परवानगी आणि प्रकल्प क्षेत्रात केलेली वाढ"**

**३.८४** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात २ हजार हेक्टरपर्यंतचे अ‍ॅप्रूव्हल आहे. ८०-८२ हेक्टर जागा खरेदी केली आहे याबद्दल विभागाने आपली बाजू मांडावी. २ हजार हेक्टरसाठी प्रकल्प मान्य झाला होता. प्रोजेक्ट एरिया वाढलेला आहे याबद्दल पर्यावरण विभाग व मंत्रिमंडळाची मान्यता नाही याबद्दल काय म्हणणे आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी पर्यावरणाचे प्रोव्हिजनल क्लिअरन्स दिनांक १३ डिसेंबर २००२ ला देण्यात आले होते. दिनांक ११ मार्च २००४ ला फायनल एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्स देण्यात आले होते. कन्सेंट-टू- ऑपरेट

एमपीसीबीमार्फत देण्यात आले होते. आता त्यांना १ हजार हेक्टरपर्यंत एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्सची गरज नाही असे समितीस विदित केले.

**३.८५** समितीने वाढलेल्या एरियासंदर्भात विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी समुद्रसपाटीपासून १ हजार मीटरपर्यंत त्यांना एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्स लागत नाही. त्यांचे म्हणणे होते की, ५ फेजमध्ये प्रकल्प करणार आहोत. पहिल्या १, २ फेजमध्ये १ हजार एमएसएफमध्ये बांधकाम करायचे, त्याला एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्सची गरज नव्हती, त्यानंतर त्यांना २ हजार मीटरपर्यंत त्यांना करायचे होते, ते घेतले पाहिजे होते, ते घेतले नाही म्हणून त्यांच्या विरोधात दिनांक ४ नोव्हेंबर २०११ ला केस दाखल करण्यात आली. केस सुरु आहे असे समितीस अवगत केले.

**३.८६** समितीस पूर्वीच्या साक्षीच्या बैठकीमध्ये सांगितले होते की, As per Regulation 21 of SDCR the Developer has to produce it at the time of initial census. त्यांचा एरिया २ हजार हेक्टरपासून ३८८२ हेक्टरपर्यंत पोहचला आहे. आपले याबद्दल म्हणणे आहे की, १ हजार मीटरपर्यंत काही गरज नाही यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी उंची व व्याप्ती हे दोन भाग आहेत. उंचीबाबत २ हजार हेक्टरपर्यंत त्यांचा एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्स होता, त्याच्या पलीकडे जाण्यासाठी त्यांनी ॲप्लिकेशन दिले आहे. राज्य शासनाची एसईएसी समितीपुढे सुनावणी सुरू आहे असे समितीस अवगत केले.

**३.८७** महालेखाकारांच्या परिच्छेदात लिहिले आहे की, अभिलेख्यांच्या छाननीत असे दिसून आले की, नोव्हेंबर, १९९६ मध्ये निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या नियम क्रमांक २ ला अनुसरून युडीडीने प्रारंभी ४०० हेक्टर आणि २ हजार हेक्टर या दरम्यान क्षेत्र विकासासाठी निश्चित केले होते. मे, २००१ मध्ये नियमातील दुरूस्तीद्वारे युडीडीने सदर कमाल मर्यादेचे बंधन काढून टाकले आणि अशाप्रकारे कुठल्याही प्रकल्पांतर्गत विकास केला जाऊ शकेल अशा एकूण क्षेत्रावर कुठलाही निर्बंध राहिला नाही. आता जर ते २ हजार हेक्टरच्या वर गेले असतील म्हणजे जवळपास ३८८२ हेक्टरपर्यंत गेले असतील तर आपण मे, २००१ ला याचे नोटिफिकेशन काढून कमाल मर्यादा काढून टाकली आहे. सोशिओ-इकोनॉमिक परिणाम काय होणार हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. २ हजार हेक्टर पासून ३८८२ हेक्टपर्यंत गेले. एरिया दुप्पट केला. ४०० ते २ हजार हेक्टरपर्यंत ज्या काही स्टडी झाल्या असतील त्यावर सोशिओ-इकोनॉमिक फॅक्टर इफेक्ट करणार असतील. नगरविकास विभागाने २ हजार हेक्टरपेक्षा किती जास्त परवानगी दिली. मे, २००१ ला सोशिओ-इकोनॉमिक फॅक्टर यावर काय परिणाम करणार याचा अभ्यास केला होता का, सोशिओ-इकोनॉमिक फॅक्टर प्रत्येक प्रकल्पात अति महत्त्वाचा आहे, त्या संदर्भात काही ग्रिव्हन्सेस, इफेक्ट तपासून पाहून निर्णय घेणार का ? यासंदर्भात समितीने विचारणा केली.

**३.८८** या अनुषंगाने विभागीय सचिव यांनी पहिल्या फेजमध्ये २ हजार हेक्टरपर्यंत मान्यता मिळाली होती. एमओईएफने एन्व्हॉयरमेंट क्लिअरस दिला होता. फेज १ मध्ये १०५० हेक्टरपर्यंत बांधकाम दाखविले होते, त्याच्या पलीकडे जाऊन फेज २ मध्ये २ हजार हेक्टरपर्यंत बांधकाम करायचे होते, त्याचे त्यांनी ॲप्लिकेशन दिले होते, ते अप्लिकेशन एसईएसी पुढे आहे अशी माहिती समितीस दिली.

**३.८९** सन २०११ मध्ये नगरविकास विभागाने पर्यावरण विभाग व उद्योग विभाग यांच्या मान्यतेने मर्यादा २ हजार हेक्टर करून बी केले होते ते केले नाही, त्यामुळे महालेखाकारांचा आक्षेप असा होता की, डोंगराळ प्रदेश भौगोलिकदृष्ट्या आणि पर्यावरणादृष्ट्या संवेदनक्षम असल्याने आणि त्यांच्या विकासात सामाजिक-आर्थिक परिणाम दडलेले असल्याने या मुद्यांच्या अभ्यासपूर्ण अहवालांच्या आधारावर थंड हवेच्या ठिकाणाच्या विकासासाठीची मंजुरी युडीडीने ईडी आणि आयई ॲण्ड एलडी यांच्याबरोबर विचारविनिमय केल्यानंतर द्यावयास हवी होती. या प्रकल्पामुळे होणारे दूरगामी परिणाम लक्षात घेता त्याकरिता मंत्रिमंडळाची मान्यता देखील आवश्यक होती. परंतु अशा बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले होते अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी येथे २ मुद्दे आहेत. २ हजार हेक्टरची कमाल मर्यादा होती, ती काढून टाकली, त्यावेळी याबद्दल काही विचार झाला होता का, यासंबंधी इतर विभागांशी विचारविनिमय झाला होता का, मंत्रिमंडळाकडे का गेले नाही असा महालेखाकारांचा मुद्दा आहे. दुसरा विषय असा आहे की, याबाबत शासनाचा आता काय विचार आहे ? मी पहिल्या मुद्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, जेव्हा कोणत्याही प्रकारचा एमआरटीपीखाली बदल करतो किंवा सूचवितो तेव्हा कायद्यामध्ये जे काय अंतर्भूत आहे त्या लेव्हलचे पब्लिक कन्सल्टेशन करतो, अधिसूचना काढतो, सूचना व हरकती घेतो, काही म्हणणे असेल तर सुनावणी देतो. आक्षेपांवर सुनावणी घेऊन मग संचालकांच्या सल्ल्याने शासन स्तरावर याबाबतचा अंतिम निर्णय केला जातो. कायद्यामध्येच ही प्रक्रिया अंतर्भूत असल्यामुळे या प्रक्रियेचे पूर्ण पालन केले जाते आणि याबाबत पुन्हा वेगळ्याने माननीय मंत्रिमंडळासमोर जाण्याची आवश्यकता नाही. कारण कायद्यामध्ये लिहिले आहे. कारण कायदा हा त्या-त्या वेळी मंत्रिमंडळाने आणि विधानमंडळाने संमत केलेला आहे. त्यामुळे कायद्यामध्ये दिलेल्या सर्व प्रक्रियेचे पालन केले जाते. सन १९९४, सन १९९६, सन २०००, सन २००१, सन २००३ चे नियम झाले आणि नंतरचे बदल झाले, जेव्हा जेव्हा बदल झाले तेव्हा तेव्हा या सर्व प्रक्रियेचे पालन केले आहे. आता आपल्यासमोर स्पेसिफिक मुद्दा आहे की, शासन या संसदर्भात काही विचार करणार का ? आताचे धोरण आहे ते पर्यावरण विभागाला पाठवू, आणखी एखाद्या विभागाला म्हणजे ग्रामविकास विभागाला पाठविण्याची गरज असेल तर त्यांनाही पाठवू. पब्लिक डोमेन येत असेल आणि आक्षेप घ्यायचा असेल तर घेऊ शकतात. परंतु प्रत्येकाला हे समजते असे नाही. नगरविकास विभागातर्फे ते सर्व संबंधित विभागांना पुन्हा एकदा पाठवू, त्यांचे काही त्या संदर्भात म्हणणे असेल तर नवीन धोरणामध्ये त्याचा अंतर्भाव करण्याचा प्रयत्न करू असे समितीस विदित केले.

**३.९०** पर्यावरण विभागाची राज्यस्तरीय समिती आहे. एका प्लॉटमध्ये २० हजार चौ.मी.च्या वर बांधकाम करायचे असेल तर पर्यावरण विभागाची परवानगी लागते. लवासा हा देखील एक प्लॉट आहे, त्यामध्ये २० हजार चौ.मी. च्या वर बांधकाम सुरू आहे. पर्यावरण विभागाला या सर्व परवानगीसाठी प्रस्ताव आले का, आले असतील तर, पर्यावरण विभागाच्या राज्याच्या समितीने त्याला परवानगी दिली का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिव यांनी पर्यावरण विभागाच्या राज्यस्तरीय समितीसमोर सन २०१३ ला अर्ज केला आहे, एसईएसी समोर सुनावणी सुरू आहे. नियमाप्रमाणे देता येईल की नाही ते समिती आणि राज्य प्राधिकरण विचार करेल असे सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस अवगत केले.

**३.९१** यावर समितीने पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय कोणतीही इमारत बांधता येत नाही, त्यांचे बांधकाम सुरू आहे. पर्यावरण विभागाच्या समितीसमोर आहे, समितीने निर्णय दिला नाही, तोपर्यंत पर्यावरण विभागाची बांधकाम करण्यास परवानगी आहे का ? याबाबत विचारणा केली असता केंद्र शासनाकडुन त्यांना सन २००४ मध्ये एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्स देण्यात आले आहे. सन २००६ पूर्वी नोटिफिकेशन नव्हते. सन २००६ चे नोटिफिकेशन काढल्यानंतर, जे करावयाचे आहे ते, पर्यावरण विभागासमोर या नोटिफिकेशप्रमाणे त्यांना करावे लागेल असे सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विदित केले.

**३.९२** २ हजार हेक्टरच्या एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्सने लेआऊट करण्यात आले. आता तेथे बांधकाम सुरू आहे, ते नदीच्या किनाऱ्यावर आहे, काही वॉटर कॅचमेंट एरियामध्ये आहे, काही वन विभागाच्या भागात आहे. सर्वसाधारणतः विकास नियंत्रण नियमावलीमध्ये २० हजार मीटरपेक्षा जास्तीचा प्रकल्प असेल तर त्याला स्पेशल पर्मिशन एन्व्हॉयरमेंट डिपार्टमेंट, एमपीसीबी यांच्याकडून घ्यावी लागते. लवासा कॉर्पोरेशनच्या बांधकामाच्या संदर्भात पर्यावरण विभागाकडे काही तक्रारी मिळाल्या आहेत का, तक्रारी मिळाल्या असतील तर त्या कोणत्या प्रकारच्या आहेत ? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी सन २००५ ला कन्सेंट-टू-ऑपरेट एमपीसीबीकडून मिळाले आहे. सन २००६ ला केंद्र शासनाचे एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्स मिळाले आहे. त्यावेळी सन २००६ चे नोटिफिकेशन नव्हते. सन २००६ चे नोटिफिकेशन आल्यानंतर, त्यांनी उल्लंघन केले असेल तर त्यांचा एसईएसीपुढे अर्ज आहे, त्यावर कार्यवाही केली जाईल असे समितीस विदित केले.

**३.९३** नगरविकास विभागाने सांगितले पाहिजे की, पर्यावरण विभाग प्रत्येक लेआऊटची परवानगी इतरांना लागू करते ती त्यांना लागू आहे का, त्यांनी सर्व परवानग्या घेतल्या आहेत का, त्यांनी परवानग्या घेतल्या नसतील तर त्यांच्या विरुद्ध आपण काय कारवाई करणार आहात ? आपण इतरांना पूर्ण फेजिंगची परवानगी घ्या असे सांगता. त्यामुळे समितीचे असे म्हणणे आहे की, आपण इतरांना केले त्याप्रमाणे त्यांना लागू करणार का किंवा त्यांना लागू केले आहे ते इतरांना लागू करणार का ? पर्यावरण विभागाच्या परवानगीशिवाय नगरविकास विभाग देखील परवानगी देत नाही. एसपीएला पर्यावरणात सूट नाही. आपण तरीही परवानग्या दिल्या असतील तर त्यांना डीपी देता येत नाही हे विभागाला मान्य आहे का ? याबाबत समितीने विचारणा केली असता नगरविकास विभागाचे सचिव यांनी पर्यावरणाच्या विरोधात एसपीएची परवानगी दिलेली असेल तर ते कायद्यानुसार कारवाईस पात्र आहेत. या केसमध्ये नगरविकास विभागाने परवानगी दिलेली नाही. एसपीए क्रिएट केले हा वेगळा भाग आहे एसपीएवर सर्व कायदे बंधनकारक आहेत. जर त्यांनी त्याचे पालन केले नाही तर त्यांच्या विरोधात देखील कारवाई होऊ शकते असे समितीस अवगत केले.

**३.९४** या विषयी पर्यावरण आणि नगरविकास विकास विभागाने एक महिन्याच्या आत कोणती कारवाई केली त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करण्याबाबत समितीने मत नोंदविले असता विभागीय सचिव यांनी अहवाल सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

**३.९५** या विषयी पर्यावरण विभागाला काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत काय ? एखाद्या बांधकामाच्या संदर्भात पर्यावरणाचा भंग झालेला असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. अशाच एका प्रकरणी माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांनी स्थगिती दिली होती. अशा प्रकारे माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री एखाद्या बांधकामावर स्थगिती देत असतील तर महाराष्ट्रातील पर्यावरण विभाग त्यावेळी काय करत होते याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी सन २०१० मध्ये एक तक्रार प्राप्त झाली होती. हजार मिटरपेक्षा अधिक ऊंचीचे बांधकाम केल्याची तक्रार प्राप्त होताच संबधिताच्या विरोधात केस दाखल करण्यात आली होती. सद्यःस्थितीत या प्रकरणी कोर्टात केस सुरू आहे अशी माहिती दिली.

**३.९६** या प्रकल्पात जे बांधकाम झालेले आहे, त्याच्या उंचीच्या संदर्भात एक केंद्रीय पथक आले होते. सदर पथकाने कोणता रिपोर्ट दिलेला आहे ? तसेच फायडींग्स काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता केंद्रीय पथकाचा रिपोर्ट खूप मोठा आहे. हाईटच्या संदर्भात आक्षेप घेण्यात आला होता. त्यानंतरच त्यांना फायनल एनव्हायरमेंट क्लिअरन्स दिलेला असून एक हजार मिटर ऊंचीपेक्षा बांधकाम केले म्हणून त्यांच्यावर दिनांक ४ नोव्हेंबर २०११ रोजी केस दाखल केली होती अशी माहिती पर्यावरण विभागाच्या सचिवांनी दिली. तसेच केस सबज्युडियस असल्यामुळे विभाग कारवाई करीत नाही. विभागाकडून फक्त केसचे मॉनेटरिंग करीत असल्याचेही सांगितले.

**३.९७** विभागाने त्यांचेवर कोणती कार्यवाही केली आहे तसेच पर्यवेक्षण कार्य प्रणालीमध्ये म्हाडा, नगरविकास आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या

प्रतिनिधींना बोलाविण्यात आले होते. याबाबत राज्य शासनाने त्यांच्या अहवालात काय म्हटलेले आहे ? संबंधित विभागांनी बांधकामाच्या ऊंचीबाबत प्रतिबंधात्मक कोणती कारवाई केलेली आहे ? पुढे आणखी बांधकाम होऊ नये या दृष्टीकोनातून विभागाने कोणती कार्यवाही केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता पर्यावरण कायद्यानुसार त्यांच्या विरोधात केस दाखल करण्याची कारवाई केली असून सद्य:स्थितीत १४ केसमध्ये कारवाई सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. सदर प्रकरणी नियमानुसार कारवाई करावी अशी समितीची सूचना असून नियमाप्रमाणे प्रोजेक्ट व्हावा अशी देखील समितीची सूचना आहे असे समितीने मत व्यक्त केले.

**३.९८** या प्रकरणी नियमानुसार जी काही पावले उचलावी लागतील ती विभागाने उचलण्याची गरज आहे. त्यांच्या ज्या काही अडचणी असतील त्या देखील विभागाने समजून घेण्याची गरज आहे. सदर प्रोजेक्ट लोकाभिमूख कसा होईल या दृष्टीकोनातून विभागाने प्रयत्न करावा अशी समितीची प्रामाणिक भावना असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

**३.९९ “पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे अनुपालन न होणे”**

यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, एक हजार ऊंचीपेक्षा बांधकाम केले म्हणून त्यांच्या विरोधात केसेस दाखल केलेल्या आहेत.

**३.१००** या विषयी केंद्र शासनाने मिनिस्टर ऑफ एनव्हायरमेंट, गर्व्हनमेंट ऑफ इंडिया यांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २०११ रोजी सशर्त मंजुरी दिली होती. त्यांनी श्रेष्ठ तज्ज्ञ वन व पर्यावरण विभागाचे प्रतिनिधी, राज्य शासन, जिल्हा परिषद यांचा समावेश असलेली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत राज्य शासनाला निर्देश दिले होते. यासंदर्भात जे उत्तर देण्यात आलेले आहे, त्या उत्तरास समितीचे समर्थन नाही. कारण करारानुसार प्रकल्पाच्या कामकाजावर सनियंत्रण ठेवण्यास आणि वेगवेगळ्या पर्यावरण कायद्याचे अनुपालन करण्यास राज्य शासनातील पर्यावरण विभागाने समिती गठित केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता या विषयी केंद्र शासनाकडे सन २०१३ मध्ये प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्याकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळे पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. त्यानंतर विभागाने दिनांक १ ऑगस्ट, २०१३ रोजी पत्र पाठविले होते. तसेच या विषयी विभागामार्फत पुन्हा पत्र पाठविले जाणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**३.१०१** तिसरा मुद्दा सांडपाण्याच्या संदर्भातील असून धरणाच्या पाण्यातच सांडपाणी पाणी डिस्चार्ज होत आहे, त्यासंदर्भात विभागाची नेमकी भूमिका काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे चार एसटीपी प्लॅन्ट लावण्याची परवानगी घेतलेली आहे. यानुसार त्यांनी तीन एसटीपी प्लॅन्ट कार्यान्वित केलेले आहेत. यापैकी एका एसटीपी प्लॅन्टची बीओडी/सीओडी जास्त असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.१०२** समितीची लवासा येथे बैठक झालेली होती. त्यावेळी डिस्चार्ज हे बांधकामासाठी वापरले जात असल्याचे सांगण्यात आले होते. पण ते सांडपाणी धरणात सोडले जात असल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. अशा प्रकारची तक्रार अनेक लोकांनी केलेली आहे. पिण्याच्या पाण्यात ते डिस्चार्ज होऊ नये याकरिता प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणती कार्यवाही केलेली आहे ? या समितीच्या प्रश्नाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने एसटीपीला मान्यता देताना ३० बीओडीचा आहे की नाही ते तपासले जाते अशी माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय प्रतिनिंधींनी दिली.

**३.१०३** डिस्चार्ज केलेले पाणी हे धरणात सोडले जात असेल तर संबंधित कंपनीचे लायसन्स हे ताबडतोब रद्द केले पाहिजे. डिस्चार्ज केलेले पाणी हे जर धरणात सोडले जात असेल तर ते ताबडतोब थांबविले पाहिजे. अशा प्रकारची त्यांना नोटीस देण्याची गरज आहे असे मत समितीने व्यक्त केले.

**३.१०४** लवासाने अनेक कन्सेंटचे अप्लिकेशन दिले आहे. परंतु, एकाही कन्सेंटला ते रिप्लाय देत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. Lavasa Corporation Ltd has submitted following applications to MPCB

1. Consent to operate for Laundry dated 14th February, 2012
2. Consent to operate for Ekaant Hotel dated 31st March, 2011.
3. Consent to operate for Mercure Hotel dated 30th March, 2011.
4. Consent to operate for Fortune Hotel dated 29th March, 2011.
5. Consent to operate for RMC Batching Plant dated 7th March, 2012.
6. Consent to operate for Hot Mix Bitumen Plant dated 14th February, 2012.
7. Consent to Est./operate Bamboo workshop dated 29th March, 2011.

8. Extension of Consent to operate for whole project dated February, 2014.

9. Consent to Establish bakery by Sower of Seeds Ltd. dated 12th November, 2014.

**३.१०५** उपरोक्त नऊ कन्सेंट पैकी एकाही कन्सेंटला रिप्लाय दिलेला नाही. त्यामुळे त्यांना डीम्ड मंजुरी मिळते. यासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाची कोणती भूमिका आहे ? ज्या अधिकाऱ्यांनी उत्तरे दिली नाहीत, अशा अधिकाऱ्यांवर निलंबानाची कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

**३.१०६** याविषयी विभागाने सतत पाठपुरावा केलेला आहे. कन्सेंटला रिप्लाय दिलाच पाहिजे. सन २०११ पासून असे घडत असून ते बरोबर नाही यामध्ये संबंधित जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

**३.१०७ "SPA कडून आराखडे आणि रेखांकने यांना अनियमित मान्यता"** SPA कडून आराखडे आणि रेखांकने यांना अनियमित मान्यता या संदर्भातील विषय असून त्यासंदर्भात अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

**३.१०८** मागील बैठकीत या विषयावर साधक-बाधक चर्चा झालेली होती. त्यावेळी बांधकामाच्या ऊंचीबद्दल चर्चा झालेली नव्हती. परंतु, त्यावेळी असिस्टंट डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग यांनी जे मुद्दे पॉईंट आऊट केलेले होते यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना नोटीस दिलेली असल्याचा खुलासा सचिव, नगरविकास विभाग यांनी केला.

**३.१०९** संबंधित हॉटेलची हाईट २० मीटरच्या वर असल्याचे सांगण्यात आले होते, याबाबत माहिती देण्यात यावी ? असे समितीने विभागास सुचित केले असता संबंधित हॉटेलने २० मीटरपेक्षा अधिक ऊंच बांधकाम करायला नको होते तशी नियमात तरतूद नाही. त्यांनी कन्सेशन देण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या स्तरावर कोणतेही कन्सेशन दिले जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद नियमात असली तरी त्यांनी उंचीमध्ये सवलत देण्याबाबत विनंती केली होती. त्यांनी असे सांगितले होते की, त्या ठिकाणी सर्व्हिस फ्लोअर आहे यासंदर्भात हॉटेलला नोटीस दिलेली असून, त्यानंतर काय करायचे त्याबाबतचा निर्णय विभागाकडून लवकरच घेतला जाणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

**३.११०** १२ हेक्टर एरियापर्यंत कन्स्ट्रक्शन केल्याबाबत सांगण्यात आले होते. ले-आऊटमध्ये ते १२ हेक्टरपर्यंत वगळण्यात आले आहे तसेच ६०० हेक्टरचा काही ले-आऊट आहे. त्यावेळी प्लॅनची माहिती देण्यात आली होती. Was it as per the Regional Plan? अशी विचारणा समितीने केली.

**३.१११** यामध्ये फक्त ले-आऊट मंजूर करावयाचा आहे. याप्रमाणे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी तो ले-आऊट सन २००६ मध्ये मंजूर केलेला होता. त्यानंतर सन २००८ मध्ये माननीय न्यायालयात प्रकरण गेले होते त्यानंतर १२ हेक्टर वगळण्याबाबत कार्यवाही केली होती अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**३.११२** तसेच त्यावेळी अशा प्रकारे माननीय न्यायालयाच्या डायरेक्शन्स होत्या असे काही दिसून येत नाही. त्यावेळी कोर्टात वाद झाल्यामुळे जिल्हाधिकारी आणि प्रोजेक्ट ओनरसमवेत चर्चा झाली होती. त्यानुसार कंपनीने नवीन ले-आऊट तयार करुन ते जिल्हाधिकारी यांच्याकडे दिले होते. त्यानंतर सदर ले-आऊट जिल्हाधिकारी यांना मंजूर केला होता त्यामध्ये संबंधित गावे वगळण्यात आली होती. कंपनीने एक प्लॅन सबमिट केलेला होता आणि जिल्हाधिकारी यांनी त्या प्लॅनला मान्यता दिली होती. त्यामध्ये १२ हेक्टर जागा ही व्हाईट कलरमध्ये दाखविण्यात आली होती. त्यामध्ये डेव्हलपमेंटचे प्रपोजल नाही, असे कंपनीने मान्य केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या प्लॅनला मान्यता दिली होती. तसेच यासंदर्भात नगरविकास विभागाला पाटबंधारे विभागाचे त्या विषयी मत काय आहे ते जाणून घ्यावे लागणार आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

**३.११३** विभागाने सांगितले होते की, हा प्लॅन आहे, जिल्हाधिकाऱ्यांचा प्लॅन आहे आणि दुसरा एसपीएचा प्लॅन आहे. दोन्हीमध्ये काही ॲम्बिग्विटी असेल तर त्या संदर्भात काही तरी केले पाहिजे. आता विभागाचे म्हणणे आहे की, प्लॅन नाही, लेआऊट आहे. समितीला एवढेच विचारावयाचे आहे की, एसपीएच्या प्लॅनप्रमाणे काम करता येते का ? अशी समितीने विचारणा केली असता तो लेआऊट आहे मात्र लेआऊट आहे की प्लॅन आहे, यामुळे त्याच्या लिगल पोझिशनमध्ये काहीही फरक पडत नाही. लेआऊट ॲप्रुव्हड आहे आणि जो आहे ती वस्तुस्थिती असून ड्राफ्ट प्लॅन मंजूर आहे तो, यापैकी जी स्ट्रिन्जंट सिच्युएशन आहे तीच लागू होईल, ही कायदेशीर वस्तुस्थिती आहे. विभाग विधी व न्याय विभागाकडून तपासून घेणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच जो प्लॅन मंजूर केला, तो सन १९९६ च्या रिजनल प्लॅनप्रमाणे केला असून त्यावेळच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जो प्लॅन मंजूर केला तो पुणे जिल्ह्याच्या त्यावेळच्या मंजुरीप्रमाणे केला आहे. पहिल्यांदा सन २००६ मध्ये केला, त्यानंतर सन २००८ च्या मार्चमध्ये केला. जून, जुलैमध्ये एसपीए तयार झाले आहे. एसपीएच्या मास्टर प्लॅनला संचालकांनी किंवा शासनाने मंजुरी दिली तर किंवा मंजुरी देताना हा भाग डेव्हलपसाठी योग्य आहे असे म्हटले तरच ही ॲनोमली दूर होऊ शकते अशी माहिती समितीस विदित केली.

**३.११४** सन २००६ चा प्लॅन आहे, जिल्हाधिकाऱ्यांनी सन १९९६ च्या एमआरटीपी खाली एलपीअच्या संदर्भात प्लॅन मंजूर केला आणि एसपीएचे फॉर्मेशन झाल्यानंतर प्लॅन केला होता, त्यामध्ये २० गोष्टी विरूध्द होत्या. ॲप्रूव्हल वेगळे होते आणि सबमिशन वेगळे होते. सन २०११ ला सुधारणा परत पाठविल्या, त्यालाही ४ वर्षे झाली म्हणजे त्यांनी बांधकाम सन २००८ ला केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या प्लॅनला बगल देऊन २०

गोष्टी वेगळ्या केल्या आहेत. सन २०११ ला अर्धवट काम केल्यानंतर विभागाकडे परत सबमिशन केले आहे, त्याला ४ वर्षे होत आहेत, ही परिस्थिती योग्य नाही. विभागाचे म्हणणे आहे की, सन १९९६ ला जिल्हाधिकाऱ्यांनी केलेला प्लॅन आणि सन २००८ मध्ये एसपीए केल्यानंतर वेगळा प्लॅन केला, त्यामध्ये त्यांनी २० विरूद्ध गोष्टी अंतर्भूत केल्या सन २०११ ला ॲप्रूव्हलसाठी गेले आजमितीस त्याचे उत्तर नाही. याबाबत समितीने विचारणा केली.

**३.११५** २० गोष्टी आहेत की जास्त आहेत हे आता सांगता येणार नाही. परंतु लेआऊटमध्ये जेवढे क्षेत्र आहे, तेवढ्यापुरताच हा तफावतीचा मुद्दा येतो, त्यापेक्षा बाहेरचे क्षेत्र नाही. एसपीएने मास्टर प्लॅन केला, तो त्या लेआऊटच्या खूप मोठ्या क्षेत्राचा केला आहे. रिजनल प्लॅनच्या तरतुदी विचारात घेऊन परवानगी दिली असेल तर योग्य आहे असे म्हणावे लागेल. त्यामध्ये तफावतीचे मुद्दे येणार नाहीत. दुसरा महत्त्वाचा विषय आहे की, सन २०११ मध्ये मास्टर प्लॅन शासनाकडे सबमिट झाला, संचालकांकडे गेला. एसपीएचा प्लॅन असतो तो संचालकांकडे जातो आणि तेही अधिकार शासनाने संचालकांना दिले आहेत. या गोष्टीमध्ये अनेक कायदेशीर इतर गोष्टी निर्माण झाल्या होत्या. संचालकांनी दरम्यानच्या काळात शासनाला हेही विचारले होते की, मी एसपीएमध्ये सदस्य असल्यामुळे मी त्याला मंजुरी द्यायची की नाही ? विभागाने समितीच्या बैठकीनंतर असा निर्णय घेतला की, याला मंजुरी द्यायची की द्यायची नाही याची सर्व तपासणी शासनाच्या स्तरावर होईल आणि त्याचा निर्णय शासन स्तरावर होईल. कायदेशीर मुद्दे तपासून शासन यावर योग्य निर्णय घेईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.११६** लवासा कॉर्पोरेशनचे जे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याला कारण असे आहे की, आपले टाऊनप्लॅनिंगचे नियम आहेत. आपल्याला राज्यात हिल स्टेशन्स उभी करायची असतील तर या संदर्भातील डीसी रूल वेगळे करावे लागतील. पाण्याच्या ठिकाणी बांधकाम करता येत नाही असे नियम असल्यामुळे अनेक अडचणी आहेत. आपण वॉटर स्पोर्टस पहायला जातो, तेथे बांधकाम केले जाते, मग १० मीटर अंतर सोडले नाही असे प्रश्न निर्माण होतात. भविष्यात हिल स्टेशन्स उभी करायची असतील तर त्याचे डीसी रूल वेगळे करण्याच्या संदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे अशी समितीची सूचना असल्याचे समितीने सांगितले.

**३.११७** अतिशय महत्त्वाचा विषय आहे बऱ्याच प्रमाणात त्यावेळी शासनाचा जो विचार होता तो विचार बऱ्याच डीसी रेग्यूलेशन्समध्ये घेतलेला आहे आणि म्हटले आहे की, या पॉलिसीमध्ये रेग्यूलेशन्स आहेत ते लागू राहतील, बाकी नियम नाही त्यासाठी मात्र ईडीसी क्लासचे नियम लागू राहतील. त्यामुळे काही ठिकाणी अशा तफावती येतात. आपण आता नवीन पॉलिसीचा विचार करीत आहोत, त्यामध्ये त्याचे स्वतंत्र रेग्यूलेशन्स करणार आहोत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**३.११८** विभागाने दिलेल्या माहितीने समितीचे समाधान झाले नसल्याने समितीने पुनः दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी सचिव, मदत व पुनर्वसन विभाग यांची साक्ष घेतली. परिच्छेद क्रमांक ४.३.१७.१ "वतनाच्या जमिनींच्या खरेदीमध्ये देय असलेल्या नजराणा फीची वसुली न होणे" व परिच्छेद क्र.४.३.१७.२ "कमाल मर्यादेच्या जमिनीच्या खरेदीत अटींचा भंग झाल्याबद्दल लागू होणाऱ्या नजराणा फी ची वसुली न होणे " यामध्ये शासनाने फक्त पर्यटनाच्या अनुषंगाने होणाऱ्या विकास कामांना यातून सुट दिलेली होती. तथापि, विभागाने सर्व व्यवहारांना सुट दिलेली आहे. तसेच परिच्छेद क्रमांक ४.३.१७.१ आणि ७२ प्रकरणामध्ये नजराणाची वसूली झालेली नाही यासंदर्भात सचिवांनी खुलासा करावा असे समितीने विभागास सांगितले असता या प्रकरणी ४.३१ कोटी रुपये मुद्रांक शुल्क आणि ५.३९ कोटी रुपये नोंदणी फी या प्रदानामध्ये सूट दिलेली आहे. तसेच, ३.७१ लक्ष रुपयांच्यु नजराणा फीमध्ये सुध्दा सुट दिलेली आहे. त्या ठिकाणी विकास झाल्यानंतर आतापर्यंत ज्या युनिटस्चे बांधकाम झालेले आहे त्यामधून ४८ कोटी ७ लक्ष रुपये मुद्रांक शुल्क आणि ६ कोटी ४ लक्ष रुपये नोंदणी फी असे मिळून एकूण ५४ कोटी ११ लक्ष रुपये वसुली केलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच मुद्रांक विभागाने स्वतःहून लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडला कोणतीही सवलत दिलेली नसून हे शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्र पर्यटन धोरण २००६ च्या अनुषंगाने ठसी' कॅटेगरीमध्ये मोडणाऱ्या पर्यटन क्षेत्रांना या सवलती लागू केल्या होत्या. याच धोरणान्वये पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिला गेला. त्यामुळे ठसी' कॅटेगरीच्या शहरांमधील अशा प्रकारच्या पर्यटनस्थळांना या सवलती लागू झाल्या. हा प्रकल्प कॅटेगरी ठसी' मध्ये मोडत असल्यामुळे लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडला या सवलती लागू आहेत, असे सर्टिफिकेशन एम.टी.डी.सी.च्या अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर त्यानुसार या सवलती दिलेल्या आहेत. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडला वेगळ्याने सवलती देण्याचा कोणताही आदेश शासन स्तरावरून मुद्रांक विभागाकडून निर्गमित झालेला नाही असा खुलासा सचिव, मुदत व पुनर्वसन विभाग यांनी केला.

**३.११९** एम.टी.डी.सी.ने जर सर्टिफाय केले असेल तर महालेखापरिक्षकांनी कोणत्या आधारावर आक्षेप काढला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता शासनाच्या धोरणानुसार ठसीद कॅटेगरीतील पर्यटन क्षेत्रांना सवलती लागू असतील तर या प्रकरणी नियमानुसारच सवलत दिली गेली आहे. तसेच महालेखापरिक्षकांचा असा आक्षेप आहे की, सवलत आहे परंतु, फक्त डेव्हलपिंग एरियालाच ही सवलत दिली पाहिजे याबाबत समितीने पृच्छा केली असता एमटीडीसी के प्रमाणपत्र के आधार पर यह दिया है. आपने हमारे कार्यालय को जो जानकारी दी उसमें ऐसा कहीं भी लिखा नहीं है असा खुलासा महालेखाकार यांनी केला.

**३.१२०** शासनाचे पर्यटनविषयक धोरण, एम.टी.डी.सी.ने दिलेले सर्टिफिकेशन या कागदपत्रांची पूर्तता विभागाने महालेखापरिक्षकांकडे न केल्यामुळे हा आक्षेप आलेला आहे. विभागाने त्याच वेळी या कागदपत्रांची पूर्तता केली असती तर हा विषय येथे उपस्थित झाला नसता. तसेच In

your reply you have stated about the Notifications of the Government and a Certificate for Exemption issued by the MTDC. याबरोबरच महालेखापरिक्षक यांचे असे म्हणणे आहे की, ज्या क्षेत्राला हे ॲप्लिकेबल आहे, त्याशिवाय अन्य ठिकाणी आपण कसे ॲप्लिकेबल केले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता संपूर्ण लवासा क्षेत्र हे हिल स्टेशन डेव्हलपमेंट' म्हणून एम.टी.डी.सी.ने डिक्लेअर केले आहे. त्याअंतर्गत रेसिडेन्शिअल युनिटस्, कमर्शिअल युनिटस्, फ्लॅटस्, हॉटेल्स यांचा विकास झाला आणि या सर्व युनिटस्ना या सवलती लागू राहतील, असे त्यांनी घोषित केल्यानंतर या सवलती देण्यात आल्या असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**३.१२१** महालेखापरिक्षक यांचे असे म्हणणे आहे की, पर्यटनाच्या संदर्भात शासन निर्णय काढलेला आहे. त्या पलीकडे जाऊन जी कमर्शिअल बांधकामे झाली आहेत त्या सर्वांना स्टॅम्प ड्युटी व्हेव केली आहे याबाबत विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, शासनाने टुरिझम डेव्हलपमेंटचे धोरण जाहीर केले आणि त्या अनुषंगाने काही सवलती देण्यात आल्या. पब्लिक युटिलिटी आणि कमर्शिअल डेव्हलपमेंट यासाठी वेगवेगळ्या सवलती लागू राहतील, असे धोरणात म्हटलेले नाही.

**३.१२२** परिच्छेद क्र.४.३.१२.१ व ४.३.१२.२ यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी पुन्हा विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

परिच्छेद क्रमांक ४.३.१२.१ "पाण्याच्या अतिरिक्त प्रमाणातील आवश्यकतेसाठी आणि बंधारे बांधण्यासाठी परवानगीचे अनियमित प्रदान" आणि परिच्छेद क्रमांक ४.३.१२.२ "एमकेव्हीडीसीकडून लवासा कॉर्पोरेशनला जमिनीचे प्रदान होण्यातील अनियमितता" या परिच्छेदासंदर्भात समितीला माहिती देताना सचिव, जलसंपदा विभाग यांनी असे सांगितले की, कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिनियमानुसार कलम १९ (१) आणि १९ (२) नुसार कार्यक्षेत्रात नवीन प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने ज्या मागण्या आल्या होत्या, त्यानुसार लवासाला कॉर्पोरेशनला मान्यता देण्यात आली होती. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील वरसगाव धरणावरील एकूण ८ धरणांना मान्यता दिली होती. यामध्ये एकूण स्टोअरेज ८७१ एमसीएफटी एवढे आहे. त्या ठिकाणच्या बंधाऱ्यांना परवानगी दिलेली आहे. यामध्ये एकूण घरगुती वापर ९३ एमसीएफटी एवढा आहे. वृक्षारोपण आणि प्लॅन्टेशनसाठी १७० एमसीएफटी, नौकानयन आणि पर्यटनासाठी ५७७ एमसीएफटी आणि बाष्पीभवनासाठी ९१ एमसीएफटी एवढा आहे. अशा प्रकारे महामंडळाने एकूण ८७१ एमसीएफटीला मान्यता दिलेली आहे त्यामुळे यामध्ये अनियमितता झालेली आहे असे नाही. महामंडळाला जमीन भाडेपट्ट्याने देण्याच्यासंदर्भातील परिच्छेद आहे. महामंडळाला कलम १८ अन्वये जमीन भाडेपट्ट्याने देण्याचा अधिकार आहे यानुसार कार्यवाही केलेली असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी केला.

**३.१२३** यापूर्वी लवासा येथे लोकलेखा समितीची संबंधित अधिकाऱ्यांसमवेत साक्ष झाली होती. त्यावेळी झालेल्या साक्षीच्या अनुषंगाने काही मुद्दे अनुत्तरीत राहिले होते. त्यानुसार समितीला दोन ते तीन मुद्यांच्या संदर्भात चर्चा करावयाची आहे. ७५ टीएमची पाणी आरक्षित केलेले आहे त्यासंदर्भात चर्चा करावयाची आहे.

**३.१२४** महालेखाकार यांनी पाण्याच्या संदर्भात ऑब्जेक्शन घेतले होते. यासंदर्भात महामंडळाने जे स्पष्टीकरण दिलेले आहे, ते योग्य असून तीन वर्षासाठी २ लाख ७५ हजार रुपये भाडेपट्टीसाठी घेण्यात आले आहेत. परंतु, त्यांचे असे म्हणणे आहे की, तीन वर्षानंतर संबंधित जागा परत घेता येते आणि आपण ती त्यांना परत दिली नाही. हे देखील चुकीचे आहे असे समितीला वाटते. बांधकाम झाल्यानंतर जागा परत मिळत नाही असे समितीने विभागास सांगितले.

**३.१२५** या विषयी महालेखाकारांनी Irregular permission for excess water requirements and for construction of bandharas, Basis of calculating 15% for evaporation, Irregular grant of land by MKVDC to LCL, etc. असे आक्षेप नोंदविलेले असून भाडेपट्ट्याच्या संदर्भात त्यांनी म्हणणे मांडलेले आहे. तीन वर्षासाठी २ लाख ७५ हजार रुपये भाडेपट्टीसाठी घेण्यात आले आहे. त्या ठिकाणची १२७ हेक्टर जागा बुडित क्षेत्रात येत आहे आणि १२ हेक्टर जागा ओपन आहे. सदर जागेवर मोठ्या प्रमाणात इमारतींचे बांधकाम झालेले आहे. त्यामुळे भाड्यापोटी ३ कोटी रुपये घेणे अपेक्षित असताना त्यांनी तीन वर्षासाठी २ लाख ७५ हजार रुपये भाडेपट्टीसाठी घेतले आहे. सदर जागा खाजगी संस्थेला देता येत नाही. त्यांनी असे सांगितले की, ३० वर्षानंतर ती जागा आम्हाला परत मिळणार आहे हे समितीला पटत नाही कारण ३० वर्षानंतर त्या ठिकाणची एखादी इमारत आपण खाली करु शकणार नाही. फक्त जागेचे नूतनीकरण करता येते. तीन वर्षासाठी २ लाख ७५ हजार रुपये भाडेपट्टीसाठी घेण्यात आलेले असून, ते चुकीचे आहे, असे समितीचे मत असल्याचे समितीने नमूद केले.

**३.१२६** शासनाचे जागा देण्याबाबत धोरण काय आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिव यांनी असे विदित केले की, लवासाला जागा देत असताना करारनाम्यामध्ये एका कलमाचा अंतर्भाव केलेला आहे. सदर करारनामा सन २००२ मध्ये झालेला आहे. सन २००२ मधील रेडीरेकनरच्या दरानुसार तीन वर्षासाठी २ लाख ७५ हजार रुपये भाडेपट्टीसाठी घेण्यात आले आहेत. यानुसार प्रत्येक वर्षीच्या रेडीरेकनरच्या दरामधील १५ टक्क्यानुसार दर निश्चित करण्याचे ठरले होते. त्यानुसार महामंडळाने तशा प्रकारची बिले अदा केलेली आहेत. १४१.१५ हेक्टर जागेपैकी

१२८.७९ हेक्टर जागा बुडित क्षेत्रात येत आहे. त्याची देखील रेडीरेकनरप्रमाणे कॉस्ट वाढविली आहे. मागील वर्षापासून रेडीरेकनरच्या दरासमोर डॅश मारलेला आहे. बुडित क्षेत्रातील जागेस रेडीरेकनरच्या दराप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत कॉस्ट वाढविण्याची गरज नाही. सद्यःस्थितीत या विषयावर वाद सुरु आहे.

**३.१२७** या विषयी समितीला एक अहवाल प्राप्त झालेला असून १५ टक्क्याप्रमाणे प्रति हेक्टर अधिकचा भार आहे. सदरहू दर प्रत्येक वर्षासाठी निश्चित केलेला होता. प्रत्येक वर्षी या दरामध्ये बदल करावा लागणार आहे. त्यानुसार भाड्यापोटी सन २००३ मध्ये ६८ हजार रुपये, सन २००४ मध्ये ८२ हजार रुपये, सन २००५ मध्ये ९ लाख ४९ हजार रुपये, सन २००६ मध्ये १० लाख ९२ हजार रुपये आणि सन २०१० मध्ये ३ कोटी रुपयांची रक्कम निश्चित करण्यात आली. परंतु, लवासा कॉर्पोरेशनने प्रती वर्षी २ लाख ७५ हजार रुपये भाड्यापोटी देण्याचे सुरु केलेले असून, ते आक्षेपार्ह आहे असे मत समितीने व्यक्त केले.

**३.१२८** यापूर्वी समितीच्या साक्षीमध्ये संबंधित सचिवांनी विधी व न्याय विभागाचे मत घेऊन ते समितीला अवगत केले जाईल असे सांगितले होते. त्यानुसार जलसंपदा विभागाने विधी व न्याय विभागाचे मत घेतले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता महामंडळ स्तरावर ऑक्टोबर, २०१५ मध्ये मत घेण्यात आलेले होते. महामंडळात कार्यरत असणाऱ्या कायदे सल्लागाराकडून मत घेतलेले आहे. कायदे सल्लागारांनी असे सांगितले आहे की, करारामधील नमूद कलम (१) आणि कलम (२) मध्ये याबाबत कोठेही स्पष्टता नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच कलम (१) आणि कलम (२) समितीस पुढीलप्रमाणे वाचून दाखविले.

कलम (१) मध्ये म्हटले आहे की, “The Lessee has agreed to pay the Lessor 15% (fifteen percent) of the cost of land demised per annum as a lease rent.” कलम (२) मध्ये म्हटले आहे की, “ For working out the lease rent which is to be paid p. a. by the Lessee to Lessor, the cost of aforesaid land so decided and ordered by the M.K.V.D.C shall be final and binding on Lessee.” ज्यावेळी करारनामा झाला होता, त्यावेळी रेडीरेकनरच्या दरानुसार २ लाख ७५ हजार भाड्यापोटी भरण्यात आले आहेत. सन २०११ मध्ये महामंडळामार्फत वाढीव दर कळविण्यात आला होता. यामध्ये बुडित क्षेत्रातील जमिनीचे व्यवहार होत नाही. बुडित क्षेत्रातील जमीन १२९ हेक्टर एवढी आहे. त्यावेळी रेडीरेकनरचे दर वाढलेले होते. त्यावेळी बुडित क्षेत्रात व्यवहार होत नसल्यामुळे त्यांनी पुन्हा महामंडळाकडे आणि स्टॅम्पड्युटी जिल्हाधिकारी यांच्याकडे आक्षेप नोंदविला होता. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी गेल्यावर्षी नॉट अव्हेलेबल म्हणून डॅश मारलेली होती. बुडित क्षेत्रातील सर्व गट नंबरमध्ये आता डॅश मारलेली आहे. आक्षेप घेतल्यानंतर त्याचे मूल्यांकन दिलेले नाही. यामध्ये बुडित क्षेत्रातील मूल्यांकन कसे काढायचे हा एक भाग आहे आणि १२.५ हेक्टर जमीन ही बुडित क्षेत्राबाहेरील आहे. यासंदर्भातील रेट निश्चित केलेला नाही. सद्यःस्थितीत ओपन लॅण्ड वेगळी झालेली आहे. १२.५ हेक्टर जागेबद्दल लवासा कॉर्पोरेशनबरोबर पत्रव्यवहार सुरु आहे. लवासा कॉर्पोरेशनने जलाशयाबाहेरील जमिनीला रेडीरेकनरच्या दराप्रमाणे भाडे देण्याबाबत तत्वतः मान्यता दिलेली आहे. यानुसार सद्यःस्थितीत कार्यवाही केली जाणार आहे. त्यानुसार बुडित क्षेत्राबाहेरील १२.५ हेक्टरच्या जागेबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे.

**३.१२९** लवासा कॉर्पोरेशन १२.५ हेक्टर जागेबाबत रेडीरेकरनच्या दराप्रमाणे भाडे देण्यास तयार आहे. त्यानुसार महामंडळाने योग्य ती कार्यवाही करावी अशी समितीची सूचना आहे. पण जे नॉन बुडित क्षेत्र आहे, अशा ठिकाणी ३ महिन्याच्या आत रेडीरेकनरच्या दराप्रमाणे टॅक्स वसूल करुन त्याबाबत समितीला माहिती द्यावी असे निदेश समितीने विभागास दिले. यासंदर्भात माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-‘अ’)**

**३.१३०** महामंडळात कार्यरत असणाऱ्या कायदे सल्लागाराकडून मत घेतलेले आहे (विवरण पत्र ३) लीज ॲग्रिमेंटमध्ये दरवर्षी रेडीरेकनरच्या दराप्रमाणे कार्यवाही करावी असे नमूद केलेले नाही. बुडित क्षेत्रातील रेडीरेकरनरचा दर कोणता असावा याबाबत देखील उल्लेख केलेला नाही. हा वाद बुडित क्षेत्राशी संबंधित आहे. त्यामुळे बुडित क्षेत्राबाबत वेगळा विचार करावा लागणार आहे. वाद रिझॉल्युशन आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित केली जाणार आहे. या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत शासनाचा फायदा झाला पाहिजे आणि त्यांच्यावर देखील अधिक प्रमाणात बोजा पडणार नाही याची काळजी घेतली जात आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**३.१३१** लवासा कंपनीने बुडित क्षेत्राबाहेरील १२.३६ हेक्टर्सचे क्षेत्र विकसनयोग्य असून सदरील क्षेत्रावर कंपनीने करारनाम्यानुसार विकास सुरू केला असून सदर क्षेत्रासाठी सन २००२ चे शिघ्रसिध्द गणकानुसार येणाऱ्या भाडेपट्टा अधिमूल्याच्या एकूण रकमेवर प्रतिवर्षी १० टक्के इतकी वाढ करून येणारा भाडेपट्टा भरणेस कंपनीने मान्य केले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले. तसेच बुडित क्षेत्राबाहेर प्रतिवर्षी १० टक्के वाढ देण्याचे कंपनीने मान्य केलेले आहे असा खुलासाही विभागीय प्रतिनिधींनी केला.

**३.१३२** मागील वर्षाच्या मागणीप्रमाणे पैशांची फरकाची वसुली करून तीन महिन्याच्या आत समितीस कळवावे असे निदेशही समितीने विभागास दिले.

समितीने अधिक माहिती जाणून घेण्याकरिता विभागास प्रश्नावली देण्यात आली होती त्या संदर्भातील माहिती विभागाने समितीस पुढील प्रमाणे उपलब्ध करुन दिली आहे.

१. भाडेपट्टीचा करार किती वर्षापर्यंत करता येतो ?

२. लवासा कॉर्पोरेशन लि. नं. ९९९ वर्षाच्या कराराने अपोलो हॉस्पीटल ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांना दिलेल्या जमिनीचे क्षेत्रुळ किती आहे ?

३. लवासा कॉर्पोरेशनला शासनाकडून व खाजगी व्यक्तीकडून/संस्थाकडून किती जमीन प्राप्त झाली आहे ?

४.नासा या संस्थेला कोणत्या प्रकारातील जमीन दिली आहे व त्यांच्या सोबत किती वर्षाचा करार केला आहे ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

**३.१३३** लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी खाजगी लोकांकडून वैयक्तीकरित्या खाजगीरित्या जमिनी खरेदी केलेल्या आहेत व त्यांचे खाजगी मालकीच्या जमिनी या त्यांनी ९९९ वर्षाच्या दीर्घमुदतीवर आपोलो हॉस्पीटल, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा इ. सारख्या वेगवेगळया राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था यांना भाडेकराराने दिलेल्या आहेत.

तरी सदरच्या जमिनी या महसूल व वन विभागाने भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या नाहीत. सदर जमिनी या त्यांच्या खाजगी (वैयक्तिक) मालकीच्या आहेत. तरी सदर प्रकरणी शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

१. तहसीलदार मुळशी यांच्या अहवालानुसार लवासा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या आदिवासी जमिनीच्या बाबतीत आतापर्यंत एकूण १७ प्रकरणे पुर्वपरवानगीशिवाय जमिनी हस्तांतरण करण्याची कारणे काय आहे ?

२. सदर जमिनीचे हस्तांतरण केव्हा करण्यात आले ?

३. १७ प्रकरणात किती आदिवासी शेतकऱ्यांचा संबंध आहे व त्यांच्या जमिनी कधीपर्यंत परत करण्यात येणार आहे ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

सदर जमिनीच्या ७/१२ च्या इतर हक्कात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६अ प्रमाणे आदिवासींची जमीन असा शेरा दाखल नसल्याने सदरचे व्यवहार झालेले दिसून येतात.

या जमिनीचे हस्तांतर सन २००२ ते २००३ च्या दरम्यान झाल्याचे दिसून येते.

**३.१३४** १७ प्रकरणांमध्ये ९८.५५ हे. क्षेत्र असून त्यापैकी २ प्रकरणात ११.३३ हे. क्षेत्र आदिवासी खातेदारांना प्रत्यार्पित करण्यात आले आहे व १३ प्रकरणांमध्ये ७२.१५ हे. क्षेत्र जून, २०१५ व सप्टेंबर, २०१५ शासन जमा करण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले असून त्यापैकी २.२६ हे. आर क्षेत्र शासन जमा करण्यात आले आहे. उर्वरीत १२ प्रकरणांमध्ये अपिल कालावधी (६० दिवस) अद्याप पूर्ण झालेला नसल्याने आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. उर्वरीत २ प्रकरणांमध्ये (११.३३ हे. क्षेत्र) उपविभागीय अधिकारी, मावळ मुळशी उपविभाग, पुणे यांच्याकडे आवश्यक असलेले आदिवासी पुरावे आदिवासी यांनी सादर केलेले नसल्याने सदरची चौकशी प्रलंबित आहे.

लवासा कंपनीने खरेदी केलेल्या आदिवासी जमिनी प्रत्यार्पित / शासन जमा करणेबाबतच्या
प्रकरणांची यादी दि. १४/१०/२०१५ अखेर

| अ. क्र. | एस आर क्र. व दिनांक | गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र | जमीन धारकाचे नाव | आदेश क्रमांक | आदिवासींना प्रत्यार्पित क्षेत्र | शासन जमा केलेले क्षेत्र | चौकशीवर प्रलंबित क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | ३१ ११ | मुगाव | ५०/५ | ५.६६.५६ | श्रावण भिवा जाधव | ०६/०७/२०१२ | ५.६६.५६ | ० | ० |
| २ | ०१ ११ | मुगाव | ५०/४ | ५.६६.५६ | राया भाऊ काटकर | ०६/०७/२०१२ | ५.६६.५६ | ० | ० |
| ३ | १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २०, २३, २४, २५ | मुगाव | ८/५ पै | ६.०१ | आत्माराम तुकाराम काटकर | २९/०६/२०१५ | ० | २.२६ | ४.१९ (टिप :- १) |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ३९/२०१४ | मुगाव | ५०/१२ | ६.०७ | लक्ष्मण लहानू वाघमारे म. वा. तुळसाबाई तुकाराम घोगरे | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ५ | ४०/२०१४ | मुगाव | ३९/३ | ५.६६ | पिठ्या सया हिलम म.वा. भिवा पिठ्या हिलम | ०८/०९/२०१५ | ० | ५.६६ | ० |
| ६ | ०९ ११ | मुगाव | ५०/७ | ६.०७ | भिया सया जाधव तर्फे श्रावण भिवा जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ७ | ०७ ११ | मुगाव | ५०/८ | ६.०७ | तुकाराम रघू कोळी म.वा. रघु तुकाराम कोळी | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ८ | २७/२०१४ | मुगाव | ५०/९ | ६.०७ | चंदर भिवा जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ९ | ३३/२०१४ | मुगाव | ३९/१ | ५.९३ | लक्ष्मण बारकू जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ५.९३ | ० |
| १० | ४१/२०१४ | मुगाव | ३९/२ | ६.०७ | जानकू संभू जाधव म.वा. नातू राहूल लक्ष्मण जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ११ | ०६ ११ | मुगाव | ३९/४ | ५.६६ | बंड्या भाऊ वाल्हेकर | ०८/०९/२०१५ | ० | ५.६६ | ० |
| १२ | ०२ ११ | मुगाव | ४१/३ | ५.३ | शंकर तुकाराम काटकर | ०८/०९/२०१५ | ० | ५.३ | ० |
| १३ | ३८/२०१४ | मुगाव | ४१/१ | ५.६६ | तुकाराम चंद्र्या काटकर म.वा. शंकर तुकाराम काटकर | ०८/०९/२०१५ | ० | ५.६६ | ० |
| १४ | २६/२०१४ | मुगाव | ४१/२ | ५.२६ | भाऊ पांडु वाल्हेकर, बंडू भाऊ, बाबु भाऊ वाल्हेकर | १४/०९/२०१५ | ० | ५.२६ | ० |
| १५ | ३७/२०१४ | मुगाव | ५०/१० | ६.०७ | काशिनाथ लहानू वाघमारे | १४/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| १६ | ०८ ११ | मुगाव | ५०/६ | ५.६६ | लहानू भिमा जाधव | | ० | | ५.६६ |
| १७ | | मुगाव | ३९/५ | ५.६६ | शंकर दाजी काटकर | | | | ५.६६ |
| | | | | ९८.५५ | | | ११.३३ | ७२.१५ | १५.५१ |

**३.१३५** टिप :- १) आत्माराम तुकाराम काटकर, यांना सिलिंग कायद्याप्रमाणे मिळालेले ४ हे १९ आर इतके मिळालेले होते. सदर प्रकरणी जमीन धारणा (जमीन धारणेची कमाल मर्यादा)१९६१ मधील कलम २९(२) प्रमाणे चौकशी करणंत येवून सदर प्रकरणी बाजार मुल्यांचे ७५ टक्के रक्कम वसूल करुन सदरचे विक्री व्यवहार हे सिलिंग कायद्याप्रमाणे नियमित करणेत आलेले आहेत.

टिप :- २) १० प्रकरणामध्ये दिनांक ८/९/२०१५ व २ प्रकरणामध्ये दिनांक १४/९/२०१५ रोजी आदेश पारित करणेत आलेले असून सदर आदेशाची अपिल मुदत ६० दिवसाची असून अपिल मुदत संपलेनंतर सदरची जमीन सरकार हक्कात घेणेची कार्यवाही करणेत येईल.

१. डिसेंबर, २००२ मध्ये पुणे (ग्रामीण) भागातील शासनाच्या जमिन खरेदीचा दर प्रति चौ.मीटर काय होता ?

२. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्या आहेत, त्यातील काही शेतकरी भूमिहीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्या भाविष्याचा विचार करता त्यांना वाढीव दर देण्याबाबतचा मुद्दा खरेदी करार करताना करण्यात आला आहे काय ?

३. भूमिहीन कुटूंबांच्याबाबत व ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी लवासा या प्रकल्पात गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांबाबत शासनाने कोणती भूमिका

निश्चित केली आहे ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

या प्रकल्पामध्ये बहुतांशी गावे विभाग क्र.१ मध्ये समाविष्ट असून या विभागात जिरायत शेत जमिनीचा दर रु.२५,०००/- ते रु.३५,०००/- हेक्टरी तर पॅडी जमिनीचा दर रु.३०,०००/- ते रु.३७,०००/- प्रति हेक्टर असा होता, तथापि बिगरशेतीचा प्रति चौ.मी. चा दर नमूद केलेला नाही. परंतु गावठाणातील प्र.चौ.मी. चा दर ३० रुपये असल्याचे दिसून येते.

अशा पध्दतीने खरेदी करार करताना भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना वाढीव दर देण्याचा मुद्दा खरेदी दस्तामध्ये दिसून येत नाही, या सर्व मिळकती शेतकऱ्यांनी स्वेच्छेने विक्री केल्या असू या पैकी कोणतीही जमीन शासनाने सक्तीने संपादीत करुन लवासा कॉर्पोरेशन लि. कंपनीला हस्तांतरीत केलेली नाही.

**३.१३६** सदर जमीन खाजगी असल्याने याबाबत शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

१. LCL ने जमीन खरेदी आणि त्याचा वापर याच्या तपशीलाचा अहवाल दर सहा महिन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेला आहे का ?

२. LCL ने ऑक्टोबर, २००६ आणि जुलै, २०१० दरम्यान एकूण रु.४४.३६ कोटी बाजारमुल्यांचा या ११९.३२ हेक्टर्स वतन (वर्ग-२) जमिनीची औद्यागिक कारणांसाठी खरेदी करण्यासाठी ७२ वेळा व्यवहार केले होते. या प्रकरणात २ टक्क्यांनी देय असलेल्या नजराणा फी ची ऑगस्ट, २०११ पर्यंत वसुली का केली गेली नव्हती ?

३. ३० दिवसांच्या विहित मुदतीत नजराणा फी चे प्रदान न झाल्याने अटींचा भंग झाला होता. त्यामुळे ७५ टक्क्यांनी रु.३३.२६ कोटी नजराणा फी लागू झाली. या रकमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून वेळीच मागणी का करण्यात आली नाही ?

४. लवासा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वतन जमीनीचे ७२ प्रकरणी व्यवहार झाले आहेत. त्यामध्ये नजराणा फी कधी भरली आहे ?

५. अद्याप ४ प्रकरणांत वसुली का करण्यात आली नाही ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१३८** लवासा कार्पोरेशन लि. कंपनीने दर सहा महिन्यांनी जमीन खरेदी व त्याचा वापर याबाबतचा तपशील सादर केलेला नाही.

या ७२ प्रकरणांपैकी वेल्हे तालुक्यातील ६६५ प्रकरणे असून त्यापैकी ६२ प्रकरणांमध्ये लवासा कंपनीने जमीन खरेदी घेणे पुर्वी तत्कालीन मुळे मालक / वतनदार यांनी सदर जमिनी रितसर ५० टक्के प्रमाणे नजराणा रक्कम भरुन वर्ग १ मध्ये रुपांतरीत करुन घेतल्या होत्या. त्यामुळे या ६२ प्रकरणांत औषेगिक कारणासाठी खरेदी करण्यासाठी २ टक्केनुसार नजराणा फी भरणेचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित ४ प्रकरणात या जमिनी अशा पध्दतीने वर्ग १ मध्ये रुपांतरीत झाल्याचे आदेश अथवा ५० टक्के नजराणा रकमेची चलने खरेदीदार उपलब्ध करुन न देऊ शकल्याने या प्रकरणी खरेदी किंमतीच्या ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम रु.४८,०८,३७७/- दिनांक १६/०८/२०१४ रोजी एकूण इतकी चलनाद्वारे शासन जमा करुन घेण्यात आलेली आहे.

**३.१३९** तसेच ७२ प्रकरणांपैकी उर्वरित ६ प्रकरणे मुळशी तालुक्यातील होती. त्यापैकी ४ प्रकरणामध्ये खरेदी नंतर ३० दिवसाचे आत कंपनीने कळविले मुळे खरेदी किंमतीच्या २ टक्के रक्कम रु. ४३५२/- वसूल केली आहे व उर्वरीत २ प्रकरणामध्ये खरेदीनंतर ३० दिवसाचे आत कंपनीने न कळविल्याने खरेदी किंमतोच्या ५० टक्के प्रमाणे नजराणा रक्कम रु. ५,६४,५२६/- वसूल केलेली आहे. वरीलप्रमाणे एकूण ७२ प्रकरणांमध्ये १०० टक्के वसूली पूर्ण झाली आहे.

लवासा कंपनीने खरेदी केलेल्या वरील ७२ प्रकरणापैकी ६२ प्रकरणी पुर्व खरेदीदाराने जमीन खरेदी करण्यापुर्वीच मूळ जमिन मालकाने शिघ्रसिध्दगणकाच्या ५० टक्के नजराणा रक्कम रुपये. ४१,३१,९२१/- शासन जमा करुन या जमिनी भोगवटदार वर्ग २ मधून भोगावटादार वर्ग १ मध्ये रुपांतरीत केल्या होत्या, त्यामुळे या प्रकरणी शर्तभंग होण्याचा अथवा लवासा कंपनीने पुन्हा नजराणा रक्कम भरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित १० प्रकरणी वरील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन नजराणा रक्कम वसूल केली आहे.

**३.१४०** वरील ७२ प्रकरणांपैकी ६२ प्रकरणामध्ये रक्म रुपये. ४१,३१,९२१/- सन २००६ ते २०१० या कालावधीत विविध तारखांना रक्कम वसुल केलेली आहे. ४ प्रकरणांमध्ये रु. ४३५२/- दिनांक २५ मे २००९ रोजी व २ प्रकरणामध्ये रक्कम रु. ५,६४,५२६/- दिनांक २० जून २००९ रोजी व वेल्हे तालुक्यातील ४ प्रकरणांमध्ये रक्कम रु. ४८,०८,३७७/- दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी वसूल करण्यात आली आहे.

वेल्हे तालुक्यातील ४ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये. ४८,०८,३७७/- दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी वसूल करण्यात आली आहे.

**दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या बैठकीत समितीने विभागास प्रश्नावली सादर केली होती त्यासंदर्भातील माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून ती पुढीलप्रमाणे आहे :——**

**३.१४१** (१) आदिवासींच्या जमिनी विनापरवाना खरेदी करणे, यासंदर्भात अद्याप प्रलंबित असलेल्या ४ प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे ? त्याची माहिती समितीस अवगत करावी. यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

आदिवासींच्या जमिनी विनापरवाना खरेदी करणेबाबत सविस्तर यादीसह अहवाल परिच्छेद क्र. ४.३.१४ मध्ये दिनांक १५ ऑक्टोबर २०१५ रोजी शासनास सादर केला आहे.

**३.१४२** (२) कमाल मर्यादेच्या जमिनीच्या खरेदीत अटींचा भंग झाल्याबद्दल लागू होणाऱ्या नजराणा फीच्या वसुली संदर्भात जी दोन प्रकरणे रद्द केली आहेत त्या आदिवासींचे गाव व त्यांची नावे तसेच जमिनींचे क्षेत्रफळ व जमिनी केव्हा परत करण्यात आल्या आहेत त्याची माहिती समितीस देण्यात यावीत. यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१४३** मौजे मुगाव, ता.मुळशी येथील राया भाऊ काटकर व श्रावण भिवा जाधव या आदिवासी खातेदारांना अनुक्रमे सर्व्हे नंबर ५०/४, एकूण क्षेत्र ५-६६, ५६ हेक्टर व सर्व्हे नंबर ५०/५ एकूण क्षेत्र ५-६६.५६ हेक्टर या जमिनी सिलिंग कायद्यान्वये वाटप केलेल्या होत्या. उपविभागीय अधिकारी मवाळ यांचे चौकशीमध्ये महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ नुसार आदिवासी व्यक्तींची जमिन शासनाच्या परवानगीशिवाय विक्री केली गेल्यास जमिन प्रत्यार्पित करणेची तरतूद आहे. कलम ३६ अ नुसार विनापरवाना विक्री झालेने उपविभागीय अधिकारी मवाळ यांचे दिनांक. ६ जुलै २०१२ चे आदेशान्वये उपरोक्त नमूद आदिवासी खातेदारांना प्रत्यार्पित करण्यात आल्या आहेत.

(३) दासवे गावातील लोकांच्या घरांचा प्रश्न लवासा कंपनीने निकाली काढला आहे का याबाबत जिल्हाधिकारी आणि समितीस माहिती द्यावी. यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१४४** लवासा प्रकल्प विकसित होत असताना कंपनीने दासवे येथील जमिनींची खरेदी करताना तेथे रहात असलेल्या शेतकऱ्यांशी वाटाघाटी करुन मोबदला परस्पर संमतीने ठरवून रितसर दस्ताने जमिनी खरेदी केल्या आहेत. त्यावेळी सदर जमीन मालकांशी केलेल्या करारानुसार एकूण २९ घरे बांधून त्यांचे ताबेही दिलेले आहेत.

(४) CSR पॉलीसी नुसार समाजहिताची कोणती कामे लवासा कंपनी करीत आहे ? यासंदर्भात माहिती जिल्हाधिकारी यांनी समितीस द्यावी. यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१४५** लवासा कॉर्पोरेशन लि. तर्फे CSR अंतर्गत स्थानिक लोकांसाठी शैक्षणिक, आरोग्य, पाणीपुरवठा, रोजगार संधी, रोजगार प्रशिक्षण इत्यादी कामे करण्यात येत असून त्याबाबत लवासा कंपनीचे वतीने लोकलेखा समितीच्या दि. ११ व १२ सप्टेंबर, २०१५ च्या लवासा दौऱ्याचे वेळी समितीला सादरीकरण करुन माहिती दिली आहे.

(५) लवासाच्या प्रकल्पातून सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, व्हॅट, सर्व्हीस टॅक्स तसेच स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशन इत्यादीद्वारे प्रतिवर्षी किती महसूल प्राप्त झाला आहे. यासंदर्भातील मागील पाच वर्षाची माहिती समितीस द्यावी. भविष्यात यातून शासनास किती महसूल प्राप्त होणार आहे ? यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

सन २०००-०१ मध्ये लवासा प्रकल्प सुरु झाल्यापासून प्रकल्पातून सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, व्हॅट, सर्विस टॅक्स तसेच स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशन इत्यादीद्वारे ४७९ कोटी इतका महसूल केंद्र, राज्य व स्थानिक प्रशासनाला प्राप्त झालेला आहे.

तसेच भविष्यामध्ये पुढील २५ वर्षाच्या कालावधीत केंद्रशासन/राज्यशासन/ग्रामपंचायत यांना सुमारे ६०,३०० कोटी इतका महसूल प्राप्त होईल असा अंदाज आहे असेही लवासाचे वतीने कळविले आहे.

(६) लवासा प्रकल्पात स्थानिक रहिवाशांना रोजगाराची संधी मिळण्यासाठी कोणती तरतूद करण्यात आली आहे ? यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१४६** १. लवासा प्रकल्पामुळे विविध क्षेत्रांमध्ये एकूण ८०,००० प्रत्यक्ष रोजगार लवासाचे नियोजन व विकासानुसार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

२. प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक लोकांना शैक्षणिक योग्यता व अनुभव तसेच प्रकल्प क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या उपलब्धतेनुसार,

प्राधान्याने रोजगार देण्याचे धोरण राबविण्यात येत असून आतापर्यंत एकूण ३१५ स्थानिक लोकांना अशाप्रकारचे रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

३. लवासा प्रकल्पात प्रकल्पातील स्थानिक लोकांना त्यांच्या क्षमतेनुसार लवासा प्रकल्पातील स्थानिक लोकांना त्यांच्या क्षमतेनुसार लवासा प्रकल्पात उपलब्ध होणारी कंत्राटे देण्याचेही धोरण राबविले जात असून त्याअंतर्गत एकूण १२ कंत्राटे देण्यात आलेली आहेत.

४. लवासा प्रकल्पात दासवे, मुगाव, भोयणी येथे तयार करण्यात आलेल्या दुकानांचे वाटप भाडेतत्वावर करताना प्राधान्याने स्थानिक लोकांना प्रथम प्राधान्य दिलेले आहे व त्यानुसारच वाटप करण्यात आलेले आहे. असे लवासा कंपनीचे वतीने कळविले आहे.

तसेच याबाबत देखील लवासाचे वतीने लोकलेखा समितीचे दि. ११ व १२ सप्टेंबर २०१५ चे लवासा दौऱ्यात सादरीकरण करुन माहिती समितीला दिली आहे.

अशाप्रकारचेच धोरण उर्वरित प्रकल्प विकसित करताना स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण लवासा कॉर्पोरेशन तर्फे ठेवण्यात आलेले आहे असे लवासा कंपनीचे वतीने कळविले आहे.

**३.१४७** (७) लवासाकरिता संपादन केलेल्या १८ गावातील लोकांच्या व्यवसाय प्रशिक्षणाकरिता कोणती सोय करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे ? यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

व्यवसाय प्रशिक्षणासंदर्भात लवासा कॉर्पोरेशन लि. तर्फे खालील कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१. लवासा कॉर्पोरेशन येथे सामाजिक बांधिलकी विभाग हा एक स्वतंत्र विभाग करण्यात आलेला असून त्याद्वारे रोजगारासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविले जातात.

२. तरुणांसाठी वेगवेगळ्या व्यवसायासाठी असलेले कौशल्य विकसीत करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेण्यात येतात. आतापर्यंत अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये ३१५ तरुणांना लवासा येथे रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

३. बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण एकूण २२ तरुणांना देण्यात आलेले असून लवासा येथील बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याच्या प्रकल्पामध्ये रोजगार देण्यात आलेला होता.

४. दहा महिला स्वयंसहाय्यता गटातील एकूण १०० महिलांना स्वयंसहाय्यता गट व छोट्या प्रकारचे व्यवसाय चालविण्यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. यापैकी एका गटाला लवासा येथील हरा बजार येथे व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

५. नाबार्ड (NABARD), बायफ (BAIF), बँक ऑफ महाराष्ट्र, अंबुजा सिमेंट फाऊंडेशन, टाटा कॅपिटल या नामवंत संस्थांच्या मदतीने स्थानिक लोकांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यासंबंधी चर्चा प्रगतीपथावर असून लवकरच असे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यासंदर्भात नियोजन आहे. असे लवासा कंपनीचे वतीने कळविले आहे.

**३.१४८** (८) भूमिहीनांना घराकरिता जागा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी कोणती कार्यवाही केली आहे ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

लवासा प्रकल्पाच्या जमिनी खरेदी करताना भूमीसंपादन कायदा किंवा तत्सम कायद्या अंतर्गत भूसंपादन करण्यात आलेले नाही. लवासा प्रकल्पातील जमीनी जमीन मालकांशी परस्पर वाटाघाटीने व संमतीने बाजारभावानुसार खरेदी केलेल्या आहेत. लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी आतापर्यंत गिरिस्थान म्हणून घोषित झालेल्या एकूण २३०४० एकर पैकी १०४७८ एकर एवढे क्षेत्र खरेदी केलेले आहे. उर्वरित क्षेत्र हे जमीन मालकांच्या संमतीनेच खरेदी करण्यात येणार आहे. सदरची बाब पुर्णतः लवासा कंपनीशी संबंधित असलेने यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी भूमिहिनांना घरासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(९) लवासा सिटी येथे कार्यरत असलेल्या अपोलो रुग्णालयात गरीबांना मोफत आरोग्य सुविधा देण्यात येत आहेत किंवा नाही याची माहिती जिल्हाधिकारी यांनी समितीस द्यावी. यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

**३.१५०** लवासा प्रकल्पामध्ये असलेल्या अपोलो हॉस्पिटल यांच्या सहकार्याने मौजे भोयणी व मुगाव येथे प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्र पूर्णपणे कार्यान्वित आहे. त्याअंतर्गत स्थानिक ग्रामस्थांना सदर आरोग्य केंद्रात मोफत उपचार व औषधे दिली जातात. सदर प्राथमिक केंद्रे ही अद्ययावत असून अपोलो हॉस्पीटलच्या तज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य सुविधा पुरविली जाते. त्याचप्रमाणे अत्यावश्यक व तात्काळ सेवेसाठी २४ तास रुग्णवाहिकेची

उपलब्धताही मोफत करुन देण्यात आली आहे.

**३.१५१** तसेच दरवर्षी लवासा प्रकल्पातील गावांसाठी आणि जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी आरोग्य तपासणीचे कार्यक्रम राबविले जातात.

मा. लोकलेखा समिती सदस्यांनी सूचविल्यानुसार स्थानिक लोकांना गंभीर आजार व अनुषंगिक शस्त्रक्रिया यासारखे उपचार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अपोलो हॉस्पिटलचा समावेश राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत करणेसाठी लवासा कंपनीला सूचना देण्यात आल्या असून कंपनीचे वतीने संबंधित विभागाशी चर्चा करण्यात आलेली असून तसा ऑनलाईन अर्जही करण्यात आलेला आहे. (Hospital Ref.No.HSI ३५९४६)

(१०) SPA च्या किती बैठका झाल्या व त्यापैकी किती बैठकांना संचालक उपस्थित होते ? याची माहिती समितीस देण्यात यावी ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

सदरचा विषय नगर विकास विभागाशी संबंधित असून याबाबत प्रधान सचिव नगरविकास यांनी दि. २० ऑक्टोबर २०१५ रोजीच्या साक्षीच्या वेळी सविस्तर माहिती सादर केली आहे. SPA इतिवृत्ताच्या प्रती या कार्यालयाकडून विधीमंडळ सचिवालयास दि. १६ ऑक्टोबर २०१५ रोजी सादर करण्यात आल्या आहेत.

(११) SPA मागील ५ ते ६ वर्षात जेवढे प्रस्ताव मंजूर केले व जेथे जेथे व्हायोलेशन झालेले आहे त्याची माहिती समितीला द्यावी ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

सदरचा मुद्दा नगरविकास विभागाशी संबंधित आहे.

**३.१५२** तथापि, या अनुषंगाने सहा. संचालक नगररचना पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. प्रायो. पुणे/गिरीस्थान प्रकल्प/लवासा/ससंपु/३५४९, दि. १७ ऑक्टोबर २०१५ अन्वये अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्यांनी सादर केलेल्या प्रत्येक मुद्यांचे अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत मुद्देनिहाय कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत मुद्देनिहाय अहवाल १ महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, लवासा विशेष नियोजन प्राधिकरण यांना या कार्यालयाकडील पत्र क्र. पमअ-१/कावि/८१७/२०१५, दि. १७ ऑक्टोबर २०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे.

(१२) शासन व लवासा कॉर्पोरेशन यांच्या झालेल्या करारात कोणत्या अटी व शर्ती होत्या, करारातील अटी व शर्ती यामधील कोणत्या अटी व शर्तीची पुर्तता लवासा कॉर्पोरेशनने केली आहे किंवा त्याचे उल्लघंन/भंग केला आहे यासंदर्भातील माहिती समितीस देण्यात यावी ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

लवासा गिरिस्थान प्रकल्प विकास करणेबाबत शासन व लवासा कॉर्पोरेशन लि. यांच्यात थेट करार झालेला नसून सदर प्रकल्प हा शासनाच्या हिल स्टेशन रेग्युलेशन अंतर्गत असलेल्या अटी व शर्ती नुसार विकसित होणे अपेक्षित आहे.

**३.१५३** सदर नियमावलीतील अट क्र. ३ नुसार डेव्हलपमेंट व लवासा कॉर्पोरेशन लि. यांच्यात थेट करार झालेला नसून सदर प्रकल्प हा शासनाच्या हिल स्टेशन रेग्युलेशन अंतर्गत असलेल्या अटी व शर्ती नुसार विकसीत होणे अपेक्षित आहे.

**३.१५४** सदर नियमावलीतील अट क्र. ३ नुसार डेव्हलपमेंट कॉम्प्लेक्समधील साईट इन्फ्रास्ट्रक्चर म्हणजेच विकासकाच्या मालकीच्या क्षेत्रामध्ये साईट इन्फ्रास्ट्रक्चर (रस्ते, पावसाळी गटारे, पाणीपुरवठा, मलनिसाःरण व्यवस्था, वीज इत्यादी) पायाभूत सुविधांचा विकास विकासकाने कारावयाच्या आहे. जेणेकरुन प्रकल्प उभारणी करीत असताना पायाभूत सोयीसुविधा इत्यादींचा खर्चाचा बोजा शासनावर पडू नये असे अपेक्षित आहे.

**३.१५५** त्यानुसार लवासा कॉर्पोरेशन लि. ने घोषित गिरिस्थान क्षेत्र (२३०४०) पैकी सुमारे १०,४७८ एकर एवढी जमीन खरेदी केली असून त्यामध्ये टप्प्याटप्प्याने पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे १६०० एकर (दासवे परिसर) इतक्या जागेचा विकास करण्यात आलेला असून त्याठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, वीज या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत आणि मुगाव व भोयणी येथे गिरिस्थान विकासाचे काम प्रगतीपथावर असून त्यानुसार पायाभूत विकासाचे नियोजन करण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्पातील लवासा कॉर्पोरेशनने विकत घेतलेल्या जमिनींचा विकास प्रकल्पासाठी करीत असताना सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून विकसीत प्रकल्प क्षेत्रात राहणाऱ्या ग्रामस्थांना पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर भागात विकसित केलेले रस्ते हे सार्वजनिक रस्ते म्हणून सर्वांच्या वापरासाठी खुले ठेवण्यात आलेले आहेत. पुढे टप्प्याटप्प्याने विकसीत होणाऱ्या कंपनीच्या क्षेत्रामध्ये सदर CSR पॉलिसीमार्फत सुविधा पुरविण्याचे नियोजित आहे. असे लवासा कॉर्पोरेशनने कळविले आहे.

**३.१५५** सदर वस्तुस्थिती लक्षात घेता. लवासा प्रकल्पाचा विकास हिल स्टेशन नियमावलीतील अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे.

(१३) इनामी जमिनी लवासाला हस्तांतरीत केल्या आहेत काय, असल्यास अशा शेतकऱ्यांची व ग्रामस्थांची नावे समितीला देण्यात यावीत व त्या जमिनी लवासाला कोणत्या नियमाखाली देण्यात आल्या आहेत ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

दिनांक १६ ऑक्टोबर २०१५ रोजीचे पत्रान्वये शासनास सविस्तर अहवाल सादर केला आहे. लवासा कंपनीने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ६३-१ (अ) या कलमान्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी जमीनी खरेदी केलेल्या आहेत. लवासा कंपनीकडून करणेत आलेला खरेदी विक्री व्यवहार नियमित करणेत आला आहे.

(१४) समितीने गावकऱ्यांच्या तक्रारी संदर्भात पुणे, जिल्हाधिकारी यांना पाठविलेला कादपत्रांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :— सदर ३५ निवेदने ही वेगवेगळ्या खात्यांशी संबंधित असलेने त्यावर चौकशी करुन उचित कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना कळविले आहे. त्यांचा अहवाल संकलीत करुन एकत्रित अहवाल सादर करणेची दक्षता घेत आहेत.

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (महसूल शाखा)**

**३.१५६** १. भाडेपट्टीचा करार किती वर्षापर्यंत करता येतो ?

२. लवासा कॉर्पोरेशन लि. ने ९९९ वर्षाच्या कराराने अपोलो हॉस्पीटल ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थाना दिलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ किती आहे ?

३ लवासा कॉर्पोरेशनला शासनाकडून व खाजगी व्यक्तीकडून/संस्थाकडून किती जमिन प्राप्त झाली आहे ?

४ नासा या संस्थेला कोणत्या प्रकारातील जमिन दिली आहे व त्यांच्या सोबत किती वर्षाचा करार केला आहे ? यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

प्रकरणी नमुद परिच्छेदामधील मुद्दे पाहता, नमुद जमिनी या लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी खाजगी लोकांकडून वैयक्तिकरित्या खरेदी केलेल्या आहेत व त्यांचे खाजगी मालकीच्या ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा इ. सारख्या वेगवेगळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था यांना भाडेकराराने दिलेल्या आहेत.

तरी सदरच्या जमिनी या महसूल व वन विभागाने भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या नाहीत. सदर जमिनी या त्यांच्या खाजगी (वैयक्तिक) मालकीच्या आहेत. तरी सदर प्रकरणी झालेल्या भाडेकराराबाबत तसेच उपस्थित मुद्यांबाबत या कार्यालयाचे स्तरावर भाष्य करणे उचित होणार नाही.

(२) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर केलेल्या कराराला (उदा. NASA) केंद्रशासनाकडून तसेच राज्यशासनाकडून मान्यता घेणे आवश्यक का नाही याबाबत खुलासा करण्यात यावा. यावर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :—

याबाबत लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केलेली आहे.

**३.१५७** NASA या संस्थांबरोबर कुठलाही करार झालेला नाही. सदर लवासा प्रकल्पात STPIL (Space Theme Park India Ltd.) या भारतीय संस्थेला Space Theme Park पार्क विकसीत करण्यासाठी लवासा कंपनीच्या मालकीची जागा दिर्घ मुदतीच्या कराराने देण्यात आलेली आहे. सदरची जमीन ही खाजगी असल्याने अशाप्रकारच्या हस्तांतरासाठी किंवा विकासासाठी राज्यशासन अथवा केंद्रशासनाच्या परवानगीचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच या संदर्भात प्रकल्प उभारणीवेळी आवश्यक असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या परवानगीनुसारच प्रकल्प विकसीत करण्यात येत आहे.

समितीने अधिक माहिती जाणुन घेण्याकरिता विभागाला प्रश्नावली देण्यात आली होती त्या संदर्भातील माहिती विभागाने समितीस पुढील प्रमाणे सादर केली आहे.

१. भाडेपट्टीचा करार किती वर्षापर्यंत करता येतो ?

२. लवासा कॉर्पोरेशन लि. नं. ९९९ वर्षाच्या कराराने अपोलो हॉस्पीटल ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय

संस्थांना दिलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ किती आहे ?

३. लवासा कॉर्पोरेशनला शासनाकडून व खाजगी व्यक्तीकडून/संस्थाकडून किती जमीन प्राप्त झाली आहे ?

४. नासा या संस्थेला कोणत्या प्रकारातील जमीन दिली आहे व त्यांच्या सोबत किती वर्षाचा करार केला आहे ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१५८** लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी खाजगी लोकांकडून वैयक्तिकरित्या खाजगीरित्या जमिनी खरेदी केलेल्या आहेत व त्यांचे खाजगी मालकीच्या जमिनी या त्यांनी ९९९ वर्षाच्या दीर्घमुदतीवर आपोलो हॉस्पिटल, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तसेच नासा इ. सारख्या वेगवेगळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था यांना भाडेकराराने दिलेल्या आहेत.

तरी सदरच्या जमिनी या महसूल व वन विभागाने भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या नाहीत. सदर जमिनी या त्यांच्या खाजगी (वैयक्तिक) मालकीच्या आहेत. तरी सदर प्रकरणी शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

१. तहसीलदार मुळशी यांच्या अहवालानुसार लवासा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या आदिवासी जमिनीच्या बाबतीत आतापर्यंत एकूण १७ प्रकरणे पुर्व परवानगीशिवाय जमिनी हस्तांतरण करण्याची कारणे काय आहेत ?

२. सदर जमिनीचे हस्तांतरण केव्हा करण्यात आले ?

३. १७ प्रकरणात किती आदिवासी शेतकऱ्यांचा संबंध आहे व त्यांच्या जमिनी कधीपर्यंत परत करण्यात येणार आहे ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

सदर जमिनीच्या ७/१२ च्या इतर हक्कात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६अ प्रमाणे आदिवासींची जमीन असा शेरा दाखल नसल्याने सदरचे व्यवहार झालेले दिसून येतात.

या जमिनीचे हस्तांतर सन २००२ ते २००३ च्या दरम्यान झाल्याचे दिसून येते.

**३.१५९** १७ प्रकरणांमध्ये ९८.५५ हे. क्षेत्र असून त्यापैकी २ प्रमाणात ११.३३ हे. क्षेत्र आदिवासी खातेदारांना प्रत्यार्पित करण्यात आले आहे व १३ प्रकरणांमध्ये ७२.१५ हे. क्षेत्र जून, २०१५ व सप्टेंबर, २०१५ शासन जमा करण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले असून त्यापैकी २.२६ हे. आर क्षेत्र शासन जमा करण्यात आले आहे. उर्वरीत १२ प्रकरणांमध्ये अपिल कालावधी (६० दिवस) अद्याप पूर्ण झालेला नसल्याने आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. उर्वरीत २ प्रकरणांमध्ये (११.३३ हे. क्षेत्र) उपविभागीय अधिकारी, मावळ मुळशी उपविभाग, पुणे यांच्याकडे आवश्यक असलेले आदिवासी पुरावे आदिवासी यांनी सादर केलेले नसल्याने सदरची चौकशी प्रलंबित आहे.

लवासा कंपनीने खरेदी केलेल्या आदिवासी जमिनी प्रत्यार्पित / शासन जमा करणेबाबतच्या
प्रकरणांची यादी दि. १४/१०/२०१५ अखेर

| अ. क्र. | एस आर क्र. व दिनांक | गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र | जमीन धारकाचे नाव | आदेश क्रमांक | आदिवासींना प्रत्यार्पित क्षत्र | शासन जमा केलेले क्षेत्र | चौकशीवर प्रलंबित क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | ३१ ११ | मुगाव | ५०/५ | ५.६६.५६ | श्रावण भिवा जाधव | ०६/०७/२०१२ | ५.६६.५६ | ० | ० |
| २ | ०१ ११ | मुगाव | ५०/४ | ५.६६.५६ | राया भाऊ काटकर | ०६/०७/२०१२ | ५.६६.५६ | ० | ० |
| ३ | १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २०, २३, २४, २५ | मुगाव | ८/५ पै | ६.०१ | आत्माराम तुकाराम काटकर | २९/०६/२०१५ | ० | २.२६ | ४.१९ (टिप :- १) |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ३९/२०१४ | मुगाव | ५०/१२ | ६.०७ | लक्ष्मण लहानू वाघमारे म. वा. तुळसाबाई तुकाराम घोगरे | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ५ | ४०/२०१४ | मुगाव | ३९/३ | ५.६६ | पिठ्या सया हिलम म.वा. भिवा पिठ्या हिलम | ०८/०९/२०१५ | ० | ५.६६ | ० |
| ६ | ०९ ११ | मुगाव | ५०/७ | ६.०७ | भिया सया जाधव तर्फे श्रावण भिवा जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ७ | ०७ ११ | मुगाव | ५०/८ | ६.०७ | तुकाराम रघू कोळी म.वा. रघु तुकाराम कोळी | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ८ | २७/२०१४ | मुगाव | ५०/९ | ६.०७ | चंदर भिवा जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ९ | ३३/२०१४ | मुगाव | ३९/१ | ५.९३ | लक्ष्मण बारकू जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ५.९३ | ० |
| १० | ४१/२०१४ | मुगाव | ३९/२ | ६.०७ | जानकू संभू जाधव म.वा. नातू राहूल लक्ष्मण जाधव | ०८/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| ११ | ०६ ११ | मुगाव | ३९/४ | ५.६६ | बंड्या भाऊ वाल्हेकर | ०८/०९/२०१५ | ० | ५.६६ | ० |
| १२ | ०२ ११ | मुगाव | ४१/३ | ५.३ | शंकर तुकाराम काटकर | ०८/०९/२०१५ | ० | ५.३ | ० |
| १३ | ३८/२०१४ | मुगाव | ४१/१ | ५.६६ | तुकाराम चंद्र्या काटकर म.वा. शंकर तुकाराम काटकर | ०८/०९/२०१५ | ० | ५.६६ | ० |
| १४ | २६/२०१४ | मुगाव | ४१/२ | ५.२६ | भाऊ पांडु वाल्हेकर, बंडू भाऊ, बाबु भाऊ वाल्हेकर | १४/०९/२०१५ | ० | ५.२६ | ० |
| १५ | ३७/२०१४ | मुगाव | ५०/१० | ६.०७ | काशिनाथ लहानू वाघमारे | १४/०९/२०१५ | ० | ६.०७ | ० |
| १६ | ०८ ११ | मुगाव | ५०/६ | ५.६६ | लहानू भिमा जाधव | | ० | | ५.६६ |
| १७ | | मुगाव | ३९/५ | ५.६६ | शंकर दाजी काटकर | | | | ५.६६ |
| | | | | ९८.५५ | | | ११.३३ | ७२.१५ | १५.५१ |

टिप :— १) आत्माराम तुकाराम काटकर, यांना सिलिंग कायद्याप्रमाणे मिळालेले ४ हे १९ आर इतके मिळालेले होते. सदर प्रकरणी जमीन धारणा (जमीन धारणेची कमाल मर्यादा)१९६१ मधील कलम २९(२) प्रमाणे चौकशी करण्यात येवून सदर प्रकरणी बाजार मुल्यांचे ७५ टक्के रक्कम वसूल करुन सदरचे विक्री व्यवहार हे सिलिंग कायद्याप्रमाणे नियमित करणेत आलेले आहेत.

टिप :— २) १० प्रकरणामध्ये दिनांक ८ सप्टेंबर २०१५ व २ प्रकरणामध्ये दिनांक १४ सप्टेंबर २०१५ रोजी आदेश पारित करणेत आलेले असून सदर आदेशाची अपील मुदत ६० दिवसाची असून अपील मुदत संपलेनंतर सदरची जमीन सरकार हक्कात घेणेची कार्यवाही करणेत येईल.

१. डिसेंबर, २००२ मध्ये पुणे (ग्रामीण) भागातील शासनाच्या जमिन खरेदीचा दर प्रति चौ.मीटर काय होता ?

२. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्या आहेत, त्यातील काही शेतकरी भूमिहीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्या भाविष्याचा विचार करता त्यांना वाढीव दर देण्याबाबतचा मुद्दा खरेदी करार करताना करण्यात आला आहे काय ?

३. भूमिहीन कुटूंबांच्याबाबत व ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी लवासा या प्रकल्पात गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांबाबत शासनाने कोणती भूमिका निश्चित केली आहे ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

**३.१६०** या प्रकल्पामध्ये बहुतांशी गावे विभाग क्र. १ मध्ये समाविष्ट असून या विभागात जिरायत शेत जमिनीचा दर रु. २५,००० ते रु. ३५,००० हेक्टरी तर पॅडी जमिनीचा दर रु. ३०,००० ते रु. ३७,००० प्रति हेक्टर असा होता, तथापि बिगरशेतीचा प्रति चौ.मी. चा दर नमूद केलेला नाही. परंतु गावठाणातील प्र.चौ.मी. चा दर ३० रुपये असल्याचे दिसून येते.

**३.१६१** अशा पध्दतीने खरेदी करार करताना भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना वाढीव दर देण्याचा मुद्दा खरेदी दस्तामध्ये दिसून येत नाही, या सर्व मिळकती शेतकऱ्यांनी स्वेच्छेने विक्री केल्या असून यापैकी कोणतीही जमीन शासनाने सक्तीने संपादीत करुन लवासा कॉर्पोरेशन लि. कंपनीला हस्तांतरीत केलेली नाही.

सदर जमीन खाजगी असल्याने याबाबत शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

१. LCL ने जमीन खरेदी आणि त्याचा वापर याच्या तपशीलाचा अहवाल दर सहा महिन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेला आहे का ?

२. LCL ने ऑक्टोबर, २००६ आणि जुलै, २०१० दरम्यान एकूण रु. ४४.३६ कोटी बाजारमुल्यांचा या ११९.३२ हेक्टर्स वतन (वर्ग-२) जमिनीची औद्यागिक कारणांसाठी खरेदी करण्यासाठी ७२ वेळा व्यवहार केले होते. या प्रकरणात २ टक्क्यांनी देय असलेल्या नजराणा फी ची ऑगस्ट, २०११ पर्यंत वसुली का केली गेली नव्हती ?

३. ३० दिवसांच्या विहित मुदतीत नजराणा फी चे प्रदान न झाल्याने अटींचा भंग झाला होता. त्यामुळे ७५ टक्क्यांनी रु. ३३.२६ कोटी नजराणा फी लागू झाली. या रकमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून वेळीच मागणी का करण्यात आली नाही ?

४. लवासा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वतन जमीनीचे ७२ प्रकरणी व्यवहार झाले आहेत. त्यामध्ये नजराणा फी कधी भरली आहे ?

५. अद्याप ४ प्रकरणांत वसुली का करण्यात आली नाही ?

यावर विभागाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :—

लवासा कार्पोरेशन लि. कंपनीने दर सहा महिन्यांनी जमीन खरेदी व त्याचा वापवर याबबातचा तपशील सादर केलेला नाही.

**३.१६२** या ७२ प्रकरणांपैकी वेल्हे तालुक्यातील ६६ प्रकरणे असून त्यापैकी ६२ प्रकरणांमध्ये लवासा कंपनीने जमीन खरेदी घेणे पुर्वी तत्कालिन मुळे मालक / वतनदार यांनी सदर जमिनी रितसर ५० टक्के प्रमाणे जनराणा रक्कम भरुन वर्ग १ मध्ये रुपांतरीत करुन घेतल्या होत्या. त्यामुळे या ६२ प्रकरणांत औद्योगिक कारणासाठी खरेदी करण्यासाठी २ टक्केनुसार नजराणा फी भरणेचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित ४ प्रकरणात या जमिनी अशा पध्दतीने वर्ग १ मध्ये रुपांतरीत झाल्याचे आदेश अथवा ५० टक्के नजराणा रकमेची चलने खरेदीदार उपलब्ध करुन न देऊ शकल्याने या प्रकरणी खरेदी किंमतीच्या ७५ टक्के प्रमाणे होणारी रक्कम रु. ४८,०८,३७७ दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी एकूण इतकी चलनाद्वारे शासन जमा करुन घेण्यात आलेली आहे.

**३.१६३** तसेच ७२ प्रकरणांपैकी उर्वरित ६ प्रकरणे मुळशी तालुक्यातील होती. त्यापैकी ४ प्रकरणामध्ये खरेदी नंतर ३० दिवसाचे आत कंपनीने कळविले मुळे खरेदी किंमतीचया २ टक्के रक्कम रु. ४३५२ वसूल केली आहे व उर्वरीत २ प्रकरणामध्ये खरेदीनंतर ३० दिवसाचे आत कंपनीने न कळविल्याने खरेदी किंमतीच्या ५० टक्के प्रमाणे नजराणा रक्कम रु.५,६४,५२६ वसूल केलेली आहे. वरीलप्रमाणे एकूण ७२ प्रकरणांमध्ये १०० टक्के वसूली पूर्ण झाली आहे.

**३.१६४** लवासा कंपनीने खरेदी केलेल्या वरील ७२ प्रकरणापैकी ६२ प्रकरणी पूर्व खरेदीदाराने जमीन खरेदी करण्यापुर्वीच मूळ जमिन मालकाने शिघ्रसिध्दगणकाच्या ५० टक्के नजराणा रक्कम रुपये. ४१,३१,९२१ शासन जमा करून या जमिनी भोगवटदार वर्ग २ मधून भोगावटादार वर्ग १ मध्ये रुपांतरीत केल्या होत्या, त्यामुळे या प्रकरणी शर्तभंग होण्याचा अथवा लवासा कंपनीने पुन्हा नजराणा रक्कम भरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित १० प्रकरणी वरील परि. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन नजराणा रक्कम वसूल केली आहे.

वरील ७२ प्रकरणांपैकी ६२ प्रकरणामध्ये रक्कम रुपये ४१,३१,९२१ सन २००६ ते २०१० या कालावधीत विविध तारखांना रक्कम वसुल केलेली आहे. ४ प्रकरणांमध्ये रु. ४३५२ दिनांक २५ मे २००९ रोजी व २ प्रकरणामध्ये रक्कम रु. ५,६४,५२६ दिनांक २० जून २००९ रोजी व वेल्हे तालुक्यातील

४ प्रकरणामध्ये रक्कम रु. ४८,०८,३७७ दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी वसूल करण्यात आली आहे.

वेल्हे तालुक्यातील ४ प्रकरणामध्ये रक्कम रुपये ४८,०८,३७७ दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी वसूल करण्यात आली आहे.

समितीने सद्य:स्थिती जाणून घेण्याकरिता विभागास प्रश्नावली दिली असता महसूल विभागाकडून प्राप्त झालेली सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

**३.१६५** (१) SPA मागील ५ ते ६ वर्षात मंजूर केलेल्या प्रस्तावाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यासंदर्भात SPA मंजूर केलेले प्रस्ताव व ज्या ज्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन झालेले आहेत त्याबाबतची संचालक, नगररचना यांनी सखोल चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करुन त्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी असे निर्देश समितीच्या लवासा येथील दिनांक १२ सप्टेंबर २०१५ रोजीच्या बैठकीच्या वेळी दिले होते. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस आजतागायत प्राप्त झालेला नाही. हा अहवाल अतितत्काळ समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले असता विभागाने खालील खुलासा केला :-

**३.१६६** महसूल शाखेकडील पत्र क्र.पमअ-१/कावि/८१०/२०१६, दिनांक २९ एप्रिल २०१६ अन्वये मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-१) यांचेकडे अलाहिदा पाठविण्यात आली असून सोबत सदर पत्राची प्रत जोडून सादर करणेत आली आहे.

(२) " आदिवासींच्या जमिनी खरेदी करणे " या परिच्छेदाअंतर्गत एकूण १७ प्रकरणात पूर्वपरवानगी शिवाय जमिन हस्तांतरण झाल्याचा अहवाल तहसिलदार मुळशी यांनी दिलेला आहे. एकूण १७ प्रकरणांपैकी २ प्रकरणांतील जमिनीचा ताबा आदिवासींना दिलेला आहे. १३ प्रकरणांमध्ये ७२.१५ हेक्टर क्षेत्र माहे जून, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीत शासनास जमा करण्याचे आदेश पारित केले आहेत. या प्रकरणांची आजची सद्यःस्थिती काय आहे. यासंदर्भातील माहिती समितीस अति तत्काळ देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता विभागाने खालील खुलासा केला :-

**३.१६७ आदिवासी जमिनी खरेदी करणे :-** या परिच्छेदाअंतर्गत १७ पन्नकरणात पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण झालेले निदर्शनास आले होते. त्याप्रमाणे दोन प्रकरणांमधील जमिनीचा ताबा आदिवासी खातेदारांना दिलेला आहे तर १३ प्रकरणांमध्ये सदर जमिनींचे हस्तांतरण रद्द ठरवून प्रस्तृत ७२ हे. १५ आर क्षेत्र सरकार जमा करण्याचे आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे अपील मुदत संपलेनंतर प्रस्तृत क्षेत्र सरकार हक्कात घेण्यात आले. तद्नंतर प्रस्तृतचे क्षेत्र यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे ३६ व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करणेचा अधिनियम १९४७ मधील तरतूदीनुसार सदर जमिनी मूळ आदिवासी खातेदार यांना प्रत्यार्पित करण्यात येवून गांव दप्तरी अधिकार अभिलेखात आदिवासी खातेदार यांची नांवे दाखल करण्यात आलेली आहेत.

**३.१६८** (३) " नजराणा रक्कम वसूल करणे " या परिच्छेदामध्ये महालेखाकारांनी एकूण ४८ प्रकरणांचा उल्लेख केला होता. तथापि, जिल्हाधिकारी, पुणे यांच्या तपासणीत प्रत्यक्षात ९० प्रकरणे आढळून आली. सदर ९० प्रकरणांपैकी ६४ प्रकरणात रु. ११,९०,९१,६४० नजराणा फी वसूल केली आहे. तथापि, उर्वरित २६ प्रकरणांबाबत नजराणा फी वसूलीबाबतची आजची सद्यःस्थिती काय आहे याबाबतची माहिती समितीस अति तत्काळ सादर करावी असे समितीने निदेश दिले असता विभागाने खालील खुलासा केला.

**नजराणा रक्कम वसूल करणेबाबत :—** परिच्छेदातील २६ प्रकरणांबाबत खालीलप्रमाणे सद्यःस्थिती आहे.

**३.१६९** २६ प्रकरणांपैकी ११ प्रकरणे लवासा संबंधित नाहीत त्यामुळे लवासा कार्पोरेशन कंपनीकडून नजराणा रक्कम वसूल करणेचा प्रश्न येत नाही. उर्वरित १५ प्रकरणांमध्ये आदेश पारित करणेत आलेले आहेत. त्यापैकी ४ प्रकरणांमध्ये लवासा कार्पोरेशन लि. यांनी २ टक्के रक्कम मुदतीत भरल्यामुळे कार्यवाही रद्द करणेत आलेली आहे. तर दोन प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १,३६,३६९ दिनांक ३० जुलै २०१४ रोजी वसूल करणेत आलेली आहे.

**३.१७०** ९ प्रकरणांमध्ये लवासा कार्पोरेशन लि. यांनी केलेले फेरचौकशी अर्ज फेटाळणेत आलेले आहेत. यामुळे पूर्वीचेच आदेशाप्रमाणे रक्कम रुपये ३,९७,७९,७०१ इतकी रक्कम भरणेबाबत लवासा कार्पोरेशन लि. यांचेवर बंधनकारक आहे. तथापि सदरची रक्कम लवासा कार्पोरेशन लि. यांनी अद्याप सरकार जमा केलेली नाही. सदरची रक्कम वसूल करणेबाबत उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी, उपविभाग, पुणे यांचेकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) " स्वामित्व धनाच्या थकबाकीची वसुली न होणे " या संदर्भात स्वामित्व धनाची (मुरुम उत्खनन) रक्कम १५.०५ कोटी व दंडाची रक्कम वसूली याबाबतचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयीन प्रकरणांची आजची सद्यःस्थिती समितीस अति तत्काळ सादर करावी असे समितीने निदेश दिले असता विभागाने खालील खुलासा केला :-

**३.१७१** आज अखेर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संकेत स्थळावर प्रकरणाची सद्यःस्थिती पाहिली असता, दिनांक ०८ जुलै २०१० रोजीच्या आदेशानुसार याचिका अंतिम निर्णयासाठी प्रलंबित असल्याने सदर प्रकरणी दंड वसुली सक्तीने करु नये, असे आदेश असल्याचे तहसिलदार, मुळशी यांनी कळविले आहे. त्यामुळे प्रलंबित रकमेच्या वसुली सक्तीच्या मार्गाने केलेली नाही असे तहसिलदार, मुळशी यांचे म्हणणे असलेचे खनिकर्म शाखेने कळविले आहे.

**३.१७२** लवासा गिरीस्थान प्रकल्पातील लवासा विशेष नियोजन प्राधिकरण यांनी मंजुरी दिलेल्या विकास परवानगीबाबतची जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे. **(परिशिष्ट-'अ')**

**अभिप्राय व शिफारशी :—**

**४ "थंड हवेच्या ठिकाणासदृष्य क्षेत्र शोधण्यास आणि प्रकल्प विकासकाच्या निवडीत पारदर्शकतेचा अभाव"**

**४.१** राज्यात थंड हवेची गिरिस्थाने विकसित करणे आवश्यक आहे यात कुणाचेही दुमत नाही. राज्याचा व देशाचा विकास करण्यासाठी पर्यटनाच्या दृष्टीने अशी ठिकाणे विकसित करणे ही काळाची गरज आहे. परंतु यासाठी नगरविकास विभागाने राज्यातील थंड हवेची ठिकाणे विकसित होऊ शकतील अशी क्षेत्रे निवडण्यासाठी राज्यातील सर्व भागांचा तज्ज्ञांकडून अभ्यास व सर्व्हेक्षण करुन सुसाध्यता अहवाल घेऊन यास जागतिक स्तरावर प्रसिद्धी देऊन अशी आवेदने मागविणे आवश्यक होते. तसेच नगरविकास विभागाने राज्यातील लवासा प्रकल्पासमवेत ज्या ६ थंड हवेच्या स्थळांच्या विकास प्रकल्पांना मंजुरी दिली ते सर्व प्रकल्प पुणे जिल्ह्यातील होते. तसेच राज्यात उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या भागात विकसनशील क्षेत्रे असतानाही अशा ठिकाणी थंड हवेचे क्षेत्र विकसित करण्यास शासनास अद्यापही यश प्राप्त झालेले नाही परंतु केवळ लवासा हा एकच प्रकल्प कार्यान्वित होऊ शकला. सदर बाब राज्याच्या समतोल विकासाच्यादृष्टीने पूरक नाही. **अतः भविष्यात शासनाने तज्ज्ञ व्यक्तींमार्फत राज्यातील सर्व क्षेत्रांचे सर्व्हे करून थंड हवेचे क्षेत्र विकसित करण्यास योग्य स्थळे निश्चित करावीत व त्यासाठी निकष ठरवून त्यास योग्य प्रसिद्धी देऊन आवेदने मागविण्यात यावीत तसेच अशी थंड हवेची ठिकाणे विकसित करतांना सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या नियमावलीनुसार अशी गिरीस्थाने विकसीत करण्यास अनेक बंधने व अडचणी येत आहेत. त्यामुळे अशी गिरीस्थाने विकसीत करण्यासंदर्भात शासनाने सुस्पष्ट व पारदर्शक अशी स्वतंत्र विकास नियमावली (डिसी रुल) तयार करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**"थंड हवेच्या ठिकाणासदृष्य क्षेत्र शोधण्यास आणि प्रकल्प विकासकाच्या निवडीत पारदर्शकतेचा अभाव"**

**४.२** शासनाने सन १९९६ मध्ये गिरीस्थान विकसनासाठीची विशेष नियंत्रण नियमावली तयार करुन यास हरकती व सूचना मागवून दिनांक २६ नोव्हेंबर १९९६ च्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २० (४) अन्वये सदर नियमावली अंतिमतः अशा मंजूर प्रादेशिक योजनांच्या नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यात आली. तद्नंतर पुणे जिल्ह्यासाठी नोव्हेंबर, १९९६ मध्ये प्रादेशिक आराखड्यास नगरविकास विभागाने मान्यता दिल्यानंतर मे.ॲक्वालॅन्ड इंडिया लि. आणि मे.पर्ली फ्ल्यु लेक रिसॉर्ट प्रा.लि. या खाजगी कंपन्यांनी पुणे जिल्ह्यातील मुळशी व वेल्हे या तालुक्यातील १८ गावांमध्ये थंड हवेच्या ठिकाणांचा विकास करण्यासंदर्भात शासनाकडे परवानगी मागितली. वास्तविक राज्यातील अशा प्रकारची थंड हवेची ठिकाणे विकसित करण्यासंबंधातील हा पहिलाच प्रकल्प असल्याने सदरहू प्रकल्पाचा विकास करण्यासाठी विकासकाची निवड ही व्यापक प्रसिद्धी देऊन व पारदर्शक पद्धतीनेच करणे आवश्यक होते. तथापि, या प्रकरणी प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी एजन्सीची निवड करताना खुल्या स्पर्धेद्वारे आवेदने मागविण्यात आली नाहीत. संचालक, नगररचना यांनी कलम २० अन्वये गिरीस्थान म्हणून उपयुक्त क्षेत्र म्हणून निर्देशित केल्यानंतर या क्षेत्रामधील किमान ४०० हेक्टर जमीन धारण करणारे एक किंवा अनेक प्रकल्प विकासक शासनाकडे अर्ज करु शकतात हा निकष ठरविण्यात आल्यामुळे त्याआधारे उपरोक्त कंपन्यांनी सादर केलेल्या प्रकल्पास शासनाकडून मान्यता देण्यात आली. जरी गिरिस्थाने विकसित करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे या कंपन्यांनी अर्ज करून त्यांची निवड झाली असली तरीही महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपानुसार या कंपन्यांनी सादर केलेल्या प्रकल्पास एकतर्फी मान्यता दिल्यामुळे निवड प्रक्रियेत पारदर्शकता राहिलेली नाही. राज्यात अशाप्रकारचे मोठे प्रकल्प विकसित करतांना एवढ्या मर्यादीत निकषांच्या आधारे इतक्या मोठ्या प्रकल्पाची पात्रता कशी काय निश्चित होऊ शकते. ही बाब देखिल अत्यंत महत्त्वाची आहे. शासनाने मोठ्या प्रमाणात ज्या ज्या सुविधा, सुट, सवलती लवासाला दिल्या त्या आवेदन स्तरावर पहिलेच घोषित केल्या असत्या तर अनेक स्पर्धात्मक प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होऊ शकले असते. **अतः शासनाने भविष्यात कुठल्याही प्रकल्पाचे एवढे मर्यादित निकष न ठेवता विभागाने यापुढे अशा प्रकल्पांना मान्यता देतानाच्या व्यापक अटी, शर्ती व निकष व देण्यात येणाऱ्या सवलती प्रथमतः निश्चित करून त्यास व्यापक प्रसिद्धी देऊन व अशा प्रकल्पांत स्वारस्य असलेल्या सर्व इच्छुकांना संधी द्यावी व विकासक/संस्थांची स्पर्धात्मक निवड पारदर्शक पद्धतीने करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**"LCL ला विशेष नियोजन प्राधिकाऱ्याचा दर्जा देणे शासनाच्या भूमिकेचे सौम्यिकरण आणि अनावश्यक अनुग्रह"**

**४.३** लवासा संदर्भातील आराखडे, रेखांकने व प्लॅन मंजुर करण्याचे अधिकार प्रथमतः जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे होते. परंतु माहे जानेवारी, २००७ मध्ये लवासा येथे झालेल्या बैठकीमध्ये राज्य सरकारकडून आराखड्यांना मंजुरी मिळण्याच्या प्रक्रिया लांबलचक असून त्यामुळे प्रकल्पास विलंब होईल या सबबीवर सन २००२ मध्ये MRTP अधिनियम, १९६६ च्या विभाग ४० च्या उपविभाग १ (ब) जोडले त्याअनुसार लवासा कॉर्पोरेशन लि. (LCL) ने केलेल्या विनंतीनुसार या कंपनीची सन २००७ मध्ये विशेष नियोजन प्राधिकारी (Special Planning Authority) म्हणून नियुक्ती करण्यात आली व त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने माहे जून,२००८ मध्ये अधिसूचना प्रसिद्ध करून १० सदस्यांची SPA गठीत केली. सदर समितीमध्ये शासनाचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगररचना, पुणे या एकाच शासकीय सदस्याचा समावेश करण्यात आला. SPA च्या माध्यमातून लवासाला काही अटी व शर्तीच्या अधिन राहून अधिकार देण्यात आले होते. काही गोष्टींचे नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांकडे होते

तर काही SPA कडे होते. SPA ने दिलेली प्रत्येक बांधकाम परवानगी दर तीन महिन्यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या निदर्शनास आणणे लवासाला बंधनकारक असून यात कोणत्याही नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास तसेच नगरविकास किंवा DCR मधील नियमावलींचा भंग केल्यास जिल्हाधिकारी, पुणे यांना अशा बाबींवर कारवाई करण्याचे अधिकार प्राप्त होते. लवासा प्रकल्पात एकूण ५ टाऊनशीप उभारण्यात येणार असून एकूण पाच टप्प्यांमध्ये हे काम प्रस्तावित आहे. राज्यात राबविण्यात येणारा अशाप्रकारचा हा पहिलाच प्रकल्प असून शासनाने या प्रकल्पास जागा, पाणी, मुद्रांकशुल्क माफी, उद्योगाचा दर्जा, करमणूक शुल्क माफी, पर्यावरणीय नियमातून सूट अशा अनेक सवलती, सूट व माफी दिलेल्या असतांनाही SPA गठीत करुन व लवासाला या प्रकल्पाचे निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार देऊन या प्रकल्पावरील शासनाचे अखेरचे थेट नियंत्रण, देखरेख व मान्यतेचे अधिकार शासनाने संपुष्टात आणले. म्हणजे प्रकल्पावर काम करणारे लोकच प्रस्तावाचा दर्जा ठरवून त्याचे मूल्यमापन करून त्याचेवर देखरेख देखील ठेवणार होते. या प्रकल्पावर विशेष नियोजन प्राधिकरणाच्या निमित्ताने शासनाचा थेट अंकुश असणे अत्यावश्यक होते. परिणामी समितीतील निर्णय प्रक्रिया ही मताधिक्क्याद्वारे पूर्ण होत असल्याने प्रकल्पाचे नियोजन आणि मंजुरीमध्ये शासनाचा सहभाग अत्यल्प राहिला. त्याच अधिकारांचा वापर करून रहिवाशांकडून आक्षेप आणि सूचना न मागविता आराखडे मंजूर करणे, मंजूर केलेल्या क्षेत्रात वाढ करणे, रेखांकन आराखड्यात बदल करणे व हा बदल केल्याच्या तारखेपासून अहवाल तीन महिन्यात शासनाला सादर न करणे, समुद्रसपाटीपासून १००० मीटरपेक्षा जास्त बांधकाम करणे, भौगोलिक परिस्थितीचे संवर्धन करण्यासाठी विहित केलेल्या नियमांचे आणि पद्धतींचे उल्लंघनास कारणीभूत ठरणारे बदल करणे, जिल्हाधिकाऱ्यांनी अगोदर वगळलेल्या क्षेत्रांचा प्लॅनमध्ये समावेश करणे, त्यावर बांधकाम प्रस्तावित करणे, पूर प्रभावित क्षेत्र, पाणलोट क्षेत्र किंवा सिंचनाच्या क्षेत्रात बांधकाम करण्यात येणे, अशा अनेक अनियमितता लवासामध्ये SPA मार्फत झाल्या व महालेखाकारांनीही याबाबत गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. लवासासोबतच्या या व्यवहारातून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होणे अपेक्षित असतांनादेखिल शासनाने लवासाला अनेक प्रकारच्या सवलती, सूट व माफी तर दिल्याच परंतु SPA गठीत करुन लवासाला शासनाने या प्रकल्पासंदर्भात सर्व निर्णय घेण्याचे अधिकारच दिले व प्राप्त अधिकारांचा वापर करतांना लवासाने विहित नियमांचे पालन न केल्यामुळे खऱ्या अर्थाने या प्रकल्पाबाबतच्या अडचणीत व आक्षेपात वाढ झाली. परिणामी केंद्र व राज्य शासनाच्या आक्षेपामुळे व न्यायप्रविष्ठ बाबींमुळे पहिल्या टप्प्यातच या प्रकल्पाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे व भविष्यात या सर्व घडामोडींचा परिणाम लवासाच्या पुढील टप्प्यांच्या गुणवत्तेवर व व्यवहारांवर देखील पडू शकतो. शासनाने SPA च्या माध्यमातून निर्णय घेण्याचे अधिकार लवासाला दिले त्या अधिकाराचा वापर SPA कडून नियमानुसार झाला नाही परिणामी शासनाने ज्या उद्देशाने SPA चा निर्णय घेतला तो साध्य होऊ शकला नाही. **अतः लवासा प्रकल्पामध्ये सुसाध्यता, नियमितता व शासनाचे नियंत्रण आणण्याच्यादृष्टीने SPA च्या अटी व शर्तीमध्ये बदल करून शासनाने SPA चे तात्काळ पुनर्गठन करावे. तसेच SPA मध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या अधिकाधिक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असावा असे समितीचे स्पष्ट मत आहे. SPA चे पुनर्गठन करताना त्यामध्ये लवासाच्या प्रतिनिधीं सोबतच खालीलप्रमाणे शासनाच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा :—**

**(१) आयुक्त, पुणे महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण (PMRDA) किंवा तत्सम अधिकारी**

**(२) जिल्हाधिकारी, पुणे**

**(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे**

**(४) संचालक, नगर रचना, पुणे**

**(५) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे**

**(६) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे**

४.४ **तसेच SPAच्या बैठकीमध्ये उपरोक्त शासकीय प्रतिनिधींची उपस्थिती अनिवार्य करण्यात करावी व बैठकीत एकमताने निर्णय न झाल्यास शासनस्तरावर अस्तित्वात असलेल्या नियम व व्यवस्थेअंतर्गत यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. परंतु नगरविकास विभागाच्या दि. १० जानेवारी २०१७ रोजीच्या पत्रान्वये समितीला असे कळविण्यात आले की, शासनाने पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना नगरविकास विभाग, शासन अधिसूचना दि. ३१ मार्च २०१५ अन्वये करून या प्राधिकरणाची हद्दवाढ दि. ४ डिसेंबर २०१५ च्या अधिसूचने अन्वये मंजूर केलेली आहे. दि. ४ डिसेंबर २०१५ च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या हद्दवाढीमध्ये संपुर्ण मावळ तालुक्यातील १ व वेल्हे तालुक्यातील लवासामधील सर्व गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. अधिनियमाचे कलम ४० (१ ख) नुसार लवासा सीटी कॉर्पोरेशन लिमिटेड यांना त्यांच्या अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरणाची नेमणूक शासनाने दि. १२ जून २००८ अन्वये केली होती. परंतु अधिनियमाचे कलम २(१५) नुसार लवासा सीटी कॉर्पोरेशन लिमिटेड हे स्वतः स्थानिक नियोजन प्राधिकरण नसल्याने लवासा सीटी कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचे विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार आपोआपच संपुष्टात येत असून ते क्षेत्र प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रामध्ये समाविष्ट होत असल्यामुळे पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणास (PMRDA) अधिसूचित क्षेत्राकरिता नियोजनाचे अधिकार प्राप्त**

**झाल्याचे विभागाने पत्राद्वारे समितीला कळविलेले आहे. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे (परिशिष्ट अ) तथापि, विभागाकडून उपरोक्त प्राप्त पत्रामध्ये शासनाच्या नगरविकास विभागाने दि.३० ऑगस्ट, २०१६ (अधिसूचना क्रमांक XXII २०१६) रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेचा उल्लेख केलेला नाही. या नवीन अधिसूचनेनुसार स्थापन झालेल्या PMRDA ची रचना ही मुंबई रिजनसाठी असलेल्या MMRDA च्या धर्तीवर केलेली आहे. या अधिसूचनेतील कलम १३(३) नुसार स्थापन झालेल्या PMRDA ला इतर नियोजन प्राधिकरणाशी सल्लामसलत करुन योग्य ते बदल सुचविण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच कलम (१४) नुसार वेळोवेळी स्वतंत्र नोटीफीकेशन काढून विशिष्ट विकासकामांसाठी (विशेषतः संपुर्ण विभागासाठी विपरित परिणाम होण्याची शक्यता असल्यास) PMRDA कडून परवानगी घेण्याचे बंधन ठेवण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत ज्याप्रमाणे MMRDA च्या कार्यक्षेत्रातील सर्व नियोजन प्राधिकरणाचे अस्तित्व अबाधित राहते त्याचधर्तीवर लवासासाठी देखील नियोजन प्राधिकरणाची नेमणूक करणे शासनाला आवश्यकच आहे असे समितीला वाटते. तसेच लवासाला सन २००८ साली देण्यात आलेले विशेष नियोजन प्राधिकारी (SPA) चे अधिकार संपुष्टात आणण्याबाबतची कारवाई महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १६० अन्वये करण्यात आलेली नसल्यामुळे सद्यःस्थितीत PMRDA च्या स्थापनेनंतर देखील लवासाला देण्यात आलेले SPAचे अधिकार अबाधित आहेत असे समितीचे मत आहे. अशा परिस्थितीत प्रकल्पाला गती देण्याच्यादृष्टीने SPAकायम ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतल्यास समितीने उपरोक्तपणे केलेल्या शिफारसीनुसार शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा SPA मध्ये समावेश करुन SPAचे सुधारित अटी व शर्तीसह पुनर्गठन करावे अशी समितीची शिफारस आहे. आणि अधिनियमातील तरतुदीनुसार लवासाचे क्षेत्रासाठी PMRDA ला नियोजन प्राधिकारी ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतल्यास त्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत शासनाने उचित निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**SPAकडून आराखडे आणि रेखांकने यांना अनियमित मान्यता**

**४.५** लवासा प्रकल्पासंदर्भात नकाशे, आराखडे व रेखांकने मंजूर करण्याचे अधिकार प्रथमतः जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे होते. जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ७ जून, २००८ रोजी लवासासंदर्भातील शेवटचा प्लॅन मंजूर करताना प्लॅनमधील १२ हेक्टर क्षेत्र वगळले होते. त्यानंतर दिनांक १२ जून, २००८ रोजीच्या बैठकीत लवासा कंपनीस विशेष नियोजन प्राधिकारी (SPA) चा दर्जा शासनाकडून देण्यात आला. SPAगठीत झाल्यानंतर मात्र या प्रकल्पाबाबतचे संपूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार काही अटी व शर्तीच्या अधीन राहून SPA ला प्राप्त झाले. परिणामी जिल्हाधिकारी, पुणे यांनी वगळलेल्या १२ हेक्टर क्षेत्रावरदेखील SPAने आराखडा मंजूर केला व याचा समावेशदेखील SPAने प्लॅनमध्ये केला. SPA च्या एकूण ८ बैठका झाल्यात व त्यातील ७ बैठकांमध्ये संचालक, नगररचना हे शासनाचे प्रतिनिधी व SPAचे सदस्य म्हणून उपस्थित होते. परंतु ज्या एका बैठकीत संचालक उपस्थित नव्हते त्याच बैठकीत संपूर्ण प्लॅन, आराखडे व रेखांकने मंजूर करण्यात आले. सदरहू कार्यपद्धती पाहता SPAच्या हेतूबद्दल शंका घेण्यास पूर्ण वाव आहे. तसेच SPAने मंजूर केलेला रेखांकन आराखडा अंतिम करण्यापूर्वी यासाठी रहिवाशांकडून हरकती व सूचना मागवून त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असतांनाही निर्धारित प्रक्रिया लवासाकडून अवलंबिली गेली नव्हती. त्यातच पूर प्रभावित क्षेत्रात, पाणलोट क्षेत्रात व सिंचनाच्या क्षेत्रात देखिल बांधकाम करण्यात आले. SDCR ने २० मीटर्सची मर्यादा विहीत करुनही एका हॉटेलची उंची २० मीटर्सपेक्षा जास्त होती. SPAगठीत झाली त्या बैठकीत SPAने घेतलेले निर्णय व मंजूर केलेल्या योजनांची माहिती दर तीन महिन्यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर करणे बंधनकारक असतानाही तब्बल अडीच ते तीन वर्षांनी सदरहू प्लॅन मंजुरीची माहिती SPAने सादर केली. जिल्हाधिकारी यांनी अगोदर केलेला प्लॅन व SPAने नंतर केलेला प्लॅन यात बऱ्याच विरुद्ध बाबी अंतर्भुत होत्या. परिणामी SPAने मंजूर केलेल्या प्लॅनवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत काही त्रुटी व आक्षेप घेण्यात आले व सदर बाब शासनाच्या निदर्शनास देखील आणली. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या कलम ४० (१) (बी) अंतर्गत लवासाला SPAम्हणून घोषित करुन अधिकार प्रत्यावर्तीत केलेले असले तरीही मास्टर प्लॅन तयार करण्यासाठी संचालक, नगररचना यांची मान्यता घेणे आवश्यक होते त्यांच्या परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारे मास्टर प्लॅन तयार करता अथवा बदलता देखील येणार नसल्याचे कलम ४० (३) अंतर्गत नमूद आहे. आजतागायत लवासाने पहिल्या टप्प्यासाठी माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये सादर केलेल्या मास्टर प्लॅनला शासनाची मंजुरी मिळालेली नाही. म्हणजेच मास्टर प्लॅन शासनाच्या विचाराधीन असताना त्यास गृहीत धरुन लवासाकडून बांधकाम करण्यात आले. वास्तविक SPA ने तयार केलेले प्लॅन मंजूर होत नाही तोपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या प्लॅननुसारच बांधकाम करणे अपेक्षित असतानाही लवासाने SPA या प्लॅनची मान्यता गृहीत धरुन बांधकाम केले. त्यानंतर लवासा या संदर्भात उच्च न्यायालयात गेली असता **व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये कन्स्ट्रक्शन कंपनीला स्वतःच्या रिस्कवर बांधकाम करण्यास न्यायालयाने मुभा दिली. परंतु त्यात कोणताही थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण होऊ नये या अटीवर बांधकाम सुरु ठेवण्यास न्यायालयाने मुभा दिली. त्यामुळे बांधकाम थांबले नाही परंतु त्यास नियमानुसार मान्यता देखील अद्याप नाही.** लवासाने हे प्लॅन तीन महिन्यांच्या आत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर न करता ते अडीच ते तीन वर्षांनी सादर केले. लवासाची ही कृती SPAच्या विहित अटींचा भंग व उल्लंघन करणारी ठरते व अशा परिस्थितीत

कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, पुणे यांना प्राप्त असूनही त्यांनी त्यांच्या अधिकारांचा वापर त्यावेळी केल्याचे दिसून येत नाही. परिणामी लवासाने SPAया अधिकारांचा वापर करुन नियमबाह्यरित्या निर्णय घेतले हे नाकारता येत नाही. **सहाय्यक संचालक यांनी SPAच्या प्लॅनमध्ये काही त्रुटी काढून त्या जिल्हाधिकारी पुणे यांच्या निदर्शनास आणल्या व जिल्हाधिकारी पुणे यांनी संपूर्ण प्लॅनला शासनाच्या अभिप्रायार्थ माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये पाठविले व आजतागायत या मास्टर प्लॅनला शासनाकडून मान्यता मिळालेली नाही ही बाब देखिल समर्थनीय ठरत नाही. एकीकडे नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करण्याचे पूर्ण अधिकार जिल्हाधिकारी, पुणे यांना प्राप्त असतांनाही त्यांनी मास्टर प्लॅनबाबत त्रुटी काढून स्वतःची जबाबदारी पूर्ण केल्याचे केवळ कागदोपत्री दर्शविण्यात येणे, परंतु मास्टर प्लॅनबाबत कुठलाही निर्णय न घेता तो अमर्याद कालावधीकरिता प्रलंबित ठेवणे अशी कार्यपद्धती शासनास नक्कीच भुषणावह नाही. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन प्लॅनबाबत गुणवत्तेवर निर्णय घेणे आवश्यक होते. एकंदरीतच या प्रकल्पावर राज्य शासनाचे नियंत्रण प्रत्यक्षात नसून केवळ कागदपत्रावरच असल्याचे दिसून आले. केवळ प्लॅन मंजूर व्हायला शासनस्तरावरुन इतका अमर्याद विलंब लागत असेल तर त्याचा थेट परिणाम अशा प्रकल्पाच्या कामावर, नियोजनावर, आर्थिक बाबींवर नक्कीच पडणारा आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी व वेल्हे तालुक्यातील १८ गावांमधील २३,००० एकर जागेवर ५ टाऊनशीप प्रस्तावित आहेत. भविष्यातही सदर जमिनीमधील अनेक प्लॅन SPAकडून मंजूर केले जातील. अतः शासनाने त्यांचेकडे प्रलंबित असलेल्या फेज-१ बाबतच्या मास्टर प्लॅनवर विहित तरतुदी, करारातील अटी व शर्ती, विकास नियंत्रण नियमावलीच्या अधीन राहून तातडीने एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा. त्यातील नियमानुसार असलेल्या प्लॅनला मंजुरी द्यावी व नियमात न बसणाऱ्या प्लॅनवर व त्या अनुषंगाने केलेल्या बांधकामावर प्रचलित नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व भविष्यात प्लॅन मंजूर करताना उपरोक्त बाबींची पुनरावृत्ती होऊ नये, व SPAने नियमानुसार एकमताने मंजूर न केलेले प्लॅन शासनास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक करावे व शासनाने त्या प्लॅनचा बारकाईने अभ्यास करावा व प्रचलित नियमानुसार असलेल्या प्लॅनला मंजुरी द्यावी व नियमानुसार योग्य नसलेले प्लॅन नामंजूर करावेत व शासनस्तरावरुन यासंदर्भात निर्णय घेण्याचा कालावधी ३ महिन्यांपेक्षा जास्त नसावा. याबाबत केलेल्या उपाययोजनेची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.६** मुळशी व वेल्हे या तालुक्यातील १८ गावांतील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी लवासा प्रकल्पाकरिता दिलेल्या आहेत. तेथील नागरिकांना पाणी, वीज, रस्ता या मुलभूत सोयी-सुविधा मिळवून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. यासंदर्भात लोकलेखा समितीने दि.१२ सप्टेंबर, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील लवासा कॉर्पोरेशन इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटरला भेट दिली व प्रकल्प क्षेत्रामध्ये येत असलेल्या गावातील नागरिकांचे म्हणणे देखिल ऐकून घेतले. लवासा परिसरातील गावांमध्ये जवळ जवळ ४ हजार ग्रामस्थ राहतात. परंतु स्थानिक रहिवाशांना तेथे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. उदा. लवासाकडून जमीन खरेदीमध्ये खरेदीखताच्या संदर्भात फसवणूक होणे, STP प्लॅन्टमधील क्रशरच्या धुळीमुळे ग्रामस्थांना त्रास होणे, लवासाला शासनाकडून मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध करुन देणे परंतु गावकऱ्यांना मात्र टँकरने पाणीपुरवठा होणे व तो देखील नियमित नसणे, वैयक्तीक शौचालये बांधून न देणे, सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता नसणे, पडळघर येथील मागासवर्गीयांकरिता घरे बांधून तयार असतांनाही त्याचा ताबा न देणे, सदर घरांना संरक्षण भिंत नसणे, गावात अंतर्गत रस्ते नसणे, काही रस्त्यांची दुरावस्था असणे, वहिवाटीची सुविधा नसणे, ड्रेनेजची सोय नसणे, ग्रामस्थांना कायमस्वरुपी नोकरी नसून ते कंत्राटी पद्धतीने काम करीत असणे, ज्या कुटुंबाची संपूर्ण जागा लवासाने खरेदी केलेली आहे त्यांना घरे बांधण्यासाठी भूखंड देणे आवश्यक असताना ते दिलेले नसणे, शाळा आहे परंतु शाळेची बस कार्यरत नसणे, इयत्ता सातवीनंतर शिक्षणाची सोय नसणे, चांगल्या वैद्यकीय सुविधा नसणे, अशा अनेक अडचणी समितीच्या निदर्शनास आल्या. लवासाच्या क्षेत्रात अपोलो सारखे ५० खाटांचे अद्यावत सोयीसुविधा असलेले रुग्णालय कार्यरत असतानाही स्थानिक गावकऱ्यांसाठी बाह्य रुग्णसेवा (ओ.पी.डी.) उपलब्ध असणे. समितीने भेटी दरम्यान सदरहु रुग्णालयात रहिवाश्याना राजीव गांधी जिवनदायी योजना लागु करणेबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेबाबत समितीने सुचित केले होते. ज्या ग्रामस्थांच्या जमिनीवर सदर प्रकल्प उभारला जात आहे त्यांनाच गावात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे. लवासाच्या पर्यटन क्षेत्रामध्ये या गावांचाही समावेश असल्याने जिल्हापरिषदेने यात हस्तक्षेप करण्यास नकार देणे व लवासाने देखिल या गावकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे. लवासाने त्यांचे अंतर्गत व लवासाकडे येणाऱ्या रस्त्यांचीच देखभाल दुरुस्ती केली परंतु गावकऱ्यांच्या रस्त्यांकडे निधी नसल्याच्या सबबीखाली दुर्लक्ष केले. यासंदर्भात जिल्हापरिषद व लवासामध्ये करार झालेला आहे परंतु त्याचे पालन लवासाकडून होत नाही. राज्यात प्रथमतःच अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात गिरीस्थान विकसित करणारा हा पथदर्शी प्रकल्प असून खूप मोठ्या प्रमाणात यासाठी गावकऱ्यांकडून जागा संपादन करण्यात आली आहे. आता जर गावकऱ्यांना योग्य सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत तर भविष्यात कोणीही अशा प्रकल्पांसाठी आपल्या जागा देणार नाहीत. शासनाने लवासाकडून या सर्व सुविधा गावकऱ्यांना मिळवून देण्याची आवश्यकता असणे **अतः स्थानिक रहिवाशांना या मुलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी लवासावर सोपविण्यात यावी व तसा करारनामा करण्यात यावा व त्यानुसार रहिवाशांना या सुविधा मिळणे करिता जिल्हाधिकारी पुणे यांचे नियंत्रणाखाली स्थानिक पातळीवर देखरेख यंत्रणा उभारावी व संबंधित विभागांशी समन्वय साधावा. तसेच नियमानुसार ज्या रस्त्यांच्या देखभालीची जबाबदारी लवासावर सोपविण्यात आलेली आहे त्या रस्त्यांचे काम लवासाकडून करुन**

**घेण्यात यावे व उर्वरित रस्त्यांची देखभाल दुरुस्ती जिल्हापरिषदेने करावी जेणेकरुन भविष्यामध्ये तेथील नागरीकांना रस्ते व मूलभूत पायाभूत सुविधा ६ महिन्यात उपलब्ध होतील याची खात्री करावी लवासा प्रकल्प क्षेत्राच्या सभोवताली असलेल्या गावांचे रस्ते लवासा प्रकल्पामधून जाणारे असतील तर गावकऱ्यांना त्या रस्त्यांचा वापर करण्यास लवासाने प्रतिबंध करु नये. तसेच स्थानिक रहिवाश्यांना लवासाच्या हद्दीतील रुग्णालयामार्फत राजीव गांधी जिवनदायी योजनेचा लाभ मिळणेसंदर्भात आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व उपरोक्त सर्व बाबी बाबतचा कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**"पर्यावरण (संरक्षण) अधिनियम,१९८६ चे अनुपालन न होणे"**

**४.७** पुणे जिल्ह्यातील मुळशी व वेल्हे तालुक्यात ७००० हेक्टर क्षेत्रात थंड हवेचे ठिकाण विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने माहे डिसेंबर, २००२ मध्ये लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड ला तात्पुरते 'ना-हरकत प्रमाणपत्र' (NOC) दिले आणि अटी व शर्ती विनिर्दीष्ट करुन माहे मार्च,२००४ मध्ये २००० हेक्टरसाठी त्याला अंतिम पर्यावरणीय मान्यता देऊन ते रुपांतरीत करण्यात आले. राज्य शासनाने माहे मार्च, २००४ मध्ये प्रकल्पांतर्गत २००० हेक्टर क्षेत्रात बांधकाम करण्यास लवासाला परवानगी दिली असतानाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने (MPCB) ६१८१.३७ हेक्टर जमिनीवर बांधकाम करण्यास मान्यता दिली जे अनियमित होते. तसेच राज्य शासनाने परवानगी देताना १००० मीटर मर्यादे पलिकडे बांधकाम केले जाणार नाही अशी अट नमूद असतानाही लवासा कॉर्पोरेशन लि. या कंपनीने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या परवानगी शिवाय समुद्र सपाटीपासून १००० मीटर पेक्षा जास्त उंचीवर बांधकाम केल्याचे दिसून आले व या अटीचे उल्लंघन झालेले आहे. जे प्रकल्प समुद्र सपाटीपासून १००० मीटर उंचीवर असतील आणि जे प्रकल्प उच्चतम धरतीपासून ५०० मीटर पेक्षा जास्त अंतरावर असतील आणि ज्या प्रकल्पांची मुळ अंदाजित रक्कम रु. ५.०० कोटी पेक्षा जास्त असेल अशा प्रकल्पांना केंद्र शासनाची मंजूरी आवश्यक होती. तसेच जवळपासच्या पाणी साठ्यात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सांडपाणी मिसळले जाणार नाही अशाप्रकारची सांडपाणी निचरा प्रणाली तयार करण्याची आवश्यकता असताना याचे पालन देखील लवासाकडून झालेले नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील तपासणीतही ही बाब स्पष्ट झाली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने STP प्रकल्पासंदर्भात लवासाला कारणे दाखवा नोटीस दिली होती. लवासा कॉर्पोरेशने माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन काम थांबविण्याच्या केंद्र शासनाच्या आदेशास स्थगिती देण्याची विनंती केली होती.

**४.८** त्याचप्रमाणे केंद्र शासनाने तज्ञ समिती गठीत करुन लवासा हिल स्टेशनची स्थळ पाहणी करुन पर्यावरण संरक्षण कायद्याच्या तरतूदींचे उल्लंघन झाले किंवा कसे, याची शहानिशा केली. शहानिशा केल्यानंतर केंद्र शासनाने सदरहू प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीकडे दि.३१/०५/२०११ च्या दिल्ली येथील बैठकीत विचारार्थ घेतला होता. पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीने सदर प्रकल्प प्रवर्तकांवर पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याच्या अधीन राहून पर्यावरण अनुमतीसाठी केंद्र शासनास शिफारस केली होती. त्यानुसार लवासा कॉर्पोरेशनवर माहे जून, २०११ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाने वरील वस्तुस्थिती मा.उच्च न्यायालयास वेळोवेळी निदर्शनास आणून दिली होती व त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने केंद्र शासनाने पर्यावरण विषयक अनुमतीमध्ये घालून दिलेल्या अटींच्या अंमलबजावणीच्या अधीन राहून केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने त्यांच्या दि.०९/०९/२०११ च्या पत्रानुसार लवासा कॉर्पोरेशन टप्पा-१ प्रकल्पास पर्यावरण विषयक अनुमती दिलेली आहे. लवासा कॉर्पोरेशनच्या टप्पा-२ च्या विस्तारीकरणासाठी लवासा कॉर्पोरेशनने राज्य शासनाच्या राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समितीकडे दि.१७/१०/२०१३ व दि.२१/ १०/२०१३ रोजी अर्ज केलेला असून सध्या तो विचारार्थ आहे. यावर शासनाने त्वरीत ३ महिन्याच्या कालावधीत निर्णय घ्यावा. तसेच सांडपाणी निचरा प्रणाली संदर्भात अटींचे उल्लंघन होत असतांना पर्यावरण विभागाने याकडे दुर्लक्ष केले. लवासातील प्रक्रिया केलेले अथवा न केलेले असे कोणतेही सांडपाणी धरणात सोडू नये असे अटी व शर्तीमध्ये नमूद असतानाही त्याचे लवासाकडून पालन झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याचवेळी लवासाने प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणेकरिता लॉन्ड्री, हॉटेल व अन्य युनिट सुरु करणेकरीता परवानगी मिळणेबाबत वेळोवेळी केलेल्या अर्जावर शासनामार्फत कोणतीही कार्यवाही न होणे अथवा त्यावर कोणताही निर्णय घेण्यात न येणे ही बाब देखील समितीला समर्थनीय वाटत नाही. अशा परिस्थितीत लवासाने प्रक्रिया केलेले सांडपाणी कोठे वापरावे हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. या प्रकल्पासाठीचा मुळ आराखडाच मंजूर नसल्यामुळे या व अशा अनेक अडचणी प्रकल्पात निर्माण झाल्या असेही समितीचे मत आहे. बांधकाम १००० मीटरच्या वर जाईपर्यंत विभागाने याकडे लक्ष दिले नाही वा आक्षेपही नोंदविलेला नाही. केंद्राच्या पर्यावरण विभागाने याची दखल घेईपर्यंत राज्य शासनामार्फत सदरहू प्रकरणी कुठलीही दखल घेण्यात आली नव्हती. **लवासामध्ये पर्यावरणाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन होण्यास विभागाने या प्रकरणाकडे केलेले दुर्लक्ष अधिक जबाबदार आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. समिती राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या कामकाजाबाबत तीव्र नापसंती व्यक्त करते व या प्रकरणी राज्य शासनाने पर्यावरण विषयक नियम, करारातील अटी व शर्ती, केंद्र शासनाचे पर्यावरण विषयक नियमाच्या अधिन राहून आवश्यक ती पुढील कारवाई करावी तसेच केंद्र शासनाच्या निर्देशानुसार तात्काळ पर्यावरणासंदर्भातील उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात यावी व टप्पा दोन व त्यापुढील बांधकामात या बाबींची पुनरावृत्ती होणार नाही यांची काळजी घेण्यात यावी. तसेच सांडपाणीबाबत करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्या प्रकरणी तसेच बांधकाम १००० मीटरपेक्षा जास्त होत असतांनाही याकडे दुर्लक्ष केल्या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व या सर्व प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**“MKVDC कडून LCL ला जमीन प्रदान होण्यातील अनियमितता”**

**४.९** खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांच्या अभिलेख्याच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (Maharashtra Krishna Vally Development Corporation) ने मुळशी तालुक्यातील त्यांच्या मालकीचे १४१.१५ हेक्टर क्षेत्रफळ (१२८.७८ एवढे जलमग्न क्षेत्र आणि १२.३६८ एवढे जलमग्न नसलेले क्षेत्र) एवढी जमीन माहे ऑगस्ट, २००२ मध्ये प्रतीवर्ष रु.२.७५ लाख एवढ्या भाडेपट्टीने ३० वर्षांसाठी LCLला दिली होती. जलमग्न असलेली जमिन बंधाऱ्यासाठी किंवा जलक्रीडा प्रकारासाठी वापरावयाची होती. वरसगाव धरणासाठी ताब्यात असलेली अजलमग्न जमीन MKVDC ने अतिरिक्त असल्याचे जाहीर केले. त्यावर LCL ने व्यापारी इमारती (उपहारगृहे, कन्व्हेंशन सेंटर इ.) बांधल्या. सदर बांधकाम शासन निर्णयाशी सुसंगत नसल्याने अनियमितता झाली. सर्वोच्च न्यायालयाने शासनाकडे अतिरिक्त ठरलेल्या जमिनीबाबत दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने ही अतिरिक्त जमिन इतर सार्वजनिक कार्यासाठी वापरावयास हवी होती अथवा तिचा जाहीर लिलाव करावयास हवा होता किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रत्यार्पित करावयास हवी होती. पण खाजगी कंपनीला व्यावसायीक कारणासाठी ती नक्कीच द्यावयाची नव्हती. तरीही सदरहू अतिरिक्त जमीन ३० वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी एखाद्या खाजगी संस्थेला भाडेपट्टीवर देवून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केलेले आहे. सदरहू मुद्द्याबाबत विस्तृत चर्चा करतेवेळी समितीसमोर विभागाकडून असे विदित करण्यात आले की, MKVDC ने सदरहू जमिन अशाप्रकारे देण्याची तरतूद व अधिकार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ कायद्यातील तरतूदीनुसार प्राप्त आहे. तसेच सदरहू परिच्छेदा संदर्भात विभागाने समितीला लेखी स्वरुपात उत्तरादाखल सादर केलेल्या ज्ञापनात या संदर्भातील महामंडळाच्या अधिकाराबाबत स्पष्टपणे विस्तृत उहापोह केलेला आहे. त्यात अशाप्रकारे जमिन देण्याबाबतच्या विहित तरतूदींचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. पुढे खुलाशात शासनाने असेही नमूद केलेले आहे की, लवासाला दिलेली जमिन ही भाडेपट्टा पोटी दिलेली आहे आणि ती कायम स्वरुपात देण्यात आलेली नाही. त्यामुळे परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाचे अपिल क्र.६२८/१९९७ च्या निर्णयाप्रमाणे सदरचा संबंध येत नाही. तसेच बुडीत क्षेत्रातील १२८.७९ हे. जमिन महामंडळास कायम स्वरुपी लागणार आहे. ते पूर्वीपासूनच वरसगाव धरणाचे बुडीत क्षेत्र आहे. सदर जमिन ही अतिरिक्त नसल्यामुळे अतिरिक्त जमिनीची विल्हेवाट लावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असेही विभागाच्या खुलाशात नमूद करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने जमीन भाडेपट्ट्याने देणेबाबत त्यांचे कायदे सल्लागार व महाराष्ट्र राज्यांचे ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेतल्याचे खुलाशात नमूद करण्यात आले आहे.

**४.१०** या संदर्भात समितीसमोर साक्षी दरम्यान चर्चा करताना समितीने असेही मत नोंदविले की, या जमिनीसाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने भाड्या पोटीची ठरविण्यात आलेली रु.२,७५,०००/- ही रक्कम अत्यल्प असून त्यामध्ये शासनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. लवासा कंपनीने बुडीत क्षेत्रा बाहेरील १२.३६ हेक्टर क्षेत्र विकसन योग्य असून सदर क्षेत्रावर कंपनीने विकास केलेला आहे. या १२.३६ हेक्टर जमिनीचा वापर लवासाने वाणिज्यिक वापरासाठी करणे हे महामंडळासोबतच्या झालेल्या करारातील अटी व शर्तीनुसार अपेक्षित नव्हते. त्यामुळे ही बाब करारातील अटींचा भंग करणारी ठरते. अतः या क्षेत्रासाठी सन २००२ चे शीघ्रसिद्ध गणका (रेडिरेकनर) नुसार येणाऱ्या भाडेपट्टा अधिमुल्याच्या एकूण रकमेवर प्रतिवर्षी १०% वाढ करुन येणारा भाडेपट्टा भाडे कराराच्या तारखेपासून भरण्यास लवासाने सहमती दर्शविली. परंतु सदरहू भाडेपट्ट्या पोटीची रक्कम ही अत्यल्प असून ती आजच्या बाजारभावाशी सुसंगत नाही. अतः सदरहू भाडेपट्टा हा रेडिरेकनरच्या दरातील वेळोवेळी (Periodically) होणाऱ्या वाढीवर निश्चित करण्यात यावा व त्यानुसार ही रक्कम वसूल करण्यात यावी असे समितीला वाटते.

**४.११ तथापि, विभागाने सदरहू जमिनीबाबत लेखी ज्ञापनात नमूद केलेली वस्तुस्थिती पाहता व महालेखाकारांनी त्यांच्या आक्षेपात नमूद केलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत केलेला उल्लेख पाहता प्रस्तुत प्रकरणात समितीला विसंगती दिसून येते. अतः या प्रकरणी शासनाच्या विधी व न्याय विभाग व महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता यांचे याबाबत स्पष्ट अभिप्राय तातडीने प्राप्त करुन घ्यावेत व त्याआधारे शासनाने योग्य ती कार्यवाही उपरोक्त प्रकरणी करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४.१२ महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळानी मुळशी तालुक्यातील त्यांच्या मालकीचे १४१.१५ हेक्टर क्षेत्रफळ माहे ऑगस्ट २००२ मध्ये प्रती वर्ष रु. २.७५ लाख एवढ्या भाडेपट्टीने LCL ला दिले. सदर दर अत्यल्प आहेत व यामध्ये सुधारणे करणे आवश्यक आहे. भाडेपट्ट्यापोटीची रक्कम ही रेडीरेकनर दरातील वेळोवेळी होणाऱ्या (Periodically) वाढीवर निश्चित करण्यात यावी व त्याप्रमाणे लवासाकडून भाडेपट्ट्यापोटी रक्कम वसूल करण्यात यावी व समितीच्या उपरोक्त शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**“आदिवासींच्या जमिनी खरेदी करणे”**

**४.१३** माहे नोव्हेंबर आणि डिसेंबर, २०१० मध्ये जमिनीच्या विकासासाठी विकास आयुक्त, उद्योग यांनी ज्या अटींवर परवानगी दिली त्यानुसार अनुसूचित जमातीतील व्यक्तीच्या मालकीच्या जमिनीची खरेदी ही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या विभाग ३६ आणि ३६(अ) तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनीचे पुनःस्थापना अधिनियम, १९७४ च्या तरतूदींच्या अधीन राहून करावयाची असते. महाराष्ट्र जमीन

महसूल संहिता विभाग ३६(अ) नुसार MLR संहिता आणि कुळ वहिवाट कायदा (सुधारणा) अधिनियम, १९७४ लागू झाल्यावर जमातींच्या ताफ्यातील जमीन विक्रीद्वारे (दिवाणी न्यायालयाचे हुकूमनाम्याची अंमलबजावणीद्वारे किंवा न्यायाधिकरणाच्या अथवा प्राधिकाराच्या आदेशानुसार झालेल्या विक्रीसह) भेट म्हणून, अदला-बदलीतून, गहाणखताद्वारे, भाडेपट्टीने किंवा इतर मार्गाने जमातीच्या बाहेरील व्यक्तीस हस्तांतरित केली जावू नये. परंतु जर अशा जमाती बाहेरील व्यक्तीने आवेदन दिले किंवा ५ वर्षे कमी कालावधीसाठी एखाद्या प्रकरणात जमीन भाड्याने, गहाण ठेवली असल्यास जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वसंमतीने आणि इतर प्रकरणात राज्य शासनाच्या पूर्वअनुमतीने जिल्हाधिकाऱ्यांची संमती घेतली असल्यास अशा अपवादात्मक परिस्थितीत हे घडू शकते. तथापि, जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्याच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, मुगांव (ता.मुळशी) गावातील जन-जाती समुहातील (कातकरी) चार व्यक्तींकडून LCL ने जमीन संपादित केली होती. तथापि,जन-जाती समुहातील व्यक्तींकडून जमिन खरेदी करण्यासाठी LCL ने आवश्यक ती पूर्व अनुमती घेतली नाही. आतापर्यंत एकूण १७ प्रकरणात पूर्व परवानगीशिवाय जमीन हस्तांतरण झाल्याचा अहवाल तहसीलदार, मुळशी यांनी दिलेला आहे. सिलींगमध्ये अतिरिक्त ठरलेल्या या जमिनी असून या जमिनींचे वाटप आदिवासींना सरकारतर्फे करण्यात आले होते. त्यावर नवीन शर्त कोरा पडला होता. लवासाने घेतलेल्या आदिवासींच्या जमिनी रजिस्टर्ड करण्यापुर्वी ही बाब शासनाच्या निदर्शनास येणे आवश्यक असुन शासनस्तरावरुन हे व्यवहार त्यावेळी थांबविणे आवश्यक होते. परंतु या जमीनींवर सिलिंग लॅन्डची नोंदच नव्हती. त्यामुळे हे सर्व व्यवहार रजिस्टर्ड झाले ही तर अतिशय गंभीर बाब असून शासनाच्या कार्यपद्धतीवर एकुणच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व विभागाने अशा जमिनीबाबत अधिक जबाबदार व सतर्कतेने काम करणे आवश्यक आहे. **त्याप्रमाणे दोन प्रकरणांमधील जमिनीचा ताबा आदिवासी खातेदारांना दिलेला आहे तर १३ प्रकरणांमध्ये सदर जमिनीचे झालेले हस्तांतरण रद्द ठरवून प्रस्तुत ७२ हे. १५ आर क्षेत्र सरकार जमा करण्याचे आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे अपिल मुदत संपलेनंतर प्रस्तुत क्षेत्र सरकार हक्कात घेण्यात आले. तद्नंतर प्रस्तुतचे क्षेत्र यांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे ३६ व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करणेचा अधिनियम १९७४ मधील तरतूदीनुसार सदर जमिनी मूळ आदिवासी खातेदार यांना प्रत्यार्पित करण्यात येवून गाव दप्तरी अधिकार अभिलेखात आदिवासी खातेदार यांची नावे दाखल करणेत आलेली आहेत. शासनाच्या अभिलेख्यांमध्ये सिलींग जमीनीची नोंद नसण्यासाठी जबाबदार कर्मचारी व अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात यावी तसेच आदिवासींच्या जमिनी विकत घेणेबाबत शासनाच्या नियमांची माहिती आदिवासींना मिळावी याकरिता आदिवासी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. उपरोक्त नमूद क्षेत्राशिवाय LCL ने खरेदी केलेल्या सर्व जमिनींचा शासनाने आढावा घ्यावा व जन-जाती समुहातील व्यक्तींकडून जमिन खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. कायद्यातील तरतूदीनुसार सदरहू क्षेत्रातील जमीनी संबंधित आदिवासी खातेदाराच्या नावे प्रत्यार्पित करुन त्यांची नावे अधिकार अभिलेख्यात नोंदविण्यात यावे. आदिवासींच्या जमिनी परत करणे किंवा शासनखाती जमा करणेबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**"शुल्क/फी इत्यादीमध्ये दिल्या गेलेल्या सुट/सवलती"**

**४.१४** पर्यटन विभागाने दिनांक ०७/०४/१९९९ च्या शासन निर्णयाद्वारे पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्यात आला. त्यानुसार महसूल विभागाकडून सन २००६ व २००७ मध्ये निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार BTAL अधिनियम, १९४८ च्या विभाग ६३ (१) (अ) मधील दुरुस्तीद्वारे लवासाला मुद्रांक शुल्क (४.३१ कोटी रु.) आणि नोंदणी फी (रु. ५.३९ लक्ष) च्या प्रदानात सुट दिलेली आहे, इतर वेळी देय असलेल्या नजराणा (रु. ३.७१ कोटी) फी आणि तत्सम शुल्काच्या प्रदानातही सवलत दिली गेलेली असून ज्या ठिकाणी पर्यटनाच्या उद्देशाने विकास करावयाचा होता फक्त असेच क्षेत्रांना सुट आणि सवलती देणे अपेक्षित असताना जमीन व घरे इ.ची विक्री यासारख्या व्यावसायिक कारणांकरिता ज्या क्षेत्रांचा विकास करण्यात आला होता, त्यामध्ये दिलेली सूट ही समर्थनीय नव्हती. त्यातच शासनाने लवासाला मोठ्या प्रमाणात सवलती व सुट दिलेल्या आहेत परंतु लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडने तेथील स्थानिक जनतेला मुलभूत सोयी-सुविधा, वैद्यकीय आणि शैक्षणिक सुविधा मोफत किंवा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्याचे कोणतेही बंधन लवासावर घातलेले नाही. अशा परिस्थितीत शासनाने दिलेल्या उपरोक्त सवलती समर्थनीय ठरत नाहीत असे महालेखाकारांच्या आक्षेपात नमूद आहे. गृह विभागाने क्र.एमटीडीसी-०३९९/सिआर/२०१/पर्यटन/दिनांक ७/४/१९९९ च्या शासन निर्णयानुसार पर्यटनास उद्योगाचा दर्जा घोषित केला या अधिसूचनेमध्ये हॉटेल्स, हेल्थ क्लब, वॉटर स्पोर्टस अम्युजमेंट पार्क इत्यादी एकुण १४ विषयांचा समावेश होता. या निर्णयातील अनु.क्र.१२ नुसार "गिरीस्थान विकास" या पर्यटन प्रकल्पास सर्व वैधानिक प्रयोजनाकरिता उद्योग म्हणून घोषित केलेले आहे. याशिवाय गृह (पर्यटन) विभागाने शासन निर्णय क्र.एमटिडीसी-०३९९/सिआर/१४२, दिनांक ८.७.१९९९ अन्वये पर्यटनास उद्योगाचा दर्जा देऊन वित्तीय बिगर वित्तीय फायदे, सवलती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यात पर्यटन धोरण, १९९९ अंमलात आणले. त्यामुळे पर्यटन उद्योगास चालना व उत्तेजन मिळेल आणि आर्थिक गुंतवणुकीत वाढ होऊन रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होईल अशा दृष्टीने नवीन सामुहीक प्रोत्साहन योजना धोरण अंमलात आणले. त्यात राज्यातील जिल्हानिहाय क्षेत्राचे ग्रुप ए, बी, सी, डी असे वर्गीकरण केले. त्यानुसार अनुसुची ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुणे जिल्ह्यातील मुळशी व वेल्हा हे तालुके ग्रुप सी मध्ये समाविष्ट आहेत. त्यानंतर शासन अधिसूचना नोंदणी फी-२०००/-१२२९/सिआर-१०६/म-१, दिनांक ४/५/२००१ अन्वये ग्रुप सी, डी, डी+ या क्षेत्रात नवीन उद्योग व उद्योगाचा विस्तार सुरु करणाऱ्या उद्योग घटकास नोंदणी फी ची माफी दिलेली

आहे. तसेच अधिसूचना मुद्रांक क्र.२०००/४२२९/सीआर-१०६४/म-१, दिनांक ५/५/२००१ अन्वये ग्रुप सी, डी, डी+ या क्षेत्रात नवीन उद्योग व उद्योगाचा विस्तार सुरू करणाऱ्या उद्योग घटकास मुद्रांक शुल्काची माफी दिलेली आहे.

**४.१५** उपरोक्त सर्व सवलती या शासनाने पर्यटनास उद्योगाचा दर्जा घोषित केल्यामुळे दिलेल्या आहेत. या सर्व सवलती दिनांक ७.४.१९९९ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद १४ विषयांना लागु होत्या. याचाच अर्थ त्यावेळेपर्यंत लवासा प्रकल्पाला या सवलती लागू नव्हत्या किंवा त्याला नियमानुसार या सवलती देय ठरत नव्हत्या. त्यामुळे सन २००१ साली 'लवासा' हे 'हिल स्टेशन' असल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले व त्यानंतर ते या शुल्क माफी व सवलतीस पात्र ठरले. अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयानुसार लवासाला या सवलती देण्यात आल्या ही जरी वस्तुस्थिती सकृतदर्शनी दिसत असली तरीही हा संपूर्ण घटनाक्रम पाहता लवासा प्रकल्पास नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क व नजराणा फी माफी लागू करणेसाठीच तर प्रकल्पाला हिल स्टेशनचा दर्जा देण्यात आला आहे अशी देखील शंका घेण्यास पूर्ण वाव आहे. तसेच ही शुल्क माफी त्या भागातील सर्वांनाच सरसकट देण्यात आली आहे. त्यात पहिल्या टप्प्यात पर्यटनासाठी, व्यावसायिक कारणांसाठी तसेच वैयक्तिक प्रयोजनासाठी घेतलेल्या सर्वच व्यवहारांवर कोणतेही निकष न लावता सरसकट ही शुल्क माफी देणे नक्कीच समर्थनीय नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी घेतलेले आहेत. परंतु साक्षी दरम्यान असेही निदर्शनास आले की, फक्त पहिल्या व्यवहारासाठी लवासाला मुद्रांक शुल्क, नोंदणी फी यातून सुट दिली जावी असे अधिसूचनेमध्ये नमूद असून त्याअनुषंगाने नंतरच्या सर्व व्यवहारांवर या शुल्कांची आकारणी करण्यात आली आहे व त्यातून शासनास मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त झालेला आहे.

**४.१६ शासनाने फेज-१ बाबतचा निर्णय अगोदरच घेतलेला असुन त्यानुंषगाने कार्यवाही झालेली आहे. भविष्यातील उर्वरीत टप्प्यांबाबत आवश्यकतेनुसार सवलती देणेबाबत शासनाने नियमानुसार निर्णय घ्यावा व व्यवसायिक व वाणिज्यिक वापराच्या बांधकामावर नियमानुसार शुल्क आकारण्यात यावे. अशी समितीची शिफारस आहे.**

**"वतनाच्या जमिनी खरेदीमध्ये देय असलेल्या नजराणा फी ची वसुल न होणे"**

**४.१७** महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दि.०८/०९/१९८३ नुसार भोगवटादार वर्ग-२ शेत जमिन, बिगर शेती प्रयोजनार्थ हस्तांतरीत करण्यासाठी मिळकतीच्या अर्नजित उत्पन्नाच्या ७५% रक्कम शासनास प्रदान करण्याची तरतूद आहे. तसेच शासनाचे परिपत्रक दि.०९/०७/२००२ मधील तरतूदीनुसार इनाम/वतन जमिनीचे पूर्वपरवानगीने बीनशेती प्रयोजनार्थ हस्तांतरण झाले असल्यास ५०% नजराणा रक्कम व विनापरवानगीने हस्तांतरण झाले असल्यास ७५% नजराणा रक्कम शासनास जमा करण्याची तरतूद आहे. तथापि, मुंबई कुळ वहिवाट व शेत जमिन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ १-अ, पोट कलम १ मधील तरतूदीनुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ खरेदी करावयाची जमिन भोगवटादार वर्ग-२ सत्ता प्रकाराची असल्यास खरेदीदारांनी अशा जमिनी कोणत्याही शर्तीवर धारण केली असली तरी खरेदीच्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या कालावधीत खरेदी किंमतीच्या २% एवढी रक्कम जिल्हाधिकारी यांचेकडे जमा करावी अशी तरतूद करण्यात आली आहे. ३० दिवसात २% नजराणा रक्कम जमा केली नसल्यास जमिनीच्या धारणाप्रकारानुसार अनुषंगिक धोरणाप्रमाणे नजराणा रक्कम जमा करणे अपेक्षित आहे. महालेखापालांनी लवासा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या वतन जमिनीच्या एकूण ७२ प्रकरणांवर आक्षेप नोंदविलेला आहे. लवासा कंपनीने जमीन खरेदी केलेल्या ७२ प्रकरणांपैकी ६२ प्रकरणी पूर्व खरेदीदाराने जमिन खरेदी करण्यापूर्वीच मुळ जमिन मालकाने शीघ्रसिद्ध गणकाच्या ५०% नजराणा रक्कम रु.४१,२०,५७३/- शासनखाती जमा करुन या जमिनी भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत केल्या होत्या. त्यामुळे या प्रकरणी लवासा कंपनीने पुन्हा नजराणा रक्कम भरण्याची आवश्यकता नाही असे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. ४ प्रकरणांमध्ये रु.४,३५२/, दिनांक २५ मे, २००९ रोजी व २ प्रकरणांमध्ये रु.५,६४,५२६/-, दिनांक २० जून, २००९ रोजी व वेल्हे तालुक्यातील ४ प्रकरणांमध्ये रक्कम रु.४८,०८,३७७/-, दिनांक १६ ऑगस्ट, २०१४ रोजी वसुल करण्यात आली आहे. एकंदरीत प्रलंबित रक्कम वसुलीची कार्यवाही लेखापरिक्षणात नोंदविलेल्या आक्षेपानंतर जमा करण्यात आली. त्याआधी शासन स्तरावरुन याबाबतची कुठलीही नोंद घेण्यात आली नव्हती. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. शासनाने त्यांना प्राप्त होणाऱ्या महसुलाबाबत सतर्क असले पाहिजे. **अतः उपरोक्त प्रकरणी शासनाने आकारलेली नजराणा फीची रक्कम व ती आकारणीची पद्धत याची पुनर्तपासणी करुन आकारणी बरोबर असल्याची पुन्हा एकदा खात्री करुन घ्यावी. लवासा कॉरपोरेशनने दर सहा महिन्यांनी जमिन खरेदी व त्याच्या वापराबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर करणे बंधनकारक असताना तसा अहवाल सादर न केल्यामुळे सदरहू वसुली करण्यास अमर्याद विलंब झालेला आहे. विभागाने लवासा कॉरपोरेशनला सदर अहवाल वेळीच सादर करणे बंधनकारक करावे व प्राप्त अहवालानुसार लवासाने जमा करावयाची नजराणा फी त्या त्या वेळी शासनखाती जमा केली आहे याची तपासणी करावी व भविष्यातील सर्व व्यवहारांची नजराणा फी वेळेत भरली जाईल याबाबत विभागाने दक्षता घ्यावी. यासंबंधात केलेल्या उपाययोजनेचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**"नजराणा रक्कम वसूल करणे"**

**४.१८** जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अभिलेख्यातील चाचणी तपासणीत असे आढळून आले की, लवासा सिटी कॉर्पोरेशन (LCL) ने औद्योगिक वापरासाठी एकूण रु.४.२३ कोटी बाजारमुल्याच्या २१४.५८ हे. क्षेत्राएवढी कमाल मर्यादेची जमीन खरेदी करण्यासाठी माहे ऑक्टोबर, २००२ ते माहे फेब्रुवारी, २००९ दरम्यान एकूण ९० व्यवहार केले होते यातील एकाही प्रकरणात जिल्हाधिकारी पुणे यांची पुर्वानुमती प्राप्त केली गेली नव्हती. मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ (एक) (अ) मध्ये सुधारणा करून अशाप्रकारची जमीन खरेदी करीत असतांना सिलींगची जमीन सरप्लस धरली होती. सिलींगची अतिरिक्त जमीन जे लोक भूमिहीन होते त्यांना दिलेली आहे. या जमिनीच्या खरेदी विक्रीबाबत ३० दिवसांच्या आत कळविले तर सदर जमिनीच्या चालू बाजार भावाच्या २% प्रमाणे नजराणा लावला जातो. आणि ३० दिवसांच्या आत कळविले नाही तर खरेदी विक्री रकमेच्या ७५% टक्के नजराणा लावला जातो. त्यावेळेस ७५% ची नजराणा आकारणी करताना जो सध्याचा बाजारभाव आणि विक्रीची किंमत यापैकी जी जास्त रक्कम असेल त्या रकमेवर आकारणे आवश्यक असताना तो खरेदीखताच्या किंमतीवर आकारण्यात आला. सद्य:स्थितीत नजराणा फीची शासनाने वसुली केलेली आहे. आता फक्त प्रश्न असा उद्‌भवतो की आकारलेली ७५% टक्के रक्कम ही खरेदीखताच्या आधारावर आकारायची की बाजार भावानुसार ? याबाबत ॲक्टमध्ये व शासन निर्णयात तफावत असल्यामुळे जिल्हाधिकारी, पुणे यांनी याप्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेतले असता त्यांनी खरेदीखताच्या किंमतीच्या आधारे नजराणा रक्कम घेणेबाबत अभिप्राय दिलेले आहे व त्यानुसार रक्कम घेण्यात आली असे साक्षीदरम्यान समितीस सांगण्यात आले. तसेच एक महिन्यात जर खरेदी विक्री बाबत माहिती दिली तर खरेदी किंमतीच्या २ टक्के नजराणा आणि माहिती दिली नाही व शर्तभंग झाला तर कोणत्या किंमतीवर नजराणा आकारावा याबाबत कायद्यामध्ये संदिग्धता असल्याचे समितीस सांगण्यात आले व यासंदर्भात कायद्यामध्ये सुधारणा करुन अधिक स्पष्टता आणण्याची आवश्यकता असल्याचे मतही विभागीय सचिवांनी समितीसमोर विहित केले. ९० पैकी ६४ प्रकरणात रु.११,९०,९१,६४० नजराणा रक्कम भरुन घेण्यात आलेली आहे. **तथापि, २६ प्रकरणांपैकी ११ प्रकरणे लवासाशी संबंधित नाहीत त्यामुळे लवासा कॉर्पोरेशन कंपनीकडून नजराणा रक्कम वसूल करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित १५ प्रकरणांमध्ये आदेश पारित करणेत आलेले आहेत. त्यापैकी ४ प्रकरणांमध्ये लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी २ टक्के रक्कम मुदतीत भरल्यामुळे कार्यवाही रद्द करणेत आलेली आहे. तर दोन प्रकरणांमध्ये रक्कम रु.१,३६,३६९ दिनांक ३० जुलै २०१४ रोजी वसूल करणेत आलेली आहे. ९ प्रकरणांमध्ये लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी केलेले फेरचौकशी अर्ज फेटाळणेत आलेले आहेत. यामुळे पुर्वीचेच आदेशाप्रमाणे रुपये ३,९७,७९,७०१ इतकी रक्कम भरणेबाबत लवासा कॉर्पोरेशन लि. यांचेवर बंधनकारक आहे. तथापि, सदरची रक्कम लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी अद्याप सरकार जमा केलेली नाही. सदरची रक्कम वसूल करणेबाबत उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी, उपविभाग पुणे यांचेकडून कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार संपूर्ण रक्कम वसूल करण्यात यावी तसेच नजराणा आकारणीच्या पद्धतीबाबत शासनाने फेरविचार करुन या प्रकरणांची केलेली आकारणी पुन्हा विभागाने तपासावी व त्याअनुषंगाने योग्य ती कारवाई करावी तसेच नजराणा आकारणीच्या पद्धतीबाबत कायद्यामध्ये अधिक स्पष्टता आणण्याच्या दृष्टीने शासनाने तात्काळ कायद्याला सुधारणा प्रस्तावित करुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच लवासा कॉर्पोरेशनकडून वसुलपात्र नजराणा रक्कम महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपानंतरच वसुलीची कार्यवाही शासनाने सुरु केली. ही अतिशय गंभीर बाब आहे. नजराणा रक्कम वसुलीच्या विलंबास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व भविष्यात या बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच वसुलीची कारवाई परिच्छेदात नमूद प्रकरणांव्यतिरिक्त लवासाशी संबंधित इतर सर्वच प्रकरणांचा आढावा घ्यावा. भविष्यात SPA कडून आराखडे मंजूर करणेपुर्वी त्यासंदर्भात शासनाचे कोणतेही कर अथवा शुल्क थकीत नाही व ते जमा केलेले आहे याची खात्री कागदोपत्री केल्यानंतरच आराखडे मंजूर करावेत. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**"स्वामित्व धनाच्या थकबाकीची वसुली न होणे"**

**४.१९** महालेखापालांच्या लेखापरिक्षणात असे आढळून आले की, लवासा कॉर्पोरेशन लि.ने इमारती, बंगले, दुकाने, कार्यालये, रस्ते आणि धरणे बांधण्यासाठी ८,०८,२४६ ब्रास एवढ्या मुरुमाचे उत्खनन केलेले होते. जिल्हापरिषद आणि महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळ यांचे बरोबर केलेल्या करारानुरुप इतर ठिकाणी उत्खनन करण्यात आले होते. तथापि, मुरुम उत्खननाबद्दल LCL ने रु.१५.०५ कोटी स्वामित्व धन आकाराचे प्रदान केलेले नव्हते. या संदर्भात विभागाने खुलाशामध्ये स्वामित्व धन रक्कम रु. १५.०५ कोटी व दंडाची रक्कम वसुली बाबतचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे स्पष्ट केले आहे. या विषयावर समितीसमोर विस्तृत चर्चा झाल्यानंतर सदरहू न्यायप्रविष्ठ प्रकरणाच्या सद्य:स्थितीबाबत अधिकची माहिती विभागाकडे मागविली असता अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांचे दि. ८ जुलै२०१६ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, "आज अखेर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे संकेतस्थळावर प्रकरणाची सद्य:स्थिती पाहिली असता दि. ८ जुलै २०१० रोजीच्या आदेशानुसार याचिका अंतिम निर्णयासाठी प्रलंबित असल्याने सदर प्रकरणी दंड वसुली सक्तीने करू नये, असे आदेश असल्याचे तहसिलदार, मुळशी यांनी कळविले आहे. त्यामुळे

प्रलंबित रक्कमेची वसुली सक्तीच्या मार्गाने केलेली नाही असे तहसलिदार, मुळशी यांचे म्हणणे असलेचे खनिकर्म शाखेने कळविले आहे." स्वामित्व धनाच्या वसुलीबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणासंदर्भात तसेच अन्य समान प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे फेब्रुवारी,२०१५ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत समितीसमोर विस्तृत चर्चा झालेली असल्याचे कार्यवृत्तावरुन स्पष्ट दिसून येते व या प्रकरणी न्यायालयीन प्रकरणाची या पुढील सद्य:स्थितीबाबतची माहिती देणे विभागीय प्रतिनिधींकडून आवश्यक व अपेक्षित असताना अप्पर जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडून दिनांक ८ जुलै २०१० रोजी माहिती अद्ययावत असल्याचे समितीला लेखी स्वरुपात कळविण्यात आले. सदरहू न्यायालयीन प्रकरण हे अंतिम निर्णयासाठी प्रलंबित नसून केवळ प्रलंबित आहे. **केवळ अन्य समान प्रकरणात दिलेल्या वेगवेगळया निर्णयाच्या आधारे शासन लवासाविरुद्धच्या या प्रकरणामध्ये न्यायालयाकडून कुठलाही निर्णय प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्नशील दिसले नाही. तसेच शासनाला लवासाकडून घेणे असलेल्या एवढ्या मोठ्या स्वामित्व धनाच्या रकमेबाबत शासन गंभीर नाही, सदरहू न्यायप्रविष्ठ प्रकरणाचा पाठपुरावा देखील शासनाकडून योग्यरित्या करण्यात येत नाही, ही बाब शासन व्यवस्थेला नक्कीच पुरक नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः शासनाने या न्यायालयीन प्रकरणी चांगल्या वकिलाची नेमणूक करुन या प्रकरणाचा गांभिर्याने पाठपुरावा करावा. सदरहू प्रकरणी तातडीने न्यायालयाचा निर्णय शासनाच्या बाजूने प्राप्त करुन घेण्याचा पूर्ण प्रयत्न करावा व स्वामित्व धनाच्या प्रकरणाबाबत न्यायालयाच्या निर्णयानुसार स्वामित्व धनाच्या वसुलीबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**"जलक्रीडा आणि मनोरंजनात्मक क्रीडा प्रकाराच्या करमणूक शुल्काची आकारणी न होणे"**

**४.२०** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ च्या विभाग ५ (अ) अ नुसार कुठल्याही जलक्रीडा प्रकारासाठी मालकाने कर आकारुन शासनाला प्रदान करावा, त्याचप्रमाणे विभाग ५ (अ) (i) मधील तरतुदीनुसार जलक्रीडा प्रकार सुरु झाल्याच्या तारखेपासून पहिल्या तीन वर्षासाठी कुठलेही शुल्क आकारले जाऊ नये. त्यानंतरच्या दोन वर्षांसाठी विभाग ५ (अ) (III) अ नुसार पूर्ण करमणूक शुल्क देय होते. LCL ने माहे डिसेंबर,२००८ पासून जलक्रीडा आणि इतर मनोरंजनात्मक क्रीडा प्रकार सुरु केले. जलक्रीडा प्रकार सुरु करण्यासाठी ख्क्ख् ने जिल्हाधिकारी, पुणे यांची परवानगी घेणे आवश्यक होते. तथापि, माहे जुलै,२०११ पर्यंत अशी परवानगी घेतलेली नव्हती आणि LCL कडून करमणूक शुल्क देखील प्रदान केले गेले नाही. महालेखापालांच्या निर्गमन परिषदेत ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर करमणूक शुल्काची वसुली शासनाने केली. **शासनाने करमणूक कराची केलेली आकारणी (Fixation) योग्य व नियमानुसार केली की नाही याची पुनःश्च तपासणी करण्यात यावी. नियमानुसार असे करमणूक शुल्क आकारणी व वसुली न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच सद्य:स्थितीत ज्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाकरीता परवानगी देय नसेल असे कार्यक्रम बंद करण्यात यावेत व ज्या प्रकरणात रितसर परवाना घेतलेला आहे अशा सर्व परवानाधारकांकडून अनुज्ञेय करमणूक शुल्काची संपूर्ण वसुली करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-अ

## सदर अहवालाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली व खाली नमूद केलेली माहिती लोकलेखा समिती कक्षात उपलब्ध आहे.

(१) दिनांक १५ जुलै २०१४ रोजी समितीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून दिनांक १९ जुलै २०१४ रोजी प्राप्त झालेली माहिती. (पृ. क्र. २३, परिच्छेद क्र. १२३ संदर्भात)

(२) Government of India Ministry of Environment & Forest Letter Dated 9th Nov. 2011. (पृ. क्र. २५, परिच्छेद क्र. १.४० संदर्भात)

(३) दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी पर्यावरण विभागाकडून प्राप्त झालेला अहवाल (पृ. क्र. २७, परिच्छेद क्र. १.४७ संदर्भात)

(४) दिनांक १५ जुलै, २०१४ रोजी समितीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाकडून दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी प्राप्त झालेली माहिती. (पृ. क्र. २९, परिच्छेद क्र. १.६१ संदर्भात)

(५) दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी जलसंपदा विभागाकडून प्राप्त झालेली माहिती. (पृ. क्र. २९, परिच्छेद क्र. १.६५ संदर्भात)

(६) दिनांक ११ व १२ सप्टेंबर, २०१५ रोजी लवासा सिटी, पुणे येथाल परिसराची पाहणी व बैठकी दरम्यान जिल्हाधिकारी, पुणे यांनी सादर केलेली माहिती. (पृ. क्र. ६६, परिच्छेद क्र. ३.५३ संदर्भात)

(७) महाधिवक्ता यांचे पत्र दिनांक ८ सप्टेंबर, २०१० (पृ. क्र. ७६, परिच्छेद क्र. ३.१३० संदर्भात)

(८) दिनांक २९ एप्रिल २०१६ रोजीचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी नगरविकास विभागास " लवासा प्रकल्पातील SPA यांनी मंजुरी दिलेल्या विकास परवानग्या " यासंदर्भात प्राप्त झालेली पत्र (पृ. क्र. ८७, परिच्छेद क्र. ३.१७२ संदर्भात)

(९) दिनांक १५ डिसेंबर २०१६ रोजीच्या या सचिवालयाच्या पत्राच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून दिनांक १० जानेवारी २०१७ रोजी प्राप्त झालेली माहिती. (पृ. क्र. ९०, शिफारस क्र. ४.४ संदर्भात)

# परिशिष्ट-ब

**मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०१४**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १५ जुलै २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी ४.३५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) **श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

**सदस्य**

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.

(६) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. यु. के. चव्हाण, अतिरिक्त सचिव

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार

**निमंत्रित—**

**महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई**

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

**महालेखाकार यांचे कार्यालय, नागपूर**

श्रीमती शिला जोग, महालेखाकार

**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. ना.भा.रिंगणे, उप सचिव

**विभागीय प्रतिनिधी.—**

१. श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

२. श्री. गणेश पाटील, अप्पर जिल्हाधिकारी, पुणे.

३. श्री. राजन कोप, सह सचिव तथा संचालक नगर रचना व नगर विकास विभाग.

४. श्री. कमलाकर अकोडे, संचालक नगर रचना, ,पुणे,महाराष्ट्र राज्य

**मदत व पुनर्वसन विभाग**

श्री. मिलिंद म्हैसकर, सचिव

**महसूल व वन विभाग**

श्री. स्वाधीन क्षत्रिय, अपर मुख्य सचिव (महसूल)

श्री. प्रवीण परदेशी, प्रधान सचिव (वने)

श्री. श्रीकर परदेशी, नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,पुणे

श्री. गणेश पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे

**पर्यावरण विभाग**

श्री. आर.ए.राजीव, प्रधान सचिव

**जलसंपदा विभाग**

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव (जलसंपदा)

श्री. एकनाथ पाटील, प्रधान सचिव (लाभक्षेत्र)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात अपर मुख्य सचिव (महसूल), प्रधान सचिव, नगरविकास, पर्यावरण, वने, जलसंपदा विभाग तसेच सचिव, मदत व पुनर्वसन विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २२ जुलै, २०१४**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.२० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. सुनील केदार, वि.स.स.

(४) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(५) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.

(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(७) प्रा.जनार्दन चांदुरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.

२. श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

३. श्री. दि.पु. येवला,अवर सचिव (समिती)

**निमंत्रित.—**

**महालेखाकार कार्यालय, मुंबई व नागपूर**

१. श्रीमती माला सिन्हा,प्रधान महालेखाकार, मुंबई

२. श्रीमती शीला जोग, महालेखाकार,नागपूर

**वित्त व व्यय विभाग, मंत्रालय, मुंबई.**

श्रीमती राधिका रस्तोगी,सचिव, वित्त व व्यय विभाग,

**विभागीय प्रतिनिधी :-**

**महसूल विभाग,मंत्रालय, मुंबई.**

१. श्री. स्वाधीन क्षत्रिय, अपर मुख्य सचिव.

२. श्री. प्रभाकर देशमुख, आयुक्त, पुणे.

३. श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी, पुणे.

४. श्री. गणेश पाटील,अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे.

५. श्री. विलास पाटील, जिल्हाधिकारी, नाशिक.

**नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.**

१. श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव.

२. श्री. राजन कोप, सह सचिव

३. श्री. कमलाकर आकोडे, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य.

**महाराष्ट्र राज्य, प्रदूषण नियंत्रण मंडळ.**

१. श्री. राजीव कुमार मित्तल,सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ.

२. श्री. अभय पिंपरकर, शास्त्रज्ञ.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल), प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी पुणे येथील लवासा कॉर्पोरेशनच्या इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन ४.३० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.
(८) श्री. सत्यजीत पाटील-सरूडकर, वि.स.स.
(९) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१०) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स.
(१२) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. उत्तमसिंग चव्हाण, सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**सादरीकरण**

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

(१) श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी
(२) श्री. प्रदीप पाटील, अपर जिल्हाधिकारी
(३) श्री. रामदास जगताप, उप जिल्हाधिकारी
(४) श्री. सुभाष बोरकर, उप विभागीय अधिकारी, मावळ व मुळशी
(५) श्रीमती मौसमी बर्डे-चौगुले, उप विभागीय अधिकारी, भोर.
(६) श्री. रामलिंग चव्हाण, तहसीलदार, वेल्हा
(७) श्री. प्रशांत ढगे, तहसीलदार, मुळशी.
(८) श्रीमती मोहिनी चव्हाण, करमणूक कर अधिकारी

**जिल्हा परिषद, पुणे**

(१) श्री. कांतिलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्रीमती शालिनी कडू, गट विकास अधिकारी, मुळशी
(३) श्री. जी.व्ही.बैरागी, गट विकास अधिकारी, वेल्हे.

**नगररचना विभाग, पुणे**

श्री. जितेंद्र भोपळे, सहायक संचालक

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे**

(१) श्री. सु. सं. डोके, प्रादेशिक अधिकारी,
(२) श्री. देविदास कोपरकर, उप प्रादेशिक अधिकारी
(३) श्री. सचिन आडकर, क्षेत्र अधिकारी
(४) श्री. राहुल निंबाळकर, क्षेत्र अधिकारी
(५) श्री. दत्तात्रय गवळी, क्षेत्र अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात जिल्हाधिकारी व विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

**शनिवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१५**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक शनिवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ रोजी पुणे येथील लवासा कॉर्पोरेशनच्या इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर येथे सकाळी १०.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(९) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.
(१०) श्री. सत्यजीत पाटील-सरूडकर, वि.स.स.
(११) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१२) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१३) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. उत्तमसिंग चव्हाण, सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात लवासा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या गावातील सरपंच व ग्रामस्थ, मोसे खोरे बचाओ आंदोलनाचे प्रतिनिधी व लवासा कंपनीचे प्रतिनिधी यांचे समवेत बैठक घेतली.

**मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१५**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.
(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(९) सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(१०) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अशोक मोहिते, सह सचिव (१)
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**निमंत्रित.—**

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**

श्रीमती मिनाक्षी मिश्रा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग, मंत्रालय**

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव (वित्तीय सुधारणा)

**विभागीय प्रतिनिधी—**

(१) डॉ.नितीन करीर, प्रधान सचिव
(२) श्री. विकास खारगे, सचिव (प्रभारी), महसूल विभाग
(३) श्री. एस.चोकलिंगम, विभागीय आयुक्त, पुणे
(४) श्री. राजन अ.कोप, संचालक, नगर रचना संचनालय,
(५) श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी, पुणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) व नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.२५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(८) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव

**निमंत्रित.—**

**महालेखाकार यांचे कार्यालय**

श्रीमती मिनाक्षी मिश्रा, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग (लेखा व कोषागारे)**

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्रीमती मालिनी शंकर, अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग
(२) डॉ. नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग
(३) श्री. सतिश गवई, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(४) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री. शि.मा.उपासे, सचिव, जलसंपदा विभाग (लाक्षेवि)
(६) श्री. के.एच.गोविंद राज, सचिव, मदत व पुनर्वसन विभाग
(७) श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी, पुणे
(८) श्री. अ. कि. सुरूशे, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे
(९) श्री. कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे
(१०) श्री. अ.अ.कपोले, अधीक्षक अभियंता, जलसंपदा, पुणे
(११) श्री. आर.बी.घोटे, कार्यकारी संचालक, म. कृ. खो. वि., जलसंपदा, पुणे
(१२) श्री. डी.पी.अनबलरान, सदस्य सचिव, म. प्र. नि. मं.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल), प्रधान सचिव, नगरविकास, जलसंपदा, ग्रामविकास तसेच सचिव, जलसंपदा (लाक्षेवि), मदत व पुनर्वसन विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३३ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(७) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(८) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(९) श्री. सुनील तटकरे, वि.प.स.

(१०) श्री. संजय दत्त,वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

श्री. सो.न.सानप, अवर सचिव

**निमंत्रित.—**

**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव (वित्तीय सुधारणा)

**प्रधान महालेखाकार यांचे कार्यालय**

श्रीमती मीनाक्षी मिश्रा,प्रधान महालेखाकार, मुंबई

श्रीमती शीला जोग, महालेखाकार, नागपूर.

**विभागीय प्रतिनिधी :-**

**नगर विकास विभाग**

श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव (२)

**मदत व पुनर्वसन विभाग**

**डॉ. के. एच.गोविंदराज, सचिव, मदतकार्ये व पुनर्वसन**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र.४.३ संदर्भात सचिव, नगरविकास व मदत व पुनर्वसन विभाग यांची साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी ३१४९–१६ (८००—३-२०१७)

**बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी २-०० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) श्री. सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१०) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(११) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१२) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१३) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१४) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१५) श्री. अमरसिंह पंडित, वि.स.स.

(१६) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.स.स.

(१७) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षांच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र. ४.३ संदर्भात प्रारुप अहवालावर चर्चा झाली.

**गुरुवार, दिनांक २२ सप्टेंबर, २०१६**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी १-५२ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) श्री. योगेश केळकर, वि.स.स.

(८) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(९) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(१२) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र. ४.३ संदर्भातील प्रारुप अहवालावर चर्चा झाली.

**मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर, २०१६**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३-०० वाजता सुरू होऊन दुपारी ५-४५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(८) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(९) श्री. सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१०) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१२) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१३) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(१४) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

(१५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षांच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र. ४.३ संदर्भातील प्रारुप अहवालावर चर्चा झाली.

**बुधवार, दिनांक १ मार्च, २०१७**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक १ मार्च, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी १-४० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो.न. सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ या वर्षांच्या महसुली जमा अहवालावरील परिच्छेद क्र. ४.३ संदर्भातील प्रारुप अहवाल संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई